13-12-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) A-1
SSP/ MHM/ KGS/ 09:30

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**औचित्याच्या मुद्दासंबंधी.**

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मला एक औचित्याचा मुद्दा मांडावयाचा आहे.

**उपसभापती** : ठीक आहे.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, रायगड जिल्हयात नागोठणे येथे असलेल्या आय.पी.सी.एल. कंपनीच्या प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या मिळाव्यात म्हणून काँग्रेसचे कार्यकर्ते श्री.विष्णू पाटील हे उपोषणाला बसलेले आहेत, परंतु त्यांना अलिबाग पोलीस स्टेशनचे प्रमुख श्री.गरुड व उपप्रमुख श्री.सावंत यांनी आणि आणखी काही पोलिसांनी उपोषण स्थळी जाऊन उपोषण सोडण्यासाठी मारहाण केली. माननीय राज्यमंत्री, श्री.रविशेठ पाटील यांचा हा मतदारसंघ असून त्यांचे ते कार्यकर्ते आहेत. तसेच, उपोषणकर्त्यांनी माझ्या जीविताला धोका असल्याचा अर्ज केला आहे. रायगड जिल्हयाचे पालकमंत्री श्री.सुनील तटकरे आणि त्यांच्या कार्यकर्त्यांकडून त्यांना धोका आहे. जनतेसाठी माझा जीव गेला तरी हरकत नाही, अशी उपोषणकर्त्यांची भूमिका आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या भांडणातून हे सर्व होत आहे. त्याठिकाणी त्यांचा बळी जाण्याचा संभव असल्यामुळे आपण त्यांचे उपोषण सोडविण्यासाठी तातडीने प्रयत्न करावेत, ही विनंती. तसेच, प्रकल्पग्रस्तांना नोकरीमध्ये सामावून घेण्याच्या दृष्टीनेही शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी मी याठिकाणी औचित्याच्या मुद्दाद्वारे विनंती करतो.

**उपसभापती** : माननीय मंत्रिमहोदयांनी याची तात्काळ दखल घ्यावी.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, होय.

--------

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अर्धा-तास चर्चा.**

**पृ. शी.** : अनेक उड्डाण पुलावर झालेला खर्च वसूल होऊनही अद्याप पथकर वसुली सुरु असणे

**मु. शी.** : अनेक उड्डाण पुलावर झालेला खर्च वसूल होऊनही अद्याप पथकर वसुली सुरु असणे यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. जयंत प्र. पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा ) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

" महाराष्ट्र शासनाने रस्ते विकास महामंडळाची निर्मिती करुन प्रथमतः मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाचे काम सोपविले त्याच बरोबर कॉरीडोरर्सची सुधारणा करण्यासाठी उड्डाणपूल बांधण्याचे काम सोपविले त्यानुसार मुंबईतील एकूण 50 उड्डाणपुलांपैकी 10 उड्डाणपूल सायन-पनवेल मार्गावर बांधले तसेच इतर उड्डाणपूलही बांधण्यात आलेले असून त्यावर पथकर वसूली सुरु करण्यात आलेली आहे. अनेक पुलावर झालेला खर्च वसूल होऊनही अद्याप पथकर वसुली सुरु असणे, सायन-पनवेल रस्त्याचे रुंदीकरण व मजबुतीकरणाच्या कामास सुरुवात न होणे, त्यामुळे प्रवाशांमध्ये पसरलेला असंतोष याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, युतीच्या काळात बा.ओ.टी. तत्वावर बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा अशाप्रकारचे धोरण ठरविले होते. त्याप्रमाणे राज्यात रस्ते, पूल बांधण्याचा एक क्रांतीकारी निर्णय त्यावेळी घेण्यात आला. प्रामुख्याने त्या काळात पुणे-मुंबई व मुंबईअंतर्गत उड्डाणपूल बांधण्यात आले. त्याचे शिल्पकार माजी मंत्री, श्री.नितीनजी गडकरी साहेब आहेत. त्यावेळी शासनातर्फे सांगण्यात आले होते की, या प्रकल्पांच्या रकमेची वसुली झाल्यानंतर त्याठिकाणी कर लावला जाणार नाही, त्याठिकाणी टोल लावला जाणार नाही अशाप्रकारचे धोरण या सभागृहामध्ये जाहीर झाले होते. तसेच, अनेकवेळा याठिकाणी सांगण्यात आले की, प्रकल्पाची रक्कम वसूल झाल्यानंतर लगेच तो प्रकल्प आम्ही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित देऊ व त्याचे मेंटेनन्स सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून करु. परंतु तसे होत नाही. वाशीच्या ब्रिजचा प्रस्तावित खर्च 270 कोटी रुपयांचा होता व त्याठिकाणी एकूण 8 उड्डाणपूल होणार होते. परंतु त्याठिकाणी फक्त एकच उड्डाणपूल बांधला गेला, त्याठिकाणी फक्त 199 कोटी रुपयांचाच खर्च झालेला आहे.

(नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.........

प्रत्यक्ष पूल बांधल्यापासून महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाला 452 कोटी रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाले आहे. 12 टक्के असलेले कर्जाचे व्याज आता कमी झालेले आहे. रस्ते विकास महामंडळाला मी स्वत: रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत 100 कोटी रुपये दोन वेळा दिलेले आहेत. या कर्जासाठी सुरुवातीला 16 टक्के व्याज होते ते कमी होऊन 12 टक्क्यांवर आले आणि आता तेही कमी होऊन 9 टक्के व्याजाचा दर आहे. त्यामुळे व्याजाचा दर देखील कमी कमी होत चालला आहे. या प्रोजेक्टचे सर्व पैसे वसूल झालेले असल्याने टोल ताबडतोब बंद करणे आवश्यक आहे आणि हा प्रोजेक्ट सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारीत दिला पाहिजे. या प्रोजेक्टचे मेंटेनन्स शासनाच्या उत्पन्नातून झाले पाहिजे नाही तर बी.ओ.टी.तत्वाला काहीही अर्थ राहणार नाही. 12 वर्षानंतर या प्रोजेक्टचा टोल बंद होणार आहे. त्यानंतर केवळ एखादा रस्ता दुरुस्त करावयाचा आणि टोलची मुदत वाढवून घ्यायची, अशा प्रकारचा कार्यक्रम या महामंडळामार्फत सुरु आहे. यासाठी शासन जी परवानगी देते ती चुकीची आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. सभापती महोदय, आपण आमच्या शेजारच्या जिल्हयातील आहात त्यामुळे यासंबंधीची आपल्याला जाणीव आहे. अलिबाग येथून निघाल्यानंतर 150 रुपये टोल भरावा लागत आहे. त्यापुढे पुन्हा धरमतर, खारपाडा या ठिकाणी देखील टोल आहेत व तेथेही सामान्य जनतेला टोल भराव लागतो. अशा प्रकारचे एक संकट तेथील लोकांवर आलेले आहे.

सभापती महोदय, प्रामुख्याने ही चर्चा मी का उपस्थित केली ? याचा विचार केला तर मुंबई हायकोर्टामध्ये श्री.विनायक व्ही.दळवी यांनी एक रिट याचिका दाखल केलेली आहे व रस्ते विकास महामंडळाला प्रतिवादी करण्यात आलेले आहे. या रिट याचिकेच्या संदर्भात शासनाने हायकोर्टामध्ये जे ॲफेडेव्हिट केलेले आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की, 30 वर्षामध्ये प्रोजेक्टचा खर्च वसूल झाला तर तेथील पथकर रद्द करण्यात येईल. माझ्याकडे या प्रकरणाची सर्व कागदपत्रे आहेत. रस्ते विकास महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि अर्थ विभागाची यासंदर्भात एक बैठक झाली. त्यावेळी अर्थखात्याने असे सांगितले की, हा पथकर बंद करुन प्रोजेक्ट सार्वजनिक बांधकाम खात्याकडे वर्ग करावयास हवा. रस्ते विकास महामंडळ हे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारित आहे. सन्माननीय मंत्री, श्री.अनिल देशमुख यांना मी सांगू इच्छितो

श्री.जयंत प्र.पाटील...............

की, आपल्या महामंडळाच्या वतीने शासनाने एक एजन्सी निर्माण केलेली आहे, आपले खाते स्वतंत्र नाही. मंत्र्यांची सोय करण्यासाठी, प्रत्येकाला संधी मिळण्यासाठी म्हणून हे महामंडळ काढण्यात आलेले आहे. सभागृहात बहुतांश मंत्रीमहोदय असे सांगत असतात की, हायकोर्टाचे आदेश असल्यामुळे, निर्देश असल्यामुळे आम्हाला अमुक अमुक गोष्ट करता येणार नाही. मग या प्रकरणीही हायकोर्टाने निर्देश दिलेले आहेत. तुमच्या खात्याचे अधिकारी काय करीत आहेत ? सचिव काय करीत आहेत ? त्या ठिकाणी जी वाहतुक सुरुवातीला अपेक्षित धरण्यात आली होती त्यापेक्षा कितीतरी पटीने वाहतुक गेल्या 4 वर्षामध्ये वाढलेली आहे. त्यामुळे तातडीने हे दोन्ही प्रोजेक्ट सार्वजनिक बांधकाम खात्याकडे वर्ग केले पाहिजेत व त्या ठिकाणी असलेला टोल बंद केला पाहिजे. या टोलची मुदत सन 2008 पर्यन्त होती.

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील ..........

रस्ते विकास महामंडळ सांगते की, आम्ही 2008 पर्यंत टोल वसूल करु. पनवेल-सायन रस्त्याचे रुंदीकरण करण्याचा रस्ते विकास महामंडळाचा प्रस्ताव आहे व त्या अनुषंगाने रस्ते विकास महामंडळाला आणखी एक टोल वाढवावयाचा आहे. त्यामुळे असा प्रश्न पडतो की, शासन टोल वसूल करण्याचे काम करते की जनतेसाठी सुविधा निर्माण करण्याचे काम करते ? या अर्धातास चर्चेच्या निमित्ताने माझी मागणी आहे की, या ठिकाणचा टोल ताबडतोब रद्द करावा आणि रस्ते विकास महामंडळाने हा प्रोजेक्ट सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करावा. अन्यथा न्यायालयाचा अवमान होऊ शकतो. महामंडळाने हायकोर्टामध्ये सादर केलेले ॲफिडेव्हीट माझ्याकडे उपलब्ध आहे. बांधकाम विभागाच्या आणि रस्ते विकास महामंडळाच्या ज्या दोन-तीन बैठका झाल्या त्या बैठकीचे इतिवृत्त माझ्याकडे उपलब्ध आहे. ते इतिवृत्त मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे. उद्या अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते की, घरातून बाहेर पडल्यानंतर 500-1000 रुपये टोल भरल्याशिवाय गाडी चालविता येणार नाही. टप्याटप्याने टोल वसूल केला जातो हे मला मान्य आहे. पण बाकीच्या भागामध्ये देखील प्रोजेक्ट उभे करावयाचे आहेत व त्या भागातील जनता वंचित राहू शकेल. रस्ते विकास महामंडळाच्यावतीने बांधा वापरा आणि हस्तांतरित करा अशा प्रकारचे धोरण स्वीकारण्यात आलेले आहे. असे असतांना आता जे चालले आहे ते बरोबर नाही. त्यामुळे शासनाने हा टोल ताबडतोब रद्द केला पाहिजे. महामंडळाने हायकोर्टामध्ये जे ॲफिडेव्हीट सादर केलेले आहे त्यामध्ये टोल रद्द करण्याची हमी दिलेली आहे. त्याची ताबडतोब अंमलबजावणी केली पाहिजे, अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सायन-पनवेल मार्गावर जो टोल वसूल केला जातो त्यासंदर्भात सभागृहासमोर विचार मांडलेले आहेत. कोणताही प्रोजेक्ट तयार झाल्यानंतर त्या प्रोजेक्टसाठी आलेल्या खर्चाची रक्कम वसूल झाल्यानंतर टोल वसूल करणे बंद केले पाहिजे, असे शासनाचे धोरण आहे. मुंबईमध्ये एकूण 50 उड्डाण पूल आहेत त्यावर टोल आकारला जातो. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, प्रकल्पाची संपूर्ण किंमत वसूल झालेली असल्यामुळे टोल आकारणे बंद करावे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, प्रकल्पाची किंमत वसूल झाल्यानंतर टोल वसुली थांबविली पाहिजे, असे शासनाचे धोरण आहे आणि हायकोर्टाने शासनाला तसे आदेश दिलेले आहेत. या प्रोजेक्टवर झालेला खर्च अद्याप वसूल झालेला नाही. म्हणून आपण टोल वसूल करीत आहोत. या प्रोजेक्टसाठी महामंडळाने बँकेकडून कर्ज घेतले होते. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी येथे आकडेवारी दिलेली आहे. त्यांनी जी आकडेवारी सादर केलेली आहे ती अपूर्ण आहे. प्रोजेक्ट तयार करीत असतांना महामंडळाने बँकेकडून कर्ज घेतले होते. त्या कर्जाच्या व्याजाच्या रक्कमेचा यामध्ये समावेश करण्यात आलेला नाही. ठाणे खाडी पूल, कळंबोली उड्डाण पूल, पनवेल बायपास यासाठी 90 कोटी रुपये खर्च झालेला आहे त्याचा यामध्ये समावेश करण्यात आलेला नाही. त्याच बरोब गॅरंटी फीचा यामध्ये समावेश करण्यात आलेला नाही. सायन-पनवेल हा 30 किलोमीटरचा रस्ता आहे. या मार्गावर 8 उड्डाण पूल आहेत त्याच्या खर्चाचा यामध्ये समावेश करण्यात आलेला नाही.

यानंतर श्री.सुंबरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख .....

त्याचबरोबर डिझेल-पेट्रोल सेस देखील आपण जमा करतो. मुंबईतील सर्व प्रकल्पातील खर्च वसूल करून हा सेस आपण जमा करीत आहोत. त्याबाबतीतील नियम असा आहे की, ज्या ठिकाणी तूट असेल ती यातून भरून काढावी. त्यामुळे हा डिझेज-पेट्रोल सेस यामध्ये लोड करता येणार नाही. सभापती महोदय, कामोठे आणि उरण उड्डाणपूल बांधला त्याच्या 65 कोटीचा या हिशोबात समावेश केला गेलेला नाही. ठाणे खाडीपूल बांधला त्यावरील 98 कोटी खर्चाहाही यात समावेश केला गेलेला नाही. तसेच तुर्भे पुलाचे 16 कोटी आणि रूंदीकरणाचे 41उ असे एकूण 57 कोटी रूपये खर्चाचाही यात समावेश करण्यात आलेला नाही. त्याचबरोबर सरकारकडून 310 कोटी रूपये या महामंडळाला मिळणार होते त्यापैकी केवळ 5 कोटी रूपये मिळाले आहेत आणि बाकी पैसे अजून मिळावयाचे आहेत, तेही यामध्ये जमेस धरावयास पाहिजेत. बाकीचे अन्य उड्डाणपूल आहेत मग त्यात कापूरबावडी येथील उड्डाणपूल आणि पेडररोड येथील उड्डाणपूलाचा देखील समावेश यात नाही. सभापती महोदय, एखापा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर त्याची किंमत पूर्णत: वसूल झाल्यानंतर टोल बंद झाला पाहिजे याबाबत दुमत नाही. तसे आपले धोरण आहेच आणि मी आपल्याला या ठिकाणी ग्वाही देऊ इच्छितो की, ज्या दिवशी या संपूर्ण प्रकल्पाची किंमत वसूल होईल त्याच दिवशी टोल बंद केला जाईल. सभापती महोदय, या बाबतीत मंत्रिमंडळ बैठकीमध्ये देखील सविस्तर चर्चा झाली आहे आणि इन्फ्रास्ट्रक्चर कमिटी आहे तिच्यासमोर देखील याबाबत चर्चा झाली आहे. तेथे आम्ळी आमची बाजू मांडली तसेच बांधकाम खात्याने देखील त्यांची बाजू मांडली. त्यावर कॅबिनेट सबकमिटीने निर्णय घेतला की, आमचा आणि बांधकाम खात्याचा जो काही हिशोब आहे तो वित्त विभागाने तपासून पहावा. ही तपासणी केल्यानंतर वित्त विभागाचेही असे मत झाले की, आमचा हिशोब बरोबर आहे आणि प्रकल्पाचा संपूर्ण खर्च टोल मधून वसूल झालेला नाही तर टोल वसुली चालू ठेवावी आणि वित्त विभागाला असे वाटले की, प्रकल्पाची संपूर्ण किंमत वसूल झालेली आहे तर मग हे सारे उड्डाण पूल आणि रस्ते सा.बांधकाम विभागाला सुपूर्द करावेत. याबाबत समितीचे प्रोसिडींग माझ्याकडे आहे त्यामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, वित्त विभागाच्या पडताळणीप्रमाणे नोव्हेंबर 2008 पर्यंत केलेल्या खर्चाची पूर्णपणे वसुली टोलमार्फत होणार असेल तर सदरचे काम 'बांधा, वापरा व हस्तांतरित करा' तत्त्वावर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करावे अन्यथा सदरचे काम 'बांधा, वापरा व हस्तांतरित करा' या तत्त्वावर महाराष्ट्र राज्य रस्ते

...... डी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .....

विमास महामंडळामार्फत करण्यात यावे. त्यामुळे आपण जी आकडेवारी दिलेली आहे ती आणि आमची आकडेवारी आहे त्याची संपूर्ण पडताळणी वित्त विभाग करणार आहे आणि याबाबत निर्णय घेणार आहे. त्यांचा जो काही निर्णय ते देणार आहेत तो निर्णय आम्हाला मान्य राहील इतकेच मी या प्रसंगी आपल्याला सांगू इच्छितो.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी या ठिकाणी ही चर्चा उपस्थित केलेली आहे. परंतु या ठिकाणी माननीय मंत्री महोदय थोडासा बुद्धीभेद करीत आहेत. यामध्ये केवळ पाच प्रकल्पांचा समावेश आहे. बाकी ठाणे, चेंबूर वगैरे सगळे प्रकल्प आहेत ते वेगळे आहेत. त्याचीही आकडेवारी आता देखील माझ्याकडे उपलब्ध आहे. शासनातर्फे पेट्रोल-डिझेल सेस म्हणून 452.36 कोटी रूपये महामंडळाला दिलेले आहेत. दुसरे असे की, या प्रकल्पाचा वाशी पूल, तुर्भे पूल इत्यादींमधून 189.99 कोटी एवढे उत्पन्न वसूल होते. बाकी प्रकल्पांचा यामध्ये समावेश करण्याची गरज नाही. आपण एक एक प्रकल्प घेऊन, तो पूर्ण करून सार्वजनिक बांधकाम खात्याला देऊन टाकावा. ....

( यानंतर श्री. सरफरे .... इ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

दुसरी गोष्ट अशी की, कळंबोली बायपास या रस्त्याला जे.एन.पी.टी. ने पैसे दिले आहेत. आणि त्या रस्त्याचा टोल आपण वसूल करीत आहात. शिरढोण ते जे.एन.पी.टी. हा रस्ता तयार झाला, त्यामधून तुम्ही टोल वसूल करीत आहात. त्या दृष्टीकोनातून सभागृहाला माहिती मिळाली पाहिजे. मंत्रिमहोदयांची गाडी देखील त्या कळंबोली बायपास रोडवरुन येते. त्यामुळे या कळंबोली बायपास रोडच्या बाबतीत ठरलेले ॲग्रिमेंट आहे असे असतांना आपले अर्थ खाते आणखी दोन वर्षे जनतेकडून टोल टॅक्स वसूल करणार आहे हे बरोबर नाही. शासनाच्या अर्थ खात्याकडे ॲग्रिमेंटचे डॉक्युमेंट्स आहेत. म्हणून माझी मागणी आहे की, हा संपूर्ण प्रोजेक्ट बांधकाम खात्याकडे तातडीने वर्ग केला पाहिजे.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, मला एकच विचारावयाचे आहे की, हा टोल टॅक्स कमी करणे आणि वाढविणे यासंबंधीची तरतूद कशाप्रकारे केली जाते? त्यासंबंधीचे नेमके धोरण काय? टोल टॅक्स सुरुवातीला लावल्यानंतर तो दुपटीने वाढविला जातो, त्यानंतर तो कमी केला जातो. या संदर्भात आपले नेमके धोरण काय आहे? त्यासाठी तरतूद काय आहे? ही गोष्ट खरी आहे की, जसजशी वर्षे उलटतील तसतसा हा टोल टॅक्स कमी झाला पाहिजे. परंतु तो वाढत गेला आहे याबाबत आपण खुलासा करावा.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, मी मघाशी माझ्या उत्तरामध्ये सांगितले आहे की, या संपूर्ण प्रकल्पाची किंमत वसूल झाल्यानंतर तो बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत होणार आहे. त्याकरीता आकडेवारीची पडताळणी वित्त विभाग आणि बांधकाम विभागामार्फत चालू आहे. संपूर्ण आकडेवारीची तपासणी झाल्यानंतर वित्त विभाग जो निर्णय घेईल तो सर्वांना मान्य होईल. जर उद्या वित्त विभागाने म्हटले की, या प्रकल्पाची किंमत 2008 किंवा 2010 पर्यंत वसूल होईल, त्यावेळी आपण वसूली बंद करु. त्यामुळे संपूर्ण आकडेवारीची तपासणी वित्त विभागामार्फत झ ााल्यानंतर व त्यासंबंधीचा निर्णय झाल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल. माननीय सदस्यांनी टोलच्या बाबतीत प्रश्न विचारला. सायन ते पनवेल या प्रकल्पासाठी टोल लावतांना संपूर्ण हिशेब करुन त्या प्रकल्पाची किंमत 3 किंवा 5 वर्षामध्ये किती वसूल होईल, आणि ती जर वसूल झाली नाही तर पुढील तीन वर्षामध्ये आकारणीमध्ये किती वाढ करणे आवश्यक आहे याचा हिशेब करुन 10 टक्के, 15 टक्के वाढ केली जाते. अशापध्दतीने ही आकारणी 5 टक्क्यापासून 25 टक्क्यापर्यंत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KGS/ MHM/ MHM/

श्री. अनिल देशमुख...

सुध्दा वाढविली जाते. जेव्हा याकरीता टेंडर काढले जाते त्यावेळी पुढील किती वर्षामध्ये टोल वाढविला जाणार आहे याचा संपूर्ण हिशेब करुन आकडेवारी तयार केलेली असते.

उपसभापती : मंत्रिमहोदय, आपण घोडबंदर रस्ता करावयास घेतला आहे, तो रस्ता कापूरबावडी जंक्शनजवळ ठाण्याला मिळतो. त्या कापूरबावडी जंक्शनवर उड्डाण पूल झाला नाहीतर तुमची मूळ संकल्पना पूर्णपणे धुळीला मिळेल. त्यामुळे कापूरबावडी जंक्शनवर उड्डाण पूल होणे आवश्यक आहे. त्याकरीता आपण ठाणे महानगरपालिकेला काहीतरी कॉट्रीब्युशन करावयास सांगितले आहे. त्यांनी कॉट्रीब्युशन केले आहे की नाही याची मला कल्पना नाही. परंतु उड्डाण पूलाअभावी हा प्रकल्प निष्प्रभ झाला असे होऊ नये म्हणून योग्य ती तरतूद करुन त्याठिकाणी आज जे काम चालू आहे त्याला जोडून कापूरबावडी जंक्शन करावे अशी माझी सूचना आहे.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, आपण उपस्थित केलेल्या मुद्दयाची मला कल्पना आहे. मधल्या काळात या कामासाठी ठाणे महानगरपालिकेला पैसे दिले होते, परंतु ठाणे महानगरपालिकेने ते पैसे दुसऱ्या कामासाठी वापरले. आपण घोडबंदर रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन केले त्यावेळी आपण केलेल्या मागणीनुसार रस्ते विकास महामंडळ कापूर बावडी उड्डाण पूलाचे काम नक्की करील असे मी कबूल केले आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**अर्धातास चर्चेसंबंधी**

**उपसभापती** : आता दुसरी अर्धातासाची चर्चा प्रा.शरद पाटील यांची आहे.

श्री.वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मला आता एका महत्वाच्या बैठकीसाठी जावयाचे असल्यामुळे माझ्या विभागाची ही अर्धातासाची चर्चा शेवटी घेण्यात यावी. तसे सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील साहेबांना मी बोललेलो आहे. त्यांची ही चर्चा शेवटी घेण्यास हरकत नाही. आपण तशी परवानगी द्यावी.

**उपसभापती** : ठीक आहे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ KTG/ MHM/

**पृ.शी.** : राज्यातील उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांना शालेय शिक्षण विभागाप्रमाणे व ग्रामविकास विभागाप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करणे.

**मु.शी.** : राज्यातील उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांना शालेय शिक्षण विभागाप्रमाणे व ग्रामविकास विभागाप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करणे यासंबंधी श्री.रामनाथ मोते,वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धातास चर्चा उपस्थित करतो :-

"राज्यातील उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या वेतनश्रेणीचा प्रश्न अनेक वर्षे प्रलंबित असणे, शालेय शिक्षण विभागाने दिनांक 3 जून 2000 च्या शासन निर्णयानुसार उच्च माध्यमिक शिक्षकांना माहे मार्च, 2000 पासून 6500 ऐवजी 7225 ची वेतनश्रेणी मान्य करणे, ग्रामविकास विभागातील उच्च माध्यमिक शिक्षकांना दिनांक 11 नोव्हेंबर, 2005 च्या शासन निर्णयानुसार शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर मार्च, 2000 पासून 7225 ची सुधारित वेतनश्रेणी मान्य करणे, आदिवासी आश्रमशाळांमधील उच्च माध्यमिक शिक्षकांचा प्रश्न गेली 6 वर्षे प्रलंबित असणे, याबाबत चर्चा झ ाल्यानंतर, 7225 ची वेतनश्रेणी दिनांक 1 जुलै, 2006 पासून लागू करण्याचा निर्णय घेणे व दिनांक 1 मार्च, 2000 पासून सुधारित वेतनश्रेणी नाकारणे परिणामत: निवृत्ती वेतनावर होणारा विपरीत परिणाम तसेच आदिवासी भागातील शिक्षकांवर झालेला घोर अन्याय, त्यामुळे दिनांक 1 मार्च, 2000 पासून सुधारित वेतनश्रेणी शालेय शिक्षण विभगाप्रमाणे व ग्रामविकास विभागाप्रमाणे लागू होण्याची आवश्यकता व त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून आदिवासी विभागामध्ये काम करणाऱ्या आश्रमशाळेमधील उच्च माध्यमिक शिक्षकांचा अत्यंत महत्वा प्रश्न मी उपस्थित केलेला आहे. सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये वेगवेगळ्या विभागामार्फत प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा चालविल्या जातात. काही शाळा या शालेय शिक्षण विभागामार्फत चालविल्या जातात, काही शाळा ग्रामविकास खात्यामार्फत चालविल्या जातात, काही शाळा आदिवासी विभागामार्फत चालविल्या जातात. त्याच्यावर त्या त्या विभागाचे नियंत्रण असते. तथापि या सर्व विभागांमार्फत चालविल्या जाणाऱ्या माध्यमिक उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांच्या सेवाशर्ती, समान वेतन असावे असे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ KTG/ MHM/

श्री.रामनाथ मोते (पुढे सुरू....

शासनाचे धोरण आहे. शालेय शिक्षण विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमध्ये काम करणाऱ्या पूर्णवेळ शिक्षकांना पाचव्या वेतनआयोगाप्रमाणे वेतनश्रेणी देण्यात आली, ती अन्याय करणारी होती. त्या संदर्भात आंदोलन झाले. शासनालाही या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करणे आवश्यक वाटले म्हणून शासनाने यासंबंधीचा धोरणात्मक निर्णय घेतला. 3 जून 2000 च्या शासन निर्णयानुसार उच्च माध्यमिक शाळांमध्ये पूर्ण वेळ काम करणाऱ्या शिक्षकांना 6500 ऐवजी 7225-11050 ही वेतनश्रेणी 1 मार्च 2000 पासून लागू केली. त्यानंतर त्या संदर्भातील थकबाकीही मिळाली. ग्रामविकास विभागातील जिल्हा परिषदेच्या उच्च माध्यमिक विभागात काम करणाऱ्या शिक्षकांना 6500 ची वेतनश्रेणी मिळाली होती. त्यांना शालेय शिक्षण विभागाप्रमाणे 6500 ऐवजी 7225 ची वेतनश्रेणी मिळणे गरजेचे होते. त्या संदर्भात शासनाकडे निवेदन केले, शासनाशी चर्चा केली आणि शासनाने याबाबत सहानुभूतीने विचार करून शालेय शिक्षण विभागाच्या उच्च माध्यमिक शिक्षकांप्रमाणे जिल्हापरिषेच्या उच्च माध्यमिक शिक्षकांना 6500 ऐवजी 7225 ही वेतनश्रेणी देण्याचे मान्य केले. या संदर्भातील आदेश 11 नोव्हेंबर 2005 रोजी निघाला आणि जिल्हा परिषदेच्या उच्च माध्यमिक विभागात काम करणाऱ्या शिक्षकांना 7225-11050 ही वेतनश्रेणी लागू झाली. शालेय शिक्षण विभागाने 1 मार्च 2000 ला सुधारित वेतनश्रेणी लागू केली त्यासंबंधातील थकबाकी देण्यात आली.

सभापती महोदय, आदिवासी आश्रमशाळेमध्ये काम करणाऱ्या उच्च माध्यमिक शिक्षकांचा प्रश्न प्रलंबित आहे. आश्रमशाळेमध्ये काम करणारे शिक्षक हे शहरापासून दूरवर रहातात. त्यांना घरभाडे भत्ता मिळत नाही. आमच्या शहरी भागातील शिक्षकांना 30 टक्के घरभाडे भत्ता मिळतो आणि आश्रमशाळेमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना 5 टक्के घरभाडे भत्ता मिळतो.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

मूळ वेतनाच्या 30 टक्के आणि मूळ वेतनाच्या 5 टक्के याप्रमाणे हा भत्ता मिळणार. अशी आमच्या आश्रमशाळेमध्ये आदिवासी भागामध्ये काम करणाऱ्या शिक्षकांची अवस्था आहे. आमचा प्रश्न फक्त या भत्त्याबद्दल नव्हता. आमचा प्रश्न असा आहे की, शालेय शिक्षण विभागाने 1 मार्च, 2000 ला सुधारित वेतनश्रेणी लागू केली. ग्रामविकास विभागाने जिल्हापरिषदेच्या उच्च माध्यमिक शिक्षकांना 1 मार्च, 2000 पासून सुधारित वेतनश्रेणी लागू केली. फक्त त्यांनी जी. आर. थोडा उशिरा काढला. मात्र आदिवासी आश्रमशाळेमध्ये काम करणाऱ्या उच्च माध्यमिक शिक्षकांचा प्रश्न प्रलंबित होता. त्यासंदर्भात या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झाली. आदिवासी विभागाने सुध्दा शालेय शिक्षण विभागाप्रमाणे आणि ग्रामविकास विभागाप्रमाणे या शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करणे हे नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने बरोबर आहे हे मान्य करुन आदिवासी विभागामध्ये काम करणाऱ्या उच्च माध्यमिक शिक्षकांना 7225-11050 ही वेतनश्रेणी लागू केली. त्यासंदर्भातील आदेश 3 ऑक्टोबर, 2006 रोजी निघाले. मात्र हे आदेश काढल्यानंतर त्यामध्ये शासनाने जी एक अट घातलेली आहे ती या आश्रमशाळांमध्ये काम करणाऱ्या, आदिवासी भागामध्ये काम करणाऱ्या शिक्षकांवर अन्याय करणारी आहे. शालेय शिक्षण विभागातील शिक्षकांप्रमाणे, ग्रामविकास विभागातील शिक्षकांप्रमाणे त्यांना जी वेतनश्रेणी अनुज्ञेय होती, जी वेतनश्रेणी द्यावयास पाहिजे होती ती वेतनश्रेणी दिलेली आहे परंतु या आदेशामध्ये जी सुधारित वेतनश्रेणी लागू केलेली आहे ती 1 जुलै, 2006 पासून लागू केलेली आहे. याचा अर्थ मागच्या सहा वर्षाचा जो काही फरक मिळावयास पाहिजे होता किंवा तेव्हापासून वेतनश्रेणी लागू करावयास पाहिजे होती त्याप्रमाणे ती लागू केलेली नाही. याचे किती दुष्परिणाम होऊ शकतात याचे मी मुद्दाम विवेचन करतो. शालेय शिक्षण विभागामध्ये जी सुधारित वेतनश्रेणी लागू झाली ती 1 मार्च 2000 पासून लागू झाली. शालेय शिक्षण विभागामधील शिक्षक 1 मार्च, 2000 पासून 7225 ची वेतनश्रेणी घेणार आणि तेव्हापासून काम करणारा आदिवासी आश्रमशाळेतील शिक्षकाला मात्र 1 जुलै, 2006 पासून 7225 च्या वेतनश्रेणीप्रमाणे वेतन मिळणार. याचा अर्थ शालेय शिक्षण विभागाचा शिक्षक सुधारित वेतनश्रेणीप्रमाणे 1 जुलै, 2006 ला 8475 या मूळ वेतनावर पोहोचतो. परंतु आदिवासी आश्रमशाळातील शिक्षकांना ती वेतनश्रेणी आता लागू केल्यामुळे, त्याचा इफेक्ट 1 जुलै, 2006

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

पासून दिल्यामुळे या विभागातील शिक्षक त्यावेळी 7225 च्या मूळ वेतनावर असणार. याचा अर्थ एकाच विभागामध्ये काम करणाऱ्या दोन शिक्षकांमध्ये, समान वेतनश्रेणीमध्ये काम करणाऱ्या या शिक्षकांच्या मूळ वेतनामध्ये 1250 रुपयांचा फरक पडतो. केवळ मूळ वेतनामध्ये 1250 रुपयांचा फरक पडतो असे नाही तर त्यावर मिळणारा 5 टक्के घरभाडे भत्ता व इतर प्रोत्साहन भत्ते आहेत त्यावर सुध्दा परिणाम होणार आहे. यापेक्षाही गंभीर बाब मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, मूळ वेतनामध्ये 1250 रुपये कमी मिळणार याचा अर्थ त्यांच्या पेन्शनमध्ये किमान 625 रुपयांचा फरक पडणार. आता जे नवीन शिक्षक लागलेले आहेत आणि ज्यांची सेवा 33 वर्षे होणार आहे त्यांना 50 टक्के पेन्शन मिळणार. त्यांच्या पेन्शनमध्ये 625 रुपयांचा फरक पडणार आहे. याचा आपण विचार करणे आवश्यक आहे. त्यांचे पेन्शनरी नुकसान होणार आहे. आदिवासी विभागामध्ये फार शिक्षक काम करतात अशी परिस्थिती नाही. या निर्णयामुळे आदिवासी विभागामध्ये काम करणाऱ्या उच्च माध्यमिक शिक्षकांवर जो अन्याय झालेला आहे, शासनाने जो चुकीचा निर्णय घेतलेला आहे तो दुरुस्त करावा आणि शालेय शिक्षण विभागाप्रमाणे, ग्रामविकास विभागाप्रमाणे आश्रमशाळेमध्ये काम करणाऱ्या उच्च माध्यमिक शिक्षकांना सुध्दा 7225 ची वेतनश्रेणी 1 मार्च 2000 पासून लागू करावी अशी मी विनंती करतो.

**उपसभापती** : यानंतर सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती बसणार आहेत म्हणून मी एक सूचना देऊन जात आहे. आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये अनुक्रमांक 5 वर सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांची अर्धा-तास चर्चा दाखविलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी मला स्वत: विनंती केलेली आहे की, ही अर्धा-तास चर्चा पुढे ढकलण्यात यावी. ही अर्धा-तास चर्चा उद्याच्या कामकाजामध्ये घेण्यात येईल आणि उद्या ही अर्धा-तास चर्चा पहिली ठेवण्यात येईल.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. अरविंद सावंत )**

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी महत्वाच्या विषयावर या ठिकाणी अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे. या राज्यामध्ये 1 एप्रिल 1996 पासून 5वा वेतन आयोग लागू झालेला आहे. तेव्हा पासून सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना सुधारित वेतनश्रेणी लागू झालेली आहे. परंतु कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांना 6500 ऐवजी 7225 ही वेतनश्रेणी मार्च 2000 पासून लागू केलेली आहे. संघटनेने घेतलेल्या अथक परिश्रमामुळे आणि केलेल्या संघर्षामुळे ही वेतनश्रेणी त्यांना लागू झालेली आहे. ग्रामविकास विभागाच्या जिल्हापरिषद उच्चमाध्यमिक शिक्षकांना तसेच शालेय शिक्षण विभागातील उच्च माध्यमिक शिक्षकांना ही वेतनश्रेणी कालांतराने लागू केलेली आहे. आदिवासी विभागामध्ये काम करणारे जे उच्च माध्यमिक शिक्षक आहेत त्यांना ही वेतनश्रेणी मार्च 2000 पासून लागू न करता ती 1 जुलै 2006 पासून लागू करण्याचा निर्णय घेतलेला आहे. वास्तविक पाहता कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांची मागणी अशी आहे की त्यांना 1 एप्रिल 1996 पासून सुधारित वेतनश्रेणी मिळावी. शिक्षकांच्या संघटनेचे माननीय मंत्री महोदय हे सदस्य आहेत. त्यांनी या बाबतीत सहानुभूतीने विचार करावा. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी सांगितल्याप्रमाणे आदिवासी विभागामध्ये काम करणारे कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक आणि उच्च माध्यमिक शिक्षक हे अनेक सवलतीपासून वंचित आहेत. त्यांना मिळणा-या वैद्यकीय बिलांची प्रतिपूर्ती वेळेवर होत नाही. आदिवासी विभागातील, समाजकल्याण विभागातील, शालेय शिक्षण विभागातील कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांना 1 एप्रिल 1996 पासून सुधारित वेतनश्रेणी लागू करावी तसेच सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी सांगितल्या प्रमाणे आदिवासी विभागातील उच्च माध्यमिक शिक्षकांना मार्च 2000 पासून सुधारित वेतनश्रेणी ताबडतोब लागू करावी आणि तसा जी.आर. काढावा अशी मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो.

---

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रविशेठ पाटील (आदिवासी विकास राज्यमंत्री ) : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी शिक्षकांच्या वेतनश्रेणीबाबतचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. 1 मार्च 2000 पासून शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर त्रिस्तरीय वेतनश्रेणी 168 पदांना लागू झाल्यास त्यांच्या वेतनातील फरक 177 कोटी इतका होईल. 177 कोटीच्या प्रस्तावास ताबडतोबीने वित्त विभागाची आणि मंत्रिमंडळाची मंजुरी घेण्यात येईल आणि हे दिले जाईल.

श्री. रामनाथ मोते : शासनाने जी.आर. काढून शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर ही वेतनश्रेणी मंजूर करावी अशी आमची मागणी आहे. शासनाने या मागणीचा गंभीरपणे विचार करायला पाहिजे. ही मागणी मंजूर केली नाही तर शिक्षकांचे फार मोठे नुकसान होणार आहे. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी याबाबतीत वित्त विभागाला कन्व्हिन्स करावे. खरे तर आदिवासी विभागामध्ये काम करणा-या शिक्षकांकडे शासनाने जास्त लक्ष दिले पाहिजे. आदिवासी विभागातील शिक्षक कोणत्या परिस्थितीमध्ये काम करतात याची शासनाला जाणीव आहे. याबाबतीत आर्थिक बोजाचे कारण पुढे न करता जो न्याय शालेय शिक्षण विभागातील शिक्षकांना दिला तोच न्याय आदिवासी विभागातील शिक्षकांना द्यावा. या सर्व शिक्षकांना समान वेतनश्रेणी मिळाली पाहिजे. आदिवासी विभागातील शिक्षकांचे 6 वर्षाचे नुकसान केलेले आहे. उद्या आम्ही कोर्टामध्ये गेला तर आम्हाला तातडीने न्याय मिळेल. परंतु गुणवत्ता चाचणी, 5वा वेतन आयोग, शिक्षण सेवक आणि आता वेतनश्रेणी अशा प्रत्येक गोष्टीसाठी आम्ही कोर्टात जायचे काय ? शिक्षकांच्या वेतनश्रेणीबाबतचा ज्वलंत प्रश्न याठिकाणी उपस्थित केलेला आहे. या प्रश्नाला न्याय द्यावा.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रविशेठ पाटील : तातडीने निर्णय घेतला जाईल.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, आदिवासी विभागाला पहिले प्राधान्य दिले पाहिजे. हे सगळे शिक्षक दुर्गम भागामध्ये काम करीत आहेत.

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, तातडीने निर्णय घेतला जाईल. वेतनश्रेणी शासनाने मान्य केलेली आहे आणि लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल.

श्री.वसंतराव खोटरे : अधिकाऱ्यांची चूक झाली असेल. परंतु एकाच प्रकारचे शिक्षण, एकाच प्रकारचे पद, एकाच प्रकारची अर्हता आणि एकाच राज्यातील शिक्षण पध्दती असताना एका विभागामधील शिक्षकांना 1 मार्च, 2000 पासून, एका विभागामधील शिक्षकांना 1 जुलै, 2006 पासून वेतनश्रेणी लागू करणे हे योग्य आहे का? ही चूक दुरुस्त करावी.

श्री.रविशेठ पाटील : शासनाच्या लक्षात आलेले आहे.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ग्रामीण पाणीपुरवठा योजनेतील पाणी वापरावर नियंत्रण नसणे.

**मु. शी.** : ग्रामीण पाणीपुरवठा योजनेतील पाणी वापरावर नियंत्रण नसणे यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : बी.ए.डी.एड.शिक्षकांची प्रशिक्षणासाठी निवड न होणे.

**मु. शी.** : बी.ए.डी.एड.शिक्षकांची प्रशिक्षणासाठी निवड न होणे यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 94 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये काम करणाऱ्या व 1 ते 7 वर्ग असलेल्या बी.ए.डी.एड.शिक्षकांना 25 टक्के प्रमाणात प्रशिक्षित पदवीधर वेतनश्रेणी मान्य केली जाणे, बी.ए.डी.एड.शिक्षकांना पुढील 5 वर्षात बी.एड.होण्याची अट लागू केली असणे, महाराष्ट्र यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ शिवाय अन्यत्र पत्राद्वारे बी.एड.प्रशिक्षणासाठी सोय नसणे, वर्षानुवर्षे अर्ज करुनही बी.एड.प्रशिक्षणासाठी निवड न झाल्याने व 5 वर्षात बी.एड.पूर्ण न झाल्याने प्राथमिक शिक्षकांना वेतनश्रेणी गमवावी लागणे, मर्यादित जागा असल्याने निवड न होणे अडचणीचे असणे, शिक्षकांना काही जागा राखून ठेवण्याबाबत व 5 वर्षाची अट शिथील करण्याबाबत कार्यवाही होण्याची आवश्यकता व त्यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, हा शालेय शिक्षण विभागाचा विषय आहे. मागील अर्धातास चर्चेचा विषय आदिवासी विभागाशी संबंधित होता म्हणून शालेय शिक्षण मंत्री सभागृहात उपस्थित नसले तरी त्याला आम्ही हरकत घेतली नव्हती. परंतु हा विषय शालेय शिक्षण विभागाशी संबंधित असल्यामुळे आम्ही जे विचार मांडणार आहोत त्या संदर्भात उत्तर कोणाकडून दिले जाणार आहे?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, संबंधित विभागाचे मंत्रीमहोदय सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक दहा मिनिटासाठी तहकूब करावी.

**तालिका सभापती** (श्री.अरविंद सावंत) : यापुढील अर्धातास चर्चा सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत याची आहे, त्या चर्चेला उत्तर कोणाकडून दिले जाणार आहे?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, संबंधित मंत्रीमहोदय सभागृहात उपस्थित नाहीत, शासन गंभीर दिसत नसल्यामुळे सभागृहाची बैठक तहकूब करावी. बालमृत्यूचा प्रश्न सन्माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांच्या महिला व बालविकास विभागाशी संबंधित आहे.

..4..



अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, शासनाच्या वतीने कोणतेही मंत्री उत्तर देऊ शकतात, त्यामुळे मी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांच्या अर्धातास चर्चेला उत्तर देण्याचा प्रयत्न करीन.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रीमहोदय उत्तर असे देतील की, आजार झाल्यानंतर उपचार करण्याची जबाबदारी आमची आहे. परंतु कुपोषणाची जबाबदारी महिला व बालविकास विभागाची आहे. त्यामुळे जोपर्यंत संबंधित विभागाचे मंत्रीमहोदय सभागृहात उपस्थित होत नाहीत तोपर्यंत मला माझी अर्धातास चर्चा उपस्थित करावयाची नाही.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांची अर्धातास चर्चा उपस्थित करण्यास काही कालावधी लागणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी उपस्थित केलेल्या चर्चेला उत्तर कोण देणार आहे?.....(थोडा वेळ थांबून)......मी सभागृहाची बैठक 5 मिनिटांसाठी तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 10 वाजून 14 मिनिटांनी 5 मिनिटांकरीता स्थगित झाली)

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभपती श्री. अरविंद सांवत )**

**तालिका सभापती** : आता सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते साहेबांच्या अर्धा तास चर्चेला सुरुवात करण्यात येत आहे परंतु या चर्चेला माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी उत्तर द्यावे असे सन्माननीय सदस्यांना अपेक्षित आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील ( महिला व बालविकास मंत्री ) : सभापती महोदय, माझी सभागृहाला विनंती आहे की, उपसमितीची बैठक सुरु असल्यामुळे सन्माननीय शालेय शिक्षणमंत्री बैठकीस गेलेले असल्यामुळे आता सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांच्या अर्धा तास चर्चेला सुरुवात करण्यात यावी. या चर्चेला मी उत्तर देणार आहे. ही अर्धा तास चर्चा पूर्ण झाल्यानंतर माननीय शालेय शिक्षणमंत्री सभागृहात उपस्थित होऊन सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते साहेबांच्या अर्धा तास चर्चेला उत्तर देऊ शकतील.

**तालिका सभापती** : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांच्या अर्धा तास चर्चेला सुरुवात करण्यात येत आहे.

--------------------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : बालमृत्यू मुक्त महाराष्ट्र होण्याबाबत.

**मु. शी.**: बालमृत्यू मुक्त महाराष्ट्र होण्याबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक २०८००० ला दिनांक ५ डिसेंबर, २००६ रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, डाॅ. नीलम गो-हे, श्री. दिवाकर रावते, श्री. मधुकर सरपोतदार, श्री. अरविंद सावंत, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

**डॉ**. दीपक सावंत ( मुंबई पदवीधर ) : सभापती महोदय, "बालमृत्सयू मुक्त महाराष्ट्र होण्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक २०६००० ला दिनांक ५ डिसेंबर, २००६ रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम ९२ अन्वये अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

सभापती महोदय, सर्वप्रथम मी शासनाचे आभार मानतो कारण उशीरा का होईना अधिवेशन संपता संपता विदर्भात होणाऱ्या बालमृत्युच्या संदर्भातील प्रश्न येथे उपस्थित झाला. दिनांक 5 डिसेंबर 2006 च्या प्रश्नोत्तराच्या यादीत हा प्रश्न 37 नंबरवर होता. त्यामुळे तो चर्चेसाठी येऊ शकला नाही म्हणून मी अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून हा प्रश्न उपस्थित केलेला आहे.

सभापती महोदय, विदर्भात कुपोषण मोठ्या प्रमाणावर वाढलेले आहे. दिनांक 5 डिसेंबर रोजी विचारलेल्या प्रश्नाला मंत्रिमहोदयांनी उत्तर देताना स्वत:वरील जबाबदारी झटकलेली दिसते. माझा प्रश्न होता मेळघाट व धारणी येथे बालमृत्युच्या संख्येत शासनाने उपाययोजना करुनही आजही चिंतनीय वाढ होत हे खरे आहे काय ? याचे उत्तर " होय. मागील वर्षाच्या तुलनेत चालू वर्षी बालमृत्युच्या प्रमाणात काही अंशी वाढ झालेली आहे" असे दिलेले आहे. मंत्रिहोदयांनी वेळ मारुन नेण्यासाठी "काही अंशी" असा शब्दप्रयोग वापरलेला आहे. प्रत्यक्षात आकडेवारील पाहिली तर बालमृत्युच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. याची कारणे अनेक असतील. कुपोषणाचा प्रश्न महिला व बालकल्याण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, आदिवासी विभाग तसेच रस्त्यांचा प्रश्न येत असल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग या विभागांशी निगडीत आहे असे मंत्रिमहोदय उत्तर देतील. महाराष्ट्रात कुपोषणाची जबाबदारी ठामपणे कोणताही विभाग घेत नाही. हा प्रश्न फुटबॉलसारखा इकडून तिकडे फिरवला जातो. कुपोषणाचा प्रश्न फक्त मेळघाट व धारणी पुरता मर्यादित नसून मुंबई जवळच्या वाडा, मोखाडा, नाशिक इत्यादी भागात सुध्दा कुपोषणाने बळी जात आहेत. या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानात बैठक घेतली होती. दुर्दैवाने आम्हाला त्या बैठकीला बोलाविण्यात आले नव्हते. आम्ही वर्तमानपत्रात ही बातमी वाचली. आता मेट्रोपोलिटन सिटीमध्ये सुध्दा कुपोषणास सुरुवात झालेली आहे. याची कारणे अनेक असतील. राज्यातील बालमृत्युचे प्रमाण रोखण्यासाठी कितीतरी समित्या नेमल्या गेल्या. डॉ.अभय बंग यांनी बालमृत्युबाबत शासनाला एक रिपोर्ट दिला होता. बालमृत्युबाबत सुप्रीम कोर्टाने शासनाला ताशेरे मारले म्हणून शासनाने मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. तसेच राजमाता जिजाऊमाता बालसंगोपन पोषण मिशन समिती श्री.रमणी यांच्या

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.................

अध्यक्षतेखाली नेमली. आता देखील माननीय मंत्रिमहोदयांनी एक नवीन समिती नेमली आहे. या समितीवर डॉ.अभय बंग, डॉ.अष्टेकर, डॉ.मृदुला फडके याची नेमणूक केलेली आहे. राजमाता जिजाऊमाता बालसंगोपन पोषण मिशन समितीचा अहवाल मागील अधिवेशनात मंत्रिमहोदय डॉ.विमल मुंदडा सभागृहाच्या पटलावर ठेवणार होत्या. परंतु आजमितीपर्यंत हा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, गेल्या तीन-चार वर्षात कुपोषणावर जवळपास 250 कोटी रुपये शासनाने खर्च केलेले आहेत. जर मी चुकत असेल तर मंत्रिमहोदयांनी मला करेक्ट करावे. विदर्भात सर्वसाधारणपणे 3 लाख बालकांचे आरोग्य धोकादायक आहे. 2 लाख बालके मृत्युच्या छायेत आहेत. मार्च ते एप्रिल या एका महिन्यात 281 बालमृत्यू झालेले आहेत. सन 2005-2006 मध्ये एकूण 334 बालमृत्यू झालेले आहेत. ग्रेड-3 आणि ग्रेड-4 मधील 1134 बालके कुपोषणाच्या छायेत आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात हजारो बालके मृत्युच्या छायेत आहेत. सभापती महोदय, हे मृत्यु का होतात ? कारण या भागातील हजारो मजूर स्थलांतरीत होत असतात. त्या भागात रोजगार हमी योजनेची कामे ठप्प झालेली आहेत. लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध नसल्यामुळे ते बाजूच्या गुजरात व मध्यप्रदेश या राज्यात जातात.

यानंतर श्री.पुरी...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ KTG/ पूर्वी श्री.अजित... 10:25

डॉ.दीपक सावंत...

मेळघाटमध्ये रोजगार हमी योजनेची कामे बंद पडलेली आहेत. सभापती महोदय, मेळघाटमध्ये मी नेहमी जातो, त्यामुळे त्याठिकाणी लोकांच्या हाताला काम आहे की नाही हे मला दिसून येते. मेळघाट व जवळपासच्या 22 गावांमध्ये हातपंत नाहीत. याबाबतीत मी पूर्वी प्रश्न उपस्थित केला होता. त्याठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय नसल्यामुळे तेथील लोक डबक्यातील पाणी पितात. यासंबंधी मी माननीय श्री.अनिल देशमुख यांनाही निवेदन दिले होते. तसेच, आपण आरोग्य विभागामार्फत अनेक योजना राबविता. त्यामध्ये जननी सुरक्षा योजना, मातृत्व अनुदान योजना, आहार सुविधा योजना अशाप्रकारच्या त्या योजना आहेत. आपण या योजनांची नांवे खूपच गोंडस ठेवलेली आहेत. याठिकाणी मी विचारु इच्छितो की, या योजनांचे लाभार्थी किती आहेत ? त्यांना खरोखरच या योजनांचा लाभ मिळतो काय ? सभापती महोदय, या योजना प्रत्यक्षात लाभार्थ्यांपर्यंत पोहचतच नाहीत. त्याठिकाणी आपण नवसंजीवन योजना सुरु केली, मातृत्व गरोदर योजना सुरु केली, त्या माध्यमातून आपण दोन मुलांपर्यंतच आपण त्यांना पैसा देतो, परंतु तिसरे मुलं झाले तर त्यांना पैसे मिळत नाहीत, ही मोठी शोकांतिका आहे. एकात्मिक बाल विकास योजनेत पुरवठा करण्यात येणा-या योजनेत प्रचंड भ्रष्टाचार असून बालकांना निकृष्ठ दर्जाचे अन्न मिळते. त्यामध्ये खिचडी, तांदूळ, डाळांचे जे नमूने आहेत, त्यांचा रिपोर्टही अजून येत नाहीत. मातृत्व योजनेच्या बाबतीत लाखो रुपये हडप केल्याबाबत मी लक्षवेधी सूचना व तारांकित प्रश्नाच्या माध्मातून माहिती घेण्याचा प्रयत्न केला होता. परंतु या योजनेत आपण नेमके काय करणार आहात ? आपण याठिकाणी जी समिती नेमली व त्यामध्ये आपण ज्यांची नियुक्ती केली, त्या लोकांकडे यासाठी वेळच नाही. त्या समितीवर डेलिगेटेड माणसांची आवश्यकता असून कुपोषणाच्या प्रश्नाबाबत आपण चांगल्या प्रकारचे शिक्षण देण्याची आवश्यकता आहे. कुपोषित मुलांना आपण त्यांच्या कोरकु भाषेमध्ये प्राथमिक शिक्षण देण्याची आवश्यकता आहे. परंतु त्याठिकाणी असा कुठलाही उपक्रम शासनाच्या वतीने राबविला जात नाही. मेळघाटातील अनेक गावांमध्ये पिण्याचा पुरवठा होत नाही, गरोदर मातांना विटॅमिनच्या गोळया किंवा औषधे मिळत नाहीत, त्यांच्या आरोग्याची तपासणी होत नाही. शिवसेनेच्या माध्यमातून आम्ही त्याठिकाणी नवजात शिशू अर्भक योजना सुरु केली. आज त्याठिकाणी बालरोग तज्ञ, स्त्री रोग तज्ञ उपलब्ध नाहीत. आज मेळघाटमध्ये किती बालरोग तज्ज्ञ आणि किती स्त्री रोग तज्ज्ञ आहेत याची माहिती माननीय





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

मंत्रिमहोदयांनी द्यावी. आज आपण अस्थायी डॉक्टरांना स्थायी करुन घेत नाहीत. आज दूर्गम भागामध्ये ते डॉक्टर फक्त 10 हजार ते 13 हजार रुपयांच्या पगारावर काम करीत आहेत. त्यांचे 10-10 वर्षे प्रमोशन होत नाही. त्यामुळेच आज अशा दुर्गम भागामध्ये कोणताही डॉक्टर जाण्यास तयार नाही. त्याठिकाणच्या डॉक्टरांना आपण प्रशिक्षित करा, त्यांना आपण डी.एच.ओ.,डी.सी.एस.,करा, तेच आपल्याला उपयोगी पडणार आहेत. अशाप्रकारचे कोर्सेस आपण मेट्रोपोलेटीन शहरामध्ये सुरु करण्यापेक्षा आपण ते ग्रामीण भागामध्ये सुरु करुन डॉक्टरांना प्रॅक्टीस द्या. त्यांना आपण सुरुवातीस 2-2 वर्षे सेवा द्या, त्याला आपण रिलिव्ह करतानाच सांगावे की, आपली त्याठिकाणी फक्त एकच वर्षाची सेवा असून त्याठिकाणी आपण चांगल्या प्रकारे काम करावे. आज एम.पी.एस.सी.च्या माध्यमातून फक्त 30 टक्के डॉक्टरच त्याठिकाणी कामाला आलेले आहेत, उर्वरित डॉक्टर जॉईनच झालेले नाहीत, त्यामुळे यासाठीही आपण काहीतरी उपाययोजना करावी. याठिकाणी आपण चांगल्या प्रकारची समिती नेमून ती समिती काय करणार आहे ? याची माहिती घ्यावी व यामध्ये ट्रान्सफरन्सी असेल तरच बालमृत्यू मुक्त महाराष्ट्र आपल्याला पहावयास मिळेल. याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांकडून अनेक अपेक्षा असून त्यादृष्टीने आपण आपल्या शासनाचे धोरण स्पष्ट करावे, अशी माझी विनंती आहे. तसेच, कुपोषणाच्या बाबतीत आपण एक श्वेतपत्रिका काढावी, अशी माझी यानिमित्ताने विनंती आहे.

----

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, 2/3 महत्वाचे जे प्रश्न आहेत त्यामध्ये विदर्भातील कुपोषणाचाही प्रश्न आहे. यासाठी जे प्रकल्प राबविले जातात त्यामध्ये जो भ्रष्टाचार होतो त्याचे उत्तर मात्र मिळत नाही. अमरावती येथे औषध खरेदीमध्ये 28 कोटी रुपयांचा घोटाळा झाला आहे. सभागृहात यासंदर्भातील चर्चाही झालेली आहे. रेशन धान्य दुकानांमधून धान्य मिळत नाही, अशाही तक्रारी आहेत. शासनाच्या ग्रामविकासाचा शेवटचा घटक हा 'अंगणवाडी' आहे. त्यांच्यावर आपण या योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी टाकून मोकळे झालो आहोत. माझा प्रश्न असा आहे की, उच्च न्यायालयाने समिती गठीत करण्याविषयी निदेश दिल्यामुळे किंवा नागपूरच्या अधिवेशनामध्ये आश्वासन दिले होते म्हणून समिती गठीत करण्यात आली आहे काय ? अशा प्रकारच्या समित्या नेमून हे काम करता येईल काय ? केवळ उच्च न्यायालयाचे समाधान करण्यापुरता हा प्रश्न नाही. तालुका स्तरावर कुपोषणासंबंधी कशा पध्दतीने नियोजन केले आहे ? प्रत्येक जिल्हयात कुपोषणग्रस्त बालकांची संख्या वाढलेली आहे, असे दैनिक सकाळ, तरुण भारत व इतरही वृत्तपत्रांमध्ये सतत येते आहे. अधिवेशनाचे आता शेवटचे दोन दिवस राहिलेले आहे. सन्माननीय सदस्य, डॉ.दिपक सावंत व आम्ही गेल्या 3/4 वर्षांपासून या विषयाचा सातत्याने पाठपुरावा करीत आहोत. अधिवेशन टू अधिवेधन यासंदर्भात चर्चा होते. मधल्या काळात कुपोषणग्रस्त जिल्हयातील लोकप्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थांतील पदाधिकारी यांना विश्वासात घेऊन कारभार होत नाही आणि मग भ्रष्टाचाराचे स्कॅम उघडकीस येतात. उच्च न्यायालयाकडून दणका आल्यानंतर शासनाकडून घोषणा केल्या जातात. असे न करता दर महिन्याला कुपोषणग्रस्त भागाचा आढावा घेऊन कुपोषणावर ताबडतोबीने उपाय होत आहेत की नाही हे पाहण्यासाठी यासाठी एखादी शासकीय यंत्रणा शासन घोषित करणार आहे काय ? यासंबंधी शासनाने खुलासा करावा, अशी विनंती करते आणि माझे दोन शब्द पूर्ण करते.

---------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी (विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, बालमृत्युच्या संदर्भात डॉ.अभय बंग यांनी एक चांगला अहवाल सादर केलेला आहे. या अहवालामध्ये संपूर्ण आकडेवारी आहे, कशा पध्दतीने आपण हे बालमृत्यु रोखू शकू, याची देखील अभ्यासपूर्ण माहिती त्यामध्ये देण्यात आलेली आहे. बालमृत्युंमध्ये आदिवासी बालमृत्यूंचा समावेश मोठया प्रमाणावर आहे. आदिवासी कुपोषित बालकांच्या दृष्टीकोनातून शासनाने त्यांचे काम करावे परंतु सन्माननीय वनमंत्री, श्री.बबनराव पाचपुते हे या ठिकाणी उपस्थित आहेत, त्यांना मी विनंती या ठिकाणी अशी करत होतो की, आदिवासी भागातील कुपोषित बालकांच्या संदर्भातील योजना आपल्या खात्याच्या माध्यमातून त्यांनी राबविल्या पाहिजेत. त्यांनी सांगितले की, आमच्या खात्यामार्फत अशा योजना राबविल्या जात आहेत व त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. पण हे सर्व करीत असतांना बालके कुपोषित होणारच नाहीत म्हणून त्यांच्या पालकांसाठी रोजगार निर्मिती करणे अत्यंत आवश्यक आहे. कुपोषित बालकांचे आई-वडिल असतील त्यांना रोजगार उपलब्ध झ ाला तर त्यांच्याकडे 4 पैसे येतील आणि ते त्यांचा उपयोग बालकांना दूध, औषधे घेण्यासाठी करु शकतील. मी माननीय वनमंत्र्यांना विनंती करतो की, त्यांनी या बाबीचा जरुर विचार करावा. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने अमरावती, नाशिक, नंदुरबार या जिल्हयांमध्ये कुपोषणासंदर्भात एक प्रकल्प हाती घेण्यात आलेला आहे. आम्ही मानधन देऊन त्या ठिकाणी डॅाक्टरांची व्यवस्था केलेली आहे. नर्सेस, ॲम्ब्युलन्स उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. केवळ एक दिवस डॅाक्टरांनी जाऊन तपासणी करणे, अशा पध्दतीची शिबिरे न घेता हजारो रुपयांचा खर्च करुन बालकांची श्रेणीवाढ कशी होईल, त्यांना औषधे कशी मिळतील यासंदर्भातील कार्य आमच्या पक्षाच्या माध्यमातून आम्ही करीत आहोत. मी या निमित्ताने सभागृहाला तसेच समाजाला अशी विनंती करणार आहे की, केवळ शासनाच्या माध्यमातून आपण कुपोषित बालमृत्युंचा प्रश्न सोडवू शकणार नाही. सन्माननीय सदस्या, डॉ.नीलम गो-हे यांना मी विनंती करु इच्छितो की, ज्या एन.जी.ओ.आहेत त्यांनी किंवा आपण सर्वांनी एखादा कुपोषणग्रस्त तालुका दत्तक घेऊन त्या ठिकाणी अशा पध्दतीचे काम सुरु केले पाहिजे, जनजागृती केली पाहिजे. लहान वयामध्ये मुलींची लग्ने होणे, दोन बालकांमधील अंतर कमी असणे, नातेवाईकांमध्ये लग्न

..3..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अरुण गुजराथी.............

होणे ही देखील बालमृत्यूची कारणे असतात. त्यामुळे यासंदर्भात जनजागृती केली पाहिजे. माननीय मंत्रीमहोदयांना मी विनंती करणार आहे की, औषधांची उपलब्धता, दुधाची उपलब्धता, डॉक्टर, वाहने यांची उपलब्धता करुन किमान आदिवासी भागातील लहान मुले आहेत त्यांच्यासदर्भात कार्यवाही व्हावी. तसेच, मुंबई, पुणे, नागपूर येथील झोपडपट्टीमध्ये देखील कुपोषित बालके आहेत. त्यांच्यासाठी एखादे पॅकेज जाहीर करावे. सन्माननीय वनमंत्री, आदिवासी विकास मंत्री आणि आपल्या खात्याच्या माध्यमातून आदिवासी मुलांसाठी एखादा विशेष कार्यक्रम या निमित्ताने सुरु झाला पाहिजे. आदिवासी विकास विभाग हा सर्वात श्रीमंत विभाग आहे.

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी .........

अर्थसंकल्पाच्या 10 टक्के रक्कम आदिवासी विकास विभागाला मिळते. शिक्षण विभाग, आरोग्य विभाग किंवा इतर कोणत्याही विभागाला मिळत नाही त्या पेक्षा जास्त रक्कम आदिवासी विकास विभागाला मिळते. आदिवासी विभाग, आरोग्य विभाग आणि वन विभाग या तिन्ही विभागांनी मिळून नागरी विभागासाठी आणि आदिवासी विभागासाठी पॅकेज तयार करावे, अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

---------

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी (धुळे तथा नंदुरबार स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, आता पर्यंत आम्ही असे गृहीत धरत होतो की, बालमृत्यू आणि कुपोषण फक्त ग्रामीण भागामध्ये, आदिवासी व गरीब वस्त्यांमध्येच आहे. परंतु सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले की, बालमृत्यू आणि कुपोषणाची लागण शहरी भागामध्ये देखील झालेली आहे. शासनाने आता पर्यंत ग्रामीण भागाकडे लक्ष दिले. दुर्दैवाने शहरी भागाकडे पाहिजे तसे लक्ष दिलेले नाही. गरीबांच्या घरामध्येच कुपोषीत बालक जन्माला येते असे नाही तर माझ्या नंदुरबारमध्ये सुपर क्लास वन अधिका-याच्या घरी कुपोषीत बालक जन्माला आले आहे. शहरी भागामध्ये अंगणवाडया सुरु करण्यासाठी शासनाने मान्याता द्यावी, अशी माझी मागणी आहे. शहरी भागातील स्लम एरियामध्ये अंगणवाडया सुरु करण्याचा निर्णय शासनाने लवकर घेतला पाहिजे. आता पर्यंतची परिस्थिती अशी आहे की, गरीब माणसांची मुले अंगणवाडयांमध्ये खाऊ खाण्यासाठी जात असत. परंतु आता असे झाले आहे की, अंगणवाडयामध्ये खाऊ तयार करुन मुलांना दिला जाते. तो मुलगा तो खाऊ घरी घेऊन जातो. त्या मुलाला जर दोन तीन भाऊ असतील तर ते व आई वडील सुध्दा त्या मुलाला मिळालेला खाऊ खातात. त्यामुळे त्या मुलाला पाहिजे तेवढया कॅलरीज मिळत नाहीत. माझी अशी विनंती आहे की, त्या मुलाने अंगणवाडी शाळेमध्येच खाऊ खाल्ला पाहिजे, याकडे लक्ष दिले पाहिजे. माझ्या नंदुरबार जिल्हयासंदर्भात बोलावयाचे झाले तर आम्ही अंगणवाडीसाठी वाटाणे दिले होते. मुंबईच्या संस्थेने वाटाण्यांचा पुरवठा केला होता. ते वाटाणे रात्रभर शिजवले तरी ते शिजले नाहीत. दाखवितांना चांगल्या प्रतीचा माल दाखविला जातो आणि पुरवठा मात्र निकृष्ट दर्जाच्या मालाचा केला जातो. शासन कोटयावधी रुपये खर्च करीत आहे. शासनाने खर्च केलेले पैसे ख-या अर्थाने गोरगरीब माणसांपर्यंत पोहचत नसतील तर त्यासाठी शासनाने कडक धोरण स्वीकारले पाहिजे, अशी मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी आदिवासींना रोजगार उपलब्ध करुन देण्यासंबंधी मुद्दा उपस्थित केला. सामाजिक वनीकरणाचे काम आदिवासींना देता येऊ शकते. सार्वजनिक उपक्रम समितीच्या माध्यमातून आम्ही विदर्भामध्ये फिरलेलो आहोत. त्यावेळी आम्ही त्यांची परिस्थिती बघितलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी अंगणवाडयांमध्ये मुलांना देण्यात येणा-या आहारासंबंधी सांगितले. अंगणवाडयांमध्ये आहार शिजविण्यासाठी इंधन लागते. आज जंगल उध्वस्त झालेले आहे. वन विभागाच्या माध्यमातून आदिवासींना रोजगार मिळू शकतो. त्यांना फक्त झाडे लावण्याचे काम न देता त्या झाडांची निगा राखणे हे काम त्यांना दिले तर त्यांना उत्पन्न मिळेल, याचा विचार केला पाहिजे. आदिवासी तांडयामध्ये, डोंगर द-यांमध्ये राहतात. तेथे डॉक्टर जाऊ शकत नाहीत. डॉक्टर तेथे गेला तर त्याला घरी परत येई पर्यंत रात्र होते त्यामुळे डॉक्टर तेथे जाण्यास उत्सुक नसतात. म्हणून आपल्याला असे करता येईल काय की, मागासवर्गीयांना आपण घरे बांधून देतो त्याप्रमाणे आदिवासींना जंगलातून बाहेर आणून शहरामध्ये त्यांच्यासाठी एकत्र राहण्याची व्यवस्था करता येईल काय ? याचा देखील शासनाने विचार करावा. इतर लोक कसे राहतात हे बघून त्यांच्यामध्ये बदल होऊ शकतो.

यानंतर श्री.सुंबरे........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते (वन मंत्री) : सभापती महोदय, येथे वन खात्याचा या विषयासंबंधात उल्लेख झाला असल्याने मी या बाबत माझ्या खात्यासंबंधातील थोडी माहिती देऊ इच्छितो. सभापती महोदय, कुपोषित बालकांचा हा गंभीर विषय शासनापुढेही आहे. वन खात्याने या संदर्भात काही निर्णय घेतलेले आहेत तेच मी आपल्याला येथे सांगणार आहे. विशेषत: तेंदू पत्ते आदिवासींकडून जमा केले जातात. त्यातून जो महसूल जमा होईल तो तेंदू पत्ता जमा करणाऱ्या आदिवासींना द्यावा यासाठी साडेसव्वीस कोटी रूपये आपण दिलेले आहेत. सभापती महोदय, त्या आदिवासींना रोजगार मिळाला पाहिजे यासाठी वन खात्यातर्फे जलसंधारणाची कामे आपण करीत नव्हतो, ते करण्याचा आता निर्णय झालेला आहे आणि सर्व गावात त्यादृष्टीने समित्या तयार करून 'आमचे गाव, आमचे जंगल' असे करून त्यांना जंगल संवर्धनाच्या कामात समाविष्ट करून घेऊन त्यांना त्यासाठी 33 प्रकारची रोपे मिळाली पाहिजेत असा निर्णयही आपण घेतलेला आहे आणि हे काम आपण आदिवासी आणि आम्ही एकत्र येऊन करणार आहोत. त्यामुळे सातत्याने त्यांना रोजगार मिळेल हाही हेतू आहे. सभापती महोदय, छोटी छोटी वन तळी करण्याचा यापूर्वी आपल्याला अधिकार नव्हता. पण आता तोही अधिकार आपण मिळविला असून त्याचे तांत्रिक काम, सर्व्हे करण्याचेही अधिकार आपण घेतले आहेत. तेव्हा जंगलातील, जंगलाजवळील आदिवासींनापूर्ण वेळे रोजगार मिळाला पाहिजे आणि तो वनखाते त्यांना देऊ शकेल. आजही या संदर्भात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक घेतली जाणार आहे आणि त्यामध्ये हा विषय मांडला जाणार आहे व 2-3 महिन्यामध्ये यासंबंधात निर्णय होईल. सभापती महोदय, सामाजिक वनीकरण आणि वन खाते पूर्वी एकत्र होते. मध्यंतरी ते खाते वन खात्यापासून वेगळे झाले होते. आता कृषी खात्याबरोबर ते खाते आहे पण कृषी खात्याचा संबंध आता त्यांच्याबरोबर तितकासा राहिलेला नाही. त्यामुळे पुन्हा एकदा वन आणि सामाजिक वनीकरण खाते एकत्र करण्याचा निर्णय घेण्याबाबतचा विषय कॅबिनेटपुढे आहे आणि लौकरच त्याही बाबतीत निर्णय होईल अशी आशा आहे. तसे झाल्यास त्यातूनही आपल्याला या दृष्टीने अधिक काम करता येऊ शकेल.

***

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...... ओ 2 ....

श्री. हर्षवर्धन पाटील (महिला व बालविकास तथा रोजगार हमी योजना मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी 'बालमृत्यू मुक्त महाराष्ट्र होण्याबाबत' अर्धा तास चर्चा येथे उपस्थित करून त्या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री.अरूण गुजराथी, डॉ.नीलम गोऱ्हे आणि श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी भाग घेऊन ज्या मौलिक सूचना केल्या आहेत त्याबद्दल प्रथमत: मी त्या सर्वांचे आभार मानतो. सभापती महोदय, आपण अनेक क्षेत्रात हिरीरीने काम करीत आहोत. राज्यामध्ये जे काही महत्त्वाचे प्रश्न आहेत त्यात कुपोषणाचा प्रश्न हाही आत्यंतिक महत्त्वाचा मानला गेलेला आहे. मी येथे या संबंधात आकडेवारी सांगून सभागृहाचा वेळ घेणार नाही. तसेच यासाठी योजना कोणत्या आहेत, किती आहेत हेही सांगून आपला वेळ घेणार नाही. माझ्या मते यामध्ये प्रश्न एवढाच आहे की, ज्या काही योजना आहेत त्यांची प्रभावी अमलबजावणी होते आहे की नाही, आणि हाच प्रश्न महत्त्वाचा आहे असे मी समजतो. सभापती महोदय, आपण म्हटले की, यासंबंधात केवळ अधिवेशनामध्ये चर्चा होते. पण ही वस्तुस्थिती नाही. मागील एक महिन्यात मी विधानसभा आणि विधानपरिषदेच्या सर्व सदस्यांची एक कार्यशाळा आयोजित केली होती. माझा कोणावर आक्षेप नाही पण दुर्दैवाने त्या कार्यशाळेला मुंबईतील केवळ एकच आमदार उपस्थित होता. माझ्याकडे त्यासंबंधीचा संपूर्ण रेकॉर्ड आहे. मुंबई आणि इतर जी शहरे आहेत त्या ठिकाणच्या झ ोपडपट्ट्यांमध्ये देखील कुपोषणाचा विषय प्रामुख्याने असतो आणि त्यासंबंधात जो मुद्दा येथे उपस्थित केला गेला त्याच संबंधात ते सेमिनार मी घेतले होते. त्यासाठी शहरातील सगळ्या आमदारांना आम्ही बोलाविले होते. ...

डॉ. दीपक सावंत : पण आम्हाला त्याचे आमंत्रणच नव्हते. आपण केवळ विधानसभेच्या सदस्यांना बोलाविले असेल.

श्री. हर्षवर्धन पाटील : नाही, माझ्या माहितीप्रमाणे आम्ही सर्वच आमदारांना बोलाविले होते. असो. पण त्यावेळेस जी चर्चा झाली त्या चर्चेमध्ये या प्रश्नाच्याबाबतीत सातत्याने आम्ही काय आढावा घेतला, काय कारवाई केली आहे याची विस्ताराने चर्चा केली. परंतु यामध्ये मूळ प्रश्न आणि विषय हाच आहे की, कुपोषणाचे शंभर टक्के निर्मूलन कसे आपल्याला करता येईल. या संबंधात किती समित्या झाल्या. किती एनजीओज् आहेत वगैरे सगळी माहिती आपणाला असल्याने तेही सांगण्यात मी आपला वेळ घेणार नाही. परंतु यासाठी असलेल्या योजनांची प्रभावी अमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आरोग्य विभाग, आदिवासी विकास विभाग, रोजगार हमी योजना

....... ओ 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील .....

विभाग, महिला व बालविकास विभाग, ग्रामविकास आणि वन विभाग असे जे 5-6 विभाग आहे त्यांचेच यामध्ये महत्त्वाचे काम आहे आणि त्यांना मदत करण्यासाठी मग काही एनजीओज् आहेत. अर्थात त्यातील काही एनजीओज् चांगले काम करीत आहेत यात शंका नाही. सभापती महोदय, या प्रश्नाच्या बाबतीत अमरावती जिल्ह्यामध्ये सद्य:स्थिती बाबत जो मुद्दा उपस्थित केला गेला होता त्याला दिलेल्या लेखी उत्तरात जी माहिती शासनाने दिली होती त्यामध्ये .....

( यानंतर श्री. सरफरे ..... पी 1 ...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील...

त्यामध्ये धारणी आणि चिखलदरा या दोन तालुक्यातील ऑक्टोबर 2006 पर्यंतची ग्रेड 3 आणि ग्रेड 4 ची आकडेवारी आपल्याजवळ उपलब्ध आहे. त्या आकडेवारीचा अभ्यास केला तर धारणी आणि चिखलदरा या दोन आदिवासी तालुक्यांमध्ये गेल्या दोन वर्षाच्या तुलनेत चांगले काम झाले आहे. हे सुरु असलेले काम अधिक सिस्टीमॅटीक पध्दतीने कसे करता येईल व त्यावर कंट्रोलिंग कसे आणता येईल यासाठी प्रयत्न सुरु झाले आहेत. या प्रश्नाकडे आपण पहातो त्यावेळी या प्रश्नाचे मूळ कुठे आहे? याचा विचार करतो. हा प्रश्न केवळ राज्य सरकारकडून सुटेल असे नाही तर त्याकरीता सर्वांनी मिळून एकत्रितपणे काम करण्याची आवश्यकता आहे. कुपोषणाच्या बाबतीत उच्च न्यायालयामध्ये अनेक याचिका दाखल झाल्या आहेत. त्या अनुषंगाने उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे 13 सन्माननीय सदस्यांची समिती गठीत करण्यात येणार आहे. त्या समितीमध्ये श्री. आठवले, श्री. श्याम आष्टेकर, डॉ. अभय बंग, डॉ. चपळगावकर, डॉ. मुंदडा, डॉ. फडके अशा बाल कुपोषणाच्या क्षेत्रामध्ये अनुभव असलेल्या प्रचलित, नामांकित मंडळींना घेऊन ही समिती तयार करण्यात येत आहे. त्याकरीता नियोजन विभागाची मान्यता घेऊन लवकरच ही समिती गठीत केली जाईल. सभापती महोदय, डॉ. अभय बंग यांच्या संदर्भात याठिकाणी उल्लेख करण्यात आला. त्यांनी शासनाला अनेक शिफारशी केल्या आहेत. महिला व बालविकास विभाग, आरोग्य विभाग, आदिवासी विकास विभाग व ग्राम विकास विभाग या सर्व विभागांच्या संदर्भात सनियंत्रण समिती गठीत केली आहे. त्याचप्रमाणे जिजामाता बाल कुपोषण मिशनची स्थापना करुन सुरुवातीला 5 जिल्हे त्यामध्ये घेतले होते.मागील दोन महिन्यात 15 आदिवासी जिल्हयांमध्ये संपूर्ण काम करण्याची जबाबदारी या मिशनकडे दिली आहे. त्याचप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठीत केली आहे. महिला व बालविकास मंत्र्यांच्या अध्यक्षते खाली सनियंत्रण समिती गठीत झाली आहे. त्याचप्रमाणे मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सुध्दा दर दोन महिन्यांनी कुपोषणासंबंधीचा आढावा घेऊन बरेचसे निर्णय घेण्याचे अधिकार स्थानिक पातळीवर देण्यात येणार आहेत. घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी सुरु आहे की नाही? असा आपण प्रश्न उपस्थित केला. मी आपणास सांगतो की, या निर्णयांची अंमलबजावणी परिणामकारकपणे खालच्या पातळीवर होत आहे. व निश्चितपणे टॉप प्रॉयॉरिटीवर त्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला जाईल. या प्रश्नामध्ये अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांचा महत्वाचा रोल आहे. म्हणून जवळ जवळ 4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील....

हजार अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांची पदे भरण्यास मान्यता देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर मिनी अंगणवाडीचे रुपांतर अंगणवाडीमध्ये करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. रघुवंशी यांनी पूरक पोषण आहारासंबंधी मुद्दा उपस्थित केला. या राज्यात 70 हजार अंगणवाडीचे सेंटर्स चालू आहेत, आणि 1 लाख 35 हजार अंगणवाडी सेविका व मदतनीस त्याठिकाणी काम करीत आहेत. पूरक पोषण आहार प्रामुख्याने 0 ते 6 वयोगटापर्यंत देण्यात येतो. आतापर्यंत ठेकेदारामार्फत पूरक पोषण आहार देत होतो. परंतु महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे, ज्या राज्याने धोरणात्मक निर्णय घेऊन महिला बचत गटाकडे हे काम सुपूर्द करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये 55 ते 60 टक्के काम हे महिला बचत गटाकडे दिले आहे. तसेच, आहाराची रेसिपी कोणती असावी हे ठरविण्याचे काम देखील आता मंत्रालयाच्या स्तरावर होणार नाही. त्या रेसिपीप्रमाणे अन्नधान्य वस्तूंचे भाव काय असावेत यासंबंधीचे अधिकार आता जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी, महिला बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सनियंत्रण समिती गठीत करुन त्यांच्याकडे दिले आहे. त्यांनी हे पूरक पोषण आहाराचे संपूर्ण काम महिला बचत गटाकडे द्यावे. त्याचप्रमाणे एका महिला बचत गटाकडे एक अंगणवाडी असे धोरण ठरले आहे. त्याचप्रमाणे महिला बचत गटाकडे एवढेच काम देऊन चालणार नाही तर त्यांना रोजगार देखील उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे, त्यासंबंधी विचार चालू आहे. राज्यामध्ये पूरक पोषण आहाराचे 400 कोटींचे काम सुरु आहे. त्याचप्रमाणे राज्य सरकारने दुसरा निर्णय घेतला आहे की, पूरक पोषण आहारामध्ये पूर्वी 1.50 पैसे देत होतो, त्याठिकाणी आता 2.00 रुपये करण्यात आले आहेत. यामधील एक रुपयाचा हिस्सा राज्य सरकार खर्च करील आणि एक रुपयांचा हिस्सा केंद्र सरकारच्या माध्यमातून खर्च केला जाईल. अशाप्रकारे एकात्मिक बाल विकास योजनेंतर्गत पूरक पोषण आहाराचा कार्यक्रम आपण राज्यामध्ये राबवीत आहोत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील (पुढे सुरू....

मला सदनाला विनंती करावयाची आहे की, पूरक पोषण आहाराच्या संदर्भात शासनाने निर्णय घेतलेला आहे की, इतर राज्यांनी महिलांच्या बचत गटाला काम दिलेले नाही परंतु आपण राज्यातील बचत गटांना पुरक पोषण आहाराच्या संबंधातील काम देण्याचा प्रयत्न केलेला आहे. मार्च अखेरपर्यन्त 100 टक्के पूरक पोषण आहाराचे काम बचत गटाला मिळेल. पूरक पोषण आहाराच्या योजनेमध्ये कोणताही ठेकेदार असता कामा नये, असा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतलेला आहे. विशेष करून तीन-चार गोष्टींच्याबाबतीत निर्णय घ्यावयाचा आहे. लोकसंख्या वाढीवर नियंत्रण करणे, दुसरी गोष्ट ग्रामीण भागातील लोकांना रोजगार उपलब्ध करुन देणे, बाल विवाह रोखणे. सन्माननीय श्री.गुजराथी साहेबांनी अत्यंत महत्वाचा मुद्दा मांडला की, दोन मुलांमध्ये अंतर ठेवण्याचे बंधन करावे. ग्रामीण भागातील लोकांचा अशिक्षितपणा असल्यामुळे त्यांच्याकडून ते पाळले जात नाही. आई-वडील कुपोषित असतील तर ते बालकाची काय काळजी घेतील ? म्हणून सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून हे सगळे प्रश्न पहाण्याची आवश्यकता आहे. आपण अत्यंत गांभीर्याने कुपोषणाच्या निर्मूलनाचे काम हाती घेतलेले आहे. आदिवासी विभागातील गरिबी, दारिद्र्य, अशिक्षितपणा, आणि लोकांमध्ये असलेला अवेअरनेस, ज्या ठिकाणी आरोग्याची सुविधा उपलब्ध नाही, साधनसामुग्री उपलब्ध नाही, अशा दुर्गम भागामध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त आढळते. त्याचप्रमाणे झोपडपट्यांमध्येही कुपोषणाचे प्रमाण वाढत आहे. नगरपालिका, महानगरपालिका या शहरी भागामध्ये देखील कुपोषण कसे रोखता येईल, या संदर्भात प्रयत्न सुरू केलेला आहे. आज नवसंजीवन योजना, तेजस्वीनी योजना, आरोग्य विभागाच्या योजना आहेत याची आपल्याला कल्पना आहे. त्यांचे एक सिंगल मॉनिटरींग होणे गरजेचे आहे. या संबंधात दर महिन्याला रिव्ह्यू घेणे अवश्यक झालेले आहे. म्हणून जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर खऱ्याअर्थाने जबाबदारी टाकलेली आहे. कलेक्टरनी तालुका स्तरावरील कुपोषण समित्या नेमाव्यात. ज्या तालुक्यामध्ये कुपोषित बालके श्रेणी 1,2,3, मध्ये आहेत, त्या ठिकाणी, जिल्ह्याच्या ठिकाणी सनियंत्रण समित्या असल्या पाहिजेत. राज्य स्तरावर सनियंत्रण समिती आहे. या समित्या प्रभावीपणे कशा काम करतील, या दृष्टीने प्रयत्न सुरु केलेला आहे. ग्रामपंचायतीची मासिक सभा असते, त्यावेळेस त्यांच्या अजंड्यावर कुपोषणाचा विषय ठेवावा, पंचायत समितीच्या दर महिन्याच्या सभेमध्ये कुपोषणाच्या विषयाचा विषय घेऊन त्याचा रिव्ह्यू घ्यावा, जिल्हापरिषदेच्या जनरल बॉडीसमोर कुपोषणाचा विषयाला प्राधान्य देऊन चर्चा करण्याची आवश्यकता आहे, तसा निर्णय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/

श्री.हर्षवर्धन पाटील (पुढे सुरु...

करतो आहोत. यामध्ये लोकल बॉडी, एनजीओ इन्व्हॉल्व्ह आहेत या सगळ्यांना एकत्रित करून काम करावयाचे आहे. कुपोषणामध्ये किती मुलांची वाढ झाली, किती कमी झाली ? या आकडेवारीमध्ये मी जात नाही. या सबंधाने एक श्वेतपत्रिका काढता येईल. आज आपल्याकडे एसआरएनुसार अहवाल आलेला आहे, या क्षेत्रामध्ये निरनिराळ्या स्वयंसेवी संस्था काम करीत आहेत. तरी देखील कुपोषण ही चिंतेची बाब झालेली आहे. निश्चित ती आपल्याला थांबवावी लागणार आहे. कुपोषणाचे निर्मूलन करण्याच्या संबंधात प्रभावीपणे सुधारणा करणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत या क्षेत्रामध्ये काम करतात. त्यांनी अर्धातास चर्चेच्या मध्यमातून ही चर्चा उपस्थित केली. या कुपोषणाच्या प्रश्नावर व्यापक चर्चा होणे गरजेचे आहे. या दृष्टीने विभागवार मेळावे घेतले पाहिजेत. गावागावामध्ये जाऊन कुपोषणाच्या संबंधाने माहिती जाणून घेणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील .....

हा प्रश्न आपण कशा पध्दतीने टॅकल करीत आहोत याची माहिती सुध्दा गावागावामध्ये जाणे आवश्यक आहे. म्हणून राज्य सरकारच्या वतीने भविष्य काळामध्ये निश्चितपणाने कुपोषण कसे रोखता येईल यादृष्टीने प्रयत्न होणार आहे. त्यादृष्टीने आमच्या शासनाची वाटचाल राहणार आहे. रोजगार हमी योजनेच्या बाबतीत बरेच नियम शिथिल केलेले आहेत. आदिवासी विभागामध्ये सर्वोच्च प्राधान्याने रोजगार हमी याजनेचे सर्व नॉर्म्स शिथिल करुन मागेल त्याला काम आणि तेही दोन किलोमीटरच्या परिसरामध्ये देणे, माननीय वन मंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे सामाजिक वनीकरणाचे काम असेल, वनतळ्याचे काम असेल, अशी कामे घेऊन त्या त्या भागातील लोकांना काम देता येईल. याबाबतीत निश्चितपणे प्रयत्न केला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

( अनेक सन्माननीय सदस्य एकदम प्रश्न विचारण्यासाठी परवानगी मागतात )

**तालिका सभापती (श्री. अरविंद सावंत )** : या अर्धा-तास चर्चेमध्ये जास्त सन्माननीय सदस्यांना सहभाग घेता येणार नाही कारण आणखी अर्ध्या तासाच्या दोन चर्चा शिल्लक आहेत व या विशेष सत्राची वेळ 11.45 पर्यंत आहे. यानंतर दोन तीन सन्माननीय सदस्य प्रश्न विचारतील व त्याला एकत्रितपणे माननीय मंत्रिमहोदय उत्तर देतील.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, योजनेची अंमलबजावणी कशा प्रकारे करणार आहोत याबाबत माननीय मत्रिमहोदयांनी विस्तृतपणे सांगितलेले आहे. माझ्या मनामध्ये एक भीती आहे. प्रत्येक अधिवेशनामध्ये आपण अशा प्रकारे चर्चा करतो तसेच समित्या नेमतो. त्या समित्या ग्राऊंड लेव्हलवर काम करतात की, नाही हे पाहण्यासाठी मॉनिटरींग सिस्टीम असली पाहिजे. त्या भागातील लोकप्रतिनिधींचा त्यामध्ये सहभाग असेल अशी मॉनिटरींग सिस्टीम करणार काय ? कारण लोकप्रतिनिधी या प्रश्नाशी कन्सर्न असतो. जिल्हा परिषद सदस्य असतील, तेथील आमदार असतील, तेथील खासदार असतील ते जर त्या बैठकीमध्ये येणार नसतील तर ते बैठकीला येत नाहीत असे वर्तमानपत्रात घोषित करावे. त्यामुळे लोकप्रतिनिधींमध्ये सुध्दा अकाऊंटीबिलिटी येईल. माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितल्याप्रमाणे यामध्ये आपल्याला पारदर्शकता ठेवावयाची आहे. त्यामध्ये यावर श्वेतपत्रिका काढण्यामध्ये शासनाला काय अडचण आहे ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/ MAP/

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रघुवंशी साहेबांनी एक अत्यंत महत्वाची बाब त्यांच्या वक्तव्यामध्ये सांगितली की, त्या ठिकाणी जे चणे किंवा वाटाणे एन.जी.ओ.मार्फत दिले जातात ते चणे रात्रभर भिजविले तरी शिजत नाहीत. माननीय मंत्रिमहोदय याबाबतीत काय कारवाई करणार आहेत ?

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : या देशामध्ये कुपोषणाचा सर्वात कमी रेट केरळमध्ये आहे. त्या ठिकाणी कमीतकमी कुपोषण होते. या ठिकाणी कुपोषण कमी करणे किंवा त्याचा रेट कमी करण्यासाठी राज्य शासन जे जे प्रयत्न करीत आहे त्यामुळे या दोन तीन वर्षामध्ये कुपोषणाचा रेट किती होता आणि आता किती रेट आहे ? कुपोषण हे केवळ आदिवासी भागामध्येच आहे असे नाही तर शहरातील झोपडपट्टयांमध्ये सुध्दा कुपोषण आहे. तेथील कुपोषणाचा रेट काय आहे ?

श्री. चंद्रकांत रघुवंशी : शहरी भागातील अंगणवाड्या लवकरात लवकर कशा सुरु होतील याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, यासंदर्भातील इफेक्टिव अंमलबजावणीसाठी मॉनिटरींग समित्या गठीत केल्या जातील आणि या मॉनिटरींग समित्या गठीत करीत असताना त्या भागातील जे लोकप्रतिनिधी असतील त्यांना त्या समितीवर घेतले जाईल. दर दोन महिन्याने या मॉनिटरींग कमिटीने रिव्ह्यू घ्यावा. या एकत्रित प्रश्नाच्या बाबतीत उच्च न्यायालयामध्ये शासनाच्या वतीने ॲफिडेव्हिट दाखल केले आहे. कुपोषणाची सद्य:स्थिती काय आहे यासंदर्भात लवकर राज्य शासनाच्या वतीने निश्चितपणे भूमिका मांडली जाईल. सन्माननीय सदस्य श्री. रघुवंशी यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याबाबतीत चौकशी केली जाईल. त्यामध्ये जे दोषी असतील त्यांच्याबाबतीत कारवाई करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी एक मुद्दा उपस्थित केला. या चर्चेच्या सुरुवातीला ते सभागृहात उपस्थित नव्हते. या प्रश्नाचे उत्तर मी दिलेले आहे. या राज्यामध्ये नवीन 25 हजार अंगणवाड्या द्याव्यात असा प्रस्ताव दिलेला आहे. या 25000 अंगणवाड्यांपैकी 12 हजार अंगणवाड्या शहरांसाठी आहेत आणि आदिवासी विभागासाठी 4000 अंगणवाड्या मंजूर होऊन त्याची कार्यवाही सुरु झालेली आहे.

----

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : प्राथमिक शाळांतील 1 ते 7 वर्ग असलेल्या बी.ए.डी.एड. शिक्षकांना 5 वर्षात बी.एड. होण्याची अट लागू केलेली असणे

**मु.शी.** : प्राथमिक शाळांतील 1 ते 7 वर्ग असलेल्या बी.ए.डी.एड. शिक्षकांना 5 वर्षात बी.एड. होण्याची अट लागू केलेली असणे यासंबंधी श्री. रामनाथ मोते यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये काम करणाऱ्या व 1 ते 7 चे वर्ग असलेल्या बी.ए.डी.एड. शिक्षकांना 25 % प्रमाणात प्रशिक्षित पदवीधर वेतनश्रेणी मान्य केली जाणे, बी.ए.डी.एड. शिक्षकांनी पुढील 5 वर्षात बी.एड. होण्याची अट लागू केली असणे, महाराष्ट्र यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ शिवाय अन्यत्र पत्राद्वारे बी.एड. प्रशिक्षणाची सोय नसणे, वर्षानुवर्षे अर्ज करुनही बी.एड. प्रशिक्षणासाठी निवड न झाल्याने व 5 वर्षात बी.एड. पूर्ण न झाल्याने प्राथमिक शिक्षकांना वेतनश्रेणी गमवावी लागणे, मर्यादित जागा असल्याने निवड होणे अडचणीचे असणे, शिक्षकांना काही जागा राखून ठेवण्याबाबत व 5 वर्षाची अट शिथिल करण्याबाबत कार्यवाही होण्याची आवश्यकता व त्यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही वा उपाययोजना.

सभापती महोदय, या ठिकाणी प्राथमिक शाळांमध्ये काम करणा-या शिक्षकांच्या प्रशिक्षणाच्या संदर्भातील विषय या अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून उपस्थित केलेला आहे. आज महाराष्ट्र राज्यामध्ये दोन प्रकारच्या प्राथमिक शाळा आहेत. एक म्हणजे पहिली ते चौथी पर्यन्तची प्राथमिक शाळा आणि दुसरी पहिली ते सातवी पर्यन्तची प्राथमिक शाळा. ह्या ज्या खाजगी अनुदानित प्राथमिक शाळा आहेत त्या शाळांमध्ये साधारत: एका वर्गाला एक शिक्षक मिळतो आणि 5 वी ते 7वीच्या वर्गासाठी 1.3 या प्रमाणात 4 शिक्षक मंजूर होतात. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार प्राथमिक शाळे काम करणारा शिक्षक हा डी.एड. झालेला असावा. प्रशिक्षित पदवीधर,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामनाथ मोते...

बी.ए.डी.एड. झालेला शिक्षक हा प्राथमिक शाळेत शिक्षकाच्या नेमणुकीस पात्र नाही, तो अपात्र आहे अशा प्रकारचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला. त्या निर्णयानुसार शासनाने आदेश काढले आणि त्या आदेशाची अंमलबजावणी महाराष्ट्रामध्ये सुरु झालेली आहे. शासनाने मागे 14.11.1979 रोजी जे आदेश काढले होते त्यानंतर पुन्हा सुधारित आदेश काढले.अशा शाळांमध्ये 1.3 प्रमाणामध्ये 4 शिक्षक मंजूर  होतात. त्यापैकी 25 टक्के म्हणजे एका शिक्षकाला प्रशिक्षित पदवीधर वेतनश्रेणी मान्य होऊ शकते. प्रशिक्षित पदवीधर वेतनश्रेणी मिळण्याचे निकष असे आहेत की, तो बी.ए.बी.एड. असावा, किंवा बी.एस्सी. बी.एड. असावा किंवा बी.ए. डी.एड. असावा. माध्यमिक आणि प्राथमिक शाळातील असे शिक्षक हे प्रशिक्षित पदवीधर म्हणून समजले जातात. म्हणजे 4 पैकी एका शिक्षकाला म्हणजे 25 टक्के शिक्षकाला प्रशिक्षित पदवीधर ही वेतनश्रेणी मिळते. म्हणजे बी.ए.डी.एड, बी.एस्सी. डी.एड. झालेल्या शिक्षकांना प्रशिक्षित पदवीधर ही वेतनश्रेणी मिळते. पण ही वेतनश्रेणी देताना अट टाकलेली आहे. या शिक्षकांनी पुढच्या 5 वर्षामध्ये बी.एड. प्रशिक्षण पूर्ण केले पाहिजे. शासनाने एक परिपत्रक काढलेले आहे की, 10 वर्षाच्या सेवेनंतर डी.एड. शिक्षक हा बी.एड. शिक्षकाशी समकक्ष होतो. दुस-या बाजूला जे बी.ए. डी.एड. शिक्षक शाळेत काम करतात त्यांच्यावर येत्या 5 वर्षामध्ये बी.एड. प्रशिक्षण पूर्ण करण्याची सक्ती करण्यात येत आहे. या बी.ए.डी.एड. झ ालेल्या शिक्षकांना प्रशिक्षित पदवीधर वेतनश्रेणी मान्य केलेली तर त्यांच्याकडून अशी अपेक्षा व्यक्त केली जाते की त्यांनी 5 वर्षामध्ये बी.एड. पूर्ण करावे. म्हणजे त्यांनी एक वर्ष रजा घेऊन बी.एड. करावे अशी शासनाची अपेक्षा आहे काय ?

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

बी.ए.बी.एड.ला नंबर लागला नाही तर मेरिटचा प्रश्न येतो. शेवटी सेवेत असलेले शिक्षक आहेत. त्यामुळे त्यांचा बी.ए.बी.एड.ला नंबर लागेल याची शाश्वती नाही. बी.ए.बी.एड.प्रशिक्षण पूर्ण करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ हा आहे. ही एकमेव एजन्सी आहे. अन्यथ विद्यापीठाचे करस्पोण्डन्स कोर्स बंद झाले. बाहेरच्या विद्यापीठातून कोर्स पूर्ण केला तर महाराष्ट्रात तो मान्य होत नाही. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठामध्ये असे प्रशिक्षण दिले जाते. त्यासाठी क्रायटेरिया आहे तो म्हणजे मेरिटप्रमाणे नंबर लागतो. दुसरी क्रायटेरिया म्हणजे संबंधित शिक्षकाचा अनुभव. आज अनेक अप्रशिक्षित शिक्षकांनी बी.एड.चे शिक्षण पूर्ण केले ते विद्यापीठाकडे अर्ज करतात आणि त्यांच्या इनटेक कॅपॅसिटीच्या मर्यादेमध्ये विद्यार्थ्यांची किंवा शिक्षकांची निवड केली जाते. हे करीत असताना बी.ए.डी.एड.झालेल्या शिक्षकांना प्रशिक्षित पदवीधराची वेतनश्रेणी मिळाली आणि त्यांना बी.ए.बी.एड.प्रशिक्षण पूर्ण करणे बंधनकारक केले. असे शिक्षक दरवर्षी विद्यापीठाकडे अर्ज करतात परंतु त्यांचा प्रशिक्षणासाठी नंबर लागत नाही. त्यामुळे ते पाच वर्षात बी.ए.बी.एड.चे प्रशिक्षण पूर्ण करु शकत नाहीत. त्याचा परिणाम असा होतो की, पाच वर्षानंतर या शिक्षकांची बी.ए.बी.एड.ची वेतनश्रेणी काढून घेतली जाते. एका बाजूला बी.ए.बी.एड.च्या प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिली जात नाही. दुसऱ्या बाजूला अन्यायकारक रितीने अट घातली आहे. आमच्या शिक्षकांनी हे प्रशिक्षण घेण्याचे मान्य केले आहे. प्रशिक्षित होणे हे चांगलेच आहे. परंतु प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी शासनाची आहे. मग शासन असे करणार आहे का? यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठामध्ये अशा शिक्षकांना, ज्यांना 5 वर्षात बी.ए.बी.एड.हा दोन वर्षाचा कोर्स पूर्ण उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे, त्यांना बी.ए.बी.एड.प्रशिक्षण पूर्ण केले नाही तर प्रशिक्षित पदवीधरांच्या वेतनश्रेणीला मुकावे लागेल अशा शिक्षकांसाठी विद्यापीठामध्ये टक्केवारीवर जागा ठेवल्या जातील का? प्राधान्याने यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठामध्ये प्रवेश मिळण्यासाठी तरतूद करणार का? जोपर्यंत एखाद्याने बी.ए.डी.एड.च्या प्रशिक्षणासाठी अर्ज केलाच नाही त्याबाबत आम्ही समजू शकतो, त्याचे आम्ही समर्थन करणार नाही. परंतु दरवर्षी अर्ज करुनही नंबर लागत नाही. 5 वर्षे उलटली आणि प्रशिक्षण पूर्ण झाले नाही. परिणामत: वेतनश्रेणी काढून घेतली. या शिक्षकांच्या वेतनश्रेणीला संरक्षण देणे आवश्यक आहे. प्रयत्न करुनही प्रशिक्षण पूर्ण होऊ शकले नाही. प्रशिक्षणासाठी निवड झाली नाही तर





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

आम्हाला दिलेली वेतनश्रेणी काढून घेऊ नये असे संरक्षण शासन देणार का? बी.ए.बी.एड.यासाठी असते, 8 वी ते 10 वीच्या विद्यार्थ्यांना कसे शिकवावे यासाठी प्रशिक्षण दिले जाते. म्हणजे बी.ए.डी.एड.झालेले शिक्षक 5 वी ते 7 वी च्या वर्गाला शिकवितात. शेवटी 10 वर्षांचा अनुभव शासनाने मान्य केला व तो अनुभव बी.ए.बी.एड.च्या समकक्ष आहे. त्या संदर्भात शासनाने परिपत्रक काढले आहे, शासन निर्णय निर्गमित केला आहे. मग बी.ए.बी.एड.ची अट का लावली जाते? या सर्व बाबींचा खुलासा मंत्रीमहोदयांनी करावा.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षणमंत्री) : सन्माननीय सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते साहेबांनी 1 ते 7 वी च्या वर्गासाठी नियुक्त होणाऱ्या 25 टक्के शिक्षकांना, 1:3 या तत्वानुसार शिक्षकांची नियुक्ती होते त्यांना बी.ए.डी.एड.शिक्षकांना बी.ए.बी.एड.च्या प्रशिक्षणाची अट घालण्यात आली आहे त्यासंबंधी मुद्दा उपस्थित केलेला आहे. प्राथमिक शिक्षणातील 1 ते 7 वीच्या शिक्षकांची मुलभूत शैक्षणिक अर्हता 12वी व डी.एड. ही आहे. 5 वी ते 7 वीपर्यंत प्रशिक्षित शिक्षक असावा हा बेसिक मुद्दा आहे. तो ग्रॅज्युएट ट्रेंड असावा हे तत्वत: मान्य केले आहे. 12वी, बी.एड.हे मान्य केले जात नाही. बाल मानसशास्त्र लक्षात घेऊन बी.ए.बी.एड. असेल तर त्याला वरची वेतनश्रेणी दिली जाते. बी.ए.डी.एड.झाल्यानंतर किमान 5 वर्षाची अट घालून बी.ए.बी.एड.चे प्रशिक्षण पूर्ण करावयाचे आहे. हे क्वालिफिकेशन महत्वाचे आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके .....

सभापती महोदय, माझी सन्माननीय सदस्यांना, शिक्षक संघटनेला तसेच शिक्षकांना विनंती राहणार आहे की, किमान पाच वर्षाच्या आत बी.ए.डी.एड. शिक्षकांनी बी.ए.बी.एड. निश्चितपणे होणे आवश्यक आहे. परंतु सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असे आहे की, या शिक्षकांना 5 वर्षात बी.ए.बी.एड. करण्याची सक्ती नसावी. परंतु त्यांची ही मागणी मान्य करता येत नाही. बी.ए.डी.एड. झालेल्या शिक्षकांना बी.ए.बी.एड होण्याच्या संदर्भात संधी उपलब्ध करुन देणे , प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करुन देणे, महाराष्ट्र यशवंतराव मुक्त विद्यापीठातून व पत्राद्वारे या शिक्षकांना बी.ए.बी.एड. होण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देण्याची मागणी केलेली आहे. तसेच यशवंतराव मुक्त विद्यापीठात या शिक्षकांसाठी राखीव जागा निर्माण करावी अशी मागणी त्यांनी केलेली आहे. असे जरी असले तरी बी.ए.बी.एड असलेले शिक्षक पाच वर्षात बी.ए.बी.एड. झाले नाही तर त्यांची वेतनश्रेणीला संरक्षण द्यावे अशीही मागणी केलेली आहे. परंतु याबाबत मीसन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, जे शिक्षक पाच वर्षात बी.ए.बी.एड. पूर्ण करु शकणार नाही त्याबाबत पाच वर्षाची अट शिथील करता येऊ शकेल. अशा प्रकारे त्यांना 2008 पर्यंत बी.ए.बी.एड. व्हावे लागेल. त्यांना आपण 2008 पर्यंत मुदत देण्यास तयार आहोत. बी.ए.बी.एड. चे प्रशिक्षण हे व्होकेशनल कोर्स सारखे आहे. या कोर्समध्ये शिक्षकांना विविध प्रकारची माहिती, प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे या शिक्षकांना बी.ए.बी.एड. होणे अनिवार्य राहील. या शिक्षकांनी आपली शैक्षणिक क्षमता, मेरीट वाढविले पाहिजे. त्यासाठी आपण दोन वर्षाची मुदत वाढवून देण्यास तयार आहोत.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी आताच सांगितले आहे की,बी.ए.बी.एड. होण्यासाठी मुदत वाढवून दिली जाणार आहे. परंतु सभापती महोदय, ज्यांना 2006 मध्ये बी.ए.बी.एड. पूर्ण करावयाचे होते त्यांना आता ते 2008 मध्ये ते पूर्ण करावे लागणार आहे. तसेच हे चक्र सातत्याने पुढे सुरुच राहणार आहे. भविष्यामध्ये हा प्रकार अशाच रितीने सुरु राहणार आहे. परंतु पाच वर्षात शिक्षक बी.ए.बी.एड. झाले नाही तर त्यांची वेतनश्रेणी कमी करु नये तसेच या शिक्षकांना बी.ए.बी.एड. होण्यासाठी संधी उपलब्ध करुन द्यावी. ज्या शिक्षकांना

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.......

प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होऊ शकली नाही तर त्या शिक्षकांची वेतनश्रेणी काढून घेऊ नये. या शिक्षकांना जर प्रशिक्षणाची संधी मिळाली नाही तर त्यामध्ये या शिक्षकांचा काय दोष आहे? त्यामुळे या शिक्षकांना प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन द्यावी. जोपर्यंत शिक्षकांना संधी उपलब्ध होत नाही तोपर्यंत त्यांची वेतनश्रेणी काढू नये.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, बी.ए.बी.एड. होण्याच्या संदर्भात अनेकवेळा शिक्षकांना संधी दिली होती परंतु हे शिक्षक रिटायर्ड झाले तरी ते बी.ए.बी.एड. होऊ शकलेले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. परंतु बी.एड.च्या प्रशिक्षणासाठी त्यांना सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबात विचार करता येईल.

**तालिका सभापती** : बी.ए.डी.एड. झालेल्या शिक्षकांनी 5 वर्षात बी.ए.बी.एड. करण्याचे आपण कम्पलसरी केलेले आहे. परंतु सर्व शिक्षकांना बी.ए.बी.एड. होण्यासाठी संस्थेत प्रवेश मिळत नाही. प्रशिक्षित होण्यासाठी यंशवतराव मुक्त विद्यापीठात त्यांना जागा मिळत नाही. त्यामुळे या शिक्षकांसाठी कोटा उपलब्ध करुन द्यावा जेणेकरुन हे शिक्षक 5 वर्षात बी.ए.बी.एड. पूर्ण करु शकतील. या शिक्षकांना जर 5 वर्षात प्रशिक्षण घेण्याची संधी मिळाली नाही तर वेतनश्रेणी काढून घेऊ नये.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, बी.ए.बी.एड. झाल्याशिवाय शिक्षक मेरीटमध्ये येत नाहीत. त्यामुळे मेरीट हे आवश्यक आहे. या ठिकाणी शिक्षकांना बी.ए.बी.एड. करण्यासाठी प्रशिक्षण संस्थेत आरक्षण आणि सीट वाढवून देण्याची मागणी केलेली आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, बी.ए.बी.एड. होण्यामध्ये आपण शिक्षकांना मुदतवाढ देत आहोत. या ठिकाणी त्यांचा प्रश्न आहे की, वेतनश्रेणीला संरक्षण मिळाले पाहिजे. परंतु यासंदर्भात आपण त्यांना बी.ए.बी.एड. करण्यासाठी मुदतवाढ देण्यास तयार आहोत.

डॉ. एम.ए. अझीज : जे शिक्षक बी.ए.डी.एड. झालेले आहेत त्यांना पुन्हा बी.ए.बी.एड. करण्याची कंडीशन का घालीत आहात?

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.ए.अझीज.........

ज्या शिक्षकांनी डी.एड. केलेले आहे ते पर्याप्त आहे. त्याला जर तुम्ही बी.एड. करायला सांगता तर तो शाळेत बी.एड.चा अभ्यास करणार की विद्यार्थ्यांना शिकविणार ? तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, शासन शिक्षकांना बी.एड.ची अट कशाला घालते ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, माझ्याकडे 10 शिक्षक डी.एड.झालेले आहेत. त्यांना योग्य वाटत असेल तर त्यांनी त्यांना आपल्या संस्थेत शिक्षक म्हणून घ्यावे. आपण गुणवत्तेचा विचार केला पाहिजे. शिक्षकांना बी.एड.करण्यासाठी सीटस् राखून ठेवण्याचा जरुर विचार करु.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, यापूर्वी 1 ते 7 वर्ग असलेल्या शिक्षकांना बी.ए.डी.एड शिक्षकांना बी.एड. होण्याची अट नव्हती. त्यांना पदवीधर वेतनश्रेणी द्यावी लागते. आता शासनाने बी.एड.ची अट आणलेली आहे.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, जे बी.ए.बी.एड आहेत त्यांना सरसकट 1 ते 7 पर्यंत अपॉईंट करायला हरकत असू नये. आपल्याला जर हे मान्य असेल तर मी हे आजच मान्य करतो. आपण 1-7 पर्यंत सरसकटपणे अपॉईंटमेंट द्यायची काय ?

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, शासनाचे स्पष्ट आदेश आहेत की, एखादा बी.ए.डी.एड. with ten years experience is equivalent to BA Bed. तो बी.एडच्या समकक्ष ठरतो.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, या संपूर्ण परिस्थितीचा सखोल आढावा घेणे हे शालेय शिक्षण विभागाला क्रमप्राप्त आहे. जे बी.ए.डी.एड.झालेले आहेत त्यांना प्राथमिक शाळेत अपॉईंटमेंट मिळते. जर तो बी.एड झाला तर त्यास स्केल वाढवून देण्याचा नियम आहे. त्याने सेकंडरी मध्ये शिकविले पाहिजे. जर बी.एड.वाला एम.ए. झाला तर त्याला एम.ए.चे क्रेडीट मिळत नाही. शासनाने समान स्केल केल्यामुळे अडचण झालेली आहे. या शिक्षणक्षेत्रामध्ये डी.एड. बी.एड., आणि एम.एड ( मास्टर ) अशा तीन महत्वाच्या श्रेणी आहेत. तेव्हा मी मघाशी म्हटल्याप्रमाणे शालेय शिक्षण विभागाने या संपूर्ण प्रकरणाचा सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे. समकक्ष स्केल केल्यामुळे शासनाची अडचण झालेली आहे. तेव्हा वरील पात्रतेप्रमाणे तीन वेतनश्रेणीमध्ये या शिक्षकांना बसविण्यात यावे त्यामुळे कोणावरही अन्याय होणार नाही, याबाबत शासन विचार करणार आहे काय ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, या संदर्भात सुस्पष्टता आणण्यासाठी एक स्वतंत्र समिती नेमण्यात येईल. त्या समितीमध्ये शिक्षक बांधवांचा देखील समावेश असेल. तसेच सीटस् वाढविण्याचा देखील साकल्याने विचार केला जाईल.

---------------

.                                                                                                   यानंतर श्री.गागरे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : शालेय शिक्षणातील पर्यावरण विषयाचे महत्व.

**मु.शी.** : शालेय शिक्षणातील पर्यावरण विषयाचे महत्व यासंबंधी प्रा.शरद पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

प्रा.शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा तास चर्चा उपस्थित करतो :-

"शासनाने सन 1999-2000 या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता 5 वी ते 9 वी या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण हा विषय शिकविण्याची घोषणा करणे, या विषयासाठी स्वतंत्र पुस्तक न छापता शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका प्रकाशित केली जाईल असे जाहिर करणे, यथावकाश इयत्ता 10 वी साठी सुध्दा पर्यावरण शिक्षण हा विषय शिकवला जाईल व या विषयाची 100 मार्काची परिक्षाही विद्यार्थ्यांना अनिवार्य केली जाईल असेही जाहिर करणे, त्यासाठी विज्ञान व गणित विषयाचे प्रत्येकी 50 गुण कमी केले जाणे, शैक्षणिक वर्ष 2007-2008 पासून याची अंमलबजावणी सुरु होणे, पर्यावरण हा विषय इयत्ता 11 वी व 12 वी साठीही शिकवण्यात येणे, परंतु त्यासाठी वेगळा शिक्षक नेमण्याची कोणतीही तरतूद नसणे, याविषयाचे पाठ्यपुस्तक नसणे, कोणत्याही शिक्षकाने तो विषय शिकवला तरी चालेल असे शासनामार्फत कळविण्यात येणे, या महत्वाच्या विषयासाठी अभ्यासक्रम निश्चित करणे, विषय शिकविण्यासाठी शिक्षकाची अर्हता निश्चित करणे, या विषयाचा कार्यभार शिक्षकाच्या एकूण कार्यभारामध्ये समाविष्ठ करणे. तसेच विद्यार्थ्यांना या विषयाची पुस्तके उपलब्ध करुन द्यावीत अशी मागणी शिक्षण क्षेत्रातून होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, पर्यावरण या विषयासाठी मी नियम 92 अन्वये अर्धा-तास चर्चा उपस्थित केली आहे. राज्यातील सर्व माध्यमिक शाळेमध्ये 1999-2000 या शैक्षणिक वर्षापासून पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविण्याची सूचना महाराष्ट्र शासनाने मार्च 1999 मध्ये काढलेली आहे. तेव्हापासून इ.5 वी ते इ.9 वी या वर्गांना पर्यावरण शिक्षण या विषयाचे अध्यापन करण्यात येत आहे. तेव्हापासून आजतागायत हा विषय माध्यमिक शाळेमध्ये शिकविला जात आहे. 2007-2008 या शैक्षणिक वर्षापासून इ.10 वी वर्गास हा विषय अनिवार्य करण्यात येणार आहे. इ.10 वी च्या परीक्षेतील गणित विषयाचे 50 गुण आणि विज्ञान विषयाचे 50 गुण कमी करुन पर्यावरण या विषयासाठी 100 गुणांची प्रश्नपत्रिका काढून त्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जाणार आहे

.....2

PNG/ MHM/ SBT/

प्रा.शरद पाटील ..... (पुढे सुरु)

असे शासनाने विद्यालयांना कळविले आहे. 2005-2006 या शैक्षणिक वर्षापासून पर्यावरण हा विषय इ.11 वी साठी शिकविण्याची सूचना देखील शासनाने केली आहे, त्याप्रमाणे इ.11 वी वर्गात पर्यावरण विषय शिकविला जात आहे. पुढच्या वर्षी इ.12 वी च्या वर्गामध्येही पर्यावरण विषय शिकविला जाईल. एक अत्यंत महत्वाचा विषय म्हणून शासनाने पर्यावरण या विषयाकडे पाहण्याचे ठरविले आहे. 1996 साली मुल्य शिक्षणाचा अंर्तभाव शालेय अभ्यासक्रमात करण्यात आला आहे. त्याप्रमाणे पर्यावरण विषयाचा समावेश अभ्यासक्रमात करण्यात यावा असे मा.उच्च न्यायालयाचे आदेश आहेत असे सांगितले गेले आहे. पर्यावरण विषय अभ्यासक्रमात समाविष्ट केला गेला असला तरी त्या विषयाच्या अभ्यासक्रमाची पुस्तके मात्र उपलब्ध करुन दिलेली नाहीत. तसेच पर्यावरण विषयासाठी प्रशिक्षित शिक्षकांची नेमणूक करण्याची व्यवस्था शासनाने केलेली नाही. आठवडयाला फक्त दोन तास पर्यावरण या विषयासाठी दिले गेले आहेत. अशा तऱ्हेने हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट केला आहे परंतु त्या संबंधीची पूर्वतयारी शासनाने केलेली दिसून येत नाही. कोणत्या विषयाच्या शिक्षकांनी पर्यावरण विषय शिकवायचा ? दुसऱ्या कोणत्या तरी विषयाचे तास कमी करुन पर्यावरण विषयासाठी दोन तास द्यावयाचे ? अशा प्रकारांमुळे दुसऱ्या विषयावर अन्याय होत आहे आणि पर्यावरण विषयालाही योग्य न्याय मिळत नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. शासन शिक्षकांना पर्यावरण विषयाची हस्तपुस्तिका आणि प्रशिक्षण देणार होते, त्याबाबत काय कार्यवाही झाली आहे ? याची माहिती मिळत नाही. तसेच शिक्षकांना पर्यावरण विषय विद्यार्थ्यांना समजून देण्यासाठी काही प्रकल्प व प्रशिक्षण हाती घेण्यासाठी सूचना देण्यात आल्या होत्या. त्याचबरोबर इतर माध्यमातून पर्यावरण विषयाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यासंबंधीच्या सूचना देण्यात आल्या होत्या. पर्यावरण विषयाच्या वर्षातून चार चाचण्या घ्याव्यात असे शासनाने सूचविले आहे. एकंदरीत विचार करता पर्यावरण विषयासंबंधी निश्चित अशा प्रकारची योजना नसल्यामुळे शालेय स्तरावर हा विषय कसा प्रकारे शिकविला जात असावा ? याबद्दल विविध शंका आहे. उच्च माध्यमिक स्तरावर देखील हा विषय शिकविण्याची सूचना केली आहे, त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी सुरु आहे. प्रत्येक उच्च माध्यमिक विद्यालयात हा विषय शिकविला जात आहे. शासनाने सूचना केल्याप्रमाणे उच्च माध्यमिक विद्यालयात पर्यावरणक्षेत्र अभ्यासक्रम व प्रकल्प अभ्यासक्रम राबविले जातात.

..... यानंतर श्री.सोनवणे

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री..शरद पाटील....... ( पुढे सुरु )

4 लेखी परीक्षा घेण्याची सूचना दिलेली आहे त्या किती ठिकाणी घेतल्या जातात याची माहिती मिळणे आवश्यक आहे त्यासाठी गुण निश्चित करण्यात आलेले आहेत तेव्हा एकूणच हा पर्यावरणाचा विषय महत्वाचा असला तरी देखील शासनाने या विषयाचा घाईघाईने परिचय करुन दिलेला दिसतोय. पूर्व तयारी करुन, नियोजन करुन जर हा विषय अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट केला असता तर योग्य झाले असते. यासंबंधी माझी आपल्याला अशी सूचना राहील की, माध्यमिक स्तरावर हा विषय शिकविण्यासाठी आठवडयाचे दोन तास न देता अधिक तास द्यावेत. तसेच कोणत्या शिक्षकाने हा विषय शिकवावा याच्या देखील सूचना स्पष्टपणाने या विद्यालयाला दिल्या पाहिजेत, त्याचबरोबर उच्च माध्यमिक स्तरावर देखील हा विषय शिकविणाऱ्या अध्यापकाची अहर्ता निश्चित करण्यात यावी तसेच या विषयासंबंधी निश्चित अभ्यासक्रम तयार करुन पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी, तसेच या विषयावर पाठ्यपुस्तके नसल्याने विद्यार्थ्यांना अध्यापक जे शिकवतील त्याच्यावरच अवलंबून रहावे लागते म्हणून पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविताना शिक्षकांना ज्या अडचणी येतात त्या दूर करण्यासाठी विचार करावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

------

X-2/...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके : माननीय सभापती महोदय, शासनाने मान्य केले पाहिजे की, हा विषय अतिशय महत्वाचा आहे. या विषयाचा अभ्यासक्रम आणि शैक्षणिक अर्हतेची निश्चितता या गोष्टी महत्वाच्या आहेत. म्हणून या शैक्षणिक वर्षामध्ये कोणतीही गैरसोय होणार नाही यासंदर्भात देखील आम्ही निश्चितपणे नियोजन केलेले आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, पहिली ते आठवी पर्यंत हा विषय स्वतंत्र पाठ्यपुस्तकांच्या मार्फत शिकविला जात नाही. अनुषंगिक किंवा इतर विषयाच्या मार्फत हा विषय शिकविला जातो. तिसरी व चौथी मध्ये हा विषय विज्ञानाच्या अनुषंगाने शिकविला जातो. पाचवी ते आठवीला हा विषय भुगोल आणि विज्ञानाच्या अनुषंगाने शिकविला जातो. याच्यामध्ये हस्तपुस्तिका देणे हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. मागील वर्षी या हस्तपुस्तिका देण्यामध्ये निश्चितपणे विलंब झालेला आहे. पण या वर्षी आम्ही या हस्तपुस्तिका निश्चितपणे आम्ही देणार आहोत. यासंदर्भात आम्ही एक लाख शिक्षक बांधवांना प्रशिक्षण देखील दिलेले आहे. विषय कितीही महत्वाचा असला तरी प्रत्येक विषयाला स्वत:चे असे एक स्वतंत्र महत्व असते म्हणून त्या विषयाची बेसीक आयडिया तयार असावी, जाणता कर्मचारीवर्ग असावा हे सुध्दा आम्हाला मान्य आहे. म्हणून अकरावीची जी पुस्तके आहेत ती आम्ही या डिसेंबर अखेर पर्यंत देणार आहोत. नंतरचा प्रश्न आहे दहावीच्या श्रेणी बाबत त्यात आपण म्हटले आहे चार-चार घटक चाचण्या व्हाव्यात. परंतु माझ्या मनात शंका आहे की हा विषय निश्चितपणे, सातत्याने शिकविला जातो की नाही याविषयी पर्यवेक्षण यंत्रणेच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. शरद पाटील यांनी विचारलेली जी शंका आहे ती रास्त आहे. हा विषय शिकविलाच गेला पाहिजे. साधारण पणे असे होते की, ज्या विषयाची बोर्डाची परीक्षा असते त्या विषयाची तीव्रता लक्षात घेऊन आपण तो विषय शिकवितो. मुलांवर खूप ताण वाढू नये म्हणून बोर्डाच्या परीक्षेपासून आपण हा विषय आपण दूर ठेवून श्रेणी पध्दती स्वीकारलेली आहे. पण त्याच्यामध्ये जर एखाद्या मुलाला "क" श्रेणी मिळाली तर तो मुलगा सुध्दा पास होणार नाही म्हणून त्या मुलाला अ,ब,क श्रेणीमध्येच पास व्हावे लागेल. त्यानंतर बारावीची परीक्षा ही 2008 ला होईल त्यासाठी एप्रिल अखेरपर्यंत आम्ही ही पुस्तके वितरित करणार आहोत. त्यानंतर अकरावी व बारावीला शिकविणारे जे शिक्षक आहेत त्यांना आम्ही मे महिन्यामध्ये पूर्णत: प्रशिक्षण देऊ. सन्माननीय सदस्य श्री. शरद पाटील यांनी म्हटल्याप्रमाणे त्या ठिकाणी एक ते दोन तास असतील प्रश्न तेथे नाही. परंतु एखाद्या महाविद्यालयामध्ये दहा ते बारा सेक्शन्स असतील तर तेथे असा एक स्पेशल विषय म्हणून असेल. त्यावेळेस मात्र त्याची शैक्षणिक अहर्ता निश्चितच करावी लागेल.

X-3/...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके.....

येथे महत्वाची गोष्ट अशी आहे की नववी ते दहावी पर्यंतची सगळी पुस्तके आम्ही प्रिंट करीत आहोत फक्त अकरावी व बारावीची जी पुस्तके आहेत ती इंग्रजी आणि मराठी या दोनच माध्यमातून आम्ही छपाईला देण्यात आलेली आहेत. आणि आम्ही ती पुस्तके निश्चित देणार आहोत.

यानंतर श्री. पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ SBT/ KGS/ MHM/ KTG/ पूर्वी श्री.सोनावणे 11:30

प्रा.वसंत पुरके...

त्यानंतर 9-10 वीच्या विषयासंदर्भात आकाशवाणी व दूरदर्शच्या माध्यमातून व्याख्यानाचे आयोजन केलेले आहे. यामध्ये प्रश्न असा आहे की, आपण या विषयाकडे किती गांभीर्याने पाहणार आहोत. याबाबतीत मी सांगू इच्छितो की, याबाबतीत शासनास मुलभूत सोयी उपलब्ध करुन द्याव्या लागतील, यासंदर्भातील कुठल्याही प्रकारची अडचण राहणार नाही. ज्युनिअर कॉलेजच्या बाबतीतही शासनाने चांगल्या प्रकारचे धोरण स्वीकारलेले आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सर्वाच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर आपण पर्यावरण हा विषय अभ्यासक्रमामध्ये आणला. माझ्या माहितीप्रमाणे अन्य कोणत्याही राज्यामध्ये अद्यापी सुप्रिम कोर्टाच्या निर्णय असतानाही पर्यावरण हा विषय अभ्यासक्रमात आणलेला नाही, आपण तो आणला ही आनंदाची बाब आहे. परंतु हा विषय शालेय शिक्षणामध्ये आल्यामुळे गणित आणि विज्ञान या विषयाचे गुण कमी करण्यात आले आहेत व त्यानुसार परिक्षा होणार आहेत. यातील एक गुण पर्यावरण विषयाला दिलेला आहे. परंतु याठिकाणी मुलांना दीडशे गुणांचा अभ्यास करावा लागेल. यामध्ये मुलांवर अभ्यासाचा बोजा येणार असून ज्याप्रमाणे इतर विषयांच्या बाबतीत 100 गुणांची परिक्षा असते त्याचप्रमाणे आपण ही परिक्षा घ्यावी. त्यामुळे याबाबतीत शासनाने फेरविचार करावा, अशी माझी विनंती आहे. त्यामध्ये दीडशे गुणांसाठी 30 गट आहेत, हे गट जास्तीचे आहेत. आपण 100 गुणांप्रमाणेच यामध्येही गट ठेवावेत व अतिरिक्त अभ्यासातून विद्यार्थ्यांना सूट द्यावी. यामध्ये आपण बदल करुन काही गट वगळता येतील का ते पहावे, अशी माझी विनंती आहे. उच्च माध्यमिक स्तरावर शासनाने दि.21 ऑगस्ट,2006 रोजी एक परिपत्रक काढले. मराठी शिकविण्यासाठी एम.ए. सेकंड क्लास, हिंदी शिकविण्यासाठी एम.ए.सेकंड क्लास, शारीरिक शिक्षणासाठी एम.पी.एड., परंतु अर्थशास्त्र हा विषय शिकविण्यासाठी एम.कॉमचा माणूस न घेता तो एम.ए.(इकोनॉमिक्स) असला पाहिजे, अशी आपली अट आहे. अशाप्रकारचे परिपत्रक आपण काढलेले आहे. त्याप्रमाणे खरोखरच पर्यावरण विषयाच्या बाबतीत पोस्ट ग्रॅज्युएट शिक्षक मिळणार का ? ते आपल्याला मिळणार नाहीत. त्याप्रमाणे आपण दि.21 ऑगस्ट,2006 रोजी परिपत्रक काढले की, इतर कोणत्याही शिक्षकावर याबाबतीतील कारभार दिला तरी चालेल. या विषयाच्या बाबतीत आपण उच्च पदवीधराचे बंधन टाकले नाही. परंतु उच्च पदवीधराची अडचणही सगळयाच विषयांच्या बाबतीत आहे. तसेच, आपण हा विषय कायम विना अनुदानित ठेऊ शकत नाही. सुप्रिम

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

कोर्टाच्या निर्णयानुसार आपण हा विषय सुरु केला, परंतु तो विषय शिकविण्याच्या दृष्टीने ज्या शिक्षकांची नियुक्ती करणार आहात, त्यांच्या पगाराची जबाबदारी कोणावर आहे ? आपण त्याची जबाबदारी संस्था चालकांची असे म्हणाल, हे बरोबर नाही. हा विषय शासनाने कम्पल्सरी स्वीकारलेला आहे. त्यामुळे हा विषय शासनाने अनुदानित ठेवावा.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, शिक्षण क्षेत्रामध्ये कुठलीही बाब आल्यानंतर त्यामध्ये जबाबदारी ही अतिशय महत्वाची बाब असते. सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी चांगल्या सूचना केल्या. हा नवीन विषय घेण्याच्या दृष्टीने अनुदानित, विना अनुदानित किंवा कायम विना अनुदानित शाळांच्या संदर्भात शासनाची कुठल्याही प्रकारची नकारात्मक भूमिका नाही. याबाबतीत निश्चित सकारात्मकच विचार होईल. यामध्ये मूळ प्रश्न हा गुण कमी करण्यासंबंधीचा आहे. यासंबंधी एक जनहित याचिका दाखल झालेली असल्यामुळे सध्याच याबाबतीत विचार करता येणार नाही.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.अे.अझिझ : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. पर्यावरण विज्ञान हा विषय पोस्ट ग्रॅज्युएटसाठी किती विद्यार्थी घेतात ? केवळ 2/3 महाविद्यालयांमध्ये हे विषय शिकविले जातात. मंत्रीमहोदयांनी असे सांगितले की, 1 लाख शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. या शिक्षकांना कोणत्या पध्दतीने शिक्षण देण्यात आले आहे ? उच्च न्यायालयाने या विषयाबाबत जो आदेश दिलेला आहे तो दुस-या कुठल्याही राज्यांने स्वीकारला नाही, मग आपल्याच राज्याने हा आदेश का स्वीकारला आहे ? हा विषय जरी महत्वाचा असला तरी या विषयातील ग्रॅज्युएट मुले कमी आहेत तसेच इतर सुविधा देखील उपलब्ध नाहीत.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, या विषयातील जाणकार लोक आहेत त्यांच्याकडून शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. पूर्वी 'स्पेशल मॅथ्स' हा विषय नव्याने सुरु झाला होता, हा विषय त्यावेळी बी.एस्.सी.झालेल्या शिक्षकांनीही शिकविला आहे. ही इनिशियल स्टेज आहे. परंतु, भविष्यात याच विषयातील तज्ञांकडून हा विषय शिकविला जाईल, याची शासन काळजी घेईल. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेश आपल्या राज्यानेच का पाळावयाचे ? असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला आहे. जर इतर कुणी नियम पाळत नसतील तर त्याचे समर्थन आपल्याला करता येणार नाही. न्यायालयाच्या आदेशांचा आदर बाळगणे हे महाराष्ट्र शासनाचे कर्तव्य आहे आणि म्हणून आपण तसे केले आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पर्यावरण हा विषय शासनाने सक्तीचा केला आहे. पण केवळ शैक्षणिक संस्थांवर जबाबदारी टाकून चालणार नाही. ही शासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे या विषयातील शिक्षकांची पदे अनुदानित करणार काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, शासन याबाबत सकारात्मक विचार करणार आहे.

**तालिका सभापती (श्री.अरविंद सावंत)** : अर्धा तास चर्चा संपली आहे. आता सभागृहाची बैठक स्थगित होऊन दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक 11 वाजून 37 मिनिटांनी, दुपारी 12.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

-----------------

यानंतर श्री.बोरले..........

GRB/ KTG/ MAP/ KGS/ प्रथम श्री.रोझेकर .......... 12:00

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**राज्य शासनाने पारधी समाजासाठी जाहीर केलेले 30 कोटी रुपयांचे पॅकेज**

**(1) * 20488 श्री. सुधाकर गणगणे , श्री. संजय दत्त , श्री. रमेश निकोसे , श्री. यशवंतराव गडाख** : सन्माननीय आदिवासी विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यशासनाने पारधी समाजासाठी रुपये 30 कोटींचे पॅकेज माहे मे, 2006 च्या सुमारास जाहिर केले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सांगली जिल्ह्याला सदर पॅकेजचा वाटा मिळालेला नाही, हेही खरे आहे काय,
(3) असल्यास, त्यामागील कारणे काय आहेत,
(4) असल्यास, सांगली जिल्ह्यासाठी पॅकेजचा हिस्सा मिळण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे काय,
(5) असल्यास, त्याचा लाभ किती कालावधीत मिळणार आहे ?

**श्री.रविशेठ पाटील, श्री.विजयकुमार गावीत यांच्याकरिता** : (1) होय.
(2), (3), (4) व (5) सध्या राज्यात अंमलबजावणी होत असलेल्या योजनांमधून पारधी समाजाच्या लाभार्थ्यांची निवड केली जाईल व सर्व योजनांमधून पारधी समाजाला दिला जाणारा लाभ रुपये 30 कोटी पेक्षा कमी नसेल याची दक्षता घेतली जाईल. यात सांगली जिल्ह्याचाही समावेश राहील.

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, महाराष्ट्रातील पारधी समाज अत्यंत मागासलेला समाज आहे. पारधी समाजावर होणारा अन्याय दूर करण्यासाठी शासनाने 30 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केलेले आहे. शासनाने जे पॅकेज जाहीर केलेले आहे त्या पॅकेजचा उत्तरामध्ये समन्वय दिसत नाही. उत्तर वाचले तर आपल्या लक्षात येईल की, शासनाने जाहीर केलेल्या पॅकेजची अद्याप अंमलबजावणी झालेली नाही. पॅकेजचे स्वरुप कसे असेल हे देखील सांगण्यात आलेले नाही, यासंदर्भात माननीय मंत्री महोदय खुलासा करतील ?

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, सर्वेक्षणाचा अंतिम अहवाल दिनांक 15 डिसेंबर पर्यंत शासनाला प्राप्त होईल. अहवाल प्राप्त झाल्यानंतर पारधी समाजाचा सर्वांगीण विकास करण्याकरिता आराखडा तयार केला जाईल.

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 20488** .....

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही. शासनाने पॅकेज दिल्याचे मान्य केलेले आहे. परंतु त्याची अंमलबजावणी झालेली नाही. पॅकेजची अंमलबजावणी केव्हा होईल आणि त्या पॅकेजचे स्वरुप काय असेल ?

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, दिनांक 15 डिसेंबर पर्यंत अहवाल प्राप्त होईल. सर्वेक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही केली जाईल.

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, दिनांक 15 डिसेंबर पर्यंत अहवाल प्राप्त होईल, असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. त्याची अंमलबजावणी केव्हा केली जाणार आहे ? एक महिन्याच्या आत त्याची अंमलबजावणी होईल काय ?

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, एक महिन्याच्या आत अंमलबजावणी करण्यात येईल.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, राज्य शासनाने पारधी समाजासाठी 30 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केलेले आहे. त्या पॅकेजचे जिल्हानिहाय वाटप करण्यात आले आहे काय ? असल्यास त्याची जिल्हानिहाय माहिती दिली जाईल काय ?

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, सर्वेक्षण अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. अहवाल प्राप्त झाल्यानंतर जिल्हानिहाय अहवाल सादर केला जाईल.

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 20488 ....

श्री. यशवंतराव गडाख : सभापती महोदय, या उत्तरात मंत्र्यांनी असे म्हटलेले आहे की, सध्या राज्यात अमलबजावणी होत असलेल्या योजनांमधून पारधी समाजाच्या लाभार्थ्यांची निवड केली जाईल. तर अशा कोणकोणत्या योजना आपल्याकडे आहेत ?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, ज्याप्रमाणे आदिवासी समाजासाठी योजना राबविल्या जातात त्याप्रमाणे पारधी समाजासाठी देखील योजना राबविल्या जातील.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी हे मान्य केले आहे की, पारधी समाजासाठी 30 कोटी रूपयांचे पॅकेज जाहीर केलेले आहे. तर मग त्या पॅकेजचे स्वरूप काय आहे ? आणि पारधी समाजाच्या उत्थानासाठी आणि प्रगतीसाठी लाभार्थींची आपण निवड करणार आहात तर त्याबाबतीतील निकष काय राहणार आहेत ? लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी योग्य प्रकारची ॲथॉरिटी आपण निर्माण करणार आहात की नाही ? नाही तर त्यामध्ये भाई-भतिजावाद उत्पन्न होण्याची शक्यता आहे.

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, यामध्ये लाभार्थ्यांची निवड करण्याबाबत कलेक्टरांना सूचना दिलेल्या आहेत आणि त्यांचे सर्वेक्षण केल्यानंतर त्याबाबतच्या सूचना अमलात आणण्यात येतील.

****

....... बीबी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ KTG/ श्री. बोरले नंतर --- 12.05

**मुंबई शहर व उपनगरात सी.एन.जी. इंधनावर चालणाऱ्या टॅक्सी व रिक्षा यांचे किमान भाडे कमी करण्याबाबत**

**(2) * 21795 श्री.राजन तेली , श्री. संजय दत्त** : सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) मुंबई शहर व उपनगरात सी.एन.जी. इंधनावर चालणाऱ्या टॅक्सी व रिक्षा यांचे किमान भाडे अनुक्रमे 10 रुपये व 5 रुपये करण्याबाबत शासनाने परिवहन आयुक्त श्री. शामसुंदर शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने आपला अहवाल शासनास सादर केली आहे काय,
(2) असल्यास, सदर अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,
(3) नसल्यास, याप्रकरणी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत, तसेच सदर अहवालाची अंमलबजावणी केव्हापर्यंत होणे अपेक्षीत आहे ?

**श्री. विलासराव देशमुख** : (1) पेट्रोल व्यतिरिक्त सी.एन.जी / एल.पी.जी. या अपारंपारिक इंधनावर चालणाऱ्या टॅक्सी/ऑटो रिक्षांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झाल्याने व किंमतीचा तुलनात्मक विचार करता पेट्रोल पेक्षा वरील इंधनाचा दर कमी असल्याने रिक्षा व टॅक्सीचे भाडेसुत्र ठरविण्यासाठी शासनाने परिवहन आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे.
(2) व (3) परिवहन आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली समितीच्या शिफारसीवर शासनाने निर्णय घेऊन शासन निर्णय दि.9.11.2006 अन्वये त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्याबाबत संबधित प्राधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, या उत्तरात उल्लेखित परिवहन आयुक्तांच्या समितीने दिलेल्या अहवालाचे नेमके स्वरूप काय आहे ? आणि या समितीने आपल्या अहवालात केलेल्या सूचना वा शिफारशी अंमलात येणार असतील तर त्या केव्हा पासून अमलात येणार आहेत ?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, परिवहन आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक समिती आपण गठित केली होती आणि त्या समितीने या संबंधात काही शिफारशी केलेल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने सीएनजीवर चालणाऱ्या टॅक्सी-रिक्शाँची भाडे आकारणी कशी असावी याबाबत शिफारशी केलेल्या होत्या. 1.6 कि.मी.साठभ्चे जे भाडे आहे ते किमान 13 रूपये ठेवावे अशी एक शिफारस त्यांनी केलेली आहे आणि त्यापुढील प्रत्येक कि.मी.ला 8 रूपये भाडे आकारावे अशीही शिफारस आहे. तसेच पहाटेच्या वेळी काय भाडे असावे म्हणजे रात्री 12 ते पहाटे 5 वाजेपर्यंतच्याकाळातील प्रवासाची भाडेआकारणी काय असावी, प्रवाशाचे जे सामान असल त्यामध्ये ठराविक आकाराच्या बॅगा असतील तर त्याबाबत किती भाडे आकारावे याबाबतीतील शिफारस आहे आणि त्या राज्य सरकारने स्वीकारल्या आहेत.

....... बीबी 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.21795 ...

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, सीएनजी आणि एलपीजी मुळे प्रदूषणाला आळा बसण्यात मदत होते त्यामुळे या इंधनावरच टॅक्सी-रिक्शॉ चालविण्याबाबत त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आपल्या काय योजना आहेत ?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, प्रामुख्याने मुंबई शहरामध्ये आणि काही प्रमाणात ठाणे शहरामध्ये ही सुविधा आपण उपलब्ध करून दिलेली आहे. परंतु यामध्ये खरी अडचण अशी आहे की, यासाठीची जी फिलिंग सेंटर्स आहेत त्यासाठी त्यांनी आमच्याकडे मोठ्या प्रमाणात जागा मागितलेल्या आहेत. त्यामुळे विलंब एवढ्याचसाठी लागतो की, त्यांनी मागितलेल्या जागांचे आरक्षण बदलावे लागते आहे. कारण त्यांनी ज्या जागा मागितल्या आहेत त्या वेगळ्या वापरासाठी राखीव आहेत आणि त्यामुळे त्यांना या जागा उपलब्ध करून देणे आणि त्यासाठी अगोदर त्या जागांवरील रिझर्वेशनमध्ये बदल करणे या दोन्ही प्रक्रिया आपल्या सुरू आहेत. त्यातील काही जागा या शासनाच्या आहेत तर काही जागा महापालिकेच्या आहेत. तेव्हा आम्ही यासाठी जाणीव पूर्वक प्रयत्न करीत आहोत आणि मोठ्या प्रमाणात सीएनजी वर वाहने चालावित जेणे करून प्रदूषणाला आळा बसेल अशीच आमची भूमिका आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, एक तर सीएनजीची फिलिंग सेंटर्स कमी आहेत आणि त्यामुळे आहे त्या सेंटर्सवर ऑटो रिक्शांच्या मोठमोठ्या रांगा लागतात. या सेंटर्सन महानगर गॅस कडून गॅस पुरवठा केला जातो आणि जाणीवपूर्वक कित्येकदा हा पुरवठा खंडित केला जातो. एका टाकीमध्ये जितक्या प्रमाणात गॅस असणे आवश्यक असहे त्या प्रमाणात तो नसतो असेही लक्षात आले आहे. तेव्हा या संबंधात महानगर गॅस बरोबर चर्चा करून हा गॅस पुरवठा नियमित होण्यासाठी काही उपाय योजना आपण करणार काय ? दुसरा माझा प्रश्न असा की, या साठी आपण नवीन यंत्रणा आणली आहे आणि तिचे उद्घाटन परिवहन आयुक्तांनी नुकतेच केलेले आहे पण आता तेथेही टॅक्सीज वगैरे काही दिसत नाही. आपल्या परिवहन आयुक्तांकडून ही यंत्रणा मोठ्या धडाक्याने आपण सुरू केली पण प्रत्यक्षात ती कोठे सुरू असल्याचे दिसत नाही. ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री. सरफरे ..... सीसी 1 ...

ता.प्र.क्र. 21795...

डॉ.दीपक सावंत...

त्याबाबत शासनाने खुलासा करावा. या सी.एन.जी. टॅक्सीमुळे मूळ टॅक्सीवाल्यांचे काय होणार आहे?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, याठिकाणी दोन प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. एक तर महाराष्ट्र गॅस पुरवठा कंपनीबरोबर सी.एन.जी. चा नियमित पुरवठा होणे व योग्य प्रमाणात तो उपलब्ध होणे याबाबत निश्चितपणे चर्चा करु आणि त्यामधून मार्ग काढू. दुसरा प्रश्न शहरामध्ये नवीन टॅक्सीज सुरु झाल्या आहेत त्याबाबत विचारण्यात आला आहे. प्रामुख्याने मुंबई शहर हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे निर्माण व्हावे यादृष्टीने आपण प्रयत्न करीत आहोत. अशावेळी बाहेरुन येणाऱ्या विदेशी पर्यटकांना त्यांच्या देशामध्ये ज्या प्रकारची टॅक्सीज आहेत, तशापध्दतीची टॅक्सी आपण पुरवू शकलो नाही तरी त्या तुलनेमध्ये वेगळया पध्दतीची टॅक्सी आम्ही सुरु करीत आहोत. त्या टॅक्सीमध्ये सर्व प्रकारची माहिती उपलब्ध होईल. तो पर्यटक शहरामध्ये फिरत असतांना तो नेमक्या कोणत्या ठिकाणी पोहोचला आहे, याची त्याला माहिती होईल. टॅक्सीवाला त्याला भलत्याच मार्गाने नेणार नाही यासाठी त्यावर पूर्णपणे नियंत्रण ठेवले जाईल. अशाप्रकारच्या टॅक्सीज मोठया प्रमाणात उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत, व त्या एका विशिष्ट वर्गासाठी राहणार आहेत. बाकीच्या सी.एन.जी. वर चालणाऱ्या इतर टॅक्सीज आहेत, त्यांच्या संघटनेने या संदर्भात मधल्या काळात निदर्शने केली आहेत. त्यांच्या संघटनेबरोबर चर्चा करुनच यासंदर्भात निर्णय घेतला आहे. त्यांच्या संघटनेला सुध्दा आपले काहीतरी वजन असले पाहिजे म्हणून प्रत्येक वेळी ते अशाप्रकारे आंदोलने करीत असतात. त्यामुळे आम्ही प्रायोगिक तत्वावर हे काम सुरु केले आहे. याठिकाणी नव्याने सुविधा आपण उपलब्ध करुन देत आहोत त्याला उत्तम प्रतिसाद मिळेल अशी अपेक्षा आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये टॅक्सींच्या संदर्भात सुधारणा होण्याबरोबर वाहनांमध्ये सुधारणा होणे स्वाभाविक आहे. त्याबद्दल तक्रार करण्याचे कारण नाही. याठिकाणी टॅक्सी आणि ऑटो रिक्षाच्या भाडयासंबंधी चर्चा झाली. टॅक्सी आणि ऑटोरिक्षाच्या भाडयामध्ये वाढ करीत असतांना त्यामध्ये सुविधा आणि सुरक्षितता मिळाली पाहिजे, ती दिली जात नाही. शासनाकडून फक्त भाडयामध्ये परिवर्तन करणे योग्य नाही. म्हणून प्रश्न असा आहे की,

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MAP/

ता.प्र.क्र. 21795...

श्री. मधुकर सरपोतदार...

त्याठिकाणी योग्य ती सुविधा दिली गेली पाहिजे. त्याचबरोबर फिलिंग केंद्र,आणि सी.एन.जी. चा पुरवठा या दोन गोष्टी मूलभूत स्वरुपामध्ये उपलब्ध केल्यानंतर आपण भाडे वाढीचा निर्णय अंमलात आणण्याचा प्रयत्न करणार काय? त्याचप्रमाणे मुंबई शहरामध्ये नवीन टॅक्सीज सुरु करणार आहात त्यावर कुणाचे नियंत्रण असणार आहे? त्यामध्ये जे पैशाची गुंतवणूक करणार आहेत, त्या गरजू लोकांना त्याचा फायदा मिळणार नाही अशी परिस्थिती निर्माण होणार आहे. त्यासाठी आपण काय करणार आहात?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, सी.एन.जी. चा पुरवठा वेळेवर आणि मुबलक झ ााला पाहिजे यासाठी शासन प्रयत्नशील आहे. भाडेवाढीचा जो अहवाल आला आहे, त्या नुसार दिनांक 9.11.2000 साली निर्णय झाला आहे व त्याचे परिपत्रक शासनाच्या वतीने काढण्यात आले आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये 87 हजार ऑटोरिक्षा आणि तितक्याच टॅक्सीज आहेत. तेव्हा सी.एन.जी. वर चालणाऱ्या टॅक्सीज आणि ऑटो रिक्शांचे दरपत्रक तयार करीत असतांना त्यांच्या संघटनेबरोबर चर्चा करुन निर्णय घेतला होता काय? असल्यास त्यांची याबाबत काय प्रतिक्रिया आहे?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, ऑटोरिक्षांच्या भाडे दरवाढी बाबतचा निर्णय घेतांना त्यांच्या संघटनेबरोबर चर्चा केल्याशिवाय एकतर्फी निर्णय घेण्यात येणार नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.21795 (पुढे सरु..

श्री.विलासराव देशमुख (पुढे सुरू..

शेवटी जे भाडे आहे ते परवडू शकते की नाही, याबाबत ते सातत्याने संपर्कामध्ये असतात. त्यांच्याशी चर्चा करूनच वेळोवेळी असे निर्णय घेतले जातात.

श्री.अरविंद सावंत : माननीय मुख्यमंत्र्यांनी फिलिंग स्टेशन उभारण्यासाठी जागेची आवश्यकता आहे, त्या संदर्भाने जागेच्या आरक्षणाबाबत त्यांनी सांगितले. आता पेट्रोल, डिझेलचे पंप आहेत, त्याच्या बाजूलाच लागून काही फिलिंग स्टेशन्स सुरु केलेली आहेत. तशाप्रकारे इतरही ठिकाणी हे फिलिंग स्टेशन सुरू करण्यास परवानगी दिली जाणार आहे काय ?

श्री.विलासराव देशमुख : शेवटी जागेची निवड ही त्या कंपनीने करावयाची आहे. आज कंपनीने सांगितले की सध्या अस्तित्वात असलेल्या पेट्रोल पंपाच्या ठिकाणी व्यवस्था करणे शक्य आहे, तर त्यामध्ये सरकारची काही अडचण नाही.

श्रीमती सुधा जोशी : आज सीएनजी, एलपीजी, पेट्रोलवर टॅक्सी आणि ॲटो रिक्षा चालविल्या जातात. त्यांचे भाडे जास्त लावावे लागत असेल तर टॅक्सी, रिक्षाच्या त्यांच्या धंद्यावर विपरित परिणाम होणार आहे काय ?

श्री.विलासराव देशमुख : एकच भाडे रहाणार आहे. आज कमी खर्चामध्ये एलपीजी किंवा सीएनजीवर वाहने चालविणे शक्य असेल तर त्यांनी त्या पध्दतीने कन्व्हर्ट करून घ्यायला पाहिजे. त्यांना कमी किंमतीमध्ये अधिक फायदा होत असेल तर त्यासाठी उत्तेजन देण्याचे धोरण ठरविलेले आहे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्यावरील झोपडपट्टया उठविण्याचा ॲक्शन प्लॅन**

**(3) * 20587 श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे , श्री. रामनाथ मोते** : सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील अतिरेकी कारवायांचे धोके लक्षात घेऊन मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीवरील झोपडपट्टी हटविण्यासाठी मुंबई महापालिकेने ॲक्शन प्लॅन तयार केला आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, मुलुंड ते वांद्रे या भागातील जलवाहिनी वर असलेल्या झोपडपट्टया हटविण्याचा व झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत पर्यायी जागा देण्याचा प्रस्ताव काही विकासकांनी शासनाकडे सादर केला आहे हे खरे आहे काय,

(3) असल्यास, या जलवाहिन्यांवर किती झोपडपट्टया 1995 पूर्वीच्या आहेत व किती 1995 नंतरच्या आहेत,

(4) असल्यास, सरसकट सर्व झोपड्या धारकांचे पूनर्वसन करण्यात येणार आहे काय,

(5) असल्यास, यासाठी विकसीत करताना किती जादा चटई क्षेत्रफळ देण्यात येणार आहे व त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे श्री.विलासराव देशमुख यांचेकरिता** : (1) नाही.

(2) हे खरे नाही.

(3) व (4) मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या प्रमुख जलवाहिन्यावरील झोपडपट्टी हटविण्याच्या कामाची प्रचंड व्याप्ती व पात्र झोपडीधारकांचे आवश्यक असलेले पुनर्वसन, कायदेशीर बाबींची पूर्तता इ. साठी महापालिकेने विभागवार जलवाहिन्यांवरील झोपडपट्टयांचे सर्वेक्षण व पुराव्यांची पडताळणी इ. चे काम हाती घेतलेले आहे. सर्वेक्षणाचे काम पूर्ण झ्ंाल्यानंतर प्रमुख जलवाहिन्यांवरील झोपडपट्टी हटविण्याचे व पात्र झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसनाबाबत शासनाच्या धोरणानुसार पात्र झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करण्यात येईल.

(5) झोपडपट्टी हटविण्याचा व झोपडपट्टी पुनर्विकास योजनेंतर्गत पर्यायी जागा देण्याचा कोणताही प्रस्ताव विकासकाकडून शासनास प्राप्त झाला नसल्याने जादा चटई क्षेत्रफळ देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

ता.प्र.क्र. 20587 (पुढे सुरु...

श्री.मधुकर चव्हाण : माननीय मुख्यमंत्री महोदय मुंबईच्या प्रश्नावर अधिक लक्ष देणार आहेत. दोनतीन दिवसापूर्वी जाहीर केले होते की, 35 कि.मी.लांबीच्या सगळ्या पाईपलाईनवर 33 हजार बेकायदेशीर झोपड्या आहेत. आज 40 लाख लोकांना पुरेल इतके 600 दशलक्ष लिटर पाणी वाया जाते. प्रश्न विचारलेला होता की, मुंबईतील अतिरेकी कारवायांचे धोके लक्षात घेऊन मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीवरील झोपडपट्टी हटविण्यासाठी मुंबई महापालिकेने ॲक्शन प्लॅन तयार केला आहे, हे खरे आहे काय ? या प्रश्नाला उत्तर दिलेले आहे की, " मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या प्रमुख जलवाहिन्यावरील झेपडपट्टी हटविण्याच्या कामाची प्रचंड व्याप्ती व पात्र झ ोपडीधारकंचे आवश्यक असलेले पुनर्वसन, कायदेशीर बाबींची पूर्वता इ.साठी महापालिकेने विभागवार जलवाहिन्यांवरील झोपडपट्यांचे सर्वेक्षण व पुराव्यांची पडताळणी इ. चे काम हाती घेतलेले आहे. सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाल्यानंतर प्रमुख जलवाहिन्यांवरील झोपडपट्टी हटविण्याचे व पात्र झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करण्यात येईल. जलवाहिन्यावरील झोपडपट्या या अधिकृत नाहीत. दुसरी गोष्ट अशी की, तानसा तलावातून पाणीपुरवठा होतो, त्या सहा इंच आणि आठ इंट व्यासाच्या पाईपलाईन आहेत त्यामधून 600 दशलक्ष लिटरपाणी 40 लाख लोकांना पुरेल इतके पाणी फुकट जात आहे. माझा प्रश्न असा आहे की, न्यायालयाच्या निदेशानुसार 1995 पूर्वीच्या झोपड्या अधिकृत समजून त्यांचे पुनर्वसन करणार,की शासन आगामी मुंबई महानगरपालिकेची निवडणूक डोळयासमोर ठेवून सर्वच अनधिकृत झोपडपट्टयांचें पुनर्वसन करणार आहे ? दुसरे असे की, त्यांना पर्यायी जागा कोठे देणार आहात ? कशाप्रकारे देणार आहात, त्यासाठी आर्थिक तरतूद किती केलेली आहे, ? किती कालावधीमध्ये त्यांना देणार आहात, किती कालावधीमध्ये या झोपडपट्टया हटविण्याचे काम करणार की त्यांचे पुनर्वसन होईपर्यन्त पाईपलाईनची दुरूस्ती करणार नाही काय ? कारण 600 दशलक्ष लिटर पाणी वाया जात आहे ते कसे वाचविणार आहात ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी तीन प्रश्न उपस्थित केलेले आहेत. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे 1995 पूर्वीच्या अनधितकृत झोपड्या नियमित करण्याचे काम करत आहोत. 1995 पूर्वीच्या झोपडपट्टयांचे पुनर्वसन हे एसआरएच्या योजनेमध्ये केले जात आहे.

यानंतर श्री बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जे 225 चौरस फुटाचे सरप्लस फ्लॅट उपलब्ध होतील त्या ठिकाणी पुनर्वसन करण्याची योजना शासनाने मान्य केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न सर्वेक्षणाच्या बाबतीत विचारला. साधारणत: पाच महिन्यांच्या आत हे सर्वेक्षण आम्ही निश्चितपणे पूर्ण करु. सन्माननीय सदस्यांनी तिसरा प्रश्न दुरुस्तीच्या संदर्भात विचारला. एवढे मोठे पाणी जे वाया जात आहे त्यादृष्टीने निश्चितपणे दुरुस्ती केली जाईल. तशा पध्दतीच्या सूचना दिल्या जातील.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, महानगरपालिकेने असे जाहीर केले की, त्या ठिकाणी झोपड्या असल्यामुळे दुरुस्ती करणार नाही. आज 40 लाख लोकांना पुरेल एवढे 600 दशलक्ष लीटर पाणी दररोज फुकट जाते. मुंबईमध्ये पाण्यासाठी मोर्चे येतात. त्या ठिकाणच्या झोपड्या हटविल्याशिवाय दुरुस्ती कशी करणार ? ज्यांनी बेकायदेशीर झोपड्या बांधलेल्या आहेत त्याना शासन 225 चौ. फुटाचे फ्लॅट देणार आहे. त्यांना जागा कोठे देणार ? त्यांचे पुनर्वसन मुंबईपासून लांब अंतरावर करणार असे उत्तर मागच्यावेळी देण्यात आले होते. त्यासाठी पैशाची काय तरतूद केली आहे ? त्यांना कोणती जागा देणार ? 225 चौरस फुटाची 35 हजार घरे बांधून तयार आहेत काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच उत्तरामध्ये सांगितले की, सर्वेक्षण करणे महत्वाचे आहे. सर्वेक्षणाचे काम चालू आहे. त्या त्या विभागाचे जे असिस्टंट कमिशनर आहेत त्यांच्याकडे हे काम सोपविलेले आहे आणि सभागृहाच्या भावना लक्षात घेता कोणत्याही परिस्थितीत कालबध्द कालावधीमध्ये हे सर्वेक्षण करण्यात येईल. सर्वेक्षण हा महत्वाचा विषय आहे. कारण 1995 च्या अगोदरच्या झोपड्या कोणत्या आणि 1995 नंतरच्या झोपड्या कोणत्या हे समजणे आवश्यक आहे. हे महत्वाचे काम अगोदर करण्यात येईल. मी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे एस.आर.ए. योजनेच्या माध्यमातून 225 चौरस फुटाचे साधारणत: 21 हजार फ्लॅटस् उपलब्ध होत आहेत. त्याला साधारणत: एक वर्षाचा कालावधी लागू शकेल. सर्वेक्षण झाल्यानंतर ज्या पात्र झोपड्या असतील त्यांना त्या ठिकाणी शिफ्ट करण्यात येणार आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, रिस्ट्रिक्टेड एरियामध्ये झोपड्या होऊ नयेत असे मूलभूत धोरण असलेच पाहिजे. ज्या ठिकाणी झोपड्या होतात त्याबाबतीत कोणालाही जबाबदार

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

धरले जात नाही हे आता लक्षात आलेले आहे. जेव्हा एखादी घटना घडते तेव्हा युध्द पातळीवर शासन धावपळ करते. मागे जेव्हा रेल्वेने बडगा उगारला आणि रेल्वेच्या हद्दीतील झोपड्या ताबडतोब तोडल्या पाहिजेत अशी भूमिका घेतली तेव्हा 1995 वगैरेचा विचार न करता कुर्ला भागातील झोपड्यांना पर्यायी जागा देऊन भराभर रेल्वेची जागा रिकामी केली. मुंबई महानगरपालिकेला पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या अत्यंत महत्वाच्या आहेत. तो रिस्ट्रिक्टेड एरिया नाही काय ? तो रिस्ट्रिक्टेड एरिया आहे. अशा ठिकाणी बेकायदेशीर झोपड्या वसलेल्या आहेत. त्यांचे पुनर्वसन होईपर्यंत आणखी किती झोपड्या वाढणार आहेत ? सर्वेक्षणाचे नाटक शासन किती दिवस चालविणार आहे हे तुमचे तुम्हाला माहीत. या सदनामध्ये प्रत्येक अधिवेशनामध्ये सर्वेक्षणाबाबत शासनाकडून सांगितले जाते. 1995 च्या झोपड्यांच्या बाबतीत सर्वेक्षण कधी पूर्ण होणार ? 1995 च्या नसलेल्या झोपड्या ताबडतोब तोडणार काय आणि पाईपलाईन मोकळी करणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे 1995 च्या अगोदरच्या झोपड्या पात्र असणार आहेत. त्यामुळे ते सर्वेक्षण केले पाहिजे. कोणत्या झोपड्या काढावयाच्या आणि कोणत्या झोपड्या ठेवावयाच्या, कोणाला पात्र धरुन शिफ्ट करावयाचे हे त्याशिवाय कळू शकणार नाही. हा महत्वाचा आणि गंभीर प्रश्न आहे हे मी मान्य करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या शासनाने थापा मारण्याचा वसा घेतलेला आहे. माननीय श्री. रोहिदासजी पाटील हे या खात्याचे मंत्री असताना त्यांनी सांगितले होते की, सहा महिन्यांच्या आत आम्ही सर्वेक्षण पूर्ण करु. त्या गोष्टीला आता चार वर्षे झालेली आहेत. त्यांनी 1995 च्या झोपड्यांच्या बाबतीत सांगितले होते. त्यानंतर तुमच्या पक्षाचे नाटक चालू आहे. 1995 च्या ऐवजी 2000 पर्यंत मर्यादा करा, त्यांच्या किती झोपड्या आहेत ते बघा, कोणाला वाचवावयाचे ते बघा असे सर्व चालू आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ SBT/ MAP/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 12:25

(ता.प्र.क्र. 20587... (श्री. दिवाकर रावते....

हे सर्व मतांचे राजकारण चाललेले आहे. मला नाईलाजाने असे म्हणावे लागत आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी मुंबईच्या विकासाचा प्रश्न स्वत:च्या उरावर घेतलेला आहे. याबाबतीत तुम्ही "खो" घालण्याचे ठरविलेले आहे काय ? ज्या ज्या गोष्टी प्राधान्याने करावयाच्या आहेत त्या तुम्ही प्रथम करा. एकाच वेळी सर्व माहिती तुमच्या टेबलावर येऊन एकाच वेळी सर्व झोपडपट्टयांच्याबाबतीत तुम्ही निर्णय घ्यायचे म्हटले तर ते कसे शक्य आहे ? एसआरअे स्कीम अंतर्गत किती गाळे उपलब्ध होणार आहेत आणि झोपडीधारकांना त्या पैकी किती देणार आहात ?

श्री. विलासराव देशमुख : ही महानगरपालिकेची पाईप लाईन आहे ही बाब आपण पहिल्यांदा लक्षात घेतली पाहिजे. तेथील झोपडपट्टयांचे सर्वेक्षण करणे आणि त्यांचे पुनर्वसन करणे ही मुंबई महानगरपालिकेची जबाबदारी आहे. अतिक्रमण काढण्यासाठी पोलीस फोर्स देणे, रेव्हेन्यूच्या संदर्भातील कामात सहाय्य देणे अशी जी काही कामे असतील त्या बाबतीत सहाय्य करण्याची आमची तयारी आहे. जवळ जवळ 65 हजार झोपडपट्टया आहेत असा प्राथमिक अंदाज आहे. पिण्याच्या पाण्याच्या पाईप लाईनवर वर्षानुवर्षे या लोकांनी झोपड्या बांधलेल्या आहेत. या पिण्याच्या पाण्याच्या पाईप लाईनवरील झोपड्याचे अतिक्रमण काढण्यासाठी त्या लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी जी काही घरे पाहिजे असतील ती आम्ही एसआरअे स्कीम मधून उपलब्ध करुन देऊ. याबाबतीत सर्व्हे करायला वेळ लागत असला तरी या कामाला प्रायॉरिटी द्यायला पाहिजे. त्या ठिकाणी कोणी एक वर्षापासून राहात असला किंवा 10 वर्षापासून राहात असला तरी तेथील सगळयाच झोपड्या काढायला पाहिजेत. पण किती लोकांचे पुनर्वसन करावयाचे, हे ठरवायचे आहे. त्यांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. स्टॉक असेल त्या प्रमाणे जेवढी घरे या कामासाठी पाहिजे असतील ती आम्ही प्रायॉरिटीने देऊ. तेव्हा टॉप प्रायॉरिटीने हे काम हाती घ्यावे अशा सूचना आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांना दिलेल्या आहेत. त्यांनी हे काम तातडीने हाती घेण्याचे मान्य केलेले आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सर्वेक्षण हा काय प्रकार आहे ? हे मला कळत नाही. आपण या झोपडीधारकांना फोटोपास दिलेले आहेत. 1995 पर्यन्तच्या झोपड्यांचे सर्वेक्षण केलेले आहे. याबाबतची सर्व माहिती जिल्हाधिका-यांकडढे उपलब्ध आहे. 1995 पर्यन्तच्या सर्वेक्षण केलेल्या

..2..

(ता.प्र.क्र. 20587... (श्री. मधुकर सरपोतदार....

झोपड्याचे पुन्हा सर्वेक्षण करायचे आहे असे सांगून सभागृहाची दिशाभूल केली जात आहे. प्रथम 1995नंतरच्या झोपड्या डिमॉलिश करण्याची व्यवस्था करा. नंतर बाकीच्या लोकांचे पुनर्वसन करा अशी माझी सूचना आहे. आपणाकडे सर्व माहिती उपलब्ध असताना आपण सभागृहाची दिशाभूल का करीत आहात ?

श्री. राजेश टोपे : ज्या जुन्या जीर्ण झालेल्या पाईप लाईन्स असतील, ज्यांची गळती होत असेल आणि ज्या ठिकाणी अतिक्रमणाचा परिणाम जास्त असेल तेथील अतिक्रमण अगोदर काढले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी फोटोपास दिलेले आहेत असे सांगितले. फोटोपास जरी दिलेले असले तरी एकूणच या कामाची व्याप्ती फार मोठी आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सूचना केल्याप्रमाणे कोणत्या कामाला आधी प्राधान्य द्यावयाचे यासंबंधीच्या सूचना महानगरपालिकेला दिलेल्या आहेत. सर्वेक्षणापेक्षा त्या लोकांना कुठे शिफ्ट करायचे हा मोठा प्रश्न आहे. एसआरचे टेनामेंटस वर्षभरामध्ये मिळातील अशी माझी माहिती आहे. प्रश्नाची ग्रॅव्हीटी लक्षात घेऊन जस जसे टेनामेंटस् उपलब्ध होतील त्या प्रमाणे या लोकांना शिफ्ट करता येईल. तेव्हा सर्वेक्षणही महत्वाचे आहे. ज्या ठिकाणचे सर्वेक्षण झालेले आहे आणि जे पात्र ठरलेले आहेत त्यांच्या बाबतीत टेनामेंटच्या उपलब्धतेच्या प्रमाणात लवकर कारवाई केली जाईल.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औरंगाबाद महानगरपालिकेला शासनाने दिलेली आर्थिक मदत**

**(४) * २०७८३ डॉ. निलम गोऱ्हे , श्री. मधुकर सरपोतदार , डॉ. दिपक सावंत , श्री. अनिल परब , श्री. सुरेश जेथलिया , श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री. अरविंद सावंत :** सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेला शासनाने फक्त १० कोटी रुपयांचे अनुदान दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त महानगरपालिकेच्या विकास कामासाठी शासनाने आणखीन काही खास निधी मंजूर केला आहे हे खरे काय, असल्यास, किती रक्कमेचा निधी मंजूर करण्यात आला आहे ?

**श्री.राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरीता** : (१) व (२) औरंगाबाद महानगरपालिकेस विविध मुलभूत सोयी सुविधांसाठी सन २००५-२००६ मध्ये रु.२८,८२,३८,०००/- इतके तर सन २००६-२००७ मध्ये रु२,५०,००,०००/- इतके विशेष अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.

----------

श्रीमती निलम गो-हे : सभापती महोदय, कुटुंबकल्याण विभाग आणि मलेरिया विभागाचे मिळून १६ कोटी रुपये प्रलंबित आहेत, ते अद्यापही मिळालेले नाहीत. त्याचप्रमाणे निधीचा जो तपशील दिलेला आहे त्यानुसार पाणीपुरवठा योजना किंवा मोठया योजनांसाठी आणि मुलभूत विकास कामांसाठी किती पैसे दिले आहेत? मलेरिया आणि कुटुंबकल्याण विभागाचा प्रलंबित निधी कधी दिला जाईल?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, उत्तरामध्ये स्पष्ट माहिती दिलेली आहे. औरंगाबाद महानगरपालिकेला २००४-०५ मध्ये १.२० कोटी रुपये, २००५-०६ मध्ये २८ कोटी रुपये आणि २००६-०७ करीता २.५ कोटी रुपये दिले. ज्या देय रक्कमा आहेत त्यानुसार मागील वर्षी औरंगाबाद येथे कॅबिनेट बैठक झाली त्या बैठकीमध्ये असे ठरले होते की, १२ वर्षे प्रत्येक वर्षाला ५ कोटी रुपये द्यायचे. २००१ साली ही बैठक झाली होती. पाच वर्षे पैसे दिले नव्हते. त्यामुळे एकरकमी मागील वर्षी २५ कोटी रुपये देण्याची व्यवस्था शासनाने केलेली आहे. यावर्षी सुध्दा पैसे देण्याची व्यवस्था केली आहे. देय रक्कमा दिलेल्या आहेत. प्रामुख्याने रस्त्यांच्या दृष्टीकोनातून ज्या गरजा आहेत त्या पूर्ण केल्या जात आहेत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, उत्तर देताना मंत्रीमहोदयांनी आर्थिक सहाय्य दिल्याचे सांगितले, ही गोष्ट चांगली आहे. कोणत्या मुलभूत सुविधांसाठी पैसे खर्च करावेत या संदर्भात कोणत्या सूचना संभाजीनगर महापालिकेल्या दिलेल्या आहेत?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.२०७८३........

श्री.राजेश टोपे : ५ कोटी रुपये प्रतिवर्षी द्यायचे आहेत त्यासाठी आय.आर.डी.पी.योजना आहे, त्या योजनेमधील शासनाचा शेअर ६० कोटी रुपयांचा आहे. आमदार आणि खासदार निधीच्या माध्यमातून २० कोटी रुपये उभे करावयाचे आहेत. वैधानिक विकास मंडळाकडून १२ कोटी रुपये, महापालिकेने ४.५ कोटी रुपये उभे करावयाचे आहेत. १६७ कोटी रुपये आय.आर.डी.पी.योजनेसाठी उपलब्ध होणार आहेत. त्यामध्ये शासनाने आपला पूर्ण वाटा दिलेला आहे. यातून रोड आणि फ्लायओव्हर्स पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मराठवाडा, महाराष्ट्र और भारत में औरंगाबाद शहर का एक विशेष स्थान है. ग्लोबलाइजेशन के इस जमाने में औरंगाबाद शहर को "टॉप १०" में लाने का उद्देश्य है, ऐसा हमारे माननीय मुख्यमंत्री ने कहा है. औरंगाबाद शहर की स्थापना को ४०० साल पूरे हो गए है. इस बात को ध्यान में रखते हुए ३०० करोड़ रुपए के प्रस्ताव वहां के कमिश्नर ने शासन को सादर किए हैं. इस राशि का उपयोग औरंगाबाद शहर के सर्वांगीण विकास के लिए किया जाएगा. क्या यह राशि औरंगाबाद शहर के लिए दी जाएगी ? क्या माननीय मुख्यमंत्री के पास औरंगाबाद शहर को "टॉप १०" में लाने की और इसके लिए विशेष निधि देने की कोई योजना है ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, अलिकडच्या काळात आपल्याला माहित आहे की, केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या वेगवेगळया योजना मोठया शहरातील महापालिका, नगरपालिकांच्या विकासाच्या दृष्टीकोनातून हाती घेतल्या आहेत. यामध्ये राज्य शासनाच्या वतीने प्रतिवर्षी बजेटरी प्रोव्हीजन वाढवित आहोत. त्यामध्ये रस्ते विकास असेल, विशेष अनुदान असेल, या माध्यमातून राज्य सरकारच्या वतीने पैसे दिले जातात. आय.आर.डी.पी.च्या अंतर्गत शासन अर्थसहाय्य देते. औरंगाबाद शहर युआयडीएससपीकडून निधी प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने पात्र असलेले शहर आहे. पिण्याचा पाण्याचा प्रश्न आहे...........

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :20783....

श्री. राजेश टोपे....

सभापती महोदय, 360 कोटी रुपयांच्या पाणी पुरवठा योजनेसाठी युएनआरएम आणि युआयडीएसएमटीच्या माध्यमातून प्रपोजल पाठविलेले असल्यामुळे शासन त्यादृष्टीने विचार करीत आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, कमिश्नर ने 300 करोड़ रुपए की योजना शासन के पास भेजी है. इसके बारे में शासन का क्या विचार है ? क्या यह राशि औरंगाबाद शहर को मिलेगी ?

श्री. राजेश टोपे : हा 300 कोटीचा प्रस्ताव आहे. ही राज्यशासन आणि केंद्रशासनाची योजना आहे. ज्या ज्या ठिकाणी आवश्यक आहे त्या त्या ठिकाण पैसे खर्च केले जातील.

डॉ एम.ए.मिर्झा : सभापती महोदय, उत्तरात असे म्हटले आहे की, सन 2005-2006 करिता 28 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे परंतु 2006-2007 मध्ये केवळ 2.5 कोटी रुपयांचीच तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे 2006-2007 मध्ये औरंगाबाद महानगरपालिकेला कमी तरतूद का केलेली आहे?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, ज्यावेळेस 2001 मध्ये मराठवाडयात कॅबिनेट मिटींग झाली होती त्यावेळेस प्रत्येक वर्षी 5 कोटी रुपये औरंगाबाद महानगरपालिकेला उपलब्ध करुन दिले जातील अशी घोषणा करण्यात आली होती. परंतु 2001 ते 2005 पर्यंत हे पैसे औरंगाबाद महानगरपालिकेला उपलब्ध करुन देण्यात आले नव्हते त्यामुळे 5 वर्षाचे राहिलेले 25 कोटी रुपये असे मिळून 28,82,38,000/- कोटी रुपये देण्यात आलेले आहेत. तसेच सन 2005-2006 मध्ये 2.5 कोटी रुपये इतके विशेष अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे. या योजनेतून 3.8 कोटी स्पेशल ग्रँट देण्यात आलेली आहे.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, मी या प्रश्नाच्या संदर्भात एक उपप्रश्न विचारला होता की, मलेरिया आणि कुटुंबकल्याण योजनेचे थकीत पैसे किती आणि कधी मिळणार आहेत? तसेच जेएनयुआरएम या योजनेतून केंद्रशासनाकडून जे पैसे येतात ते पैसे या शहराला दिले जातात. परंतु महाराष्ट्र शासनाकडे वर्षानुवर्षे पैसे प्रलंबित आहेत. महाराष्ट्र शासनाचे हे पैसे प्रलंबित

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असल्यामुळे या महानगरपालिकेची कोंडी होते. त्यामुळे 2 वर्षाचे किती पैसे प्रलंबित आहेत व हे पैसे महाराष्ट्र शासन किती दिवसात उपलब्ध करुन देणार आहे?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, मलेरिया आणि कुटुंबकल्याण योजनेच्या माध्यमातून आरोग्य विभागाकडून पैसे मिळत असतात. यामध्ये नगरविकास विभागाचा पैसे देण्यामध्ये डायरेक्ट संबंध नसतो.

--------------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माधवनगर (जि.सांगली) येथे ग्रामीण बस स्थानक उभारणीमधील दिरंगाईबाबत**

**(५) * २०६९० प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील :** सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगलीतून ग्रामीण भागात होणाऱ्या एस.टी.वहातूकीची स्वतंत्र सोय व्हावी या उद्देशाने माधवनगर येथे राज्य मार्ग परिवहन महामंडळाने जमिन संपादित करुन अनेक वर्षे झाली तरी त्या जागेवर ग्रामीण बस स्थानक अद्याप सुरु होऊ शकले नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) उक्त जागेवर बस स्थानक त्वरेने सुरु करण्यासंबधी महमंडळामार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विलासराव देशमुख** : (१) हे खरे आहे.

(२) गेल्या काही वर्षापासून राज्य परिवहन मंहामंडळ बिकट आर्थिक स्थितीतून वाटचाल करत असल्याने निधीच्या कमतरतेमुळे बसस्थानकाचे बांधकाम हाती घेणे शक्य झाले नाही.

(३) महामंडळाची आर्थिक स्थिती बिकट असल्याने स्वखर्चाने बसस्थानकाचे बांधकाम महामंडळास करता आले नाही. म्हणून व्यापारी संकूल योजनेअंतर्गत (बी.ओ.टी. तत्वावर) बसस्थानकाचे काम करता येणे शक्य आहे काय या तपासणीसाठी जुलै,२००३ मध्ये स्वारस्य अभिव्यक्ती निविदा मागविण्यात आल्या होत्या पंरतू त्यास प्रतिसाद मिळाला नाही. सबब निधीच्या उपलब्धतेनुसार सदर जागेवर बसस्थानक बांधण्यास राज्य परिवहन महामंडळ प्रयत्नशिल आहे.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, सांगली शहराचे बसस्थानक शहरात असल्यामुळे ग्रामीण भागात एस.टी. वाहतूक करण्यासाठी बसडेपोची जागा कमी पडू लागली आहे. त्यामुळे महाराष्ट्र परिवहन महामंडळाने नागरी जमीन कमाल धारणा कायद्याअंतर्गत एका शेतक-याची जमीन बसडेपोसाठी संपादित केली असून या घटनेला 7-8 वर्षे होऊन गेलेली आहे. ग्रामीण भागात एस.टी. वाहतुकीची स्वतंत्र सोय व्हावी यासाठीच ही जागा एस.टी. महामंडळाने संपादित केली होती. उत्तरामध्ये म्हटले आहे की, स्वखर्चाने बसस्थानकाचे बांधकाम महामंडळास करता आले नाही. म्हणून व्यापारी संकूल योजनेअंतर्गत (बी.ओ.टी.तत्वावर )बसस्थानकाचे काम करता येणे शक्य आहे काय ? तपासणीसाठी जुलै, 2003 मध्ये स्वारस्य अभिव्यक्ती निविदा मागविण्यात आल्या होत्या परंतू त्यास प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे यासंदर्भात नवीन निविदा काढण्यात येतील काय? तसेच उत्तरात असेही म्हटले आहे की, निधीच्या उपलब्धतेनुसार सदर जागेवर बसस्थानक बांधण्यास राज्य परिवहन महामंडळ प्रयत्नशिल आहे. त्यामुळे मला असे विचारावयाचे आहे की, या बसस्थानकासाठी अंदाजे किती खर्च अपेक्षित आहे? तसेच एखाद्या वित्तीय संस्थेकडून निविदा आल्या आणि बसस्थानकाचे काम झाले तर तेथील गाळे व्यापा-यांना भाडयाने देऊन महामंडळाचे उत्पन्न वाढू शकेल, तरी असे शासन करणार आहे काय ? ....4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 20690......

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्या प्रश्नाच्या संदर्भात बसस्थानकासाठी 3 वर्षापूर्वी निविदा काढण्यात आल्या होत्या परंतु त्याला प्रतिसाद मिळाला नव्हता. आता पुन्हा नव्याने निविदा काढल्या तर या कामासाठी निश्चित प्रतिसाद मिळू शकेल अशी खात्री आहे. या शहराची गरज लक्षात घेता तातडीने नवीन बसस्थानक बांधणे आवश्यक आहे ही गोष्ट आम्ही मान्य करतो त्यामुळे यादृष्टीकोनातून तातडीने पाऊल उचलले जाईल.

यानंतर श्री. अजित......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वसमत व हिंगोली या नगरपालिकांच्या मुख्याधिकाऱ्यांनी कमी कर वसूली केल्याबाबतची विभागीय चौकशी**

**(6) * 22491 श्री. श्रीकांत जोशी , श्री. नितीन गडकरी , श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे : दिनांक 20 जुलै, 2006 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक 19 जुलै, 2006 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील प्रश्न क्रमांक 17683 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) वसमत व हिंगोली या नगरपालिकांच्या मुख्याधिकाऱ्यांनी कमी कर वसूली केल्यामुळे त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यासाठी विभागीय आयुक्त यांनी शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, चौकशीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विलासराव देशमुख** : (1) होय.

(2)विभागीय आयुक्ताचे अहवालानुसार संबंधित मुख्याधिकारी यांचे कमी वसूलीबाबत खुलासे घेण्यात आले असून त्या अनुषंगाने पुढील कारवाई करण्यात येत आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या यादीतील उत्तराने माझे समाधान झालेले आहे.

( उपप्रश्न नाहीत. )

--------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## मुंबई, भांडुप येथील झोपडपट्टीवासी कुटुंब, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेपासून वंचित असल्याबाबत

**(७) * २०८१० श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते :** सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९७१ च्या कायद्याअंतर्गत एखाद्या झोपडपट्टीला गलिच्छ वस्ती (स्लम) म्हणून जाहिर करण्याचे अधिकार मंत्रालयाने स्वत:कडे घेतले असल्याने मुंबईतील भांडुपमधील दोन हजारांहून अधिक झोपडपट्टीवासी कुटुंब अद्याप झोपडपट्टी पुनर्वसन योजने (एस.आर.ए) पासून वंचित राहिल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपडपट्टीवासियांसोबत भांडुपच्या टाटा पॉवरच्या उच्च दाबाच्या विजेच्या तारांखाली शेकडो चाळी गलिच्छ वस्ती म्हणून जाहिर केल्या जात नसल्याने हजारो कुटुंबे एस.आर.ए पासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चाळ मालक व झोपडीदादा या रहिवाशांकडून भाडे व सुविधांसाठीचे पैसे वसूल करतात, परंतु गलिच्छ वस्ती जाहिर करा, अशी मागणी वारंवार करीत असतानाही शासन मान्य करीत नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**ॲड.प्रीतमकुमार शेगावंकर,श्री. विलासराव देशमुख यांच्याकारिता** : (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभाती महोदय, मी एकूण चार प्रश्न विचारले होते. त्यातील पहिल्या तीन प्रश्नांची उत्तरे "नाही" अशी देण्यात आलेली आहेत. तर चौथ्या प्रश्नाचे उत्तर "प्रश्न उद्‌भवत नाही" असे देण्यात आले आहे. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, गलिच्छ वस्ती संदर्भात गाईड करण्याचे अधिकार उपजिल्हाधिकाऱ्यांकडून काढून ते मंत्रालयातील उपसचिवांकडे दिलेले आहेत हे खरे आहे काय ? हे अधिकार सन 1971 च्या कायद्याअंतर्गत एखाद्या झोपडपट्टीला गलिच्छ वस्ती म्हणून जाहीर करण्याचे अधिकार मंत्रालयाने स्वत:कडे घेतले असल्याने मुंबईतील भांडूपमधील दोन हजारांहून अधिक झोपडपट्टीवासी कुटुंब अद्याप झोपडपट्टी पुनर्वसन योजने पासून वंचित राहिल्याचे आढळून आले आहे हे खरे आहे काय ? असल्यास त्यांना एस.आर.ए.ची मान्यता का देण्यात येत नाही ?

ॲड.प्रीतमकुमार शेगावंकर : सभापती महोदय, एस.आर.ए. जाहीर करण्याचे अधिकार सक्षम अधिकाऱ्याकडे देण्यात आलेले आहेत. हे अधिकार मंत्रालयात घेतलेले नाहीत. तशाप्रकारचा स्पष्ट जी.आर.आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 20810......

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, भांडूप येथील झोपडपट्टीस एस.आर.ए.ची मान्यता का देण्यात आलेली नाही ? तेथील लोकांनी सर्व कागदपत्रे, डॉक्युमेंटस सादर करुनही त्यांना एस.आर.ए.ची मान्यता का देण्यात आलेली नाही ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, भांडुप येथे जी झोपडपट्टी आहे ती फार मोठ्या जागेवर व्यापलेली आहे. ज्या जागेवर ही झोपडपट्टी आहे तेथून उच्च दाबाच्या वीज वाहिन्या जातात. त्यामुळे तेथील दहा मीटरच्या परिसरात कोणालाही जात येत नाही. त्यामुळे तेथे एस.आर.ए.ची स्कीम राबविणे थोडे कठीण दिसते. त्यांना पर्यायी जागा उपलब्ध असेल तर त्याबाबत विचार करु. आपण 1 नोव्हेंबर रोजी एक धोरण जाहीर केलेले आहे. 40 हेक्टर, 100 हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र असलेले जसे धारावीचा भाग डेव्हलप करण्याचा निर्णय घेतलेला आहे त्याप्रमाणे डेव्हलप करता येईल. भांडूप येथे उच्च दाबाच्या वीज वाहिन्या असल्यामुळे त्याठिकाणी दहा-दहा मीटरपर्यंत आपल्याला जात येत नाही. त्यामुळे एस.आर.ए.स्कीमचा विचार करण्यात आलेला नाही.

--------------

..4..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नवीन पनवेल भागातील रिक्षा चालक मीटरप्रमाणे वाहतूक करीत नसल्याबाबत**

**(८) * २२०१४ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. जगदीश गुप्ता :** सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल रेल्वे स्थानकावरुन (जि.रायगड) नवीन पनवेलच्या भागात प्रवासी घेऊन जाणाऱ्या रिक्षापैकी बहूतांश रिक्षा चालक मीटर असतांनादेखील मीटरप्रमाणे भाडे घेत नाहीत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रात्रीच्यावेळी प्रवाशांच्या अगतिकतेचा फायदा घेऊन रिक्षा चालक मीटरप्रमाणे पैसे न घेता प्रवाशांकडून दामदुप्पट भाडे घेतात हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गेल्या एक-दोन वर्षापासून हे प्रकरण सुरु असताना वाहतुक विभागाच्या एकाही अधिकाऱ्यांने याकडे लक्ष न देण्याची कारणे काय आहेत,

(४) ज्या अधिकाऱ्यांनी याबाबीकडे दुर्लक्ष केले आहे त्यांची नांवे काय आहेत व त्यांच्यावर कोणत्या स्वरुपाची कारवाई किती दिवसात करण्यात येणार आहे,

(५) सर्व रिक्षा चालकांनी मीटरप्रमाणे भाडे आकारावे यासाठी तातडीने कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे वा येत आहे तसेच ही कार्यवाही करण्यास किती कालावधी लागणार आहे ?

**श्री.विलासराव देशमुख :** (१) व (२) काही प्रमाणात खरे आहे.

(३) व (४) याबाबत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पेण यांनी अंमलबजावणी पथाकामार्फत तपासणी करुन जनतेकडून प्राप्त झालेल्या तक्रारीवर कारवाई करुन ऑटोरिक्षा धारकाकडून माहे एप्रिल २००६ ते ऑक्टोबर २००६ पर्यंत एकूण रुपये १०,१९,६००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

(५) मीटरप्रमाणे भाडे घेण्यासाठी रिक्षा युनियनना कळविण्यात आलेले आहे. तसेच जनजागृतीसाठी महत्वाच्या शहरात एस.टी.स्टॅण्ड व रेल्वे स्टेशन या ठिकाणी भाडे दर्शक बोर्ड प्रदर्शित करण्यात आले आहेत. तसेच वायुवेग पथकामार्फत विशेष तपासणी करण्यात येत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी स्पष्ट प्रश्न विचारला होता की, पनवेल रेल्वे स्थानकावरुन नवीन पनवेलच्या भागात प्रवासी घेऊन जाणाऱ्या रिक्षांपैकी बहुतांश रिक्षाचालक मीटर प्रमाणे भाडे घेत नाहीत हे खरे आहे काय ? या प्रश्नाचे उत्तर "काही प्रमाणात खरे आहे" असे देण्यात आलेले आहे. मी मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, त्याठिकाणी एकही रिक्षावाला मीटरप्रमाणे भाडे घेत नाही. हा प्रकार गेल्या चार-पाच वर्षापासून सुरु आहे. आर.टी.ओ.विभाग जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. गेल्या दोन वर्षात किती दंड वसूल करण्यात आला ? असा माझा प्रश्न होता. त्याचे उत्तर " एप्रिल ते ऑक्टोबर 2006 या कालावधीत एकूण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 22014......

10,19,600 रुपये दंड वसूल करण्यात आला" असे दिलेले आहे. पाच-सहा महिन्यांमध्ये इतका दंड होता. मी मागील दोन वर्षाची माहिती विचारलेली आहे.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.अजित... 12:45

ता.प्र.क्र.22014....

श्री.पांडुरंग फुंडकर...

त्याठिकाणी रात्रीच्यावेळी प्रवाशांना फारच त्रास होतो. त्यामुळे माझा असा प्रश्न आहे की, आपण याबाबतीत दोन वर्षात किती दंड वसूल केला ? व पनवेल येथील रिक्षाचालकांनी मिटरप्रमाणेच भाडे आकारावे यादृष्टीने आर.टी.ओ.ना आदेश दिले जातील काय ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, मिटरप्रमाणे भाडे आकारले जात नाही, ही तक्रार आम्ही काही प्रमाणात मान्यच केलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी याठिकाणी जाणीवपूर्वक बोलत आहे. त्याठिकाणी कुठल्याही रिक्षामध्ये मिटर नाहीत.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, मिटरप्रमाणे भाडयाची आकारणी होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच आपण त्यासंदर्भात जाहीरपणाने किती पैसे आकारले पाहिजेत, यादृष्टीने एस.टी.स्टॅण्ड, रेल्वे स्टॅण्ड, रिक्षा स्टॅण्ड येथे बोर्ड लावलेले आहेत. त्याचबरोबर आपण 301 रिक्षाचालकांचे परवानेही निलंबित केले आहेत. यासंदर्भातील माहिती लोकांना होण्याच्या दृष्टीने आपण सातत्याने प्रयत्न करीत आहोत. याबाबतीत आणखी कडक कारवाई होण्याची आवश्यकता असून त्याप्रमाणे आणखी कडक ॲक्शन घ्यावी लागेल व मोठया प्रमाणात परवाने रद्द करावे लागतील. परंतु एवढया मोठया प्रमाणात रिक्षाचालकांचे परवाने रद्द केल्यानंतर तेथील जनतेलाही पर्याय उपलब्ध असण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात रिक्षा चालकांच्या संघटनेशी आम्ही वांरवार चर्चा करीत आहोत. याबाबतीत मी निश्चितपणे तेथील आयुक्तांना सूचना देईल की, आपण त्याठिकाणी पुन्हा जाऊन तेथील रिक्षाचालक संघटनेशी चर्चा करावी. आणखी कडक कारवाई करुन हे प्रकार थांबले पाहिजेत व मिटरप्रमाणेच भाडयाची आकारणी झाली पाहिजे. इतर ठिकाणी मिटरप्रमाणेच भाडयाची आकारणी होते, परंतु पनवेलच्या बाबतीत अशी तक्रार असून त्यासंदर्भात कडक ॲक्शन घेतली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, गेल्या दोन वर्षात आपण अशा किती लोकांवर कारवाई केली आहे ? व किती रुपयांचा दंड वसूल करण्यात आला ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, दोन वर्षाची आकडेवारी सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही, ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

..2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.22014....

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, याठिकाणी मूळ प्रश्न असा आहे की, पनवेल येथील रिक्षा व्यावसायिक हे नियमाप्रमाणे, मिटरप्रमाणे भाडयाची आकारणी करत नाहीत. त्यासंदर्भात आपल्या अधिकाऱ्यांनी कोणती कारवाई केली ? सभापती महोदय, आम्हाला कोकणामध्ये जाण्याच्या दृष्टीने बऱ्याचवेळा पनवेलला जावे लागते. परंतु त्याठिकाणी पनवेल येथील रिक्षाचालकांची बरीच दादागिरी चालत असल्याचे आम्ही स्वत: अनुभवलेले आहे. त्याठिकाणच्या जनतेकडून तक्रार आल्यानंतरच आपण कारवाई करीत आहात. इतके दिवस आपले अधिकारी जनतेकडून तक्रारी येण्याची वाट का पाहत होते, त्यांनी अगोदरच स्वत: लक्ष घालून कारवाई का केली नाही ? त्यामुळे याठिकाणी ज्या अधिकाऱ्यांनी अगोदर कारवाई केली नाही, त्यांच्यावरही कारवाई होणे आवश्यक आहे, ती आपण करणार का ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, जानेवारी, 2006 ते नोव्हेंबर,2006 पर्यंत यासंबंधीची जवळपास 1925 प्रकरणे दाखल करण्यात आली असून जवळपास 58 हजार रुपयांचा दंडही वसूल करण्यात आलेला आहे. यामध्ये आणखी कारवाई केल्यानंतर तीच रक्कम 10 लाखापर्यंत एकूण 6 महिन्यांत गेलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे, तेथील रिक्षाचालकांच्याविरुध्द ज्या अधिकाऱ्यांनी नरमाईचे धोरण स्वीकारले असेल त्यासंदर्भात चौकशी करण्यात येईल व त्यांच्यावर ॲक्शनही होईल.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, दिवसापेक्षा रात्रीच्यावेळी प्रवासी परिवारासह रिक्षास्टॅण्डवर गेल्यानंतर रिक्षाचालक दुप्पटीने ते तिप्पटीने भाडे आकारुन त्यांची अक्षरश: लूट करतात. यासंदर्भात माझी एवढीच मागणी आहे की, आपण त्याठिकाणी जे बोर्ड लावणार आहात, त्यासोबतच यासंबंधीची तक्रार कोणाकडे करावयाची व त्यांचा फोन नंबर त्या बोर्डवर आपण देणार का ? आणि विशेषत: रात्रीच्यावेळी जे परिवारासह येतात, त्यांना त्रास होणार नाही, याची व्यवस्था आपण करणार काय ?

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.रोझेकर...

**ता.प्र.क्र.22014**..........

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, प्रवाशांचे हाल होऊ नयेत, त्यांची लूट होऊ नये यासंदर्भामध्ये कार्यवाही करण्यात येत आहे. परंतु, यासंदर्भात सन्माननीय सदस्यांच्या ज्या सूचना आलेल्या आहेत त्याचा सरकार विचार करेल.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, प्रवाश्यांशी निगडीत हा प्रश्न आहे. प्रवासी नाडले जात आहेत. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी येथे सांगितले की, संबंधितांवर कठोर कारवाई करु. दंडात्मक कारवाई पुरेशी नाही. तेंव्हा, कठोर कारवाई कोणती करण्यात येणार आहे ? रिक्षा चालकांचे लायसन्स रद्द करणार काय ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, 10 लाख रुपयांचा दंड वसूल केला आहे त्याचबरोबर जवळ जवळ 300 लोकांचे लायसन्स रद्द केले आहे. दुस-या बाजूला अशा पध्दतीने जर लायसन्स रद्द झाले तर प्रवाश्यांचे हाल होणार नाहीत हेही पाहिले पाहिजे. त्यामुळे यामधील जे दोष आहेत ते दूर कसे होतील आणि रिक्षा चालकांना जरब वाटेल यासंबंधी ज्या सूचना केल्या आहेत त्याचा विचार करता आवश्यक ती कारवाई नक्की करण्यात येईल.

---------------------

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**महापालिकेच्या सॅनिटरी इन्स्पेक्टरला लाच घेताना पकडल्याबाबत**

**(९) * २०८३६ श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. सुधाकर गणगणे , श्री.राजन तेली , श्री. यशवंतराव गडाख :** सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील खरेदी केलेल्या दुकानाला आरोग्य प्रमाणपत्र देण्यासाठी महापालिकेच्या सॅनिटरी इन्स्पेक्टरला २५ हजाराची लाच घेताना दिनांक ३१ जुलै, २००६ रोजी वा त्यादरम्यान रंगेहात पकडण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उक्त अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) स्वच्छता निरिक्षक, आरोग्य खाते, मुंबई महानगरपालिका यांना ॲन्टी करप्शन ब्युरो, यांनी हॉटेलचा परवाना संबंधितांच्या नावे करण्यासाठी लाचेची रक्कम रु.१४,०००/- स्विकारत असताना दि.३१.७.२००६ रोजी पकडले हे खरे आहे.

(२) पोलीस व लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अन्वेषण पूर्ण झाल्यावर मुंबई महानगरपालिकेकडून स्वतंत्रपणे विभागीय चौकशी करण्यात येणार आहे.

(३) लाचलुचपत प्रकरणाच्या न्यायालयीन निकालासापेक्ष सदर कर्मचाऱ्याला दि.३१.७.२००६ पासून मुंबई महानगरपालिका सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अन्वेषण किती कालावधीत पूर्ण होणार आहे ? राज्यात अशा घटना सतत घडत आहेत. तेंव्हा, अशा प्रकरणांबाबत शासन कोणता ठोस निर्णय घेणार आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, हे जे.सी.बी.चे प्रकरण आहे. लाचलुचपत विभागाच्या माध्यमातून अन्वेषण चालू आहे. ते लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबतच्या सूचना देण्यात येतील जेणे करुन चार्जशीट दाखल करता येईल व त्यानंतर विभागीय चौकशी करता येईल.

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, याच प्रकरणातील सॅनिटरी इन्स्पेक्टरबाबत अशा प्रकारच्या तक्रारी यापूर्वी हॉटेल मालकांनी केल्या होत्या, हे खरे आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न मूळ प्रश्नाशी निगडित नाही.

----------------

...3.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ता.प्र.क्र.22207</u>**

**(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)**

----------------

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..4.........

**मानशीश्वर खाडी ते मांडवी खाडी (तालूका वेंगुर्ला, जिल्हा सिंधुदूर्ग) येथील गाळ काढणेबाबत**

**(११) * २०९५१ मेजर सुधीर सावंत , श्री. संजय दत्त : दिनांक २१ जुलै, २००६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या १८ व्या यादीतील प्रश्न क्रमांक १७५४७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय मत्स्यव्यवसाय मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेंगुर्ला (जिल्हा सिंधुदूर्ग) तालुक्यातील मानशीश्वर खाडी ते मांडवी खाडी येथील मच्छिमारांच्या मागणीनुसार गाळ काढण्यासाठी ४० लाख रुपयांची तरतूद केली असूनही समुद्राशी निगडीत खात्यांचा परस्पर समन्वय नसल्याने सदर निधीचा विनियोग करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २२ मे, २००६ रोजी वा त्या दरम्यान दिलेल्या लेखी निवेदनाच्या अनुषंगाने सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त ठिकाणाच्या खाडीतील गाळ काढण्याबाबत व तेथील मच्छिमारांच्या समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे,

(४) अद्याप, याबाबत कोणतीच कारवाई केली नसल्यास त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री.हसन मुश्रीफ, श्री.अनिस अहमद यांच्याकरिता** : (१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, शासनाने गाळ काढण्यासाठी कालावधी निश्चित केला आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मानशीश्वर खाडी ते मांडवी खाडी येथील 850 फुटापर्यन्तचा गाळ काढण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. कोकण पॅकेजच्या दुस-या टप्प्यात हा गाळ काढण्याचे मान्य करण्यात आले आहे.

---------------

..5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नवी मुंबईतील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या धोकादायक गाळयांच्या पुनर्बांधणीबाबत**

**(१२) * २३२८३ श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. जितेंद्र आव्हाड : दिनांक १३ जुलै, २००६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक १२ जुलै, २००६ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील प्रश्न क्रमांक १८९४५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या धोकादायक गाळयांच्या पुनर्बांधणीसंदर्भात विकास नियंत्रण नामावलीत फेरबदल करण्याच्या महानगरपालिकेच्या विचाराधीन असलेल्या प्रस्तावावर अंतीम निर्णय घेण्यात आला आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री.राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१), (२) व (३) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन नवीन मुंबई महानगरपालिकेने नवी मुंबई शहरासाठीची विकास नियंत्रण नियमावली शासनास अंतिम मान्यतेसाठी दिनांक ६.७.२००६ रोजी सादर केलेली आहे.

महानगरपालिकेने संपूर्ण शहरासाठी पूर्णत: नवीन नियमावली प्रस्ताविलेली असल्याने त्याची छाननी सुरु असून त्यास मंजूरी देताना कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रस्तावावर योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, दिलेल्या लेखी उत्तराने माझे समाधान झाले आहे.

(उपप्रश्न नाहीत)

---------------

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कल्याण (जि.ठाणे) येथील श्रीकृष्णनगर भागात होत असलेले अनधिकृत बांधकाम**

**(13) * 21005 श्री. संजय दत्त , श्री. सुधाकर गणगणे , श्री.राजन तेली , श्रीमती सुधा जोशी** : सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कल्याण (जि.ठाणे) येथील श्रीकृष्णनगर या भागात अनधिकृत बांधकामे होत असून रस्त्यांत अनधिकृत पायऱ्या, ओटे बांधले जात असल्याबाबत दिनांक 10 एप्रिल, 2006 रोजी स्थानिक जयसाई सदन व श्री. स्नेह सहकार गृहनिर्माण संस्थेने मा.आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने उपरोक्त अनधिकृत बांधकामाबाबत कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कोणती कारवाई केली आहे वा येत आहे,

(5) अद्याप चौकशी केली नसल्यास त्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (1) होय.

(2) तक्रारीत तथ्य नसल्याने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, प्रश्नाच्या लेखी उत्तराने माझे समाधान झालेले आहे.

( उपप्रश्न नाहीत )

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**महाराष्ट्र राज्याच्या अधिकाऱ्यांचा राज्यातील अखिल भारतीय सेवांमधील असलेला कोटा वाढवून देण्याबाबत**

**(14) * 23444 डॉ. वसंत पवार , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. लक्ष्मण जगताप : दिनांक 19 जुलै, 2006 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या चौथ्या यादीतील प्रश्न कमांक 13967 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) महाराष्ट्र राज्याच्या अधिकाऱ्यांचा राज्यातील अखिल भारतीय सेवांमधील असलेला कोटा वाढवून देणेसंदर्भात केंद्र शासनाने अंतीम निर्णय घेतला आला आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रश्नी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) उक्त प्रश्नी अद्याप निर्णय घेतला नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विलासराव देशमुख** : (1) यासंदर्भात केंद्र शासनाने अद्याप अंतिम निर्णय घेतलेला नाही.

(2) प्रश्न उद्‌भवत नाही.

(3) प्रस्तूत मागणी संदर्भात निर्णय घेण्याची बाब राज्य शासनाच्या अखत्यारीतील नाही.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, अखिल भारतीय सेवेमध्ये महाराष्ट्र राज्याच्या अधिका-यांचा कोटा वाढविण्यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री प्रयत्नशील असल्याचे समजल्याने माझे समाधान झालेले आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, अखिल भारतीय सेवेत उत्तीर्ण होणा-यांना पाहिजे ते राज्य मिळत नाही. महाराष्ट्रामध्ये मराठी अधिकारी येण्यासंदर्भात माननीय मंत्री महोदय प्रयत्न करणार आहेत काय ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, इंडियन पब्लिक सर्व्हीस कमिशनने ठरवून दिलेल्या नियमावलीप्रमाणे त्यांच्या नियुक्त्या होत असतात. आता मराठी अधिका-यांचे प्रमाण वाढलेले आहे. पूर्वी मराठी अधिकारी कमी उत्तीर्ण होत असत. त्यांच्यासाठी आणखी प्रशिक्षण केंद्र निर्माण करण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. ही ऑल इंडिया सेवा असल्यामुळे सर्व अधिकारी महाराष्ट्रात येतील हे सांगणे कठीण आहे. कारण हा केंद्र शासनाचा विषय आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मराठी अधिका-यांना सेवाज्येष्ठतेप्रमाणे मुंबई महानगरपालिकेसारख्या इतर महत्वाच्या ठिकाणी कमिशनर म्हणून नियुक्ती दिली जाईल काय ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, राज्य चालवितांना आपण तसा विचार करीत नाही. ते शासकीय सेवेतील नोकर असतात. मराठी अधिकारी आहे म्हणून आपण त्याला प्रायॉरिटी देत नाही. मुंबई महानगरपालिकेला कार्यक्षम अधिकारी देण्याचा शासनाने प्रयत्न केलेला आहे.

...3........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, दक्षिण भारतीयांच्या कोटयाप्रमाणे कोटा वाढवून घेण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करेल काय ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, याबाबतची माहिती मी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांच्याकडून घेईन.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, अखिल भारतीय सेवेमध्ये मराठी अधिका-यांची टक्केवारी किती आहे ? अखिल भारतीय सेवेत उत्तीर्ण होऊन महाराष्ट्रामध्ये परप्रांतातून अधिकारी येतात. त्यांना मराठी शिकणे कम्पल्सरी आहे. ब-याच अधिका-यांना मराठी येत नाही.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, परप्रांतातून आलेल्या अधिका-यांनी मराठी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. ते अधिकारी परीक्षा उत्तीर्ण झाले नाहीत तर त्यांच्या विरुध्द कारवाई करण्याची तरतूद नियमामध्ये आहे आणि त्याप्रमाणे काही अधिका-यांवर कारवाई झालेली आहे. ज्या नवीन अधिका-यांची नियुक्ती होते त्यातील काही अधिकारी उत्तम मराठी बोलतात. काही अधिका-यांना प्रयत्न करुन देखील चांगले मराठी बोलता येत नाही. कोणत्याही प्रांतातून अधिकारी येथे आला असेल तर त्याला मराठी येणे आवश्यक आहे. त्यांना मराठी परीक्षा उत्तीर्ण होणे कम्पल्सरी आहे. त्यांनी मराठी परीक्षा पास केली नाही तर त्यांच्या कारवाई करण्याची तरतूद नियमामध्ये आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये काम करणा-या अधिका-यांना कम्पल्सरी मराठी आले पाहिजे. जी.आर. मध्ये पास, ॲपीअर असे नमूद केलेले असते. हा प्रश्न घेऊन मी मंत्रालयातील संबंधित अधिका-याकडे गेलो होतो.

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.23444...

ज्या अमराठी अधिकाऱ्यांनी मराठी भाषेची परीक्षा दिली असेल आणि त्यात ते नापास झाले असतील तर काय केले जाते हे माननीय मुख्यमंत्र्यांनी आता सांगितले आहे. म्हणजे मराठी भाषा ही सगळ्यांना सक्तीची आहे आणि ते बरोबर आहे. मराठी मातीमध्ये आलेल्यांना मराठी भाषा आलीच पाहिजे ही त्यामागील आपली सर्वांचीच भूमिका आहे. पण ...

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे ....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण आज रेकॉर्ड ब्रेक करावयाचे ठरविले आहे काय ? .... माझा यामध्ये प्रश्न असा आहे की, मराठी भाषा उत्तीर्ण असली पाहिजे असा आपला जीआर आहे त्याप्रमाणेच अधिकाऱ्यांनी मराठी भाषेतच आपल्या नाव व हुद्याच्या पाट्या लावल्या पाहिजेत असाही एक जीआर आहे. आणि मध्यंतरी मंत्रालयात येऊन आम्ही त्याच जीआरचा पाठपुरावा केला आहे पण याबाबतीत सरकारने मात्र काहीही केलेले नाही. मराठी मातीचे मीठ खाणाऱ्या अधिकाऱ्यांनी येथे सर्व सुखसोयी घ्यायच्या. त्यांच्या घरची सफाई देखील मराठी माणसेच करतात. तेव्हा त्यांनी आपल्या नावाच्या पाट्या देखील मराठी भाषेतूनच लावल्या पाहिजेत यासाठी आम्ही मंत्रालयामध्ये आंदोलन केले, आपल्या जीआरचाच पाठपुरावा केला. त्याबद्दल माझ्यावर खटला भरावयाचा असेल तर जरूर आपण भरावा. आपले मुख्य सचिव श्री.डी.के.शंकरन् यांच्या नावाची पाटी इंग्रजीमध्ये, इंग्रजी अद्याक्षरामध्ये लावल्या पाहिजेत, हे आपण सक्तीचे केले पाहिजे तर त्याबाबत आपण काय करणार आहात ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, खरे तर या प्रश्नाशी संबंधित असा हा विषय नाही. आपण या महाराष्ट्रात मराठी भाषेसाठी नेहमीच असे प्रयत्न केलेले आहेत. पण मराठी आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषेतून नावे लिहावित असेही आपले धोरण आहे.

**उपसभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

***

...... एमएम 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्त्याच्या मुद्यांबाबत ...**

**उपसभापती** : माझ्याकडे आज एकंदर 7 सदस्यांकडून औचित्त्याचे मुद्दे मांडण्यास परवानगी द्यावी म्हणून विनंती आलेली आहे. त्यासाठी मी प्रत्येकाला 1-1 मिनिट देतो.

श्री. पांडुरंग फुंडकरा (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील विषयावर औचित्त्याचा मुद्दा येथे उपस्थित करू इच्छितो. सभापती महोदय, कोट्यवधी हिंदू पवित्र शुभ मानत असलेल्या "ओम" या चिन्हाक्षराची पंढरपुरी तंबाकूच्या पुडीवर छपाई करून त्याची विटंबना केली जात आहे. या "ओम " छापलेल्या तंबाकूच्या पुड्या नंतर रस्त्यावर टाकल्या जातात, पायाखाली तुडविल्या जातात, गटारामध्येही टाकल्या जातात. त्यामुळे कोट्यवधी हिंदूंच्या धार्मिक भावनांचा अपमान होतो. या संबंधात मागील अधिवेशनामध्ये सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी देखील हा प्रश्न औचित्त्याच्या मुद्याद्वारा उपस्थित केला होता आणि पंढरपुरी तंबाकूच्या उत्पादकावर कारवाई करण्याची मागणी केलेली होती. सभापती महोदय, त्यावेळी सभापती आसनावर आपणच होता आणि आपण या बाबीची गंभीरतेने दखल घेऊन कारवाई करण्याचे निदेश दिले होते. पण त्यानंतरही गेल्या 3 महिन्यांमध्ये या उत्पादकांवर काय कारवाई शासनाकडून केली गेली हे समजलेले नाही. किंबहुना त्यांचेवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही आणि म्हणूनच आज देखील पंढरपुरी तंबाकूच्या पुडीवर "ओम " चिन्हाक्षर मुद्रित करून त्याचे मोठ्या प्रमाणावर वितरण सुरू आहे. "ओम " या चिन्हाक्षराचा ट्रेडमार्ग म्हणून तेथे उपयोग करण्यात येतो आहे. याबाबत आम्ही केंद्रीय विभागाकडून माहिती घेतली असता अशा प्रकारे "ओम " या चिन्हाक्षराचा ट्रेडमार्क म्हणून उपयोग करून घेता येत नाही असे त्यांनी आम्हाला कळविले आहे. त्यांचे दिनांक 26 ऑक्टोबर 2006 चे तसे पत्र देखील माझ्याकडे आहे. तेव्हा याबाबतीत सभापती महोदय, आपण तातडीने लक्ष घालून पंढरपुरी तंबाकूच्या उत्पादकांवर त्वरित कारवाई करून "ओम" चिन्हाक्षराचा अशा प्रकारे उपयोग होऊ नये यासाठी त्याला प्रतिबंध करावा. मागील वेळेस आपणच या आसनावरून तसे निदेश दिलेले होते. पण सरकारकडून त्याबाबत कोणतीही दखल घेण्यात आल्याचे दिसत नाही तरी आता आपण याबाबत पुन्हा लक्ष घालून "ओम" चिन्हाक्षराची तंबाकूच्या पाकिटावर छपाई करण्यास मनाई करावी अशी माझी आपणास विनंती आहे.

..... एमएम 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : माननीय विरोधी पक्षनेता श्री.पांडुरंग फुंडकर यांनी जो विषय या ठिकाणी औचित्याच्या मुद्याद्वारा मांडला आहे त्याबाबत मागील वेळेस देखील मी निदेश दिले होते पण त्यानंतरही त्या तंबाकूच्या उत्पादकांनी हे करण्याचे थांबविलेले नाही. त्यामुळे या उत्पादकांना अशा प्रकारे "ओम" या चिन्हाक्षराचा वापर करण्यास बंदी घालावी आणि त्यांच्यावर 24 तासात फौजदारी गुन्हा दाखल करावा असे मी सांगतो.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, आपण सूचना केली आहे त्याची नोंद घेऊन त्याप्रमाणे कारवाई केली जाईल.

****

( यानंतर श्री. सरफरे ..... एनएन 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत असून राज्य शासनाने त्याची गंभीर दखल घ्यावी व केंद्र सरकारला कळवावे अशी विनंती करतो. मुद्दा असा आहे की, मुंबईहून हावडा येथे जाण्यासाठी प्रत्येक रविवारी "ज्ञानेश्वरी एक्सप्रेस" नावाची एक रेल्वे गाडी सुरु झाली. संत ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधी आणि ज्ञानेश्वरीच्या सप्त शताब्दीच्या निमित्ताने मुंबईहून हावडा येथे जाण्यासाठी प्रत्येक रविवारी "ज्ञानेश्वरी एक्सप्रेस" या नावाने गाडी सोडण्यात येते. परंतु संबंधित लोकांना भाषा ज्ञान नसल्याकारणाने "ज्ञानेश्वरी" ऐवजी "जनेश्वरी" एक्सप्रेस असे या गाडीचे नामांतर दोन महिन्यातच करण्यात आले. प्रत्येक रेल्वे स्टेशनवर "ज्ञानेश्वरी एक्सप्रेस" ऐवजी "जनेश्वरी एक्सप्रेस" आ रही है, "जनेश्वरी एक्सप्रेस" जा रही है! अशी घोषणा केली जाते. ती गाडी मुंबईला आल्यानंतरही तिला कुणी "ज्ञानेश्वरी" म्हणत नाही, ती "जनेश्वरी" झालेली आहे. तेव्हा आपण राज्य शासनाच्या वतीने केंद्र शासनाला कळवावे. एखादा बंगाली भाषेत सार्वजनिक बोर्ड किंवा शासकीय कार्यालयात विशेषत: कोलकत्त्यात भाषेचा वापर करताना थोडी तरी चूक झाल्यास त्या पत्राची किंवा नोटीसीची दखल घेतली जात नाही. प्रत्येकाला आपापल्या भाषेच्या अस्मितेचा स्वाभिमान आहे. परंतु मराठी भाषा शासकीय कामकाजात वापरणे कमी दर्जाचे मानले जाते. महाराष्ट्र राज्यातील मराठी भाषेच्या अस्मितेच्या स्वाभिमानाचा कोणालाही संबंधच नाहिसा झालेला आहे. बाहेरच्या राज्यातील इतर भाषांबरोबर मराठी भाषेची तुलना करणे कल्पनेच्या बाहेर आहे. 12 व्या शतकातील संत ज्ञानेश्वर महाराज युगपुरुष आणि संतपुरुष, संत शिरोमणी होऊन गेले. त्यांचे नाव सतत सर्व लोकांच्या स्मरणात राहण्यासाठी या गाडीला "संत ज्ञानेश्वरी एक्सप्रेस" असे नाव देण्यात आले आहे. ती सुधारणा केंद्र सरकारने करावी आणि राज्य सरकारने याची दखल घेऊन केंद्र सरकारला कळवावे अशी माझी अतिशय नम्र विनंती आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी)

डॉ. एम. ए. अझिज (नामनियुक्त) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा सभागृहासमोर उपस्थित करीत आहे. परभणी येथील रहिम वस्तीमध्ये पुढील आठवडयात जुम्याचे नमाज पढतांना एका संशयित इसमास मशिदीच्या समुदायाने हटकले असता, सदरहू इसम कावरा बावरा झाला. त्याला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. त्या संशयित व्यक्तीने आपले नाव अल्ताफ हुसेन असे सांगितले. त्याची पोलिसांनी चौकशी केली असता, माझे नाव भोसले असे त्याने सांगितले. संशयित इसमाची झडती घेतली असता, त्याच्याकडे अल्पसंख्यांक धर्तीचे कपडे इत्यादी वस्तू सापडल्या. अलिकडे राज्यामध्ये मालेगाव, नांदेड अशा राज्यातील निरनिराळया भागात विविध घटना घडत असून कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली आहे. परभणी येथील घटनेने पुन्हा जातीय उद्रेक होऊ नये म्हणून पोलिसांनी त्या इसमावर कोणतीही कारवाई केली नसल्यामुळे ही बाब अतिशय गंभीर झाली आहे. याकरिता मी या औचित्याच्या मुद्याव्दारे सदनाला माहिती देतो. आणि पोलिसांनी या इसमावर तात्काळ कारवाई करावी अशी विनंती करतो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

13-12-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही )NN 3

DGS/ KTG/ SBT/

श्री. अरविंद सावंत (मुंबई सानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने या सभागृहामध्ये अत्यंत खेदाने औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. सभापती महोदया, गेल्या दोन अधिवेशनामध्ये किंबहुना त्याच्या पूर्वीपासून सतत पहात आहोत की, आम्ही सार्वजनिक हिताच्या व निकडीच्या विषयावर लक्षवेधी सूचना चर्चेसाठी देतो. हे अधिवेशन सुरु होऊन आठ दिवस होऊन गेले तरी त्यापैकी एकही लक्षवेधी सूचना लावण्यात आलेली नाही. मी जाणीवपूर्वक त्या लक्षवेधी सूचनेचे विषय सांगतो. 1) "कोपरगावच्या साखर कारखान्याच्या पेंट वॉशमुळे तेथील शेतकऱ्यांची जमीन नापिक झाली". 2) "शासकीय दूध योजनेमध्ये 105 रोजंदारीवरील कामगार गेली 22 वर्षे असून त्यांना कायम सेवेमध्ये सामावून घेण्यात यावे" 3) "देवगड तालुक्यामध्ये रॉकेलचा पुरवठा न होणे" या विषयावर लक्षवेधी सूचना दिल्या होत्या. त्याचप्रमाणे कालपरवा देखील "आंबेगाव तालुक्यातील शाळेच्या बांधकामामध्ये निकृष्ट दर्जाचे सिमेंट वापरण्यात आले, त्यामुळे त्या खाळा खोल्या धोकादायक झालेल्या आहेत" या विषयावर पूरक मागण्यांमध्ये बाब मांडली. त्यानंतर विद्यापिठाच्या संदर्भात पुण्यामध्ये बोगस कॉलेजेस चालू आहेत, त्याबाबतचा फॅक्स माझ्याकडे आहे. सिंध्दांत इंस्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्स अँड रिसर्च या संस्थेच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमाच्या वैधतेबाबत प्रश्न विचारला होता. ही संस्था बोगस असून उपसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांनी सदरहू अभ्यासक्रम अवैध असून ते बंद करण्याची कार्यवाही करावी अशाप्रकारची नोटीस काढली.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (पुढे सुरु...

इतके गंभीर विषय आम्ही मांडतो की, ज्यामधून विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळले जाते. यातील एकही लक्षवेधी लागत नाही, याचे मला आश्चर्य वाटते. माझी औचित्याच्या निमित्ताने विनंती आहे की, निदान सदस्यांना यामध्ये न्याय मिळाला पाहिजे. लक्षवेधी सूचना सार्वजनिक आणि निकडीच्या असतानाही त्या लागत नाहीत, याबद्दल मी खेद प्रगट करतो. धन्यवाद.

--

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी प्रश्न उपस्थित केला, त्याप्रमाणे आम्हाला जे मुद्दे अग्रक्रमाचे वाटतात, त्यावर आम्हाला अपेक्षित असलेला न्याय देता येत नाही, म्हणून ॲडव्होकेट उज्वल निकम हे अतिशय निस्पृह आणि कोणत्याही दबावाला बळी न पडता, चांगले काम करणारे सरकारी वकील म्हणून त्यांची ख्याती आहे. त्या व्यक्तीला त्यांच्याच नासिक परिक्षेत्राचे अभियोग संचालनालयाचे प्रभारी उपसंचालक श्री.पी.बी.राठी यांनी गेली सहा महिने सातत्याने त्रास देण्याचा उद्योग चालविलेला आहे. ॲड. उज्वल निकम हे बॉम्बस्फोटासारख्या खटल्यामध्ये समाजाच्या दृष्टीने एक आव्हानात्मक काम करीत आहेत. ते खटले चालवत असताना, बॉम्बस्फोटाच्या खटला सुरू होण्याच्या तारखेला नाशिक परिक्षेत्रातील अभियोग संचालनालयाचे प्रभारी उप संचालक, श्री.राठी हे प्रभारी आहेत, ते कायमस्वरुपी नाहीत. तरी देखील त्यांनी तुम्हाला सरकारी वकील म्हणून कोणत्याही सरकारी न्यायालयात काम पहाण्यास का मनाई करू नये ? अशी कारणे दाखवा नोटीस पाठविलेली आहे. बरोबर बॉम्बस्फोटाच्या खटल्याच्या निकालाच्या तारखांच्यावेळी त्यांच्यासमोर प्रश्न उपस्थित केलेला आहे. बॉम्बस्फोटाच्या प्रकरणातील निकालाचे वाचन सुरू असताना, ॲड. उज्वल निकम यांना त्रास देण्याचा प्रयत्न या नाशिकमधील अभियोग संचालनालयाचे चालविलेला आहे. ही अतिशय गंभीर गोष्ट आहे. सभापती महोदया, प्रायोरिटीचा प्रश्न म्हणून बॅलटमध्ये दिलेला होता, तो प्रश्न लागला नाही. आठवडाभर प्रयत्न केल्यानंतर आम्हाला सांगण्यात आले की, हा विषय पुरवणी मागण्यांमध्ये मांडावा. पुरवणी मागण्या चर्चेला आल्यानंतर बोलणे संपवा, संपवा अशी आम्हाला घाई करण्यात आली. प्रश्न असा आहे की, ॲड. उज्वल निकम यांची मागणी लोक प्रत्येक महत्वाच्या खटल्यामध्ये करतात. ते कोणत्याही दबावाला बळी न पडता चांगले काम करतात, त्यांना जर अशाप्रकारे नोकरशाहीकडून त्रास दिला जात असेल तर ते योग्य नाही. म्हणून मी या सदनामार्फत औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधते,. ॲड. निकम यांना त्रास देणारे प्रभारी उपसंचालक श्री.राठी, यांना पाठबळ देणारे सरकारी अभियोग संचालनालय आहे, यांच्याबाबतीत चौकशी करून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (पुढे सुरू.....

कारवाई करावी,अशी माझी मागणी आहे. ॲड. उज्वल निकम आमचे संरक्षण करतात, त्यांनाच कायदेशीर संरक्षण मिळवून देण्याची वेळ आलेली आहे, याकडे औचित्याच्या मुद्याद्वारे लक्ष वेधू इच्छिते. धन्यवाद.

---

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदया, या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून महाराष्ट्रातील गोरगरिबांच्या शिक्षणाचा प्रश्न मी उपस्थित करू इच्छितो. शासनाच्या धोरणानुसार पहिली ते दहावीपर्यन्त शासनाने मोफत शिक्षण जाहीर केलेले आहे. 12 वीपर्यन्त मुलींना शिक्षण मोफत केलेले आहे. परंतु पहिली ते दहावीपर्यन्त जे विद्यार्थी अनुत्तीर्ण होतात या विद्यार्थ्यांना पुढील वर्षी शिक्षणासाठी शासकीय नियमाप्रमाणे शुल्क भरावे लागते. मागासवर्गीय विद्यार्थी हे एकदा नापास झाले तरी त्यांच्याकडून पुढच्या वर्षी शुल्क न घेता, त्यांना शाळेमध्ये शिक्षण दिले जाते. परंतु जे बिगर मागासवर्गीय विद्यार्थी आहेत, त्यांना मात्र शुल्क भरावे लागते. त्याचा परिणाम असा होतो की, गोरगरिबांची मुले, मजुरी करणाऱ्यांची मुले, घरकाम करणाऱ्यांची मुले त्यांचे शाळेमध्ये दुर्लक्ष होते आणि ते नापास होतात, त्यांना मात्र शिक्षणापासून वंचित रहावे लागते. एकदा हा विद्यार्थी नापास झाला की, पुन्हा तो शिक्षणाच्या प्रवाहामध्ये येत नाही. म्हणून मी या निमित्ताने शासनाला विनंती करू इच्छितो की, जे विद्यार्थी मागासवर्गीय नाहीत,ते नापास होतात त्यांना इतर विद्यार्थ्यांबरोबरच किमान एक वर्ष तरी नि:शुल्क शिक्षण घेण्याची संधी शासनाने उपलब्ध करून द्यावी, यासाठी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

---

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था): सभापती महोदया, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आज महाराष्ट्र टाइम्समध्ये "शहीदाचे कुटुंबीय मारताहेत पालिकेत खेटे" या मथळयाखाली एक बातमी आलेली आहे. त्यासंदर्भात मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. सभापती महादेया, ठाणे महापालिकेतर्फे शहीद मेजर मनीष पितांबरे यांच्या कुटुंबियांना पाच लाख रुपये व त्याच्या पत्नीला महापालिकेत कायमस्वरुपी नोकरी देण्यात आली. या निर्णयाचे लोकांकडून कौतुक करण्यात आले. असेच ठाण्याचे आणखी एक सुपूत्र विजय मोरे हे काश्मीरमधील बारामुल्ला येथे दहशतवाद्यांच्या हल्ल्यात शहीद झाले. त्यांच्याही कुटुंबियांना पाच लाख रुपये व पत्नीस कायम स्वरुपी नोकरी देण्याचा ठराव ठाणे पालिकेने केला. परंतु विजय मोरे यांच्या पत्नीची नोकरी करण्याची इच्छा नसल्यामुळे त्यांच्या भावाला नोकरी मिळण्याकरिता विनंती केली. परंतु ठाणे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी तांत्रिक अडचणीचे कारण देऊन शहीद विजय मोरे यांच्या कुटुंबियांना अनेक खेटे मारावयास लावले. शहीद विजय मोरे यांच्या कुटुंबियातील एका व्यक्तीस ठाणे पालिकेत नोकरी मिळण्याकरिता शासनाने लक्ष घालावे, याकरिता ही बाब मी औचित्याच्या मुद्याव्दारे सभागृहाच्या निदर्शनास आणीत आहे. याकरिता ठाणे महापालिकेच्या सभागृहातील ठरावाची वाट न बघता नगरविकास खात्याने आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना, तेथील आयुक्तांना आदेश देऊन त्यांच्या कुटुंबियातील एका व्यक्तीला नोकरी द्यावी अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याव्दारे करीत आहे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याची नोंद घेतलेली आहे.

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदया, माझा औचित्याचा मुद्दा आहे. हा मुद्दा गृह विभागाशी संबंधित आहे. मालवणच्या 2006 मधील पोटनिवडणुकीमध्ये श्री. रमेश गोवेकर नावाचा कार्यकर्ता बेपत्ता झाला होता. तो बेपत्ता झाल्यानंतर स्थानिक पोलीस यंत्रणेकडून त्याचा तपास सी.आय.डी. कडे देण्यात आला. सी.आय.डी.चा तपास चालू असताना विधानसभेचे माजी अध्यक्ष श्री. दत्ताजी नलावडे यांच्यासोबत मी माननीय गृहमंत्र्यांना भेटलो. माननीय गृहमंत्र्यांनी स्थानिक एस.पी. तसेच डी.आय.जी यांना फोन लावला. त्यावेळी श्री. रमेश गोवेकर यांचे काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की, ते जिवंत आहेत, आठ

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिवसात ते घरी येतील. ही घटना फेब्रुवारी महिन्यामध्ये घडल्यानंतर ते अद्याप परत आलेले नाही. त्या घटनेला एक वर्ष पूर्ण झालेले आहे. या मधल्या काळामध्ये उच्च न्यायालयाने सदर केस सी.बी.आय. कडे वर्ग केली आणि सी.बी.आय. ला आदेश दिले की, चार महिन्यामध्ये श्री. रमेश गोवेकर यांच्या मातोश्रींना प्रगती अहवाल कळवावा. परंतु त्यांनी त्यांच्या मातोश्रींना कोणतीही कल्पना दिलेली नाही. त्याचा तपासाचे काय झाले हे त्यांना कळविले नाही. त्यांच्या मातोश्री आजारी असतात. त्यांची प्रकृती खालावलेली आहे. याबाबत खुलासा झाला पाहिजे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदया, माझा पॉइन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे...

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी )** : आपले नाव माझ्याकडे आलेले नाही.

प्रा. जोगेंद्र कवाडे : माझा पॉइन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. 11 तारखेला मी माननीय सभापती महोदयांना औचित्याचा मुद्दा उपस्थित करु देण्याची विनंती केली होती. त्यावेळी माननीय सभापतींनी सांगितले की, आज वेळ नाही. आपण 12 तारखेला औचित्याचा मुद्दा घेऊ. काल मी माननीय सभापतींना भेटलो. माननीय सभापतींनी सांगितले की, आज औचित्याचा मुद्दा घेण्यात येईल. दलितांच्या हत्याकांडाच्या संदर्भात संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पोलीस अतिरेक सुरु आहे. घराघरामध्ये कोम्बींग ऑपरेशन चालू आहे. स्त्रियांना मारहाण केली जात आहे. अशा प्रकारचा औचित्याचा मुद्दा आपण उपस्थित करु देत नाही, हा अन्याय आहे. हे बरोबर नाही. बाकीच्या सर्व सन्माननीय सदस्यांना औचित्याचा मुद्दा उपस्थित करु देता परंतु दलितांवर होणाऱ्या अत्याचाराच्या संदर्भात, पोलीस खात्याच्या अतिरेकाच्या बाबतीत मला औचित्याचा मुद्दा उपस्थित करु देत नाही, हा अन्याय आहे. याचा निषेध करुन मी सभात्याग करतो.

**तालिका सभापती** : त्यासंदर्भात आपण भाषण केलेले आहे.

( सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे सभात्याग करतात )

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी तक्रार करणे हे समजू शकतो परंतु त्यांनी माननीय सभापतींच्या विरोधात असा निषेध व्यक्त करुन जाणे योग्य नाही. सभापती महोदया, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी जो मुद्दा मांडला त्याबाबत सांगू



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. दिवाकर रावते ....

इच्छितो की, बॉम्ब स्फोटातील आरोपींना शिक्षा देण्याचे काम आता न्यायमूर्ती सुरु करतील त्यावेळी आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा कशी द्यावयाची याबाबत युक्तिवाद सुरु होतील. त्यामुळे सरकारी वकील श्री. उज्ज्वल निकम यांच्यासंबंधीचा औचित्याचा मुद्दा अत्यंत महत्वाचा आहे. शासनाने यासंदर्भात या सदनाच्या माध्यमातून उत्तर देण्याबाबत आपण निदेश दिले तर बरे होईल.

**तालिका सभापती** : त्याची दाद घेतली जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, आपण निदेश द्यावेत. शासनाकडून त्यासंदर्भात निवेदन होणे आवश्यक आहे. ते निवेदन करावे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर तसेच इतर सन्माननीय सदस्यांनी जे औचित्याचे मुद्दे उपस्थित केले त्याची नोंद मी घेतलेली आहे. कायदेशीर संरक्षण दिले जाईल की नाही हा मुद्दा गृह खात्याशी संबंधित आहे. ही बाब त्या खात्याला कळविण्यात येईल.

----

यानंतर श्री. शिगम ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: अतांराकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक बारा ते बावीस सभागृहासमोर ठेवणे

प्रधान सचिव (2) : तालिका सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने अतांराकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक बारा ते बावीस सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक बारा ते बावीस सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ KTG/ पूर्वी श्री. बरवड 13:20

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. राणा जगजितसिंह पाटील (कृषी राज्यमंत्री) : तालिका सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादितचा सन 2004-05चा तिसरा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (वस्त्रोद्योग राज्यमंत्री) : तालिका सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादितचा सन 2003-2004चा 38वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : तालिका सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित नागपूरचा सन 2004-2005चा चौतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील (उद्योग राज्यमंत्री) : तालिका सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सन 2003-2004चे वार्षिक हिशेब सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक हिशेब सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील : तालिका सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने मँगनीज ओर (इंडिया) लिमिटेडचा सन 2005-06चा 44वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे .

डॉ. सुनील देखमुख (वित्त राज्यमंत्री) : तालिका सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीच्या सन 2001-2002या वर्षाच्या आठव्या अहवालातील परि.क्र. 1.28मध्ये समितीने केलेल्या शिफारशीनुसार सर्व मंत्रालयीन विभागांनी सन 2004-2005 या वित्तीय वर्षात केलेल्या पुनर्विनियोजनाबाबतच्या माहितीचे एकत्रित विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

---

...4..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे

श्री. धोंडीराम राठोड (समिती सदस्य) : तालिका सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा बारावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**तालिका सभापती** : रोजगार हमी योजना समितीचा बारावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विनंती अर्ज सादर करणे

डॉ. वसंत पवार : तालिका सभापती महोदया, "महाराष्ट्रातील शैक्षणिक क्षेत्रातील वेतनेत्तर अनुदान व आरक्षण, शिक्षकेतर कर्मचारी भरती तथा आकृतीबंध इत्यादी मागण्यासंबंधी शासनाने निर्णय घेण्याबाबत" या विषयावरील विनंती अर्ज मी आपल्या अनुमतीने सभागृहास सादर करतो. हा अर्ज सादर करीत असताना मी संक्षिप्त निवेदन करु इच्छितो.

तालिका सभापती महोदया, वेतनेतर अनुदान हे 2004 पर्यन्त देऊ केलेले आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष स्वातंत्र्य सेनानी श्री. गोविंदभाई श्रॉफ यांच्या समवेत माननीय मुख्यमंत्र्यांनी जे आ/श्वासन दिलेले होते त्याचे पालन झालेले नाही. तेव्हा वेतनेतर अनुदान बंद न करता त्याबाबतची भूमिका शासनाने स्पष्ट करण्याची गरज आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार........

आणि हे वेतनेतर अनुदान 2004 नंतर त्या त्या वर्षात ताबडतोब मिळणे अत्यंत महत्वाचे आहे. त्याचबरोबर वेतनेतर अनुदानामध्ये इमारत भाडे देण्यासाठी शासनाकडून सर्टिफिकेटचे नुतनीकरण मागितले जाते, त्यासंदर्भात शासनाने भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे. शिक्षकेतर कर्मचारी भरतीवर शासनाने नवीन आकृतीबंधामुळे बंदी आणली आहे. ती बंदी ताबडतोब उठविणे गरजेचे आहे. चिपळूणकर समितीने सुचविलेला आकृतीबंध कायम ठेवणे गरजेचे आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळच्या खाजगी शिक्षण संस्थांमध्ये जवळपास 40 ते 45 हजार शिक्षक शिक्षणाचे काम करतात. वास्तविक हे काम शासनाचे आहे. खाजगी शिक्षण संस्थाचालक हे काम करतात. त्यांच्याकडे त्या दृष्टीकोनातून बघण्याची गरज आहे. 1 तारखेला या संस्थांमधील कर्मचारी संपावर गेले. त्यांचे एक दिवसाचे वेतन कापण्यात आले. मंत्रीमहोदयांनी हे गैर असल्याचे मान्य केले. परंतु अद्याप त्यासंबंधी जी.आर.काढला नाही. तो जी.आर.ताबडतोब काढण्यात यावा अशी विनंती आहे. शासनाने जाहीर केले की, कायम विनाअनुदान तत्व कायमचे रद्द करण्यात येणार आहे. ही स्वागतार्ह बाब आहे. 2001 नंतरच्या ज्या शाळा मंजूर झाल्या आहेत, त्या तदर्थ किंवा टक्केवारीच्या अनुदानावर दिल्या आहेत. यापुढे ज्या तुकडया मंजूर केल्या जातील त्या मंजूर न करता बृहत आराखडयानुसार मान्यता देण्याची गरज आहे. सत्र शुल्क शाळांकडून घेतले जाते. ते आता कालबाह्य झाले आहे. महागाईमध्ये दहापट वाढ झाली. या शुल्कातून शाळेने खर्च करावयाचा असतो. क्रीडा, ग्रंथालय, इतर अनेक आवश्यक उपक्रम, चाचण्या यांचा खर्च या शुल्कातून करणे शाळांना शक्य होत नाही. ते शुल्क वाढविण्याची गरज आहे. सध्याच्या पाचपट रक्कम केली पाहिजे. मुळात हे शुल्क 2 ते 4 रुपये इतके अल्प आहे. त्यामधून कोणत्याच शाळेचे उपक्रम चालू शकत नाहीत.

सभापती महोदय, उच्च माध्यमिक विभागामध्ये तासिका तत्वावर 20 ते 40 रुपये मानधनावर ज्युनिअर कॉलेजचे शिक्षक शिकवित आहेत. ही रक्कम कमीत कमी 75 ते 100 रुपये प्रती तास करण्यात यावी.

श्री.दिवाकर रावते : माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्यांनी विनंती अर्जासंबंधी बोलत असताना शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा उल्लेख केला. 44 हजार शिक्षकेतर कर्मचारी शासनाच्या नवीन निर्णयामुळे बेकार ठरले आहेत. त्यांनी काढलेल्या मोर्चावर पोलिसांकडून लाठीचार्ज





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

करण्यात आला. हा विषय महत्वाचा नाही का? आंधळयांवर, डोळसांवर शासन लाठीचार्ज करते, मुसलमानांवर मात्र करीत नाही. 44 हजार शिक्षकेतर कर्मचारी ही काही साधी संख्या नाही. त्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भात सुध्दा सन्माननीय सदस्यांनी उल्लेख करावा.

डॉ.वसंत पवार : त्यांनी संप मागे घ्यावा यासाठी शासनाने जो नवीन आकृतीबंध आणला आहे तो ताबडतोब मागे घ्यावा आणि जूना आकृतीबंध सुरु ठेवावा ही माझी मागणी आहे. चिपळूणकर समितीने जो अहवाल दिला आहे त्यानुसार शासनाकडून प्रत्येक वेळी जाहिरात दिली जाते. आरक्षित पदाकरीता उमेदवार उपलब्ध होत नाहीत. अशावेळी तात्पुरत्या स्वरुपात 50 टक्के ओपनमधून आणि 50 टक्के आरक्षणामधून पदे भरण्यास शासनाने मान्यता देणे गरजेचे आहे. जोपर्यंत ही पदे अशा प्रकारे भरली जाणार नाहीत तोपर्यंत अकॅडमिक त्रास होण्याची शक्यता आहे. 50 टक्के बिंदू नामावलीच्या आधारे नेमणुका होणे गरजेचे आहे. महाविद्यालयांच्या संदर्भात जी.आर.काढला. 5 टक्के अनुदान महाविद्यालयांना द्यावे. 2003 नंतर ते अनुदान बंद करण्यात आले, त्या संदर्भातील आदेश रद्द करण्यात यावा. महाविद्यालयांना सुध्दा 5 टक्के वेतनेतर अनुदान द्यावे. नॅक समिती संपूर्ण महाराष्ट्रातील कॉलेजांमध्ये जाऊन आली, त्या समितीचा खर्च प्रत्येक कॉलेजला देण्याची गरज आहे.

(नंतर श्री.जुन्नरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार ....

सभापती महोदय, समाज कल्याण विभागाकडून शिष्यवृत्ती मिळत असतात परंतु या शिष्यवृत्ती अनियमितपणे मिळतात त्यामुळे या शिष्यवृत्ती त्याच वर्षी देणे गरजेचे आहे. सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदय, उपस्थित आहेत त्यामुळे मी सांगू इच्छितो की, प्राथमिक शाळांना शिपाई आणि लिपीक दिले जात नाहीत. त्यामुळे प्राथमिक शाळांना जर शिपाई आणि लिपीक दिले तर शाळेच्या गुणवत्तेत चांगल्या प्रकारे वाढ होऊ शकेल. या विनंती अहवालाच्या संदर्भात मी संक्षिप्तपणे मुद्दे मांडलेले आहेत त्याची दखल घेऊन विनंती अर्ज मंजूर करावा अशी विनंती आहे.

**तालिका सभापती** : विनंती अर्ज सभागृहास सादर झाला आहे. हा विनंती अर्ज प्रतिवृत्त सादर करण्याकरिता विनंती अर्ज समितीकडे सोपविण्यात आला आहे. प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाल्यावर त्याची प्रत प्रत्येक सदस्याकडे पाठविली जाईल.

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>हरकतीच्या मुद्याबाबत</u>**

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मला आपल्याकडून मार्गदर्शन हवे आहे. मुंबई येथील जुलै महिन्याच्या पावसाळी अधिवेशनात श्रीमती अनिता गुजर या महिलेचा बाळंतपणामध्ये डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाला होता त्यासंदर्भात मी सभागृहात प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या संदर्भात संपूर्ण सभागृहाने पाठिंबाही दिला होता. या प्रश्नाच्या संदर्भात शासनाकडून आलेला अहवाल सत्यस्थितीवर आधारीत नव्हता हे माननीय सभापती महोदयांनी सुध्दा मान्य केले होते व पावसाळी अधिवेशन संपण्यापूर्वी वस्तुनिष्ठ अहवाल सभागृहाला सादर करावा व ज्यांच्याकडून चूक झालेली आहे त्यांच्यावर कारवाई करावी असे माननीय सभापती महोदयांनी आदेश दिले होते. पावसाळी अधिवेशन संपल्यानंतरही यासंदर्भातील वस्तुनिष्ठ अहवाल आलेला नसून आता हिवाळी अधिवेशन संपण्यास केवळ तीन दिवस उरलेले आहेत असे असतांनाही या अधिवेशनातही यासंदर्भातील अहवाल सभागृहाला सादर होत नसेल तर ते योग्य नाही. डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे श्रीमती अनिता गुजर या महिलेचा मृत्यू झालेला आहे त्यामुळे या कुटुंबाला न्याय देण्याकरिता या अधिवेशनात तरी संबंधित अहवाल मांडला जाईल काय यासंदर्भात आपण मला मार्गदर्शन करावे व न्याय मिळवून द्यावा अशी विनंती आहे.

**तालिका सभापती** : पावसाळी अधिवेशनात या प्रश्नाच्या संदर्भात माननीय सभापती महोदयांनी निर्देश दिले होते की, पावसाळी अधिवेशन संपण्याच्या आत सत्यस्थितीवर आधारीत अहवाल सभागृहाला सादर केला जावा. त्यासंदर्भात मी आता निर्देश देते की, या प्रश्नाच्या संदर्भातील सत्य अहवाल हिवाळी अधिवेशन संपण्यापूर्वी सभागृहाला सादर करण्यात यावा.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझ्या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात माननीय सभापती महोदयांनी 3 दिवसाच्या आत माहिती टेबल करावी असे आदेश दिलेले असतांनाही, पाच दिवस उलटून गेल्यानंतर सुध्दा ही माहिती टेबल करण्यात आलेली नाही. त्यामुळे सभागृहाच्या कामकाजात भाग कसा घ्यावा हा आमच्या समोर प्रश्न पडलेला आहे.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, निवेदनाचे उत्तर सुध्दा आम्हाला दिले जात नाही. हिवाळी अधिवेशन संपण्याला आता केवळ तीन दिवस शिल्लक राहिलेले असतांना निवेदनाचे उत्तर न मिळणे हे काही योग्य नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : ज्या ज्या विषयाच्या संदर्भात 2 दिवसात, 3 दिवसात माहिती सभागृहाला सादर केली केली जाईल असे उत्तर देण्यात आलेले असेल तर त्या विषयाच्या संदर्भात शासनाने ती ती उत्तरे त्वरीत द्यावीत असे मी निर्देश देत आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, गंभीर विषयावर जर कार्यवाही होत नसेल, सर्वोच्च सभागृहाचे जर अधिकारी ऐकत नसेल, अधिकारी मुजोर झाले असेल तर आपण त्यांना कोणती शिक्षा देणार आहात?

यानंतर श्री. अजित......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती ( श्रीमती सुधा जोशी )** : ज्या ज्या मंत्रिमहोदयांनी निवेदन किंवा अहवाल दोन-तीन दिवसांत पटलावर ठेवण्यात येईल असे सांगितलेले आहे. ती माहिती पटलावर ठेवण्यात यावी असे मी निर्देश देत आहे.

--------------

**<u>वि.स.व्रि.क्र. 104 बाबत</u>**........

. श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे की, आज श्री.नंदलाल यांनी दिनांक 1 फेब्रुवारी रोजी महानगरपालिकेच्या निवडणुका जाहीर केलेल्या आहेत हे खरे आहे काय ? जर निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असेल तर आपल्याला हे विधेयक मांडता येईल काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदया, या संदर्भातील माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नाही..

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते की, या विधेयकाला कोणतीही बाधा येणार नाही. आता मी वि.स.वि.क्र. 104 घेत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**:नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी ( तिसरी सुधारणा ) विधेयक.

**L.A BILL NO. CIV OF 2006**

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965 )

श्री.राजेश टोपे ( नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्र. 104 -महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**तालिका सभापती ( श्रीमती सुधा जोशी )** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्र.104 -महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदया, जे अस्तित्वात असलेले अधिनियम आणि तरतुदी आहेत त्यामध्ये सोपी आणि सरळ पध्दती यावी या उद्देशाने हे विधेयक आणलेले आहे. आपण उपाध्यक्षांच्या निवडणुकीबाबत या विधेयकाद्वारे सुधारणा करीत आहोत. पूर्वी अधिनियमामध्ये अशी तरतूद होती की, अगोदर नगराध्यक्ष डायरेक्ट निवडून यायचा आणि त्यांनतर पहिली जी.बी. त्यांच्या अध्यक्षतेखाली व्हायची आणि त्यावेळी उपाध्यक्ष निवडला जायचा. आता इनडायरेक्ट सिस्टीम आल्यामुळे अध्यक्ष आणि उपाध्यक्षाची निवड करावी लागणार आहे. आता प्रिसायडींग ऑफीसरच्या माध्यमातून पहिल्या जी.बी.मध्ये अध्यक्ष आणि उपाध्यक्ष या दोघांची निवड होणार आहे. जिल्हापरिषदेमध्ये आणि पंचायत समितीमध्ये देखील अशीच पध्दत आहे. म्हणून साधी आणि सरळ पध्दत अवलंबिण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे..........

सभापती महोदया, जे नामनिर्देशित सदस्य आहेत त्यांची सुध्दा पहिल्या जी.बी.मध्ये निवड केली जाते. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये राजकीय पक्षांच्या व गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात मान्यताप्राप्त पक्षांचे व गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेऊन, महाराष्ट्र विधानमंडळाच्या विविध समित्यांवर सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात येते. यामुळे राज्य विधानमंडळामध्ये सर्व मान्यताप्राप्त पक्षांना व गटांना खात्रीपूर्वक पुरेसे प्रतिनिधीत्व मिळते. तीच पध्दती नगरपरिषदेमध्ये अवलंबिण्यात येत आहे. नगरपरिषदेतील स्थायी समिती, आरोग्य समिती, शिक्षण समिती कोणतीही समिती असो त्या नगरपरिषदेतील काम करण्यासाठीच असतात. अगोदर या समित्यांवरील सदस्यांच्या निवडणुका रात्रौ 11-12 वाजेपर्यंत चालत होत्या, याचा निश्चिपणे त्रास होत होता. तेव्हा विधानमंडळामध्ये ज्या विविध समित्या आहेत, त्या समित्यांचे नियम येथेही असावेत अशी शासनाची कल्पना आहे.

यानंतर श्री.गागरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे .....(पुढे सुरु)

त्या दृष्टीने Proportional strength of the party जी असेल त्या दृष्टीकोनातून या समितीचा व आघाडीचा आकार ठरलेला असतो. 10 % of the total strength मध्ये कोणकोणत्या पक्षाचे किती सदस्य असावेत हे त्या Proportional strength आधारे ठरविता येऊ शकेल. नामनिर्देशित सदस्य पहिल्या सर्वसाधारण सभेमध्ये घेतले जातात, त्यांना आपण सात दिवसाच्या कधीही निवडण्याची तरतूद यामध्ये करण्यात आलेली आहे. जिल्हाधिकारी हा Presiding Officer राहणार आहे. त्याच बरोबर पोस्ट इलेक्शन आघाडीची आज शक्यता दिसत नाही मात्र प्री-इलेक्शन आघाडी करण्यास परवानगी आहे. तशी पोस्ट इलेक्शन आघाडीची तरतूद करण्यासाठी काल विधानसभेत अशा पध्दतीची दुरुस्ती मान्य केली असून ती बीलामध्ये अंतर्भूत केलेली आहे. विधानसभेत हे विधेयक एकमताने संमत झालेले आहे. त्यामुळे विधान परिषदेची संमती मिळण्यासाठी आता हे विधेयक या सभागृहात सादर करण्यात आले आहे. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) विधेयक-2006 हे संमत करावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**( सभापतीस्थानी मा.उपसभापती )**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) विधेयक-2006 शासनाने आणले आहे. निवडणूकीतील व सत्तेतील घोडेबाजार करणारे महात्मा गांधी आपल्या पक्षात आहे, त्याचा पहिला फटका आम्ही पाहिला आहे, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांना या सभागृहात निवडून येण्यासाठी धापा टाकत यावे लागले आहे. असे प्रकार थांबविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे, ही चांगली बाब आहे. अशा प्रकारची परिस्थिती तुम्हीच निर्माण करुन ठेवली होती. शासनाने घेतलेल्या चांगल्या निर्णयाचे स्वागत करण्यास काही हरकत नाही.

लोकसभा, विधानसभेच्या आमदार खासदारांच्या बाबतीत आता मी सांगत नाही परंतु बाकीच्या निवडणुकीमध्ये बोली लावली जाते, थैल्यांची देवाण-घेवाण होते. तरीही आपण लवकर कोणाचे नामनिर्देशन करीत नाहीत. आता तुम्ही नामनिर्देशनाची तरतूद करीत आहात ही चांगली बाब आहे. पक्षाच्या संख्याबळाच्या आधारावर नामनिर्देशन करणार आहात ही चांगली बाब आहे. नगरपरिषदेतील उमेदवारांना निवडणूकीच्या माध्यमातून एक संधी आपण निर्माण करुन दिली आहे. त्यावेळेला त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. नगरपरिषद निवडणूकीत 5000 रुपये प्रमाणे मत देणारे उमेदवारही आहेत. नगरपरिषदेकरीता "कॉप मेंबर" करण्यासाठी बरेच लोक आम्हाला भेटतात, अशा निवडणूकीच्या वेळी आम्हाला लोक झोपू देत नाहीत. नवीन विधेयकातील नामनिर्देशनाची तरतूद चांगली आहे. निवडणूकीतील काही बाबी कशा सुधारणार हा प्रश्न आहे. पक्षाचे जेवढे संख्याबळ असेल त्याप्रमाणे नामनिर्देशन ठरविता येईल. समजा दोन पक्षाची आघाडी झाली असेल, व त्यापैकी एका पक्षाच्या सदस्यांची संख्या 19 असेल व दुसऱ्या पक्षाच्या सदस्यांची संख्या 1 असेल तर त्या बाबतीत आपण काय तरतूद करणार आहात, हे ठरवू शकत नाही. तरी आपण याबाबत खुलासा करावा. आपण विधेयकाद्वारे सुधारणा आणण्याचा निर्णय घेतला आहे तो नक्कीच चांगला आहे.

.....यानंतर श्री.सोनवणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते... ( पुढे सुरु )

या ठिकाणी ( 2 ब ) मध्ये असे म्हटले आहे की, "परिषद सदस्यांचे नामनिर्देशन करताना, जिल्हाधिकारी, मान्यताप्राप्त पक्षाचे अगर नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेईल आणि अशा प्रत्येक पक्षाच्या किंवा गटाच्या नेत्याशी विचारविनिमय करुन, शक्यतोवर, परिषदेमधील अशा पक्षांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करील" येथे प्रश्न असा आहे की, मुंबई महानगरपालिकेमध्ये आमचे सचिव खाते स्वतंत्र आहे. परंतु या ठिकाणी जिल्हाधिकारी हे कशासाठी टाकले ? जर जिल्हापरिषदेचा संबंध असेल तर तेथे मुख्य कार्यकारी अधिकारी असतात. तसेच नगरपालिकेत सुध्दा मुख्याधिकारी असतो. त्यामुळे यामध्ये आपण जिल्हाधिकारी असे का टाकले याचे उत्तर द्यावे. तसेच गट नेता म्हणजे कोण ? गट नेता कोणाला मानले जाते ? यासंबंधी नोंदणी केली पाहिजे का ? त्यामुळे यामध्ये आपण जिल्हाधिकारी हे कशासाठी घातले याचे स्पष्टीकरण व्हावे. माझ्याकडे शासनाचे परिपत्रक आहे. या सगळया पक्षातून निवडून आलेल्याची नोंद होते का ? आणि त्याचप्रमाणे नोंदणीच्यावेळी अशी कोणतीच कारवाई झाली नाही. पक्षाचे प्रमुख म्हणजे कोण ? हाही प्रश्न येथे निर्माण होता आणि तो योग्यच असला पाहिजे. पक्षाने सचिव पद दिलेले असेल तर ते चालेल. एका तालुक्यातील पालकमंत्री हा त्या दुसऱ्या पक्षाचा संपर्क मंत्री आहे. जेथे पालकमंत्री राष्ट्रवादीचा आहे. तेथे संपर्कमंत्री हा काँग्रेसचा आहे. परंतु हा अधिकार कोणाचा आहे ? निवडून आलेल्या नगरसेवकांची नोंदणी केली पाहिजे ही त्या पक्षातील गट नेत्याची व पर्यायाने व्हीपची भूमिका असते. त्यामुळे या ठिकाणी गट नेत्याची भूमिका काय असेल, याचे स्पष्टीकरण होण्याची आवश्यकता आहे. क्वॉलिफाय किंवा डिसक्वॉलिफायचा प्रश्न ज्यावेळी येतो त्यावेळी नियमाप्रमाणे डिसक्वॉलिफाय करणे हा दुसऱ्या पक्षाचा हक्क नाही. महाराष्ट्रातील शिवसेना / भाजपा युती, काँग्रेस आणि राष्ट्रवादीची युती सर्वांना माहिती आहे. राष्ट्रवादीची भाजपाबरोबर युती होऊ शकते का ? अशी सुध्दा युती होऊ शकते. परंतु He is very eger to lenox हे ते जाणून घेण्यास फार उत्सुक आहेत. निवडून येणाऱ्या सदस्यांची नोंद घेतली जावी काय ? हे सुध्दा स्पष्ट केले पाहिजे. यामध्ये असे आहे की, आघाड्यांमध्ये निवडून येणारे आपली आघाडी तयार करतील.

यानंतर श्री. पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

बिलामध्ये आपण असे म्हटले आहे की, "परंतु आणखी असे की, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, 1986 यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी (2 ब) च्या अंतर्गत पक्ष किंवा गटांच्या संख्या बळाचा निर्णय करताना निवडणूक निकालाच्या अधिसूचनेनंतर एक महिन्यापेक्षा अधिक नाही अशा कालावधीत विविध पक्ष, गट अथवा या दोन्हीचे सदस्य नसलेले निर्वाचित सदस्य यांना एकत्रित येऊन आघाडी तयार करता येईल व अशा आघाडीची नोंदणी झाल्यावर तिला निवडणूकपूर्व नोंदणीकृत आघाडीचे सर्व अधिकार त्याचप्रमाणे नोंदणीकृत पक्ष अथवा गटाच्या सदस्यांना लागू असलेल्या निर्हता याबाबतच्या उक्त अधिनियमातील तरतूदी यथास्थिती लागू असतील." ही अतिशय गंभीर बाब आहे. याठिकाणी आपण "विविध पक्ष, गट..." असे म्हटले आहे, याचा अर्थ काय ? याचा अर्थ असा आहे का की, विविध गट अथवा या दोन्ही गोष्टी नसलेले ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, विविध गटाचा अर्थ असा की, शिवसेना/भाजपा व कॉंग्रेस/राष्ट्रवादी हे मान्यता प्राप्त पक्ष असून ते वेगवेगळे मान्यता प्राप्त गट आहेत. यामध्ये वेगवेगळया पक्षाने एकत्र यावयाचे आहे. यामध्ये फूट हा विषय वेगळा आहे. यासंदर्भातील गोष्टी ॲण्टीडिफेक्शन ऑफ लॉज्मध्ये आहेत. यामध्ये दोन पक्षाची आघाडी आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, यामध्ये असेही म्हटले आहे की, "या दोन्हीचे सदस्य नसलेले निर्वाचित सदस्य" म्हणजे, अपक्ष. अपक्षांनी एकत्रित येऊन एक गट केला तर ती बाब चांगली आहे. त्यामुळे त्यांचे एकप्रकारे बळ निर्माण होईल. परंतु त्यांचा जो गट निर्माण होईल त्याचा गटनेता कोण होईल ? त्यांच्या व्हीपचे काय ? त्यांना दिलेला व्हीप ते मानणार की नाही ? Whether he is due for disqualification for his behavior ? can you close him the door ? हा महत्वाचा मुद्दा आहे. एकदा त्यांनी गट निर्माण केल्यानंतर त्यांच्या गटनेत्याने जारी केलेल्या व्हीपची नोंदणी कम्पल्सरी आलीच. गटनेता नेमल्यानंतर त्याने जारी केलेला व्हीप बंधनकारक राहील, हा यातील महत्वाचा भाग आहे. त्यांचे डिस्कॉलिफिकेशन होईल की नाही ?

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

याची जाणीव यामध्ये नाही. याबाबतची सविस्तर माहिती मंत्रिमहोदयांनी द्यावी. एका ठिकाणी भाजपा व राष्ट्रवादीवाले एकत्रित लढले व त्यांची जागाही आली. परंतु शिवसेना व भाजपाचे पूर्वापारपासूनचे प्रेम असल्यामुळे ती प्रेयसी परत आली. परत आम्ही एकत्रित नगरपालिकेच्या निवडणुका लढल्या. अकोला नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये आम्ही प्रि-अलायन्सने लढलो.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

समजा कुणाची संख्या कमी आली तर ते अंडरस्टँडिंगने पदे घेतील. हे सर्व फ्रि अलायन्समध्ये मान्य केले पाहिजे. एका ठिकाणी आम्हाला सभागृह नेते पद देण्यात आले नाही. अशा अनेक गोष्टी घडलेल्या आहेत. या दुरुस्तीचा नक्की फायदा होणार आहे. ही दुरुस्ती महानगरपालिकांना ॲप्लिकेबल आहे किंवा नाही ? त्याही ठिकाणी अशी तरतूद असणे आवश्यक आहे. तशा प्रकारचे बिल शासनाने स्वतंत्रपणे आणावे, अशी अपेक्षा व्यक्त करतो. या बिलाचे मी स्वागत करतांना ज्या शंका व्यक्त केल्या आहेत त्याचे निरसन मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तरात करावे, अशी विनंती करतो. धन्यवाद.

----------------

..2...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, हे जे बिल या ठिकाणी मांडलेले आहे ते पारित होण्याच्या परिस्थितीत आहे. मी मंत्रीमहोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आता निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. फॉर्म भरण्यासही सुरुवात झाली आहे. अशा स्थितीमध्ये त्या नगरपालिकांची स्थिती काय राहणार आहे ? अपक्षांच्या मुद्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी केला आहे. मला एकच सांगावयाचे आहे की, नामनिर्देशित करण्याचे अधिकार जिल्हाधिका-यांना दिलेले आहेत. जिल्हाधिका-यांनी नामनिर्देशित केल्यानंतर जर सदस्यावर अन्याय झाला तर त्याविरुध्द अपिलात जाण्याची तरतूद या दुरुस्ती विधेयकात नाही. अध्यक्ष इम्पार्शलपणे वागतात, कधी वागत नाहीत, अशी अनेक उदाहरणे आहेत. काही नगरसेवकांना निरर्ह केले तर त्याचा निकाल वर्षानुवर्षे लागत नाही. जिल्हाधिका-यांना अधिकार देत असतांना अपिलाची तरतूद ठेवणे आवश्यक आहे. समजा एखाद्या पालिकेत एका पक्षाचे 20 सदस्य आहेत, एका पक्षाचे 20 सदस्य आहेत, अपक्षाचे 5 संख्याबळ असेल तर जिल्हाधिकारी कशा पध्दतीने नामनिर्देशन करणार आहेत. समान सदस्य निवडून आले तर प्रेफरन्स कुणाला देणार आहात याचा उल्लेख नाही. मग यामध्ये भानगडी निर्माण होतील. सत्ताधारी पक्षाची आघाडी झाली असेल आणि त्यांना 5 अपक्षांचा पाठिंबा असेल तर स्वीकृत सदस्य म्हणून कुणाची नेमणूक केली जाईल. त्यामुळे दुस-या 5 च्या गटावर अन्याय होऊ शकतो. याचा खुलासा मंत्रीमहोदयांनी केला तर मला बरे वाटले असते. विषय समितीच्या नेमणुकीसंबंधी या ठिकाणी दुरुस्ती आणलेली नाही. पूर्वीच्या कायद्यामध्ये विषय समित्या बनवित असतांना जर कोरम झाला नाही तर अध्यक्षांकडे अधिकार जात असत. मग वाटेल त्या पध्दतीने समित्या बनवून मंजूरीसाठी पाठविल्या जात. जिल्हाधिकारी राजकीय पक्षाला पाठिंबा देणारा असेल तर 6/6 महिने नगरपालिकेच्या समित्या होत नाहीत. त्यामुळे विषय समित्या नेमण्यासंबंधी अशा प्रकारची दुरुस्ती या विधेयकान्वये आणलेली नाही. जिल्हाधिका-यांनी किती दिवसात समितीला मान्यता देऊन नगरपालिकांना कळविले पाहिजे याचा उल्लेख नाही. या सर्व बाबी या ठिकाणी स्पष्ट झाल्या पाहिजेत. या बिलाचे स्वागत करतो आणि थांबतो.

-----------------

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, विधेयकाच्या कलम 8 मध्ये असे म्हटलेले आहे की, "परंतु कोणत्याही पालिका सदस्याला एकापेक्षा अधिक विषय समित्यांचा सदस्य म्हणून आधीच नामनिर्देशित करण्यात आले असेल तर, तो स्थायी समितीचा सदस्य होण्यास पात्र असणार नाही." येथे अडचण निर्माण होणार आहे. उदाहरणार्थ, मुंबई महानरगपालिकेमध्ये 5 विषय समित्या आहेत. काही वेळेला प्रपोर्शनेटप्रमाणे एखाद्या सदस्याला दोन कमिटयांवर पाठविले जाते. समजा मी विधी व न्याय समितीचा सदस्य आहे, मार्केट गार्डन समितीचा सदस्य आहे. नंतर स्टँडिंग कमिटीची निवडणुक झाली तर माझा पक्ष मला सांगतो की, आमच्या या नगरसेवकाला सुध्दा स्टँडिंग कमिटीचा सदस्य होता येईल. येथे कोणाला सदस्यच करता येणार नाही. मग पार्टीवर अन्याय होईल. मुंबई महानगरपालिकेचा अनुभव असा आहे की, एक एक नगरसेवक तीन-तीन कमिटयांचा सदस्य असतो. या छोटया छोटया त्रुटींसाठी तुम्ही काय करणार आहात ? स्थायी समितीवर त्याला सदस्य होताच येणार नाही. माझा पहिला मुद्दा असा आहे की, समजा 9 अपक्ष सदस्य आहेत आणि आपण म्हटल्याप्रमाणे त्यांनी गट केला नाही आणि त्या प्रत्येक सदस्याने एकमेकाच्या सहाय्याने नामनिर्देशन केले तर काय करणार ? म्हणून विषय समित्यांच्या संदर्भातील हे कलम अडचणीचे होईल असे मला वाटते.
धन्यवाद.

---------

..2...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश जेथलिया (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये आज निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झालेला आहे. कोऑपशनचा फॉर्म भरण्याची आज शेवटची तारीख आहे. आज सभागृहासमोर हे विधेयक आलेले आहे. कोऑपशनच्या निवडणुकीला स्टे देण्यात आलेला आहे काय ? अध्यक्ष आणि उपाध्यक्षांच्या निवडणुका 17 तारखेला होणार आहेत. कोऑपशनच्या निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची आज शेवटची तारीख आहे. सर्व ठिकाणी अर्ज भरुन झालेले आहेत, त्याला स्टे मिळणार आहे काय ? अध्यक्ष आणि उपाध्यक्षाचा कार्यकाल अडीच वर्षाचा ठेवण्यात आला आहे काय ? विषय समितीच्या निवडणुका सुध्दा अडीच वर्षाच्या ठेवण्यात आलेल्या आहेत काय ? कोऑपशनचा फॉर्म भरण्याची आज शेवटची तारीख आहे. बिलामध्ये दुरुस्ती करुन या सर्व निवडणुकीला स्टे देण्यात आलेला आहे काय ? याचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा, एवढे बोलून मी आपली रजा घेतो.

---------

..3...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगदीश गुप्ता (अमरावती स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, विधेयकाच्या कलम 5 (2) (ब) मध्ये कोऑपबद्दल निकष दिलेले आहेत. नगरपालिकेमध्ये जे संख्याबळ असेल त्या संख्याबळानुसार आपल्याला कोऑप मेंबर निवडून द्यावा लागणार आहे. फक्त एकच शंका अशी आहे की, ज्या ठिकाणी अपक्षांची संख्या जास्त आहे तेथे आपण ठरविलेल्या निकषाप्रमाणे त्यांनी कोणताही गट निर्माण केला नसेल किंवा गटाची नोंदणी केलेली नसेल तर कोऑप मेंबर निवडतांना कोणता निकष लावण्यात येईल ? दुसरा मुद्दा असा आहे की, आज आपण सभागृहामध्ये या विधेयकावर चर्चा करीत आहोत. आता फॉर्म भरण्याची प्रोसेस सुरु झालेली आहे. कोणत्याही गटाची नोंदणी झालेली नाही आणि आज फॉर्म भरण्याचा शेवटचा दिवस आहे. या कायद्यानुसार त्या ठिकाणी जिल्हाधिकारी कोऑप मेंबर कशा प्रकारे निवडतील याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे, एवढे बोलून मी आपली रजा घेतो.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया (अकोला तथा वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, कोऑपशन मेंबरमुळे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. कोऑपशन मेंबर नामनिर्देशित सदस्य आहे. तो जिल्हाधिका-यांच्या माध्यमातून नामनिर्देशित करण्यात येणार आहे. समजा एखाद्या नगरपालिकेमध्ये किंवा महानगरपालिकेमध्ये 70 सदस्य असतील तर एका गटासाठी 14 सदस्य लागतात. आपल्याला 5 सदस्य निवडावयाचे आहेत आणि एका गटाकडे जर 17 सदस्य असतील तर त्यातून तो निवडून येऊ शकतो. परंतु एका गटाकडे जर 12 सदस्य असतील तर त्याला ते प्रावधान असणार नाही काय ? मघाशी सन्माननीय सदस्य श्री.जगदीश गुप्ता यांनी विचारले की, 10 अपक्ष सदस्य असतील तर ते एकत्र येणार नाहीत. 10-15 आघाडयांचे सदस्य आणि अपक्ष सदस्य एकत्र येण्यास तयार होणार नाहीत.

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बजोरिया ....

ते एकत्रित बसायला तयार नाहीत आणि त्यामुळे 20 सदस्य असतानादेखील त्यांना नामनिर्देशित सदस्य देण्याची मुभा राहणार नाही काय ? नामनिर्देशित सदस्य पक्षच देणार काय ? आता येथील काही सदस्यांनी बसूनच सांगितले आहे की, असे सदस्य पार्टीच देणार आहे. पण मग मोठ्या संख्येने अपक्ष सदस्य असताना आणि ते एकत्रित आले नाही तर त्यांना कोणाही सदस्यास नामनिर्देशित करता येणार नाही काय ? सभापती महोदय, एका नगरपालिकेमध्ये समजा 40 सदस्य आहेत आणि त्यातील 20 सदस्य अपक्ष असतील, आणि 10 सदस्य एका पक्षाचे व 10 सदस्य दुसऱ्या पक्षाचे असतील तर त्यांना किती सदस्य को-ऑप करता येऊ शकतील हा येथे महत्त्वाचा प्रश्न आहे. तरी त्याबाबत आपण खुलासा करावा.

****

.......झेडझेड 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सागर मेघे (नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मला या निमित्ताने केवळ एकाच गोष्टीबाबत खुलासा पाहिजे. मागील चर्चेमध्ये असे आले होते की, व्हीप आला नाही तर काय करणार ? एखाद्या सदस्याने व्हीप मिळाल्याची सही केली नसेल तर त्याबाबत काय होईल ? नगरपालिकेमध्ये 17-18 सदस्य ययआहेत आणि त्यातील एखाद्या पक्षाचे 3-4 सदस्य निवडून आले असतील आणि त्यातील एखाद्याने पार्टीचा व्हीप घेतला नाही तर त्यांच्या बाबतीत काय होणार आहे ? याबाबत खुलासा केल्यास बरे होईल.

****

..... झेडझेड 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अत्यंत घाईगर्दीने सन् 2006 चे वि.स.वि.क्रमांक 104 - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) विधेयक माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांकडून येथे मांडण्यात आलेले आहे. हल्ली विधेयक मांडण्याची घाई आणि पद्धती जी आहे ती बरोबरच नाही. त्यामुळे असे होते की, कायद्यामध्ये परिवर्तन करताना सदस्यांना जो काही अभ्यास करावा लागतो, पूर्वतयारी करावी लागते ती करताच येत नाही. सरकारपक्ष मात्र जशी गरज असेल त्याप्रमाणे घाईघाईने विधेयक येथे घेऊन येतो आणि विधेयक मंजूर करण्यासाठी सांगितले जाते. त्यातून मग संभ्रम निर्माण होतो. आज आपल्याला ही गरज का भासली ? नगरपालिका आहेत तर तेथील पदाधिकारी निवडावयाचे आहेत अशा वेळी त्या नगरपालिकेमध्ये अपक्षांची संख्या मोठी असेल तर आपण काय करणार आहात ? त्या सगळ्यावर नियंत्रण कसे करावयाचे यासाठी हे वेगळ्या पद्धतीचे विधेयक येथे आणले गेले आहे. यातून घोडेबाजार कमी होईल पण जोडेबाजार होणार नाही काय ? अपक्ष हे विरोध करण्यासाठी निश्चित एकत्रित येतील आणि मग त्यांना आपल्या बाजूने आणण्यासाठी घोडेबाजार होणारच. तेव्हा निवडणुका झाल्या तर त्यातून 'अपक्ष' ही संज्ञा धारण करणारे सदस्य किती येतील आणि त्यावर आपण कसे नियंत्रण करावयाचे हे आपण सांगितल्यास बरे होईल. आताच सन्माननीय सदस्य श्री.जगदीश गुप्ता यांनी विचारले की, 9 अपक्ष आले तर त्यांना कोणाचाही व्हीप नाही. ते स्वत:च्या मर्जीनुसार मतदान करणार आणि कोणती समिती पाहिजे ते सांगणार. मग तुमचे जिल्हाधिकारी किंवा जो कोणी अधिकारी त्या ठिकाणी नेमलेला असेल तो याबाबत निर्णय घेणार आहे. सभापती महोदय, या एका कलमाला माझा विरोध आहे. आपण यात म्हटले आहे की, जिल्हाधिकारी किंवा असा अधिकारी की जो ज्याच्याकडे अशा सभेचे अधिकार असतील.. म्हणजे हा अधिकारी कोण नेमणार आहे ? सीइओ की आपला मंत्रालयातील वरिष्ठ कारकून, शिपाई असेल तर तोही तेथे बसणार आहे काय ? त्याबाबत काय मार्गदर्शन आहे ? त्याचा खुलासा झालेला नाही. यामध्ये अडचण अशी आहे की, या माध्यमातून आपण निवडून आलेल्या सदस्यावर थोडासा अन्यायदेखील करीत आहोत. ....

( यानंतर श्री. सरफरे ..... 1ए 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

निवडून आलेल्या सभासदांना तुमच्या अधिकाऱ्यांकडून, लालफितीकडून कसे नाडविले जाते याची अनेक उदाहरणे रोजच्या चर्चेमध्ये आपण पहात आहोत. त्यामुळे अधिकाऱ्यांकडून याबाबतीत मॅनेज केले जाईल की काय असा प्रश्न निर्माण होतो. या संदर्भात कोठल्याही प्रकारचे मार्गदर्शन करण्यात आलेले नाही. आणखी एक प्रश्न असा निर्माण होतो की, जर तो पक्ष मोठया संख्येने निवडून आला आणि जर त्यांना अपक्षांची साथ घ्यावयाची असेल तर त्यावेळी काय करणार? जिल्हयाचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांची निवड जिल्हाधिकारी त्यांची सभा बोलावून व त्यांच्या नियंत्रणाखाली व मार्गदर्शनानुसार होईल. याचा अर्थ असा की, निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींची नेमणूक अधिकाऱ्यांकडून होईल व त्यांच्या हाताखाली आपल्याला काम करावे लागेल असा त्याचा अर्थ आहे. त्याबाबत उदाहरण देतांना आपण विधीमंडळाच्या वैधानिक कमिटयांचे दिले आहे, या कमिटया कशातऱ्हेने निर्माण केल्या जातात?.माझा प्रश्न असा आहे की, आपली सत्ता येऊन दोन वर्षे झाली तरीसुध्दा वैधानिक कमिटयांवरील सदस्यांच्या फेरनियुक्तीची प्रक्रिया आतापर्यंत पूर्ण झाली आहे काय? त्याचे उत्तर नकारार्थी आहे. त्या फेरनियुक्त्या अद्यापि पूर्ण झालेल्या नाहीत. आजही त्या कमिटया आपण पुढे चालवीत आहोत आणि काम करीत आहोत. असाच प्रकार याठिकाणी होणार आहे काय? जर आपले त्यावर नियंत्रण नसेल, मार्गदर्शक तत्व नसेल तर कशाच्या आधारावर आपण ही कार्यवाही करणार आहात? आज विधीमंडळाच्या बाबतीत मार्गदर्शक तत्वे नाहीत. निवडून आल्यानंतर चार महिन्यात कमिटया झाल्या पाहिजेत. किंवा वर्ष-दोन वर्षानंतर त्यांच्या फेरनियुक्त्या झाल्या पाहिजेत, सदस्यांच्या नेमणुका झाल्या पाहिजेत अशाप्रकारचे मार्गदर्शक तत्व याठिकाणी कां नाही? आमच्या विधान परिषद सभागृहाचे माननीय सभापती आणि विधानसभेचे माननीय अध्यक्ष या दोघांच्या मार्गदर्शनाखाली या समित्या नियुक्त होतात. त्या समित्यांची पुनर्रचना केली जाते. परंतु ती केव्हा केली जाते? याबाबत काहीही निकष नाहीत. त्यामुळे त्याचा परिणाम असा होतो की, माननीय सभापती हे या सदनाचे सर्वोच्च अधिकारी म्हणून आपण म्हणावयाचे, परंतु त्यांनी काम करतांना किंवा कोणताही निर्णय घेतांना त्याबाबत कोणते बंधन असले पाहिजे? एखादा निर्णय चार-सहा किंवा दोन महिन्यात घेतला पाहिजे. नाहीतर तो वर्षे दोन वर्षे पडून रहातो. दोन वर्षे झाली तरी या कमिटयांवर कोणत्याही प्रकारे नियुक्त्या झालेल्या नाहीत. सुरुवातीपासून भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना या दोन पक्षांकडून त्यांच्या आमदारांची नावे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

देण्यात आलेली आहेत. परंतु अद्यापि त्यांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या नाहीत ही वस्तुस्थिती आहे. मंत्रिमहोदय, आपण या विधेयकामध्ये विधीमंडळाचे उदाहरण दिले आहे म्हणून मला धक्का बसला. आपण विधेयकाच्या परंतुकामध्ये म्हटले आहे की, "परंतु, आणखी असे की, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, 1986 यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी (2 ब) च्या अंतर्गत पक्ष किंवा गटांच्या संख्या बळाचा निर्णय करतांना निवडणूक निकालाच्या अधिसूचनेनंतर एक महिन्यापेक्षा अधिक नाही अशा कालावधीत विविध पक्ष, गट अथवा या दोन्हीचे सदस्य नसलेले निर्वाचित सदस्य यांना एकत्रित येऊन आघाडी तयार करता येईल व अशा आघाडीची नोंदणी झाल्यावर तिला निवडणूकपूर्व नोंदणीकृत आघाडीचे सर्व अधिकार त्याचप्रमाणे नोंदणीकृत पक्ष अथवा गटाच्या सदस्यांना लागू असलेल्या निर्हता याबाबतच्या उक्त अधिनियमातील तरतूदी यथास्थिती लागू असतील" प्रश्न असा आहे की, या निवडणुका होऊन महिना होऊन गेला. आपल्याला याची अर्जन्सी कां निर्माण झाली? आपण हे विधेयक घाईघाईने आणावयाचे, आणि त्यावर चर्चा करण्याकरीता आम्ही आमदारांनी रात्रभर बसावयाचे, अशी प्रथा आणि परंपरा आहे. आपण तितका वेळ बसू शकतो आणि या विधेयकावर बोलू शकतो असा सर्वसामान्य नियम आहे. या नियमाविरुध्द नाही काय? नियम असा आहे की, या सदनाचे कामकाज किती तास चालावे, किती तास असावे यासंबंधी मार्गदर्शक तत्वे आणि नियम आहेत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरू...

आता नवीन पध्दत सुरू झालेली आहे. सभागृहाची बैठक उद्या सकाळी 10-30 वाजता भरेल. याबाबत सदनाला काही विचारले जात नाही....हे उदाहरण म्हणून मी सांगितले. या विधेयकामध्ये विधानमंडळाचा आधार घेतलेला आहे. यामधील ज्या काही त्रुटी आहेत, त्या सभागृहाच्या निदर्शनास आणून रेकॉर्डवर आणणे हे माझे काम आहे. या दृष्टीने या सगळ्या गोष्टींचा विचार होणे आवश्यक आहे. अपक्षांची संज्ञा घेऊन निवडून येतात. त्यांची निवडून येण्याची ताकद असते म्हणून ते निवडून येतात. निवडणुकीमध्ये पैसा किती खर्च करावा याला बंधन असले तरी प्रत्यक्षात कोणी मानत नाही. लोकसभेपासून ग्रामपंचायतीपर्यन्तच्या निवडणुकीमध्ये लाखो रुपये खर्च केले जातात आणि गट, तट निर्माण होतात. जेव्हा हातामध्ये सत्ता येते, त्यावेळेस विकासाच्या कामांसाठी निधी उपलब्ध होतो, त्यामध्ये वाटेकरी निर्माण होतात. विकासाच्या नावाने गाव भकास केले जाते. या दृष्टीकोनातून निश्चित मार्गदर्शक तत्वे आखून त्या पध्दतीने काम करावे लागेल. घोडेबाजार केल्याचे आपण पहातो. चुका माणसाने करायच्या आणि प्राण्यांना दोष द्यायचा, असे चाललेले आहे.

कलम 8 "(क) कलम 63, पोट-कलम (2ब) मध्ये, निर्धारित केलेल्या रीतीने जिल्हाधिकाऱ्याने नामनिर्देशित केलेले असे इतर सदस्य, तथापि, स्थायी समितीच्या सदस्यांची एकूण संख्या, उक्त कलमाच्या पोट-कलम (4), खंड (अ) अन्वये निर्धारित केलेल्या संख्येपेक्षा अधिक होता कामा नये," ही सगळी मार्गदर्शक तत्वे आहेत, या संदर्भात संदिग्धता आहे. त्यावर आपण भाष्य करावे. एक गोष्ट खरी आहे की, जिल्हाधिकाऱ्यांनी नामनिर्देशित सदस्य केल्यानंतर सदस्यांची कमतरता भरून येईल. नामानिर्देशन करताना हे अधिकारी मंत्र्यांच्या दबावाला बळी पडतात. जे नियमाप्रमाणे काम करतात त्याचा परिणाम सर्वसाधरणपणे समाजामध्ये निवडून आलेल्या लोकांना भोगावे लागतात, अशी परिस्थिती येऊ नये, म्हणून यासाठी कोणत्या प्रकारची काळजी घेणार आहात ? याबाबत आपण मार्गदर्शन करावे. शेवटी विधेयक पास होईल. कायदा मंजूर करताना ज्या बाधक गोष्टी आहेत त्याचा उलगडा करावा म्हणून मी बोललो एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

----

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, या बिलाच्या निमित्ताने मी शासनाचे अभिनंदन करु इच्छितो. कोठे तरी आज शासनाला जाग आली आणि आयाराम गयारामचे राजकारण संपले पाहिजे असे शासनाला वाटले. सन 2003 मध्ये केंद्रामध्ये एन.डी.ए. चे सरकार असताना पक्षांतरबंदी कायद्यामध्ये सुधारणा करण्यात आली. खऱ्या अर्थाने डिफेक्शनच्या संदर्भात बदलाची सुरुवात स्व. राजीव गांधी हे पंतप्रधान असताना झाली. त्यानंतर 2003 मध्ये पक्षांतरबंदी कायद्यामध्ये सुधारणा करण्यात आली. संसदेमध्ये ते बिल पास झाले. त्यानंतर आपल्या दोन्ही सभागृहाने एकमुखी ठराव पास केला की, स्थानिक स्वराज्य संस्थेतून विधान परिषदेवर जे सदस्य निवडून येतात त्यासंदर्भामध्ये तशाच प्रकारची तरतूद कायद्यात असली पाहिजे. त्याचाच परिणाम म्हणून हे विधेयक या सदनामध्ये आणले गेले आहे. सन्माननीय राज्यमंत्री श्री. राजेश टोपे यांचे मी अभिनंदन करतो. हे संपूर्ण बिल वाचले तर यामध्ये राजकीय पक्षाला महत्व दिलेले आहे. नाही तर आयाराम गयारामचे राजकारण, सौदेबाजार संपणार नाही. त्या त्या पक्षांनी ज्या उमेदवाराला अधिकृतपणे तिकीट दिलेले आहे त्या पक्षांचे नियंत्रण या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांवर असले पाहिजे ही या बिलाच्या संदर्भातील पार्श्वभूमी आहे. या ठिकाणी अपक्ष सदस्यांच्या बाबतीत उल्लेख करण्यात आला. अपक्ष सदस्य ज्या दिवशी सभागृहामध्ये जातात त्यावेळी त्यांना ते कोणासोबत आहेत हे आयडेंटीफाय करावे लागेल. निवडणुकीपूर्वी आघाडी झाली असेल तर समजू शकतो. त्यांच्यावर आघाडीचे नियंत्रण असेल. त्यांना व्हीप काढता येईल. परंतु ज्यांची आघाडी रजिस्टर्ड झालेली नाही आणि जे स्वतंत्रपणे निवडून आलेले आहेत, जे कोणत्याही पक्षाच्या निवडणूक चिन्हावर उभे राहून निवडून आलेले नाहीत त्यांच्यावर कोणाचेही नियंत्रण राहणार नाही. त्यामुळे ते पहिल्यांदा ज्यावेळी सभागृहामध्ये जातील त्यावेळी त्या सर्व नगरसेवकांना ते कोणाबरोबर राहतील हे आयडेंटीफाय करावे लागेल. ते कोणत्या पक्षाबरोबर राहतील हे निश्चित झाल्यानंतर त्यांना त्यामध्ये बदल करता येणार नाही. या ठिकाणी ज्यावेळी लोकशाही आघाडीचे सरकार आले त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असेल, काँग्रेस पक्ष असेल, त्यांच्याबरोबर असलेल्या अपक्षांनी ते कोणाबरोबर राहणार आहेत हे आयडेंटीफाय केले. एकदा ते आयडेंटीफाय झाल्यानंतर त्यामध्ये कोणताही फेरफार होणार नाही. एकदा ते झाल्यानंतर जर त्यामध्ये बदल करावयाचा असेल तर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ......

त्यांना त्या आघाडीच्या प्रमुखाला सांगावे लागेल की, मी यामध्ये बदल केलेला आहे आणि मी आता तुमच्या पक्षाबरोबर राहणार नाही. अशाच प्रकारची तरतूद या बिलामध्ये आहे. या संपूर्ण बिलामध्ये काही ज्या त्रुटी दिसतात त्या मी सांगू इच्छितो. मी व्हीपच्या संदर्भात सांगू इच्छितो. मध्यंतरी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये स्थायी समितीच्या निवडणुकीमध्ये आमच्या पक्षाच्या एका नगरसेविकेने पक्षाचा आदेश झुगारुन शिवसेनेच्या उमेदवाराला मत दिले. मी त्यांना नोटीस काढली की, पक्षाचा व्हीप असताना तुम्ही शिवसेनेच्या उमेदवाराला मत दिले. त्यामुळे आमचा उमेदवार एक दोन मतांनी पडला. या अनुषंगाने या संपूर्ण बिलामध्ये किंवा नियमांमध्ये दुरुस्ती करावी लागेल. यामध्ये प्रतोदची व्याख्या दिसत नाही. त्या ठिकाणी कोण व्हीप असणार ? मी पक्षाचा प्रमुख असलो किंवा पक्षाचा महत्वाचा पदाधिकारी असलो आणि मी माझे अधिकार जिल्ह्याला दिले तरी जिल्ह्याचा अध्यक्ष किंवा जिल्ह्याचा प्रमुख व्हीप काढू शकत नाही. व्हीप काढण्याचा अधिकार त्या सभागृहात निवडून आलेल्या नगरसेवकांचा जो गटनेता असेल त्याला प्रतोद म्हणून अधिकार देऊ शकतो किंवा गटनेत्याव्यतिरिक्त कोणताही सदस्य असेल त्याला पक्ष प्रतोद करु शकतो. पक्षाचा जो व्हीप आहे त्याची अंमलबजावणी करण्याचे काम पक्ष प्रतोदावर असते. या बिलामध्ये त्याबाबत तरतूद केलेली आहे असे दिसून येत नाही. तशी कल्पना जर माननीय मंत्रिमहोदयांच्या मनामध्ये असेल तर व्हीपच्या संदर्भातील भूमिका स्पष्ट करावी. मी या निमित्ताने राज्य शासनाचे अभिनंदन करतो. आयाराम गयारामला कोठे तरी आळा घालण्याचे काम या विधेयकाच्या माध्यमातून केलेले आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी ( धुळे तथा नंदुरबार स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, हे बिल आणल्याबद्दल सर्वप्रथम मी शासनाचे अभिनंदन करतो. कारण स्थनिक स्वराज्य संस्थांमध्ये स्थैर्य प्राप्त करुन देण्यासाठी शासनाने अत्यंत चांगली भूमिका घेतलेली आहे आणि एक चांगले बिल या ठिकाणी आणलेले आहे. पूर्वी डिसक्वालिफिकेशनच्या संदर्भात, आम्ही व्हीप काढल्यानंतर तो व्हीप त्यांना बजावला गेला की नाही, त्यांनी मतदान केले की नाही हे सिध्द करण्यासाठी वेळ लागत असे. आता नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये हात वर करुन मतदान करावयाचे आहे आणि त्याची नोंद प्रोसिडींगमध्ये होणार आहे की, अमक्याने अमक्याला मतदान केले. अशावेळी कोणत्याही पक्षाच्या अध्यक्षाच्या किंवा व्हीपच्या आदेशाच्या विरोधात मतदान केले तर मुख्याधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तसा रिपोर्ट द्यावा आणि जिल्हाधिकाऱ्यांनी अमुक एक दिवसात त्यावर निर्णय घ्यावा अशी दुरुस्ती यामध्ये केली पाहिजे असे मला वाटते.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. चंद्रकांत रघुवंशी....)

माझ्या मागच्या विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या संदर्भातील निर्णय अजून प्रलंबित आहे. त्यानंतर मी पुन्हा विधानपरिषदेवर निवडून आलो. याप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयावर तारखा घेण्याचे काम सुरु असते. आता सभागृहामध्ये सर्वांनी "हात वर" केल्यानंतर त्यासंबंधातील नोंद मुख्याधिका-यांनी करणे अनिवार्य केले पाहिजे. एकूण झालेले मतदान, कोणत्या पक्षाच्या नगरसेवकाने कोणाला मतदान केले याची नोंद असली पाहिजे. आता व्हिडिओ शूटिंग होणार असले आणि जिल्हाधिकारी सुमोटो निर्णय घेणार असले तरी मुख्याधिका-यांनी त्यांचा रिपोर्ट जिल्हाधिका-यांना दिल्यानंतर एक किंवा दोन महिन्यामध्ये त्यांनी निर्णय घ्यावा अशा प्रकारची तरतूद विधेयकामध्ये करणे आवश्यक आहे एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेशदादा देशमुख (परभणी तथा हिंगोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) विधेयकाच्या संदर्भात केवळ एक दोन सूचना शासनाला करणार आहे.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे आज नगरपालिकांमध्ये वेगवेगळया पक्षांचे संख्याबळ हे बरोबरीचे आहे. तीन पक्षाचे तीन नगरसेवक एक अपक्ष या प्रमाणे नगरसेवक निवडून आले तर बहुमताचा प्रश्न येईल. कारण एकच सदस्य निवडायचा असतो. याबाबतीत मार्गदर्शन होणे आवश्यक आहे. अध्यक्ष आणि उपाध्यक्षांच्या निवडीच्या संदर्भात हे जे विधेयक शासनाने आणलेले आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ KGS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 14:25

श्री. राजेश टोपे (नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, या विधेयकावर अनेक सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. जे काही कॉमन प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेले आहेत त्यांची नोंद घेऊन त्यासंबंधात मी उत्तर देऊ इच्छितो.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावतेसाहेबांनी "जिल्हाधिकारीच का ?" असा प्रश्न उपस्थित केला. उपनगराध्यक्ष पदाच्या निवडीसाठी उपजिल्हाधिकारी नेमण्याची तरतूद केलेली आहे. महापौरांच्या निवडणुकीच्या संदर्भात्‍ील दोन उदाहरणे आपल्या डोळयासमोर आहेत. अहमदनगर आणि धुळे या दोन्ही महानगरपालिकांच्या अधिनियमामध्ये महापौरांची निवड करावयाची असेल तर मावळते महापौर हे प्रिसायडिंग ऑफिसर म्हणून असतात. ब-याच वेळा अशा बैठकीमध्ये काय चित्र निर्माण झाले, किती लिटिगेशन्स झाली, हायकोर्टामध्ये किती प्रकरणे प्रलंबित आहेत ? या सर्व गोष्टी आपणाला माहीत आहेत. डाव्या बाजूच्या मंडळींचे ब-याचदा असे मत असते की, शक्यतोवर सभेच्या अध्यक्षस्थानी प्रशासनातील अधिकारी वर्ग असेल तर ते अधिक चांगले. जिल्हाधिकारी हे प्रशासनातील अधिकारी असल्यामुळे जिल्हाधिकारी किंवा प्रांत, किंवा तो डेलिगेट करील असा कोणताही अधिकारी सभेच्या अध्यक्षपदी असू शकतो, अशा प्रकारची तरतूद केलेली आहे. गट नेता कोण ? असा प्रश्न या ठिकाणी विचारण्यात आलेला आहे. पक्ष किंवा निवडून आलेला गट प्रिरजिस्टर असेल आणि ते ज्या नेत्याची निवड करतील असा गटनेता असणार आहे. त्याच गटनेत्याला व्हिप काढण्याचे अधिकार असणार आहेत. सर्वच सन्माननीय सदस्यांनी घोडेबाजाराचा उल्लेख या ठिकाणी केला. निवडणुका मेंबर को-ऑप्ट करण्यासाठी किंवा समितीवर सदस्य म्हणून घेण्यासाठी असल्या तरी

... नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे..........

त्या निवडणुका प्रिफरेन्शियल पध्दतीने होत होत्या, त्या टाळून विधीमंडळातील फॉर्म्युला आपण त्याठिकाणी लागू करीत आहोत. अपक्षांच्या दृष्टीकोनातून अनेकांनी आपले विचार मांडले आहेत. अपक्ष सुध्दा आपापसात मिळून एक गट तयार करु शकतात. तो गट ते रजिस्टर्ड करु शकतात. त्यासाठी जे आघाडीचे नियम आहेत तेच नियम लागू असणार आहेत. त्यांच्यातील सुध्दा प्रतोद किंवा गटनेता असेल. पोस्ट इलेक्शन आघाडी केली जाईल, तिचा गटनेता असेल त्याला व्हिप काढण्याचा अधिकार असेल आणि त्या व्हिपचे पालन केले नाही तर अनर्ह ठरविण्याचा म्हणजे अँटी डिफेक्शन लॉ त्याठिकाणी लागू होणार आहे. एक अपक्ष असेल, दोन अपक्ष असतील, त्यांनी कोणत्या पक्षाबरोबर जायचे, ते सुध्दा पोस्ट पोल आघाडीमध्ये ठरविता येऊ शकणार आहे. त्यामुळे सातत्याने इकडे-तिकडे जाण्याचा जो प्रकार होतो, अस्थैर्य निर्माण करण्याचा प्रश्न आहे तो यापुढे निर्माण होणार नाही. अनेक सन्माननीय सदस्यांनी स्थैर्य निर्माण करण्याच्या संदर्भात उल्लेख केला. या सगळया गोष्टी स्थैर्य निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून आहेत. महानगरपालिकांमध्ये सुध्दा अशा प्रकारची दुरुस्ती पक्षीय महत्व वाढविण्याच्या दृष्टीने असावी अशी अपेक्षा व्यक्त केली गेली. मी जरुर या सूचनेचे स्वागत करतो. महानगरपालिकांच्या संदर्भात पुढील अधिवेशनामध्ये अशाच प्रकारच्या तरतुदी लागू करण्यासंबंधी बिल आणले जाईल.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय मंत्रीमहोदयांनी अपक्षांच्या संदर्भात खुलासा केला. अपक्षांनी ठरविले की, आम्हाला कोणत्याही आघाडीत जायचे नाही. 10 अपक्ष निवडून आले आहेत. त्यापैकी 7 जणांनी आघाडी करायचे ठरविले आणि 3 अपक्षांनी कोणत्याही आघाडीत न जाण्याचा निर्णय घेतला तर त्यांचे स्टेटस काय राहणार? त्यांना व्हिप कोण बजावणार?

श्री.राजेश टोपे : ते स्वतंत्र राहतील. प्रत्येक व्यक्तीचा तो अधिकार असू शकेल. अपक्षांनी निवडून आल्यानंतर कोणत्या पक्षाबरोबर जायचे हे अपक्षांनी ठरवावे.

श्री.दिवाकर रावते : 5 वर्षासाठी करीत आहात का?

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : गट नेता को निकालना होगा, तो उसके लिए क्या करना होगा?

श्री.राजेश टोपे : हे सगळे पाच वर्षासाठी लागू राहील. अडीच वर्षाचा कार्यकाल नाही. सभापती महोदय, गटनेत्यांचा कालावधी सुध्दा पाच वर्षाचा राहील. यामध्ये ज्या काही छोट्या मोठ्या सुधारणा सुचविल्या आहेत, काही त्रुटी असू शकतील. परंतु आपण रुल्स करीत आहोत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे.........

सभागृहाच्या भावनांचा विचार निश्चितप्रकारे रुल्सच्या माध्यमातून ताबडतोबीने करता येणे शक्य आहे. त्यामुळे अधिक पारदर्शक, सोपी आणि सरळ पध्दत राहील अशी व्यवस्था रुल्सच्या माध्यमातून ठरणार आहे.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : गट नेता को कौन चुनेगा?

श्री.राजेश टोपे : नगरपालिकेचे सदस्य लोक एकत्र येऊन त्यांचा गटनेता निवडतील. या संदर्भात काही गोष्टी सुचवायच्या असतील तर आपण रुल्स करीत आहोत त्यामध्ये त्यांचा विचार केला जाईल. या निवडणुका घोषित झालेल्या आहेत. आज या सभागृहाने बिल मंजूर केल्यानंतर माननीय राज्यपालांची स्वाक्षरी झाल्यानंतर त्या तारखेपासून या अधिनियमाचा अंमल सुरु होणार आहे. त्यामुळे जाहीर केलेला कार्यक्रम आपोआप रद्द होईल. को-ऑप्शनच्या निवडणुकीचा कार्यक्रम उपाध्यक्ष आणि अध्यक्षांच्या सहकार्याने 7 दिवसाच्या आत केव्हाही जिल्हाधिकारी जाहीर करु शकतील अशा प्रकारची तरतूद करण्यात आली आहे.

(नंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ....

त्यामुळे कोऑप्शनच्या संदर्भात काळजी करण्याचे आता काहीही कारण नाही. व्हीप काढल्यानंतर जर जाणीवपूर्वक जर कोणी अबसेंट राहिला असेल तर ते व्हीपचे उल्लंघन होणार आहे. त्याला अँटी डिसकॉलीफिकेशनच्या कायद्याद्वारे निरर्ह करता येईल. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी साहेबांनी सांगितल्या प्रमाणे व्हीप पाळले नाही म्हणून कमिशनारांकडे अपील केले जाते कमिशनारांकडील अपिलाचा कालावधी स्पेसीफाईड रुलमध्ये स्पेसिफाईड केले नाही तर ते रुल्समध्ये जरुर स्पेसिफाईड केले जाईल. जेणेकरुन निर्णय घेण्याचा विषय निश्चितपणे असला पाहिजे. नाही तर बरेच दिवस हेअरिंगला लागत असतात त्यामुळे बेसीक विषय डिफेट होऊ शकेल. सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या सर्व सूचनांचा रुल्समध्ये अंतर्भाव केला जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नगरपालिकेच्या निवडणूका होऊन एक महिना पूर्ण झालेला आहे. आता त्यांना नोंदणी केंव्हा करता येईल?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सगळया निवडणूका हया 17 तारखेला झालेल्या आहेत. निवडून आलेल्या सदस्यांचे गॅझेट काढले जात असते. त्या तारखेपासून एक महिना अशा प्रकारचा कार्यक्रम असणार आहे. काही कलेक्टरांनी 27 तारखेला काही कलेक्टरांनी 1 डिसेंबर पासून गॅझेट काढले असेल तर त्या तारखेपासून एक महिना अशा प्रकारचा कार्यक्रम राहणार नाही सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, पोस्ट पोल आघाडी करण्याचा संधी या कायद्यामुळे निर्माण झालेली आहे. त्यामुळे एक महिन्याच्या आत जरुर ती करता येणे शक्य होणार आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 8 ( दोन्ही सम्मिलित ) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 104 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 104 संमत झाले आहे.

आता 3.00 वाजेपर्यंत मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक स्थगित होत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 2.39 ते 3.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**उपसभापती** : विधानसभेत विनियोजन विधेयके संमत झालेली नसल्यामुळे ती नंतर घेण्यात येतील. आता सन 2005 चे वि.स.वि.क्र. 89- महाराष्ट्र जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयक चर्चेसाठी घेण्यात येत आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयक.

L.A.BILL NO. LXXXIX OF 2005.

( A BILL TO BRING SOCIAL AWAKENING AND AWARENESS IN THE SOCIETY AND TO CREATE A HEALTHY AND SAFE SOCIAL ENVIRONMENT WITH A VIEW TO PROTECT THE COMMON PEOPLE IN THE SOCIETY AGAINST THE EVIL AND AGHORI PRACTICES AND CUSTOMS THRIVING, ON IGNORANCE, AND TO COMBAT AND ERADICATE THE EVIL AND SINISTER PRACTICES AND AGHORI PRACTICES BORN OUT OF BELIEFS PROPAGATED IN THE NAME OF SOME SO CALLED DIVINE OR SUPERNATURAL OR MAGICAL POWERS OR EVIL SPIRITS COMMONLY KNOWN AS BLACK MAGIC BY QUACKS AND CONMEN WITH SINISTER MOTIVE OF EXPLOITING AND HARMING MENTALLY, PHYSICALLY AND FINANCIALLY THE COMMON PEOPLE IN THE SOCIETY AND THEREBY DESTROYING THE VERY SOCIAL FIBRE OF THE SOCIETY; AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH AND INCIDENTAL THERETO.) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE.

( विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव पुन: प्रस्तुत करण्यात आला. )

**उपसभापती** : विधानसभा विधेयक क्रमांक 89- महाराष्ट्र जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन हि विधेयक दिनांक 20 जुलै, 2006 रोजी विधानपरिषद सभागृहात माननीय मंत्रिमहोदयांनी मांडले. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी हे विधेयक सभागृहाच्या वैधानिक क्षमतेबाहेर आहे असा मुद्दा मांडून भाषण सुरु केले होते. He is on legs. त्यांनी आता त्यांचे भाषण सुरु करावे.

यानंतर श्री.गागरे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

एकदा विधेयक याठिकाणी मांडल्यानंतर ती सभागृहाची प्रॉपर्टी होते. या सभागृहातील कामकाजाविषयी कोणी लिखाण करुन कोणी आपले मत वा आक्षेप नोंदवत असेल तर ते निषेधार्ह आहे. असे जर लिहिले असेल तर त्याबाबतीत हक्कभंग येतो. दिनांक 21 जुलै, 2006 रोजी लोकसत्तामध्ये डॉ.नरेंद्र दाभोलकर यांनी या विधेयकासंबंधी "मुख्यमंत्र्यांना खुले पत्र - जादूटोणाविरोधी विधेयकाविरुध्द "करणी" कोणी केली ? या सदराखाली जे लिहून आलेले आहे, ते अवमान करणारे आहे. त्यांनी पुढे असे लिहिले आहे की, "शेवटच्या आठवडयात अधिवेशन संपण्याच्या आदल्या दिवशीच्या रात्री 8 वाजता विधेयक मांडण्यात आले," हा विषय त्यांचा आहे का ? पुढे असेही लिहिले आहे की, "विधानसभेत मंजूर झालेले विधेयक मांडण्यासाठीही शिवसेनेचा हरकतीचा मुद्दा मंजूर झाला. युतीने टाळया वाजवल्या. हे कसे घडले ते कोडेच आहे. एका जागरुक आमदाराने नियम वाचून दाखवला आणि सामाजिक न्यायमंत्र्यांना निदान विधेयक मांडता तरी आले हे आमचे "नशीब"(!). त्याच दिवशी रात्री 11 पर्यंत कामकाज चालवून विधेयक का बरे मंजूर करुन घेण्यात आले नाही ?" हे आम्हाला प्रश्न विचारत आहेत. पुढे असेही लिहिले आहे की, "दुस-या दिवशी दुपारी 12.45 ला ते चर्चेला घेण्याचे सभापतींनी दिलेले आश्वासन मी माझ्या कानांनी ऐकले." परंतु त्यांचा आणि आमचा काय संबंध आहे ? या सभागृहाला कान आहेत, पत्रकारांच्या पुढे ठेवलेल्या बॉक्सलाही कान आहेत. पुढे असेही म्हटले आहे की, "प्रत्यक्षात दुसऱ्या दिवशी ती वेळ लांबत गेली. प्रथम चार तास, शेवटी चार महिने. ही अकार्यक्षमता ? अनास्था ? की मिलीभगत ?" अशाप्रकारे या सभागृहाच्या कामकाजाविषयी कोणी कॉमेंट्स करणे, ही अतिशय गंभीर बाब आहे. ही बाब गंभीर आहे की नाही याबाबतचा निर्णय आपली समिती घेऊ शकते. कारण यासंदर्भातील विशेषाधिकार भंगाची सूचना मी दिनांक 27.9.2006 रोजी दिलेली असून त्यासंदर्भातील निर्णय अजून झालेला नाही. या सूचनेसंबंधी माननीय सभापती महोदय, पहिल्याच दिवशी निर्णय देतील असे मला वाटले होते, परंतु तसे झालेले नाही. आता अधिवेशनाचा दुसरा आठवडा चालू असून सोमवारचा दिवस होऊन गेलेला आहे. काल मी परत माननीय सभापती महोदयांकडे जाऊन माझ्या हक्कभंग सूचनेसंबंधी निर्णय द्यावा अशी विनंती केली, त्यावेळी त्यांनी ठीक आहे, असे सांगितले. आज बुधवार आहे. हा विषय

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सदनामध्ये चर्चेला आलेला असताना, या बिलासंबंधी मी जे वक्तव्ये करीन, माझी भूमिका मांडीन त्याबाबत आपण शंका घेऊन काम करणार आहात का ? याबाबतीत बाहेरच्या लोकांना असे अधिकार आहेत का ? मी माझ्या मर्यादेमध्ये बोलत आहे. माननीय सभापती महोदय, आपण याबाबतीत मिलीभगत करत असाल तर त्याची माहिती मला नाही. परंतु बाहेरचे लोक अशाप्रकारचे शब्दप्रयोग वापरत असतील तर ती अतिशय गंभीर बाब आहे, असे मी समजतो. यासंबंधी मी जी विशेषाधिकार भंगाची सूचना दिली होती, त्याचे काय झाले ? या सभागृहातील कामकाजाविषयी बाहेर जी वक्तव्ये झाली ती फारच गंभीर आहेत. सभागृहामध्ये या बिलासंदर्भात मत व्यक्त करण्याचा मला पूर्ण अधिकार असून माझे मत खोडून काढण्याचा सरकारलाही पूर्ण अधिकार आहे. बहुमताच्या जोरावर हे बिल इच्छा असो अथवा नसो ते मंजूर करण्याचे अधिकार त्यांना आहेत. हा सर्वस्वी सभागृहाचा प्रश्न आहे. परंतु याठिकाणी सभागृहाच्या घटनादत्त अधिकारांचाच जर अवमान होत असेल, कोणी याबाबत घटनाबाहय वर्तन करत असेल किंवा मिलीभगतचे आरोप होत असतील तर ही बाब अतिशय गंभीर आहे, असे मला वाटते. आमच्या अकार्यक्षमतेविषयी बोलण्याचा यांना कोणता अधिकार आहे ? परंतु अशाप्रकारचा शब्दप्रयोग त्यांनी केलेला आहे. त्यामुळे माननीय सभापती महोदय, याठिकाणी मी अतिशय नम्रपणे विनंती करु इच्छितो की, मी दिलेल्या हक्कभंग सूचनेविषयी जरी आत्तापर्यंत निर्णय आला नसला तरी आपण तो अधिवेशन संपण्यापूर्वी द्यावा. याठिकाणी सभागृहाचा जो गंभीर अवमान झालेला आहे, त्यासंबंधी माननीय सभापती महोदयांनी निर्णय द्यावा. याबाबतीतील जो काही निर्णय येईल त्याप्रमाणे भविष्यामध्ये आम्ही त्यासंदर्भातील नोंद आपल्या पध्दतीने घेऊ, एवढेच मी प्रथम: सांगू इच्छितो.

नंतर श्री.राझेकर...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

सभापती महोदय, मी या विधेयकावर ऑन लेग आहे. त्यावेळी मी घटनेच्या अनुच्छेद 246 (2) बाबत माझे मत व्यक्त करीत असतांना असे सांगण्याचा प्रयत्न करीत होतो की, या अनुच्छेदामध्ये केंद्र व राज्य सरकार यांना कोणत्या विषयाबाबत कायदे करण्याचे अधिकार आहेत त्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. घटनेच्या 7 व्या अनुच्छेदात राजकारभाराच्या विषयांची 3 गटात विभागणी झालेली आहे. पहिल्या यादीतील विषयाबाबत कायदा करण्याचा अधिकार केंद्र सरकारला आहे, दुस-या यादीतील विषयांबाबत कायदा करण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे व तिस-या यादीतील विषयांबाबत कायदा करण्याचा अधिकार केंद्र सरकार व राज्य सरकार या दोघांना दिलेला आहे. कायदा कोणी करावा आणि कसा करावा याबाबत घटनेत स्पष्ट उल्लेख आहे. याचा अर्थ असा होतो की, या तिन्ही याद्यांमधील विषयांबाबत केद्र सरकार व राज्यसरकार यापैकी कोणी कायदा करावा याचे अधिकार ठरवून देण्यात आलेले आहेत. या अधिकाराबाहेर जाऊन कोणालाही कायदा करता येणार नाही. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश श्री.बी.पी.सिन्हा, सी.जे.के.सुब्बाराव, एन.राजगोपाला अय्यंगार, जे.आर.मुधोळकर, टी.एल.व्यंकटरामा अय्यर यांच्या न्यायालयात दाखल केलेल्या खटला क्रमांक ऐआयआर 1962/1044 मधील निर्णयामध्ये क्लॅरिफिकेशन देत असतांना असे म्हटले आहे की, "In the matter of construing entries in the Lists given in Schedule VII of the Constitution, the following rules of interpretation are now well settled. The power to legislate is given to the appropriate Legislatures by Article 246 of the Constitution. The entries in the three Lists are only Legislative heads or fields of legislation, they demarcate the area over which the appropriate Legislatures can operate." अशा प्रकारचा स्पष्ट निर्णय दिलेला आहे. या याद्यांमध्ये कुठेही धर्माच्या संदर्भात कायदा करावा, असे म्हटलेले नाही. अंधश्रद्धा निर्मुलनाच्या या विधेयकात धार्मिक विधी व कृत्य यांचा उल्लेख केलेला असल्यामुळे आपल्याला यासंदर्भात कायदा करता येणार नाही. याच घटनेच्या कलम 246 मधील कायदा करण्याच्या संदर्भामध्ये सी.एफ.धिरुभाई विरुध्द स्टेट ऑफ बॉंबे (1955) 1 सुप्रिम कोर्ट रिपोर्टर पान 961 आणि दीपचंद विरुध्द स्टेट ऑफ

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...........

यु.पी.ए.आय.आर.1959 सुप्रिम कोर्ट पान 648 या निकालांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे की, तीन याद्यांच्या बाहेर जाणारा एखादा कायदा केंद्र सरकारने केल्यास तो मुळापासून अवैध ठरतो. एखादा कायदा राज्य सरकारने केल्यास तो मुळापासून अवैध ठरतो. कायदा करता येणार नाही यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने काय म्हटले आहे ते मी या ठिकाणी मांडले. असा कायदा केला तर अवैध ठरतो असे सर्वोच्च न्यायालयाचे म्हणणे आहे. कारण या यादीत धर्म नाही. सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की, "It must be remembered that we are interpreting the Constitution and when the Court is called upon to interpret the Constitution, it must not be construed in any narrow or pedantic sense and adopt such construction which must be beneficial to the amplitude of legislative powers. The broad and liberal spirit should inspire those whose duty is to interpret the Constitution to find whether the impugned Act is relatable to any entry in the relevant List."

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MAP/ MHM/ SBT/ प्रथम श्री.रोझेकर ......... 15:25

श्री.दिवाकर रावते ...........

असे स्पष्ट शब्दामध्ये सुप्रीम कोर्टाने म्हटलेले आहे. सभापती महोदया या विधेयकाच्या कलम 13 मध्ये असे म्हटलेले आहे की, "शंका दूर करण्यासाठी याद्वारे असे घोषित करण्यात येते की, ज्यामुळे व्यक्तिला मानसिक, शारीरिक वा आर्थिक बाधा पोहोचत नाही असे कोणतेही धार्मिक विधी व धार्मिक कृत्ये अंतर्भूत असलेल्या कृतींना या अधिनियमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही." यासंदर्भामध्ये कायद्याच्या व्याखेत वरील वाक्याचा एक विरुध्द अर्थ होतो. व्यक्तिला आर्थिक, शारीरिक, धार्मिक बाधा पोहोचत असलेल्या कोणत्याही धार्मिक विधीला, धार्मिक कृत्याला हा अधिनियम लागू होईल. तसेच वरील आवृत्तीत स्पष्ट दिसते की, कायद्यामध्ये दाखविलेल्या विविध तरतुदी व कलमे, यात दाखविलेल्या बाबींव्यतिरिक्त धार्मिक कृतींना ज्या कायद्याने बाधा पोहोचत नाही. याचा अर्थ असा आहे की, काही धार्मिक कृत्यांना या कायद्याने बाधा पोहोचते. ज्या धार्मिक कृत्यामुळे एखाद्या व्यक्तीला मानसिक, शारिरीक बाधा पोहोचते. मग कोणतेही धार्मिक विधी वा कृत्ये का असेनात, तो या कायद्यात गुन्हा ठरविण्यात आला आहे. धार्मिक कृत्ये योग्य की अयोग्य याच्या मेरीट किंवा डी मेरीटमध्ये न जाता मी राज्यघटनेच्या चौकटीमध्ये बघितले तर ही तरतूद धार्मिक विधी व धार्मिक कृत्ये यांचे विनियमन करणारे आहे. तरीही तरतूद हे देखील दर्शविते की, संपूर्ण कायद्यामध्ये ठिकठिकाणी धार्मिक विधी व कृत्ये यांचे विनियमन करण्यात आले आहे आणि म्हणूनच त्याबाबत स्पष्टीकरण व्यावृत्तीद्वारे देण्यात आले आहे. वरील स्पष्टीकरणावरुन स्पष्ट दिसते की, हा कायदा धार्मिक गोष्टींना लागू होतो, त्याला गुन्हा ठरवितो. उदाहरणार्थ हिंदू धर्मातील अनेक कायदे किंवा जन्माला आलेल्या मुलाचे आपण बारसे करतो त्याचे कान टोचतो त्यामुळे रक्त येते. टोचणे म्हणजे धार्मिक विधी झाला. तो बाघा आणणारा आहे, तो अपाय करणारा आहे. मुस्लिम धर्मामध्ये सुंता करणे हा त्या वयातील मुलाला बाधा आणणारा आहे, अपाय करणारा आहे. तेव्हा अशा प्रकारे एखाद्या धार्मिक अनुषंगिक बाबीवर कायद्याने बंदी आणणे म्हणजे घटनेच्या कलम 25 व 26 अन्वये जे धर्म स्वातंत्र्य दिलेले आहे ते हिरावून घेण्यासारखे आहे. म्हणून हे कलम घटनाबाहय आहे. याबाबत माननीय सर्वोच्च न्यायालयाने ए.आय.आर. 1962 सुप्रीम कोर्ट 553 या निर्णयाद्वारे स्पष्ट केलेले आहे. सभापती महोदय, या धार्मिक विधीच्याबाबतीत सुप्रीम कोर्टाचा निर्णय आलेला आहे तो निर्णय काय आहे हे मी मुद्दाम येथे सांगणार आहे.

..2..........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

"The right under Article 26(b) is subject to clause (2) of Article 25 of the Constitution. The impugned Act, however does not come within the saving provisions embodied in Clause (2) of Article 25. Quite clearly, the impugned Act cannot be regarded as a law regulating or restricting any economic, financial, political or other secular activity. The mere fact that certain civil rights which might be lost by members of the Dawoodi Bohra community as a result of excommunication even though made on religious grounds and that the Act prevents such loss, does not offer sufficient basis for a conclusion that it is a law "providing for social welfare and reform" within Article 25(2). As the Act invalidates excommunication on any ground whatsoever, including religious grounds it must be held to be in clear violation of the right of the Dawoodi Bohra community under Article 26(b) of the Constitution."

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. रावते ....

हा महाराष्ट्र सरकारने केलेल्या कारवाईवर निर्णय आलेला आहे. दाऊदी बोहरा समाजाने आपल्या समाजातील एखाद्याला काही धार्मिक बाबीच्या अनुषंगाने समाजाबाहेर काढून टाकले होते तेव्हा त्यासंबंधात महाराष्ट्र सरकारने त्याबाबत आक्षेप घेतला होता त्यावर दाऊदी बोहरा समाज कोर्टामध्ये गेला असता सुप्रीम कोर्टाने सांगितले की, ही त्यांची धार्मिक बाब आहे त्यामुळे त्या संबंधात तुम्हाला कारवाई करता येणार नाही. सभापती महोदय, अशा गोष्टींबाबत कोर्टाने काय भूमिका घेतली वा काय मान्य केले आहे एवढ्या पुरतेच मी येथे हे सांगितले आहे. थोडक्यात सांगावयाचे तर धार्मिक बाबीमध्ये, धार्मिक विधी संबंधात कोणताही हस्तक्षेप करून बंधन घटनेने आणता येणार नाही असा सुप्रीम कोर्टाचा निर्णय झालेला आहे. त्या निर्णयानंतर आतापर्यंत धार्मिक बाबीसंबंधातील हस्तक्षेपासंबंधात कोठलाही निर्णय सुप्रीम कोर्टाकडून आलेला नाही. त्यामुळे तो निर्णय आपल्या सर्वांवर बंधनकारक आहे. सभापती महोदय, या संबंधातील कंकरंट लिस्ट जी आहे त्यामध्ये धार्मिक कृत्यावर बंधन आणणारी तरतूद नसल्याने अशा प्रकारची तरतूद करणे घटनाबाह्य आहे असे मांडल्यानंतर मी गेल्या वेळेस घटनेच्या कलम 29 बद्दल बोलत होतो. त्यामध्ये मी काही गोष्टी कोट केल्या होत्या. त्यामध्ये कलम 29 मधील "Protection of interests of minorities.(1) Any section of the citizens residing in the territory of India or any part thereof having a distinct language, script or culture of its own shall have the right to conserve the same." तुमच्या धार्मिक चाली, रीतीरिवाज यावर तुम्हाला घटनेच्या 29 कलमानुसार कोणतेही बंधन आणता येणार नाही. सभापती महोदय, मी कलम 25 च्या संदर्भात वारंवार म्हणालो आहे की, "Freedom of conscience and free profession, practice and propagation of religion." त्यामध्ये त्यांनी पुढे असे म्हटले आहे की,(1) "Subject to public order, morality and health and to the other provisions of this Part, all persons are equally entitled to freedom of conscience and the right freely to profess, practice and propagate religion. आणि मग या संदर्भात हे सगळे म्हणत असताना सुप्रीम कोर्टाने याबाबतीत जे निरनिराळे निर्णय दिलेले आहेत ते फार महत्त्वाचे आहेत. खरे म्हणजे मी कायद्याचा अभ्यासक असतो तर यावर जास्त बोलू शकलो असतो. पण मी या क्षेत्रात तसा नवीन असल्याने मी त्यासंबंधात थोडक्यातच बोलणार आहे. ....

( यानंतर श्री. सरफरे .... 3एम 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, कलम 25 च्या संदर्भात आलेल्या वेगवेगळया निर्णयामध्ये असे म्हटले आहे की, .... AIR 1987 Supreme Court 748 ( From 1986 Kerala LT 227) O.Chinnappa Reddy and M.M. Dutt.JJ).जेवढे सुप्रिम कोर्टाचे निर्णय आहेत ते साऊथचे आहेत. कारण त्याठिकाणी मंदिरे खूप आहेत, धार्मिक वाद आहेत. त्यामुळे साऊथचे निर्णय जास्त आहेत. या जज्जमेंटच्या परिच्छेद 17 मध्ये कोर्टाने स्पष्ट म्हटले आहे की, एका नगण्य, अल्पसंख्य, गटाच्या भावना जपणे आवश्यक आहे असे कोर्टाने स्पष्ट केले आहे. एका विशिष्ट धार्मिक श्रध्दा किंवा धार्मिक कृती किंवा तर्काला, भावनेला भिडणारे नसेल तर घटनेच्या कलम 25 प्रमाणे कोणत्याही व्यक्तींचे वैयक्तिक विचार हे इर्रिलेव्हंट आहेत. कलम 13 मध्ये धार्मिक विधीच्या संदर्भात म्हटले आहे की, "(C) Constitution of India Art. 25---- Interpretation of ---- Factors to be considered.

Article 25 is an article of faith in the Constitution, incorporated in recognition of the principle that the real test of a true democracy is the ability of even an insignificant minority to find its identity under the country's Constitution. This has to be borne in mind in interpreting Art.25." परिच्छेद 19 मध्ये म्हटले आहे की, " Nothwithstanding the fact that a particular religious belief or practice does not appeal to our reason or sentiments, it would attract the protection of Art.25 subject, of course, to the inhibitions contained therein, when the belief is genuinely and conscientiously is held as part of the profession or practice of religion. Our personal views and reactions are irrelevant. (1909) ILR 33 BOM 122,Approved."सरकारने या संदर्भात क्लॉज काढला आहे, तो इर्रिलेव्हंट आहे असे सुप्रिम कोर्टाने स्पष्टपणे म्हटले आहे. हे विधेयक संमत करण्यासंबंधी हे पहिले जज्जमेंट आहे.

सभापती महोदय, दुसरे जज्जमेंट असे आहे,... AIR 1963, Supreme Court,1638 (V of 50 C 246). या जज्जमेंटच्या परिच्छेद 59 व 60 मध्ये स्पष्ट म्हटले आहे. अनुच्छेद 25 (1) व 26 (ब) मध्ये धर्म कसा सुरक्षित आहे, यासंबंधी सुप्रिम कोर्टाने काय म्हटले आहे? धर्माने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

दिलेल्या पध्दतीनुसार आपल्याला धार्मिक विधी करण्याचा पूर्ण अधिकार त्या धर्माच्या व्यक्तीला, माणसाला आहे. " What is protected under Article 25 (1) and 26 (b) respectively are the religious practices and the right to manage affairs in matters of religion. If the practice in question is purely secular or the affairs which is controlled by the statutes is essentially and absolutely secular in character, it cannot be urged that Article 25 (1) or Article 26 (b) has been contravened. Though the task of this disengaging the secular from the religious may not be easy, it must nevertheless be attempted in dealing with the claims for protection under Article 25(1) and 26 (b) ...

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. या सभागृहामध्ये विधानसभा विधेयक क्रमांक 89 चर्चेकरिता मांडण्यात आले आहे. त्या अनुषंगाने या विधेयकावर सभागृहामध्ये चर्चा सुरु आहे. या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य माननीय श्री.दिवाकर रावते हे या विधेयकावर बोलत असतांना त्यांनी या विधेयकाच्या मेरीटवर बोलतो असे आपल्याला सांगितले. बोलत असतांना ते सुप्रिम कोर्टाच्या अनेक दाखल्यांची उदाहरणे याठिकाणी वाचून दाखवीत आहेत. हे दाखले वाचीत असतांना त्या संदर्भातील त्यांचा मुद्दा, भावार्थ आम्हाला कळत आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्करराव जाधव (पुढे सुरू....

भावार्थ साधरणपणे धर्मांतर झालेले आहे, धर्माच्या रूढीमध्ये हस्तक्षेप हाईल, अशा अनुषंगाने हे बील आणलेले आहे, असे सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी कोर्टाच्या निर्णयाचे दाखले देण्याचा प्रयत्न केला परंतु उतारे देऊन त्यांना काय सिध्द करावयाचे आहे, त्याचा त्यांनी खुलासा व्हावा. या बिलातील रुपरेषा वाचली तर त्यांनी कोर्टाचे जे दाखले दिले ते बिलाशी संबंधित नसल्याचेच दिसते. मी या बिलातील कलम 13 वाचून दाखवितो. "शंका दूर करण्यासाठी याद्वारे असे घोषित करण्यात येते की, ज्यामुळे व्यक्तीला मानसिक, शारिरीक वा आर्थिक बाधा पोहोचत नाही असे कोणतेही धार्मिक विधी व धार्मिक कृत्ये अंतर्भूत असलेल्या कृतींना या अधिनियमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही." इतके स्पष्ट या बिलामध्ये सांगितलेले आहे. म्हणून माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे की, त्यांनी जे कोर्टाच्या जज्जमेंट वाचून दाखविले त्यातून त्यांना काय सिध्द करावयाचे हे समजत नाही. याचा या बिलाशी अर्थाअर्थी काही संबंध नाही. सभागृहाचा वेळ घेतला जात आहे, असे मला सांगावयाचे आहे.

डॉ.वसंत पवार : सन्माननीय सदस्यांनी आर्टिकल 25 चा उल्लेख केला. Sir, it relates to freedom of religion. It reads as under: "Freedom of conscience and free profession, practice and propagation of religion." आपण आर्टिकल 25 वाचले पण आपण त्या खालील आर्टिकल 25 (2) वाचून दाखविले नाही. यामधील दोनच लाईन आपल्याला वाचून दाखविणे गरजेचे आहे. It reads as under; " 25(2) Nothing in this article shall affect the operation of any existing law or prevent the State from making any law---" आपल्याला कोणताही कायदा करण्याचा पूर्ण अधिकार घटनेने दिलेला आहे. सुप्रीम कोर्टाने या अगोदर निर्णय दिले असले तरी देखील आपल्या सभागृहाला नवीन कायदा करण्याचा अधिकार घटनेने दिलेला आहे. याची सभागृहाने आणि सन्माननीय सदस्यांनी नोंद घ्यावी, अशी विनंती आहे.

श्रीमती उषाताई दराडे : सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव आणि सन्माननीय सदस्य डॉ.वसंतराव पवार साहेबांनी मुद्दा उपस्थित केला, त्या संबंधामध्ये मला स्पष्ट म्हणावयाचे आहे की,आर्टिकल 25 (2) वाचलेले आहे. हे गृहित धरून अर्ग्युमेंट केले जाते. या कायद्यामधील तरतुदी धर्माला बाधा आणणाऱ्या आहेत असे सांगण्याचा प्रयत्न केला . प्रिझम्शन हा अर्ग्युमेंटचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

श्रीमती उषाताई दराडे (पुढे सुरू...

आधार होऊ शकत नाही. असे भाष्य करणे बरोबर होणार नाही. या बिलाच्या संदर्भात जी काही सायटेशन्स वाचून दखविण्यात आली ती या बिलाशी संबंधीत लागू होणार नाहीत.

श्री.मधुकर चव्हाण : सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी मुद्दा उपस्थित केला. धर्माला बाधा आणणारे विधेयक नाही हे सन्माननीय सदस्यांचे मत आहे...

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

जादूटोणा किंवा समाजाला वेठीस धरणाऱ्या ज्या बाबी आहेत त्याला प्रतिबंध करण्याच्या बाबतीत कोणाचाही विरोध नाही. या ठिकाणी मांडण्यात आलेले बिल हे कसे घटनाबाह्य आहे हे सांगण्याचा प्रयत्न सन्माननीय सदस्य करीत आहेत. अनेक बिलामध्ये अध्याहृत शब्द किंवा हिडन वर्ड्स् असतात. नंतर कायदेपंडित त्याचा वेगळा अर्थ लावतात, अनेक लोकांना गुंतवतात आणि अनेक लोकांना सोडविण्याचा प्रयत्न करतात. हा सर्वंकष कायदा होणार आहे. त्यामुळे समाजामध्ये सुडाची भावना निर्माण होऊ शकते. या चर्चेनंतर हा कायदा कसा आहे याची चर्चा आपण नंतर करणार आहोत. आता हा कायदा घटनाविरोधी कसा आहे यासाठी सन्माननीय सदस्य दाखले देत आहेत. ते धर्माच्या आधारावर दाखले देत नसून सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाच्या आधारावर दाखले देत आहेत. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचे आपोआप कायद्यामध्ये रुपांतर होते असा अलिखित नियम आहे. It becomes the law of country. म्हणून मला असे म्हणावयाचे आहे की, यामध्ये व्हॅलिडिटीचा प्रश्न आहे. मुस्लीम बांधवांनाही माझी विनंती आहे की, आपण हे वाचावे. आपल्यावर सुध्दा परिणाम होणार आहे. त्याची चर्चा आपण नंतर करणार आहोत. या ठिकाणी श्री. भास्कर जाधव यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला त्यामध्ये काहीही तथ्य नाही असे माझे मत आहे.

डॉ. एम.ए.अझिज : अध्यक्ष महाराज सन 2005 चे वि. स. वि. क्रमांक 89 या बिलाचे टायटल जर आपण वाचले तर त्यामध्ये "Eradication of black magic and evil practices" असे म्हटले आहे. ही कोणत्याही धर्माची बाब होऊ शकत नाही. धर्माला या बिलामध्ये ओढण्याचा प्रश्न येत नाही. Mr. Deputy. Chairman, Sir, this bill actually relates to the eradication of bad, evil practices and eradication of Black magic, the evil, sinister and aghori practices. ही कोणत्याही धर्माची बाब होऊ शकत नाही. म्हणून आपण या ठिकाणी धर्म आणण्याचा प्रश्न येत नाही. कान टोचणे, सुंता करणे, मातम करणे या धार्मिक बाबी आहेत. त्याचा याच्याशी संबंध येत नाही. यामध्ये धर्माचा प्रश्न येत नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हे विधेयक या ठिकाणी अद्याप चर्चेला यावयाचे आहे. या विधेयकाला विरोध का आहे हे सांगण्यासाठी हरकत उपस्थित करण्याचा अधिकार प्रत्येक सन्माननीय सदस्याला आहे. समोरच्या बाजूच्या सन्माननीय सदस्यांना ते आवडणार नाही हे स्वाभाविक आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव तसेच सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार यांनी जे मुद्दे उपस्थित केले ते कायदेशीर मुद्दे आहेत. Sir, that amounts to the interference in the religion. But, there is no interference in the religion. It is a matter of fact.

Shri Madhukar Sarpotdar: Mr. Deputy, Chairman, Sir, the hon. Member, Shri Kulkarni does not have any right to speak.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. या ठिकाणी या अत्यंत महत्वाच्या बिलावर चर्चा चालू आहे. या बिलावर सन्माननीय सदस्य व्यवस्थितपणे आपली मते मांडत असताना एकमेकांना डिस्टर्ब करु नका. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी आपले म्हणणे मांडावे. मी सभागृहाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना सांगतो की, कुणीही कुणाच्या बोलण्यामध्ये अडथळा निर्माण करुन नये. आपण बोलता आणि आपणच निर्णय घेता. मी या ठिकाणी बसून फक्त ऐकण्याचे काम करतो आहे तेव्हा आपण निर्णय माझ्यावर सोडावा. मी या ठिकाणी नेमका कशासाठी बसलो आहे हेच मला कळत नाही. हा प्रकार सन्माननीय सदस्यांनी थांबवावा. माझ्यामध्ये देखील निर्णय घेण्याची क्षमता आहे म्हणून आपण मला या खुर्चीवर बसविले आहे. माझी एक्स्पायरी डेट अजून लांब आहे. मेहरबानी करुन सन्माननीय सदस्यांनी आपले वक्तव्य मांडावे. मी योग्य तो निर्णय देईन.

यानंतर श्री. शिगम......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 15:50

श्री. मधुकर सरपोतदार : मूलतः सन्माननीय सदस्य श्री. भास्करराव जाधव यांनी पॉईण्ट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून याठिकाणी भाषण केले. त्यानुषंगाने नंतर सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार आणि सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी वक्तव्य केले. ते त्यांचे वक्तव्य पॉईण्ट ऑफ इन्फर्मेशनच्या संदर्भात होते की, पॉईण्ट ऑफ ऑर्डरच्या संदर्भात होते हे मला माहीत नाही. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी हे मध्येच उठून बोलायला लागले ते वकील आहेत. खरे म्हणजे वकिलांनी असे करायचे नसते...(अडथळा) .. माझे म्हणणे एवढेच आहे की, हे विधेयक कसे योग्य होऊ शकत नाही, हे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत. माझ्या समोरच्या सन्माननीय सदस्यांना कायद्याचे चांगले ज्ञान आहे हे मला मान्य आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे भाषण संपल्यानंतर त्यांच्या भाषणातील मुद्दे कसे अयोग्य आहेत हे दाखवून देण्याचा माझ्या समोरच्या सन्माननीय सदस्यांना पूर्ण अधिकार आहे. या विधेयकावर जेव्हा त्यांना बोलायला संधी मिळेल त्यावेळी त्यांनी तो अधिकार वापरावा. या विधेयकाच्या संदर्भात आमची प्रमुख ऑब्जेक्शन्स काय आहेत ती रेकॉर्डवर आणण्याचा आम्हाला पूर्ण अधिकार आहे. हे अंधश्रध्दा निर्मूलनासंबंधीचे विधेयक आहे. अंधविश्वासाच्या संदर्भात कोणेतेही स्टेटमेंट करुन नका एवढेच मला सांगायचे आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी नम्र विनंती आहे. मी घटना हातात धरलेली आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेली ही फार मोठी देणगी आहे. सन्माननीय सामाजिक न्याय मंत्री श्री. चंद्रकांत हंडोरे हे "तू उठ रे, तू उठ रे" असे दुस-याला बोलण्यासाठी प्रवृत्त करीत आहे. आपण आपल्या बाबासाहेबांचा अपमान का करता ? हे मला कळत नाही. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी आणि सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांना माझी हात जोडून विनंती आहे. आपण लॉ ग्रॅज्युएट आहात. आपली कोर्टामध्ये प्रॅक्टीस होत नाही म्हणून आपणाला या ठिकाणी पाठविलेले आहे की काय ? अशा प्रकारची शंका येते. आपण चांगले वकील आहात आणि पक्षामध्ये आपण चांगली न्याय्य भूमिका बजावू शकता म्हणून तुम्हाला येथे आणले असेल तर अशी अनमोल रत्ने सभागृहामध्ये आणल्याबद्दल मी पक्षाध्यक्ष श्री. शरद पवार यांना धन्यवाद देतो. सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांना सांगू इच्छितो की, आबा तुमच्या कारकीर्दीवर आमचे प्रेम आहे. तुमच्या खात्यावर आम्ही बोलतो तो भाग वेगळा. परंतु

.2..

(श्री. दिवाकर रावते....

तुमची सिन्सिरिटी कोणी चॅलेंज करु शकत नाही. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना मी एक प्रश्न विचारतो, त्याचे उत्तर त्यांनी द्यावे.या सदनामध्ये जेव्हा बारबालाच्या संदर्भातील बिल आले होते त्यावेळी माझ्या पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि या सदनाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आदरणीय श्री. प्रमोद नवलकर यांनी घटनात्मक बाबींवर हे बिल कसे टिकू शकणार नाही हे सांगितले होते. ते सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना नेहमी "माय लर्नेड फ्रेण्ड" असे संबोधायचे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना मी विचारु इच्छितो की, त्यावेळी कुठे गेली होती तुमची बुध्दिमत्ता ? एक मंत्री प्रामाणिकपणे कोणते काम करीत असेल तर त्याबाबतीत त्यांना मदत करण्याची तुमची सामूहिक जबाबदारी आहे. सभापती महोदय, मी येथे कोर्टाचे निर्णय सांगत आहे. माझे मत मी अजून मांडलेले नाही. माझे मत अजून मला मांडायचे आहे. मी कुठली लपवा-छपवी करीत नाही.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

काय झाले? मी माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांना सांगू इच्छितो, मी सुरुवात करताना असे वाचले की, प्रस्तूत कायद्याच्या शेवटी नमूद केलेल्या व्यावृत्ताकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. हे मी आपल्याला आणि सदनाला म्हणालो. कायद्यातील कलम 13 चे व्यावृत्त पुढीलप्रमाणे आहे असे मी वाचले. शंका दूर करण्यासाठी याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की.... तुम्ही मला कशाला वाचून दाखविता? त्यात असे म्हटले आहे की, ज्यामुळे व्यक्तीला मानसिक, शारिरीक, आर्थिक बाधा पोहोचत नाही......पोहोचत नाही. पोहोचत असेल तर..... पोहोचत नसेल तर लागू होत नाही. पोहोचत नसेल तर असे कोणतेही धार्मिक विधी व धार्मिक कृत्ये अंतर्भूत असलेल्या कृतींना अधिनियमामधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही. मी कायद्यातील तरतूदी आणि घटना घेऊन उभा आहे तो शारीरिक, मानसिक, आर्थिक बाधा पोहोचत असतील असे धार्मिक विधी माझ्या धर्मामध्ये आहेत. इतर धर्माबद्दल बोलण्याचा मला अधिकार नाही. मी हिंदू आहे, माझ्या धर्माबद्दल बोलण्याचा मला अधिकार आहे. माझ्या धर्माबद्दल बोलण्याचा अधिकार घटनेने मला दिला असेल तर ते करण्याचा मला पूर्ण अधिकार आहे. जर हे विधेयक त्यात बाधा आणत असेल तर मला हा अधिकार कोणी दिला? सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला असेल तर तो याठिकाणी मांडणे हे माझे कर्तव्य आहे. मी काळ्या कृत्यांना उत्तेजन देणाऱ्यांच्या बाजूचा नाही. बिलाच्या माध्यमातून अशा प्रकारे धर्मावर प्रहार करण्याचा प्रकार होत असेल तर त्याचा प्रतिकार करुन माझ्यामध्ये सामर्थ्य असेल, शक्ती असेल तेवढी आणि विरोधी पक्षात बसलो असताना मला माझे मत मांडण्याचा प्राप्त झालेला अधिकार आहे, त्यातून प्रतिकार करणे हे माझे धर्मकर्तव्य आहे. म्हणून हे मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. अजून माझे धर्माबद्दल मत मांडणे बाजूला राहीले आहे. मानसिक, शारीरिक आणि आर्थिक बाधा कोणत्या होतात हे बिलावर बोलेन तेव्हा मांडेन. बिलामध्ये व्यावृत्ती असल्यामुळे मांडता येत नाही असे निवेदन करीत असताना माझे नव्हे तर सुप्रीम कोर्टाने काय म्हटले ते मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. सभापती महोदय, मला शंका होती. तुमच्याबद्दल आम्हाला प्रेम आहे, आदर आहे. तुम्हाला याठिकाणी बसविले आहे. आतपर्यंतचा आमचा अनुभव आहे. तुम्ही काहीही करता. परंतु आम्हाला गप्प बसविता आणि सगळे काम पूर्ण करुन घेता. म्हणून तुम्हाला बसविले आहे का अशी भीती आहे.

**उपसभापती** : मी अजूनपर्यंत जादूटोणा केला का?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : करा. परंतु आपण सांगितले की, माझ्यामध्ये निर्णय घेण्याची क्षमता आहे, म्हणून तुम्हाला बसविले. आम्हाला तुमच्या निर्णयक्षमतेबद्दल शंका नाही. मी सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांना सांगू इच्छितो की, मला इंग्रजी नीट वाचता येत नाही. कारण ते कोर्टाचे इंग्रजी आहे. रेग्युलर इंग्रजी वेगळे असते. कृपा करुन मला माझा अधिकार बजावू द्या. तुमच्या मेहेरबानीवर नाही. आपल्याला जे काही म्हणायचे असेल ते माझे भाषण पूर्ण झाल्यावर सांगा. तुमच्याबद्दल फार मोठा गौरव आहे. अभ्यास आहे, तुमच्याबद्दल आपुलकी आहे.

**उपसभापती** : हा बिलाचाच एक भाग समजण्यात यावा काय?

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार साहेब, मी 25 च्या जज्जमेंटवर बोलून 25 (बी) वर येणार आहे. प्रथम 25 प्रमाणे मला मिळालेला हक्क वाचून दाखवितो. म्हणजे तुम्ही कसे अयोग्य मांडले ते तुम्हाला कळेल. सभापती महोदय, ए.आय.आर.1958, सुप्रीम कोर्ट, 956, कॉलम 25- सी 136 फ्रॉम केरला. दिनांक 22 मे, 1958.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, जजमेंटच्या पॅरा 8 मध्ये कोर्टाने स्पष्ट केले आहे की, Directive principles to State policy.( घटनेमधील कायदे मंडळांना मार्गदर्शक भाग) हा घटनेतील मूलभूत हक्कांच्या भागाला दुय्यम आहे. सरकार मुलभूत हक्कांवर गदा आणणारा कायदा करु शकत नाही. The reference is: Anno.A..I.R.Com. Const. of India,Art.143 N-2. "(b) Constitution of India , Part III (General). Part IV (Gen.), Article 245 and 246 - Legislation by State to implement directive principles---Legislation cannot override fundamental rights -- principles of harmonious construction to be followed.

The Legislative power conferred upon a State Legislative Assembly by Article 245 and 246 is to be exercised under Article 245 subject to the provisions of the Constitution. Therefore, although certain legislation may have been undertaken by a State in discharge of the obligation imposed on it by the directive principles enshrined in Part IV of the Constitution, it must, nevertheless, subserve and not override the fundamental rights conferred by the provisions of the Articles contained in Part-III of the Constitution.

The directive principles of State Policy have to conform to and run as subsidiary to the Chapter on Fundamental Rights. Nevertheless, in determining the scope and ambit of the fundamental rights relied on by or on behalf of any person or body the Court may not entirely ignore these directive principles of State Policy laid down in Part IV of the Constitution but should adopt the principle of harmonious construction and should attempt to give effect to both as much as possible. AIR 1951.S.C.226 (228) and AIR 1958 S.C. 731, Rel.on."

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, जजमेंटच्या प्यारा 16 मध्ये कोर्टाने हे स्पष्ट केले आहे की, धर्म म्हणजे केवळ तत्वज्ञान असे नव्हे, तर धार्मिक कृतीदेखील धर्मातच मोडतात व त्या घेटनेने संरक्षित आहे. हा रेफरन्स कोर्टाने मेन्शन केलेला आहे. त्याच्या जजमेंट AIR-1958, सर्वोच्च न्यायालय 225 (V45 C42) दिनांक 8 नोव्हेंबर,1957, पॅरा 16 मध्ये धार्मिक कृतीत धर्म मांडतो. त्यामुळे हा कायदा लागू होतो. In that judgement, it is stated as under: "(f) Constitution of India; Article 25(2) (b) and 26 (b) --- "Matters of religion." इ Scope of Expression in Art. 26(b) Denominational temple at Moolky Petah in village Mannampady in South Kanara District founded for benefit of Gowda Saraswath Brahmins --- Right to exclude others from worship--- Art. 26(2) (b), if covers denominational institutions -- Conflict between Art.25 (2) (b) and 26(b)--- interpretation --- Art. 25 (2) (b) prevails extents of denominational right protected by Article 26 (b) --- Litigation under Madras Act V of 1947 parties --- Government agitating on behalf of public-- Public if bound by decisions... AIR 1958 MAD.1985,affirmed ---- (Madras Temple entry authorization Act ( V of 1947,as amended by Act XIII of 1949.),Ss.2 (2),3) ---- (Interpretation of Statues ---- Harmonious construction) --- Civil P.C.( 1908), Preamble and O.I.R, VIII) (words and phrases--- Matters of religion.")

The expression "matters of religion" in Art.26 (b) embraces not merely matters of doctrine and belief pertaining to the religion but also the practice of it, or to put it in terms of Hindu theology, not merely its Goana but also its Bhakti and Karma Kandas. AIR 1954,S.C.282,Relied on."'

यानंतर श्री. अजित.......

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती डॉ.वसंत पवार )**

श्री.दिवाकर रावते..........

AIR 1972 Supreme Court 1586 (V 49 C 293) बोहरा समाजाबाबत दिलेल्या जजमेंटमध्ये असे म्हटलेले आहे की, धर्माच्या मूळ गाभ्याला बंधन करणारा कायदा करता येत नाही. धर्माचा मूळ गाभा कसा ठरवावा हे या जजमेंटच्या पॅरा 12 मध्ये कोर्टाने स्पष्ट केले आहे, या जजमेंट बरोबर वर म्हटलेली क्रमांक 1 ची जजमेंट विचारात घेतली तर अंधश्रध्दा कायद्याच्या कलम 13 ने बाधीत केलेल्या धार्मिक कृती तशा बाधीत करता येणार नाहीत हे दिसेल. याच जजमेंटच्या पुढील क्रमांक 8 चे जजमेंट या म्हणण्याला अधिक आधार देईल.

AIR 1972 S.C. 1586 (V 59) C 293 नुसार असा निर्णय दिला आहे की,

"(A) Constitution of India, Article 25, 26 Scope of.

The protection of Articles 25 and 26 is not limited to matters of doctrine or belief. They extend also to acts done in pursuance of religion and therefore contain a guarantee for rituals and observances, ceremonies and modes of worship which are integral parts of religion. What constitutes an essential part of a religious or religious practice has to be decided by the courts with reference to the doctrine of a particular religion and include practices which are regarded by the community as a part of its religion AIR 1962 sc.853 Followed. "

यानंतर AIR 1954 S.C. 282 (V 41 C 68) ही अत्यंत महत्वपूर्ण जजमेंट आहे, या जजमेंटच्या पॅरा 12 मध्ये कोर्टाने स्पष्ट केले आहे की, एखादे मंदिर चालविताना तेथील महंताला त्याचे मुख्य काम करण्यास अक्षम ठरविणारा किंवा त्याला नौकर ठरविणारा कायदा घटनाबाह्य आहे. या जजमेंटच्या पॅरा 14 मध्ये घटनेच्या 25 ने संरक्षित धर्म अधिक स्पष्ट केला आहे, तिच्या पॅरा 17 मध्ये धार्मिक बाबींचा अधिकार कोणतेही कायदा मंडळ नष्ट करु शकत नाही, असा निर्वाळा आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे तिच्या पॅरा 19 मध्ये कोर्टाने स्पष्ट केले आहे की, धार्मिक कृती व त्यांच्यासाठी केला जाणारा खर्च या दोन्ही गोष्टी सेक्युलर नाहीत त्यामुळे त्यांच्या विषयी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

कायदा करता येणार नाही. Constitution of India Art.19(1) (f) Mahant of Math --- His rights and duties -- Restrictions on Mahant -- (Hindu Law इ Religious Endowment). It reads as under:

"The beneficial interest which a Mahant enjoys is appurtenant to his duties and as he is in charge of a public institution, reasonable restrictions can always be placed upon his rights in the interest of the public. But the restrictions would cease to be reasonable if they are calculated to make him unfit to discharge the duties which he is called upon to discharge. A Mahant's duty is not simply to manage the temporalities of a Math. He is the Head and superior of spiritual fraternity and the purpose of the Math is to encourage and foster spiritual training by maintantenance of a competent line of teachers who could impart religious instructions to the disciples and followers of the Math and try to strengthen the doctrines of the particular school or order, of which they profess to be adherents. This purpose cannot be served if the restrictions are such as would bring the Mathadhipati down to the level of a servant under a State department. It is from this standpoint that the reasonableness of the restrictions should be judged." Further, it is stated that :

"(d) Constitution of India, Art.25--- Practice and propagation of religious tenets --- Applicability of Art. 25 to Mathadhipati --(Hindu Law Religious Endowments.)

A Mathadhipati is not a corporate body; he is the Head of the Spiritual fraternity and by virtue of his Office has to perform the duties of a religious teacher. It is his duty to practice and propagate the religious tenets of which he is an adherent and if any provision of law prevents him from propagating his doctrines....

यानंतर श्री.गागरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Shri Diwakar Rawate .....

That would certainly affect the religious freedom which is guaranteed to every person under Article 25. Institutions as such cannot practice or propagate religion. It can be done only by individual persons and whether these persons propagates their personal views or the tenets for which the institution stands is really immaterial for the purposes of Art. 25.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य एका पाठोपाठ एक सुप्रीम कोटाचे निर्णय वाचून दाखवत आहेत. या सभागृहामध्ये सुप्रीम कोर्टाचे निर्णय वाचून दाखविणे हे नियमाला धरुन आहे का ? हा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

Shri Diwakar Rawate : It is the propagation of belief that is protected, no matter whether the propagation takes place in a church or monastery, or in a temple or parlour meeting. Article 26 - Distinction between Art. 26 Clause (b) and following two clauses. Besides the right to manage its own affairs in matters of religion, which is given by Art. 26 Cl. (b) the next two clauses of Art. 23 guarantee to a religious denomination the right to acquire and own property and to administer such property in accordance with law. The administration of its property by a religious denomination has thus been placed on a different footing from the right to manage its own affairs in matters of religion. The latter is a fundamental right which no Legislature can take away, whereas the former can be regulated by laws which the Legislature can validly impose. It is clear; therefore, that questions merely relating to administration of properties belonging to a religious group or institution are not matters of religion to which cl. (b) of the article applies.

यानंतर श्री.सोनवणे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Shri Diwakar Rawate.....

Then, Article 26(b) - What are matters of religion.

What constitutes the essential part of a religion is primarily to be ascertained with reference to the doctrine of that religion itself. If the tenets of any religious sect of the Hindus prescribe that offerings of food should be given to the idol at particular hours of the day, that periodical ceremonies should be performed in a certain way at certain periods of the year or that there should be daily recital of sacred texts or oblations to the sacred fire, all these will be regarded as parts of religion and the mere fact that they involve expenditure of money or employment of priests and servants or the use of marketable commodities will not make them secular activities partaking of a commercial or economic character; all of them are religious practices and should be regarded as matters of religion within the meaning of Art. 26(b).

सभापती महोदय, या जजमेंटवरुन धर्माच्या बाबतीत जे सांगितले ते फार गंभीर आहे. यामध्ये असे म्हटलेले आहे की, समाजातील सर्वसामान्य लोकांचे मानसिक, शारीरिक व आर्थिक शोषण करुन त्यांचे नुकसान करण्याच्या व त्याद्वारे समाजाची घडी विस्कटून टाकण्याच्या दुष्ट हेतूने प्रयत्न झालेला आहे. या संदर्भात सुप्रिम कोर्टाने एवढे निर्णय दिलेले आहे. तेव्हा यावरुन असे दिसते की हे बील कायदेशीर नाही. या ठिकाणी 25 च्या संदर्भात सांगितले, 26 च्या संदर्भात सांगितले.What is said in Article 25? "Nothing in this article shall affect the operation of any existing law or prevent the State from making any law-

What is said in Article 25(2) (a)? "regulating or restricting any economic, financial, political or other secular activity which may be associated with religious practice." It may be associated with religious

3U-2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Shri Diwakar Rawate.....

practice and not with my own religion; Hinduism, Muslim, Christian or Parsee. Clause 2(b) of Art. 25 says " providing for social welfare and reform or the throwing open of Hindu religious institutions of a public character to all classes and sections of Hindus." Now, there is Explanation I which says "The wearing and carrying of Kirpans shall be deemed to be included in the profession of the Sikh religion. Explanation II says "In sub-clause (b) of clause (2) the reference to Hindus shall be construed as including a reference to persons professing the Sikh, Jaina or Buddhist religion and the reference to Hindu religious institutions shall be construed accordingly."

यानंतर श्री. पुरी....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

यामध्ये कॉमेंटस् आल्या आहेत, त्या काय आहेत ? "Article 25(2) permits regulation of any secular activity associated with the religious practice secular activity (S. Narain vs State of Andhra Pradesh). विधेयकाच्या मूळ गाभ्याशी मी पूर्णपणे सहमत आहे, हे मी सुरुवातीसही सांगितले होते आणि आताही सांगत आहे. परंतु याठिकाणी धर्मावर बंधने असता कामा नयेत. यासंदर्भातील सुधारणा आणण्याच्या दृष्टनेच माझा आग्रह आहे. "granting concession to the Muslim". अनुच्छेद 245 व 246 प्रमाणे आपल्याला धर्माच्याबाबतीत कायदाच करता येत नाही. यासंबंधी कोर्टाचे जज्जमेंट आहे, त्यामध्ये असे म्हटले आहे की, "Granting a concession to the Muslim students to avail 'Ramzan' holidays in a school where the Muslim students are in majority and, further, granting them allowance to cover up the working days by working during midsummer holidays is neither unreasonable nor unconstitutional and in no case, it would affect or sabotage secularism. Article 25 not only protects the freedom of religious opinion, but it also protects acts done in pursuance of a religion, which is obvious by the expression 'practice of religion' in Art. याठिकाणी घटना आपले मत मांडत आहे. कायदा कोणत्या पध्दतीने करावा, यासंबंधी सुप्रिम कोर्टाचे जज्जमेंट आहेत. "Touching the one's own religious conscience, would be violated of Art. 25. State is precluded from; issuing any orders which directly or impliedly offend the religious sentiments or freedom of conscience." त्या जज्जमेंटनुसार आपल्याला कायदा करता येणार नाही. घटनेच्या कलम 19 प्रमाणे "(a) to freedomof speech and expression; (b) to assemble peaceably and without arms; (c) to form associations or unions; (d) to move freely throughout the territory of India; (e) to reside and settle in any part of the territory of India;" यामुळे लोंढयांचा त्रास झालेला आहे. "(g) to practice any profession, or to carry on any; occupation, trade or business." उद्या कर्नाटकच्या

..2....

श्री.दिवाकर रावते...

कोर्टात, दिल्लीच्या कोर्टात आपल्याला उभे राहता येईल.  माननीय श्री.गुरुनाथ कुलकर्णी साहेबांना, श्री.सगमांच्या हिमाचल प्रदेशच्या कोर्टात उभे राहता येईल. It is freedom of practice.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

क्लॉज 19 (6) मध्ये असे म्हटले आहे की, "Nothing in sub-clause (g) shall affect the operation of any existing law in so far as it imposes, or prevent the State from making any law imposing, in the interests of the general public, reasonable restrictions on the exercise of the right conferred by the said sub-clause, and, in particular, nothing in the said sub-clasue shall affect the operation of any existing law in so far as it relates to, or prevent the State from making any law relating to- (i) The professional or technical qualifications necessary for practising any profession or carrying on any occupation, tradeor business, or (ii) the carrying on by the State, or by a corporation owned or controlled by the State of any trade, business, industry or service, whether to the exclusion, complete or partial, of citizens or otherwise." याचा अर्थ जो अगोदरचा कायदा आहे त्या अंतर्गत दुरुस्ती करता येईल परंतु त्याला सुपरसिड करणारा कायदा करता येणार नाही. या ठिकाणी बिलासमवेत अनुसूची दिलेली आहे. या अनुसूचिमध्ये 1 ते 12 यात काय घडले तर काय करावयाचे वगैरे दिलेले आहे. बिलावर बोलतांना मी याबाबतची चर्चा करणार आहे. पण मी या ठिकाणी निदर्शनास आणून देतो की, एखादा कायदा आस्तित्वात असतांना दुसरा नवीन कायदा राज्याला करता येणार नाहीत. 3 वर्षाची सजा 5 वर्षाची करणे, 500 रुपये दंड 1000 रुपये करणे वगैरे दुरुस्त्या करता येऊ शकतात कारण त्या कायद्याला आणखी ताकद येते. परंतु, आधीच कायद्यात तरतूद असेल तर नवीन कायदा करता येणार नाही असे घटनेच्या 19 (सी) मध्ये म्हटले आहे. "Additional ground of challenge could be that the restraint on the practice of alternative healing techniques is disproportionate to the purpose of the Legislation, the Object sought to be achieved and the evil sought to be remedied. This would be sustained by relying upon the wide definition of the "practise



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**श्री.दिवाकर रावते..........**

of black magic and evil *aghori* practises" under Section 2(1) (b) of the Act and particularly the use of the word "miracle" in entry 2 of the schedule to the Act. These, read with the prohibitions and penalties prescribed under Section 3 of the Act would be cited to show that it is beyond all allowable limits of restraint under clause 6 of Art. 19 of the Constitution" भूत उतरविण्याच्या बहाण्याने एखाद्या व्यक्तिला दोराने किंवा साखळीने बांधून ठेवून मारहाण करणे, काठीने किंवा चाबकाने मारणे यासाठी देखील सध्याच्या कायद्यात तरतुदी आहेत. या सर्व गोष्टी बंद झाल्या पाहिजेत या मताचे आम्ही आहोत. परंतु, त्या बंद करण्यासाठी आय.पी.सी.च्या कलम 319, 322, 320 व 324 मध्ये तरतूद आहे. 7 वर्षाची सजा व दंड देण्यात आला आहे. पादत्राणे भिजलेले पाणी प्यायला लावणे यासाठी आयपीसीच्या कलम 503 अन्वये 2 वर्षे सजा अधिक दंडाची तरतूद आहे. सजेची तरतूद आहे.

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

मिरचीची धुरी देणे, छताला टांगणे, जाणीवपूर्णक मृत्यू होईल अशा दुखापती करणे यासाठी आय.पी.सी. च्या कलम 299 अन्वये 10 वर्षे सजा व दंडाची तरतूद आहे. त्यानंतर दोराने किंवा केसांनी बांधणे, त्या व्यक्तिचे केस उपटणे, व्यक्तिच्या शरीरावर, अवयवांवर तापवलेल्या वस्तूचे चटके देऊन इजा पोहोचवणे, धोकादायक वस्तूने दुखापत करणे यासाठी आय.पी.सी.च्या कलम 319, 322, 320, 324 अन्वये 1 वर्षे सजा व दंडाची तरतूद किंवा 7 वर्षे सजा व दंडाची तरतूद आहे. उघडयावर लैंगिक कृत्य करण्यासाठी जबरदस्ती करणे, जबरदस्तीने कायद्याने बंधनकारक नसलेले वा बेकायदेशीर कृत्य करायला लावणे यासाठी आय.पी.सी. च्या कलम 503 प्रमाणे 2 वर्षे सजा व दंडाची तरतूद आहे. तोंडात जबरदस्तीने मूत्र किंवा विष्ठा घालणे किंवा यासारखी कोणतीही कृती करणे यासाठी आय.पी.सी.च्या कलम 503 अन्वये 2 वर्षे सजा व दंडाची तरतूद आहे. एखाद्या व्यक्तीने तथाकथित चमत्कार करुन त्यापासून आर्थिक प्राप्ती करणे, तसेच अशा तथाकथित चमत्कारांचा प्रचार व प्रसार करुन लोकांना फसवणे, ठकवणे अथवा त्यांच्यावर हदहशत बसवणे यासाठी आय.पी.सी.च्या कलम 420 अन्वये 7 वर्षे सजा व दंडाची तरतूद आहे. अतिमानुष शक्तीची कृपा मिळवण्यासाठी ज्यामुळे जिवाला धोका निर्माण होतो किंवा शरीराला जीवघेण्या जखमा होतात अशा अनिष्ट व अघोरी प्रथांचा अवलंब करणे, आणि अशा प्रथांचा अवलंब करण्यास इतरांना प्रवृत्त करणे, उत्तेजन देणे किंवा सक्ती करणे हा कायद्याने गुन्हा ठरत नाही. सभापती महोदय, मौल्यवान वस्तू, गुप्त धन, जलस्त्रोत यांचा शोध घेण्याच्या बहाण्याने वा तत्सम कारणाने करणी, भानामती या नावाने कोणतेही अमानुष कृत्य करणे आणि जारणमारण अथवा देवदेवस्की यांच्या नावाखाली नरबळी देणे किंवा देण्याचा प्रयत्न करणे किंवा अशी अमानुष कृत्ये करण्याचा सल्ला देणे, त्याकरता प्रवृत्त करणे अथवा प्रोत्साहन देणे .....

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना पाणी प्यायचे आहे. सभागृहामध्ये पाणी आणता येत नाही. खास बाब म्हणून मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 4.34 वाजता 10 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

--------

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगितीनंतर .... )

**सभापतीस्थानी - माननीय उपसभापती**

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मला एक पॉईन्ट ऑफ प्रोसिजर आपल्या परवानगीने मांडावयाचा आहे. आता हे सभागृह 10 मिनिटांसाठी स्थगित करण्यात आले होते. सभागृह स्थगित होण्यापूर्वी या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते हे सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 89 या विधेयकावर बोलत होते. सन्माननीय सदस्य श्री.रावते बोलत असतानाच तालिका सभापतींनी 'सन्माननीय सदस्य श्री.रावते यांना पाणी पिण्यासाठी म्हणून सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे' असे सांगून सभागृहाची बैठक स्थगित केली. अर्थात माझी हरकत त्याबद्दल नाही. परंतु ज्या कारणासाठी म्हणून बैठक स्थगित करण्यात आले ती काही आपले प्रथा नाही आणि पीठासन अधिकाऱ्यांनी दिलेला हा निर्णय असल्याने कदाचित भविष्यात तो निर्णय म्हणून गृहीत धरला जाऊ शकतो. म्हणून किमान ते शब्द तरी आपण बदलावेत वा 'खास बाब' म्हणून असे करण्यात आले असे आपण जाहीर करावे.

**उपसभापती** : आपले म्हणणे योग्य आहे. ते शब्द रेकॉर्डवरून काढून टाकण्यात येतील. यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी आपले भाषण पुढे सुरू करावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या विधेयकाच्या व्याख्या खाली सेक्शन 2(1)(बी) मध्ये 'संहिता' म्हणजे फौजदारी प्रक्रिया संहिता,1973 असा आहे त्यासंबंधात मी बोलत आहे. यातील 8 मध्ये मंत्र-तंत्राच्या सहाय्याने भूत-पिशाच्चाला आवाहन करीन अशी धमकी देऊन लोकांच्या मनात घबराट निर्माण करणे, मंत्रतंत्र वा तत्सम गोष्टी करून एखाद्या व्यक्तीस विषबाधेतून मुक्त करतो आहे असे भासविणे, लोकांना वैद्यकीय उपचार घेण्यापासून रोखणे व त्याऐवजी त्यांना अघोरी कृत्य वा उपाय करण्यास प्रवृत्त करणे वगैरे बद्दल आपीसी कलम 503, 504, 416, 420 लावता येतात आणि त्याखाली जास्तीत जास्त सजा 7 वर्ष आणि दंड अशी आहे. त्यानंतर कुत्रा, साप, विंचू या सारखे जनावर चावल्यास व्यक्तीला वैद्यकीय उपचार घेण्यापासून रोखून किंवा प्रतिबंध करून त्याऐवजी मंत्रतंत्र, गंडेदोरे यासारखे इतर उपचार करणे वा करावयास लावणे याबद्दल आयपीसी कलम 299 खाली प्रसंगी जीवावर बेतणाऱ्या कृत्यांबद्दल सदोष मनुष्यवध होऊ शकतो म्हणून जन्मठेपेची शिक्षा व दंड होऊ शकतो. तसेच बोटाने शस्त्रक्रिया करून दाखवितो असा दावा करणे किंवा गर्भवती स्त्रीच्या गर्भाचे लिंग बदल करून

..... 3वाय 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

दाखवतो असा दावा करणे. म्हणजे मदर टेरेसा हात रूग्ण व्यक्तीच्या अंगावरून हात फिरविल्याचे दाखविले जाते वगैरे जे काही आहे ते मी माझ्या विधेयकावरील भाषणातून नंतर बोलणारच आहे. पण अशा कृत्यांच्या बाबतीत आयपीसी कलम 416, 420, 299, 322, 324, 302 या सारखी कलमे लागू शकतात आणि त्याप्रमाणे सजा कमीत कमी आणि जास्तीत जास्त सांगितलेली आहे. त्यानंतर 'क' मध्ये स्वत:मध्ये विशेष शक्ती असल्याचे अथवा आपण कुणाचा तरी अवतार असल्याचे वा स्वत:मध्ये पवित्र आत्मा असल्याचे भासवून किंवा त्याच्या नादी लागलेल्या व्यक्ती पूर्वजन्मी तू माझी पत्नी, पती वा प्रेयसी, प्रियकर होता असे सांगून अशा व्यक्तींशी लैंगिक संबंध ठेवणे तसेच मूल न होणाऱ्या स्त्रीला अतिंद्रीय शक्तीद्वारे मूल होण्याचे आश्वासन देऊन तिच्याशी लैंगिक संबंध ठेवणे, मंदबुद्धीच्या व्यक्तीमध्ये अतिंद्रीय शक्ती आहे असे इतरांना भासवून त्या व्यक्तीचा धंदा व व्यवसाय यांसाठी वापर करणे या विरोधात आयपीसी कलम 416, 497, 420 लागू शकतात आणि त्यासाठी कमीत कमी 1 वर्ष अधिक दंड आणि जास्तीत जास्त 7 वर्षे कैद व दंड अशी शिक्षा होऊ शकते. .....

( यानंतर श्री. सरफरे .... 3झेड 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

म्हणजे 12 व्या कलमामध्ये जे समाविष्ट केले आहे त्याकरीता हे विधेयक आणले आहे असे सांगितले. अशाप्रकारची तरतूद आय.पी.सी. मध्ये असल्यामुळे नवीन कायद्यातील कलम 19(6) प्रमाणे अशाप्रकारची तरतूद करता येऊ शकत नाही. त्यामुळे घटनात्मकदृष्टया हे कलम कां समाविष्ट करावे असा प्रश्न आहे? सभापती महोदय, याठिकाणी घटनेच्या संदर्भात सर्व बाबी मांडीत असतांना मी माननीय सभापतींना परवा लेखी कळविले होते, ते मघाशी सभागृहामध्ये वाचून दाखविले आहे. या विधेयकाला विधीमंडळाची मंजूरी घेण्यापूर्वी घटनात्मकदृष्टया हे विधेयक आपल्याला मांडता येणार नाही असा माझा आक्षेप होता. या सदनामध्ये बारबालाच्या संदर्भात विधेयक आले होते त्याचा मी मघाशी उल्लेख केला. त्या विधेयकाचे साऱ्या महाराष्ट्राने स्वागत केले. बारबालासंबंधीचा कायदा करणे योग्य होते. त्याचप्रमाणे अंधश्रध्दा निर्मूलनासंबंधीचा कायदा व्हावा या मताशी मी आणि माझा पक्ष, माझे सर्व सहकारी, युतीचे सर्व सहकारी ठाम आहोत. अंधश्रध्देतून महाराष्ट्रात निर्माण झालेली अमानुषता ताबडतोब गेली पाहिजे या मताचा मी आहे. त्याचवेळी मघाशी सांगितल्याप्रमाणे या विधेयकामध्ये कळत न कळत मंत्रिमहोदयांची, सरकारची इच्छा नसली तरी हिंदू धर्मावर निर्बंध येईल अशाप्रकारचे वाक्य आणले आहे. हे विधेयक 12 व्या कलमापर्यंत होते, त्यानंतर 13 वे कलम आले. त्या कलमामध्ये धार्मिक संदर्भ आला. तो आल्यानंतर केवळ आम्ही हिंदू आहोत, आमच्या पक्षाचा अजेंडा हिंदू आहे, म्हणून आपण हे विधेयक आणीत आहात. म्हणून आपण घटनात्मकदृष्टया हे विधेयक मांडण्याचा प्रयत्न केला आहे असे माझे ठाम मत आहे. सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात सुप्रिम कोर्टाचे वेगवेगळे निर्णय असतील, आपण बारबालाच्या संदर्भात कायदा संमत केला तेव्हा या सरकारचे आणि आबांचे आम्ही कौतुक केले. आजच्या घटकेला जर आपल्या हातून काही चूक झाली असेल तर ती आपण सुधारली पाहिजे. या विधीमंडळामध्ये घटनेला अनुसरुन कायदा न होता घटनाविरोधी कायदा होत आहे अशाप्रकारचे चित्र महाराष्ट्रापुढे जाता कामा नये असे आपल्याला प्रामाणिकपणे वाटते. बारबालांच्या कायद्याच्या संदर्भात श्री.निखिल वागळे यांनी "आपले महानगर" या सायंदैनिकामध्ये लिहिलेल्या लेखामध्ये जे म्हटले आहे ते आपणास वाचून दाखवितो. "कोणताही कायदा करताना अतिउत्साहापेक्षा सर्व बाजूंचा साकल्याने विचार करावा लागतो हा धडा या प्रकरणातून त्यांनी घेतला तर... म्हणजे या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभागृहाने, ते उपकारक ठरेल. म्हणजे, केवळ समाज सुधारणेची इच्छा महत्वाची नाही त्यासाठी वापरले जाणारे मार्ग योग्य आहेत की नाही यावरही विचार व्हायला हवा". अशाप्रकारचे स्पष्टीकरण अग्रलेख लिहितांना श्री. निखिल वागळे यांनी केले आहे. या कायद्याच्या संदर्भात आपल्या सभागृहाची सॅंटीटी, आपल्या बुध्दिमत्तेचा प्रश्न आहे, आपल्या कार्यप्रणालीचा प्रश्न, आपण घटनात्मक काम करीत नाही काय हा प्रश्न आहे? म्हणून या विधेयकाच्या संदर्भात खूप तरतूदी मांडल्या आहेत. आणि सुप्रिम कोर्टाचे 25 जज्जमेंट माझ्याकडे आहेत. तरीसुध्दा मांडलेले दाखले पूरे आहेत. त्यामध्ये धर्माच्या सर्व बाबीसंबंधात जज्जमेंट आले आहेत. अगदी धार्मिक भावनेपासून, प्रार्थनेपासून सर्व बाबी त्यामध्ये आल्या आहेत. म्हणून मी आपणाला विनंती करतो की, या विधेयकावरील चर्चा सुरु होण्यापूर्वी हे विधेयक मांडण्यास परवानगी दिली तर या विधेयकावर मी निश्चितपणे बोलायला सुरुवात करणार आहे.माझे अधिकृत भाषण सभागृहाच्या रेकॉर्डवर आहे, माननीय सभापतींना दिलेले पत्र देखील रेकॉर्डवर आहे. सभापती महोदय, सन 2005 चे विधानसभा विधेयक क्रमांक 89 वरील चर्चा आपण आता थांबवावी अशी मी आपणास विनंती करतो. आणि या संबंधात घटनात्मक दृष्टया महाराष्ट्र राज्याच्या अभियोक्त्यांचे मत सभागृहाने घ्यावे अशी मी विनंती करतो. अन्यथा, माननीय मंत्रिमहोदय, लॉ सेक्रेटरी, माननीय कार्यकारी मंत्री, माननीय सभापती आणि विधीमंडळाच्या सचिवांना रितसर लिगल नोटीस बजावू की, असे करणे गैर ठरेल, कृपया आपण असे करु नका.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरू....

मी सुरुवातीला सगळे सांगितलेले आहे. म्हणून मी विनंती करतो की, घटनाबाह्य विधेयक मंजूर झाले तर त्याची संपूर्ण जबाबदारी सामाजिक न्याय मंत्र्यांवर राहील, हे मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. अशाप्रकारचे कृत्य घडू नये, अशी प्रामाणिक इच्छा व्यक्त करतो. या विधेयकातील तरतुदी आक्षेपार्ह आहेत. म्हणून महाअभियोक्ता यांचे याबाबतीतील कायदेशीर मत घेऊन या बिलावर चर्चा पुढे सुरू ठेवावी, अन्यथा या बिलावर चर्चा करू नये, अशी मी नम्र विनंती करतो.

श्री.पांडुरंग फुंडकर : या बिलावर चर्चा होण्यापूर्वी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या बिलासंबंधी घटनात्मक पेच निर्माण केलेला आहे. या संबंधाने त्यांनी सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचे अनेक दाखले दिले. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार एखाद्या धर्मावर बाधा आणणारे बील आणू नये. हे बील धर्माची परंपरा, श्रध्दा यावर बंधन आणणारे आहे. एवढेच म्हणणे आहे की, हे जादुटोणा, तंत्र, मंत्र असेल तर त्या संबंधात सध्याच्या कायद्यामध्ये पुरेशा तरतुदी आहेत, त्या सन्माननीय सदस्यांनी वाचून दाखविल्या. असे असताना, हे बील आणण्याचा मंत्री महोदयांनी प्रयत्न चालविलेला आहे. माझी विनंती आहे की, बारबालाच्या संबंधातील बील दोन्ही सभागृहाने मंजूर केले, परंतु त्या विधेयकाच्याबाबतीत शासनाची फसगत झाली. म्हणून या विधेयकाच्या तरतुदींचा कायदेशीर अभ्यास होणे आवश्यक आहे. यासाठी ॲडव्होकेट जनरल यांचे मत घेऊन मग हे बील चर्चेला आणावे.

**उपसभापती** : जे बील चर्चेला आणलेले आहे त्या बिलाच्या एकंदरीत घटनात्मक क्षमतेबद्दल सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी बराचसा ऊहापोह केला. त्यांनी बरेचसे मुद्दे मांडलेले आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय आणि विविध अधिनियमांचे दाखले दिलेले आहेत. हे विधेयक सभागृहामध्ये मांडले गेलेले आहे,त्यावर सन्माननीय सदस्य ऑन लेग आहेत. त्याबाबत घाईगर्दीने मी निर्णय घेणार नाही. परंतु आज याबाबत सखोल अभ्यास करून, माननीय सभापती महोदयांबरोबर व्यवस्थित चर्चा करून, उद्याच्या कामकाजामध्ये या बिलाची पुढील कार्यवाही सुरू होईल. कार्यवाही सुरू करण्यापूर्वी आज जे घटनात्मक प्रश्न उपस्थित केलेले आहेत, त्याबाबत माननीय सभापतींशी चर्चा करुन रेकॉर्ड तपासून निर्णय घेता येईल. त्यानंतर उद्या या बिलावर चर्चा सुरु होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/

श्री.गुरूनाथ कुलकर्णी : सन्माननीय सदस्य दिवाकर रावते यांनी घटनेतील कलमे आणि निरनिराळे सुप्रीम कोर्टाचे निवाडे वाचून दाखविले. त्याचे चुकीचे इंटरप्रिटेशन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. माझ्या समजुतीप्रमाणे सुप्रीम कोर्टाचे जज्जमेंट या संपूर्ण विधेयकाशी रिलेव्हंट नाही हे मी पटवून देईन. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी घटनेतील ज्या तरतुदी वाचून दाखविल्या त्या ग्राह्य धरून निर्णय घेणार असाल तर त्यापूर्वी मला बोलण्याची आपण परवानगी दिली पाहिजे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : पहिली गोष्ट अशी की, सन्माननीय सदस्यांनी दिलेले जे दाखले आहेत ते ग्राह्य धरुन निर्णय घेऊ असे मी कोठेही म्हटलेले नाही. मी असे सांगितले की, सन्माननीय सदस्यांनी ज्या गोष्टी सभागृहासमोर मांडलेल्या आहेत, याच्या अनुषंगाने यापूर्वी या विधेयकाच्या बाबतीत या सभागृहामध्ये ज्या पध्दतीने कामकाज झाले त्या सर्व बाबींचा एकत्रित विचार करुन मगच याबाबतचा निर्णय उद्या सभागृहात जाहीर करण्यात येईल. त्यानंतर या बिलावरील कामकाज चालू होईल. मी या बिलावरची चर्चा बंद केलेली नाही. चर्चेकरिता दरवाजे मोकळे ठेवलेले आहेत. उद्या याबाबत निर्णय झाल्यावर ज्या सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे असेल त्यांनी बोलावे.

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या बिलाच्या संदर्भामध्ये घटनात्मक मुद्दा उपस्थित केलेला आहे. आर्टिकल 25 प्रमाणे कायदा करता येतो परंतु शेड्यूलमधील पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या लिस्टमध्ये जे विषय आहेत त्यामध्ये धर्माच्या संदर्भात काही म्हटलेले नाही, त्यामुळे हा कायदा करता येणार नाही असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. तो पेच त्यांनी निर्माण केलेला आहे. मला असे म्हणावयाचे आहे की, हा जो कायदा आहे यामध्ये आम्ही कोणत्याही धर्माला बाधा आणत नाही. जे 12 कलमांचे परिशिष्ट लावलेले आहे तेवढ्यापुरताच हा कायदा मर्यादित आहे. त्यामुळे कोणत्याही धर्माला बाधा आणली जात नाही. आर्टिकल 25 (अे) मध्ये याबाबत सांगितलेले आहे. तसेच आर्टिकल 25 (बी) मध्ये समाजव्यवस्था, समाजस्वास्थ्य आणि आरोग्य सुधारण्यासाठी शासनाला कायदा करता येतो आणि त्यानुसार आम्ही हे बिल आणलेले आहे. आपण म्हणाला की, या बिलाची कायदेशीर बाजू समजावून घेऊन आम्ही निर्णय करु. मला असे वाटते की, मी हे बिल मांडलेले आहे. हे बिल पुर:स्थापित झ ाालेले आहे. त्यावर आता निर्णय देण्याची आवश्यकता नाही. बिल प्रत्यक्षात इंट्रोड्यूस झालेले आहे. उद्या यावर चर्चा ठेवावी याबाबत माझे काही म्हणणे नाही. परंतु हे बिल पुर:स्थापित झालेले आहे.

श्री. दिवाकर रावते : हे बिल पुर:स्थापित झालेले नाही.

**उपसभापती** : मी सुस्पष्ट शब्दात सांगितले की, या सभागृहामध्ये आता ही तिसऱ्यांदा किंवा चौथ्यांदा चर्चा चालू आहे. प्रत्यक्षात या बिलावर सगळ्यांना बोलावयाचे आहे, सगळ्यांना चर्चा

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

**उपसभापती** ........

करावयाची आहे. शासनाचीही अशी संकल्पना आहे की, हे बिल योग्यरित्या मांडलेले आहे. महाराष्ट्रातील हा कायदा सर्व धर्मियांना लागू होणारा कायदा आहे. मी यातील धर्म हा शब्द सोडून देतो पण आपण जो कायदा करतो तो सगळ्यांना समान आहे. हा कायदा या सभागृहात सर्वसंमतीने संमत होऊन जनतेपर्यंत पोहोचला तर जो संदेश आपल्याला जनतेला द्यावयाचा आहे त्यादृष्टीने ते योग्य होईल. सन्माननीय सदस्यांनी जे घटनात्मक मुद्दे मांडलेले आहेत ते योग्य आहेत की, अयोग्य आहेत याची तपासणी न करता आता निर्णय दिला तर ते अयोग्य होईल. यासंदर्भातील आधीचा रेकॉर्ड तपासला पाहिजे. या विधेयकावर चर्चा करण्याची ही तिसरी वेळ आहे. मी जर झटकन एखादा निर्णय दिला आणि त्याला कोणी चॅलेंज केले तर ते बरोबर होणार नाही. म्हणून मी या ठिकाणी असा निर्णय दिला की, यासंदर्भात उद्या सकाळी सन्माननीय सभापतीं महोदयांशी सखोल चर्चा करुन, आधीचे प्रोसीडींग वाचून त्यासंदर्भात उद्या निर्णय घेतला जाईल. हे बिल उद्या चर्चेला येईल. आता यानंतर माननीय वित्त मंत्र्यांनी पुरवणी विनियोजन विधेयक मांडावे.

----

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक

L.A. BILL NO.CI OF 2006

( A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY FIRST DAY OF MARCH 2007.)

श्री. जयंत पाटील ( अर्थ व नियोजन मंत्री) : महोदय, महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2006चे वि.स.वि. क्रमांक 101, दिनांक 31 मार्च 2007 रोजी संपणा-या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या असे निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राचे राज्यपाल त्यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो.

(खंड 2 व 3, अनुसूची खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एकापाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**उपसभापती** : ज्याअर्थी, परिषदेने कोणतीही शिफारस केलेली नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही अशा संदेशासह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येत आहे.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विनियोजन (अधिक खर्च) विधेयक

L.A.BILL NO. CII OF 2006

( A BILL TO PROVIDE FOR THE AUTHORISATION OF APPROPRIATION OF MONEYS OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE TO MEET THE AMOUNTS SPENT ON CERTAIN SERVICES DURING THE FINANCIAL YEAR ENDED ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 1999, IN EXCESS OF THE AMOUNTS GRANTED FOR THOSE SERVICES AND FOR THAT YEAR.)

श्री. जयंत पाटील ( अर्थ व नियोजन मंत्री) : महोदय, महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2006चे वि.स.वि. क्रमांक 102, दिनांक 31 मार्च 1999 रोजी संपलेल्या वित्तीय वर्षातील विवक्षित कामांसाठी व त्या वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या रकमांहून, त्या वर्षात त्या विवक्षित कामांवर ज्या अधिक रकमा खर्च करण्यात आल्या तो खर्च भागविण्यासाठी राज्याच्या एकत्रित निधीतून केलेल्या पैशांच्या विनियोजनास अधिकृत मंजुरी देण्याकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या असे निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राचे राज्यपाल त्यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडशः सभागृहाला सादर करतो.

(खंड 2 व 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एकापाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**उपसभापती** : ज्याअर्थी, परिषदेने कोणतीही शिफारस केलेली नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही अशा संदेशासह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येत आहे.

--

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विनियोजन (द्वितीय अधिक खर्च) विधेयक

L.A. BILL NO. CIII OF 2006

(A BILL TO PROVIDE FOR THE AUTHORISATION OF APPROPRIATION OF MONEYS OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE TO MEET THE AMOUNTS SPENT ON CERTAIN SERVICES DURING THE FINANCIAL YEAR ENDED ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 2000, IN EXCESS OF THE AMOUNTS GRANTED FOR THOSE SERVICES AND FOR THAT YEAR.)

श्री. जयंत पाटील ( अर्थ व नियोजन मंत्री) : महोदय, महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2006चे वि.स.वि. क्रमांक 103, दिनांक 31 मार्च 2000 रोजी संपलेल्या वित्तीय वर्षातील विवक्षित कामांसाठी व त्या वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या रकमांहून, त्या वर्षात त्या विवक्षित कामांवर ज्या अधिक रकमा खर्च करण्यात आल्या तो खर्च भागविण्यासाठी राज्याच्या एकत्रित निधीतून केलेल्या पैशांच्या विनियोजनास अधिकृत मंजुरी देण्याकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या असे निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राचे राज्यपाल त्यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडशः सभागृहाला सादर करतो.

(खंड 2 व 3, अनुसूची खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एकापाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**उपसभापती** : ज्याअर्थी, परिषदेने कोणतीही शिफारस केलेली नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही अशा संदेशासह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येत आहे.

---

...4..



**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत व डॉ. नीलम गो-हे यांनी "दिनांक 11.12.2006 रोजी काशिमीरा (भाईंदर, जि.ठाणे) येथे दारुच्या नशेत भरधाव वेगाने टेम्पो चालविल्याने तो फूटपाथवर चढून फूटपाथवर झोपलेल्या मजूर पती-पत्नीचे व त्यांच्या भाचीचा टेम्पोखाली चिरडून मृत्यू होणे व दोघे गंभीर जखमी होणे, पोलिसांनी या प्रकरणी टेम्पो चालकावर कुठल्याही प्रकारची कारवाई न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे व रामनाथ मोते यांनी "दगड चाळ, 81 मॉटलँड रोड, मुंबई सेंट्रल, ही इमारत 1976 साली म्हाडाने दुरुस्तीला ताब्यात घेऊन या इमारतीतील 84 रहिवाशांना संक्रमण शिबिरात स्थलांतर करुन इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्याने मूळ रहिवाशांना त्यांचे गाळे परत न देता त्यांच्या जागी इतर घुसखोरांना गाळे दिल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर व प्रतापराव सोनवणे यांनी "राज्यातील शिक्षकांच्या सी.पी.एफ. संबंधी शासनाने निर्णय न घेतल्याने सेवानिवृत्त झालेल्या अनेक शिक्षकांना पेन्शन मिळण्यापासून वंचित ठेवल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी "ग्रामविकास विद्यालय, पाटाळा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर या शाळेस मान्यता देतेवेळी झालेल्या गैरप्रकारात गुंतलेल्या श्री. आसेकर या शिक्षकाला तात्काळ कामावरुन कमी करुन पात्र शिक्षकांना मुख्याध्यापक म्हणून मान्यता देण्यात

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

येऊन अतिप्रदान झालेले असल्यास संबंधितांकडून वसूल करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.  तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.   मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

--

...नंतर श्री. भोगले...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ठाणे-बेलापूर पट्टयातील पॉयशा इंडस्ट्रिअल कंपनीतील कामगारांची देणी न मिळणे

**मु. शी.** : ठाणे-बेलापूर पट्टयातील पॉयशा इंडस्ट्रिअल कंपनीतील कामगारांची देणी न मिळणे याबाबत सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.गणेश नाईक ( कामगारमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते यांनी "ठाणे-बेलापूर पट्टयातील पॉयशा इंडस्ट्रिअल कंपनीतील कामगारांची देणी न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, ठाणे-बेलापूर पट्टयातील पोयशा इंडस्ट्रिअल कंपनीमध्ये गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तेथे 700 ते 800 कामगार काम करीत होते. 1994 साली कंपनीमध्ये कायमची टाळेबंदी लागू झाली. 1998 साली सर्व कामगारांच्या थकबाकीची माहिती घेतली गेली. 2004 साली लिक्वीडेटरने 20 टक्के काटछाट करुन थकबाकी किती आहे हे निश्चित केले. आजपर्यंत 800 कामगारांची उपासमार सुरु आहे. 800 पैकी 137 कामगारांचे निधन झाले असून गेल्या 7-8 वर्षात लिक्वीडेटरच्या माध्यमातून थकबाकी न मिळाल्यामुळे शासनाने त्वरित निर्णय घ्यावा अशी विनंती करतो.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, निवेदनामध्ये म्हटल्याप्रमाणे माननीय उच्च न्यायालयाच्या डी.आर.टी.च्या माध्यमातून निकाल दिला होता. त्यानुसार मालमत्तेची विक्री करण्यास मनाई केली आहे. सध्या हे प्रकरण न्यायालयात असून ज्या दिवशी प्रकरण संपुष्टात येईल त्या दिवशी कामगारांची देणी देण्याचा विचार केला जाईल.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

**पृ. शी.** : वीज वितरण कंपनीमध्ये निकृष्ट दर्जाच्या वीज केबल्स व ट्रान्सफॉर्मरची करण्यात आलेली खरेदी.

**मु. शी.** : वीज वितरण कंपनीमध्ये निकृष्ट दर्जाच्या वीज केबल्स व ट्रान्सफॉर्मरची करण्यात आलेली खरेदी याबाबत श्री.पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□□य विरोधी पक्षनेता श्री.पांडुरंग फुंडकर यां□ ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्षनेता ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या वीज केबल्स व ट्रान्सफॉर्मर खरेदीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराचा विषय 4-5 दिवस तारांकित प्रश्न, पुरवणी मागण्या, अर्धातास चर्चेच्या माध्यमातून सातत्याने मी सभागृहात मांडीत आहे व शासन प्रत्येक वेळी अपूर्ण व असमाधानकारक उत्तर देऊन चालढकल करीत आहे. त्यामुळे भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांना व कंत्राटदारांना संरक्षण मिळत आहे. दिनांक 19 मार्च, 2006 रोजी तारांकित प्रश्न क्रमांक 15945 ला उत्तर देताना मंत्रीमहोदयांनी हे स्पष्ट मान्य केले की, सन 2004-05 ते 2005-06 या कालावधीत विद्युत मंडळाकडून 10 कोटी रुपयांची सदोष वीज केबल खरेदी झालेली आहे. जर एका वर्षात 10 कोटी रुपयांची सदोष वीज केबल खरेदी होत असेल तर गेल्या 5 वर्षात वीज केबल व ट्रान्सफॉर्मर खरेदीमध्ये गैरव्यवहार व भ्रष्टाचार झाल्याची आपल्याला कल्पना येईल. ज्या कंपनीकडून सदोष वीज केबल व ट्रान्सफॉर्मर खरेदी करण्यात आलेली आहे त्यांच्याकडून ती बदलून घेतली असती तर त्या खरेदीने कदाचित समाधान झाले असते. परंतु इतक्या वेळा हा विषय तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून उपस्थित करुन, अर्धातास चर्चा व इतर आयुधांच्या माध्यमातून उपस्थित करुनही सदोष वीज केबल व ट्रान्सफॉर्मर बदलून घेतली जात नाहीत व खरेदी करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई केली जात नाही. उलट परवा दिनांक 8 डिसेंबर, 2006 रोजीच्या प्रश्नोत्तराच्या यादीत या प्रश्नाला जे लेखी स्वरुपात उत्तर देण्यात आले ते अतिशय मजेशीर आहे. उत्तरात म्हटले आहे की, वीज केबल खरेदी प्रकरणी जे 17 अभियंते आतापर्यंत दोषी आढळले त्यापैकी 5 जण सेवानिवृत्त झाले. एकाचे निधन झाले. तसेच सदोष ट्रान्सफॉर्मर खरेदीत ज्या 8 लोकांना दोषी धरण्यात आले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...........

त्यापैकी 2 अधिकारी सेवानिवृत्त झाले असे उत्तरात म्हटले आहे. पुढे म्हटले आहे की, सेवानिवृत्तीनंतर कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याची तरतूद कंपनीच्या कर्मचारी सेवानियमामध्ये नसल्यामुळे शिस्तभंगाची कारवाई करणे शक्य नाही. याचा अर्थ जोपर्यंत अधिकारी सेवानिवृत्त होत नाही तोपर्यंत त्यांची चौकशी चालूच राहणार आहे. शासनाच्या या दिरंगाईचा अर्थ विद्युत मंडळाचे जे अभियंता दोषी आढळले आहेत त्यांच्या सेवानिवृत्तीपर्यंत चौकशी सुरु ठेवायची आणि सेवानिवृत्त झाल्यानंतर सेवानियमात तरतूद नाही म्हणून मुक्त करायचे. मला वाटते शासनाची ही कृती गंभीर, भ्रष्टाचाराला संरक्षण देणारी आहे. म्हणूनच या गंभीर बाबीकडे सभागृहाचे लक्ष वेधण्यासाठी मी विशेष उल्लेख करीत आहे.

-------

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मौजे मेरी, उनगाव (ता.कामठी, जि. नागपूर ) परिसरात असलेल्या प्लांट कंपनीपासून होणारे प्रदुषण.

**मु. शी.** : मौजे मेरी, उनगाव (ता.कामठी, जि. नागपूर ) परिसरात असलेल्या प्लांट कंपनीपासून होणारे प्रदुषण याबाबत प्रा. जोगेंद्र कवाडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यानी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे त्यांनी ती मांडावी.

प्रा. जोगेंद्र कवाडे ( नामनियुक्त ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मौजे. मेरी, उनगाव (ता.कामठी जि. नागपूर) परिसरात असलेल्या स्टील प्लांट कंपनीपासून होणारे प्रदुषण या प्रश्नाकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. या स्टील कंपनीमधून केमिकल वॉटर निघते त्यामुळे त्या परिसरातील गावामध्ये प्रचंड प्रदुषण झाले असून त्यामुळे शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. गावातील नागरिकांचे आरोग्य योग्य रहावे आणि शेत मालाची हानी टाळण्यासाठी शासनाने ही जी कंपनी आहे ती कंपनी इतर सुरक्षित ठिकाणी हलविण्याबाबत निर्देष द्यावेत अशी विनंती आहे. मेरी, उनगाव(ता.कामठी जि. नागपूर) परिसरात असलेल्या स्टील प्लांट कंपनीपासून परिसरात प्रदुषण वाढलेले आहे त्यामुळे गावातील ग्रामस्थांना गावात राहणे जिकिरीचे झाले आहे. तसेच शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान होत असून सदर गावातील लोकांना विस्थापित होण्याची वेळ येऊ नये, गावातील लोकांचे आरोग्य चांगले रहावे तसचे शेतीचे नुकसान होऊ नये यांसाठी मंत्री महोदयांनी ही कंपनी इतर सुरक्षित ठिकाणी हलवावी अशी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी विनंती करतो.

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अस्थायी वैद्यकीय अधिका-यांना नियमित सेवेत सामावून घेण्याबाबत.

**मु. शी.** : अस्थायी वैद्यकीय अधिका-यांना नियमित सेवेत सामावून घेण्याबाबत श्री. प्रतापराव सोनवणे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. प्रतापराव सोनवणे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. प्रतापराव सोनवणे ( नाशिक विभाग पदवीधर ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र राजपत्रित वैद्यकीय अधिकारी संघटना म्हणजेच मॅग्मो ही संघटना राज्यभरच्या वैद्यकीय अधिका-यांच्या हितासाठी कार्य करीत आहे. सदर संघटनेने आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी दि. 17.11.2006 पासून राज्यभर संपूर्ण असहकार आंदोलन पुकारले होते व त्यात सुमारे 4000 वैद्यकीय अधिकारी सहभागी झाले होते.

शासनाने सदर आंदोलनाची दखल घेऊन काही मागण्याच्या संदर्भात सहानुभूतिची भूमिका घेऊन दि. 24.11.2006 रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत अस्थायी अधिकारी गट "अ" म्हणजे MBBS ही पदवी धारण करणा-या सदस्यांच्या प्रलंबित मागण्या मान्य केल्या. मात्र अस्थायी वैद्यकीय अधिकारी गट "ब" म्हणजे BAMS या पदवीधारकांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले.

सभापती महोदय, खरेतर शासन निर्णयानुसार MBBS व BAMS पदवीधारकांना समकक्ष दर्जा दिलेला आहे. या दोनही प्रवर्गाची वेतनश्रेणी समान आहे आणि जबाबदारीही समान आहे. तेव्हा शासनाने गट "अ" व गट"ब" यांच्यात दुजाभाव न ठेवता या सर्वांनाच गट "अ" दर्जात समाविष्ट करण्यात यावे व त्यांच्या सर्व सेवाविषयक बाबी महासंचालक आरोग्य सेवा मुंबई यांचेकडे वर्ग करण्यात याव्यात ही न्याय बाब ठरेल. त्याच प्रमाणे सद्यस्थितीतील शासन आरोग्य सेवेत कार्यरत असणा-या सर्व अस्थायी वैद्यकीय अधिका-यांना स्थायी/कायम करण्यात यावे ही मागणीसुध्दा योग्य असून शासनाने तातडीने हा निर्णय घेऊन संबंधितांना न्याय द्यावा ही मागणी आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रतापराव सोनवणे.....

. सभापती महोदय, दि. 12.12.2006 रोजी सभागृहाचे कामकाजात आरोग्य खात्याच्या एका प्रश्नावर चर्चा होत असताना राज्यभर शासकीय वैद्यकीय अधिका-यांची संख्या अपूरी आहे असे माननीय राज्यमंत्र्यांनी मान्य केले होते. या परिस्थितीवर मार्ग काढण्यासाठी शासकीय वैद्यकीय अधिका-याच्या वर नमूद केलेल्या मागण्या मान्य करणे निश्चित उपयुक्त व परिणामकारक ठरेल अशी भावना मी व्यक्त करतो व शासनाने त्वरीत यासंदर्भात निर्णय घ्यावा अशी मागणी करतो.

--------------

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : लोकसेवा आयोगाद्वारा घेण्यात येणाऱ्या परीक्षांचा निकाल वेळेवर न लागणे

**मु. शी.** : लोकसेवा आयोगाद्वारा घेण्यात येणाऱ्या परीक्षांचा निकाल वेळेवर न लागणे याबाबत श्री.संजय केळकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.संजय केळकर यां□ ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र लोकसेवा आयोग जी परीक्षा घेते त्याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. राज्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या एम.बी.एस.बी.च्या 325 पदांसाठी जवळपास दीडलाख विद्यार्थी परीक्षेसाठी बसले होते. ही परीक्षा दिनांक 5 डिसेंबर 2005 रोजी झाली. परंतु आजमितीपर्यंत या परीक्षेचा निकाल लागलेला नाही. त्यामुळे परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याविषयी प्रश्न उपस्थित झालेला आहे. माझी सूचना आहे की, केंद्रीय लोकसेवा आयोगा प्रमाणे परीक्षेचा निकाल कालबध्द कालावधीत लावण्यात यावा. त्यामुळे विद्यार्थ्यांचा फायदा होणार आहे. माझी मागणी आहे की, दिनांक 5 डिसेंबर 2005 रोजी घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल लवकरात लवकर लावण्यात यावा.

सभापती महोदय, माझी दुसरी विशेष उल्लेखाची सूचना अशी आहे की......

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांना सांगू इच्छितो की, एका वेळी फक्त एक विशेष उल्लेखाची सूचना मांडता येते.

मी माननीय मंत्रिमहोदयांचे एका बाबीकडे लक्ष वेधू इच्छितो, ठाणे महापालिकेचे आयुक्त रजेवर गेले असल्यामुळे त्यांचा कार्यभार ठाण्याचे जिल्हाधिकारी यांचेकडे देण्यात आलेला आहे. त्यामुळे त्यांचेवर कामाचा ताण पडत आहे. आता निवडणुका देखील जवळ आलेल्या आहेत. त्यांना जिल्ह्याचे काम देखील पहावे लागते. ठाणे जिल्ह्याचे आयुक्त श्री.संजय सेठी हे आजारी असल्यामुळे रजेवर गेलेले आहेत. त्यांची तब्बेत बरी झाली असेल तर त्यांना कामावर बोलवावे किंवा दुसऱ्या आयुक्तांची कायम स्वरुपी नियुक्ती करण्यात यावी.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : ठाणे महापालिकेच्या आयुक्त श्री.संजय सेठी हे मेडीकल रजेवर आहेत. त्यांचा आजार कितपत सिरिअस आहे यासंबंधी मला माहिती नाही.......

**उपसभापती** : या संदर्भातील माहिती आपण उद्या सायंकाळपर्यंत सदनाला द्यावी.

श्री.राजेश टोपे : होय.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, ठाणे महानगरपालिकेमध्ये फक्त आयुक्त नव्हे तर उपायुक्त, नगररचनाकार, शिक्षणाधिकारी या सर्व महत्वाच्या जागा गेल्या तीन महिन्यांपासून रिक्त आहेत.

**उपसभापती** : नगररचनाकार जागेवर नेमणूक झालेली आहे. सुप्रीम कोर्टात ते प्रकरण पेडींग आहे. पाच-सहा दिवसांत निर्णय होईल. शिक्षणाधिकाऱ्यांची नेमणूक झालेली आहे. उपायुक्त पदाच्याबाबत मंत्रिमहोदय निर्णय घेतील.

-----------

..3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : फिल्मसिटीच्या तत्कालीन संचालकांनी केलेला गैरव्यवहार

**मु.शी.**: फिल्मसिटीच्या तत्कालीन संचालकांनी केलेला गैरव्यवहार याबाबत श्री.मधुकर चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" फिल्मसिटीचे तात्कालीन संचालक श्री.गोविंद स्वरुप यांनी केलेला गैरव्यवहार, या गंभीर प्रकरणावर मार्च 2006 च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी, विशेष उल्लेख अशी विविध आयुधे वापरुन संबंधित विभागाच्या मंत्र्यांकडून एक महिन्याच्या आत गुन्हा अन्वेषण विभागाकडून चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते. या आश्वासनानुसार कारवाई होण्याकरिता दिनांक 13 एप्रिल, 6मे, 1 जुलै व 18 सप्टेंबर 2006 अशा विविध तारखांना संबंधित खात्याच्या मंत्र्यांबरोबर पत्रव्यवहार करुनही आजपर्यंत या गैरव्यवहारातील दोषींवर कारवाई झाली नाही. सदर विषय अत्यंत महत्वाचा असल्यामुळे तो मी आज सभागृहामध्ये "विशेष उल्लेखद्वारे" मांडत आहे.

---------------

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मुंबई उपनगरी रेल्वे प्रवाशांसाठी असलेल्या एमयुटीपी-2 प्रकल्पाबाबत

**मु.शी.** : मुंबई उपनगरी रेल्वे प्रवाशांसाठी असलेल्या एमयुटीपी-2 प्रकल्पाबाबत
श्री.मधुकर सरपोतदार, श्री.दिपक सावंत, श्री.दिवाकर रावते,
श्री.अरविंद सावंत, ॲड.अनिल परब, डॉ.निलम गोऱ्हे,
श्री. परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मधुकर सरपोतदार : (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मुंबई उपनगर रेल्वेच्या विस्तारासाठी आखलेल्या एमयुटीपी-2 साठी सुमारे पाच हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून त्यातील निम्मी रक्कम जागतिक बँकेकडून कर्जरुपाने मिळणे, रेल्वेकडील उपलब्ध जमिनीचा व्यापारी तत्वावर उपयोग करुन एक हजार कोटी रुपये उपलब्ध होणे व उरलेले अंदाजे 1500 कोटी रुपये रेल्वे मंत्रालय व राज्य शासन यांनी समसमान रक्कमेचा आपआपला वाटा उचलण्याची तरतूद असतांना राज्य शासन आपल्या रक्कमेचा हिस्सा देण्याबाबत जाणीवपूर्वक करीत असलेली टाळाटाळ, परिणामी सदर रेल्वे प्रकल्पास उशिर होणे, शासनाने आपल्या वाटयाचे पैसे न दिल्यास हा प्रकल्प बारगळणे, अन्यथा रेल्वे प्रवाशांच्या तिकिट पासेसवर सरचार्ज लावून प्रचंड रक्कम वसूल करण्याचा रेल्वे प्रशासनापुढे असलेला प्रस्ताव, आधीच महागाईमुळे त्रस्त झालेल्या मुंबईतील लाखो रेल्वे प्रवाशांवर सरचार्जच्या रुपाने सुमारे 750 कोटी रुपयांचा पडणारा अधिभार, सदर शासनाच्या वाट्याची रक्कम एकाच वर्षी भरणे शक्य नसल्यास ती हप्त्याने भरण्याची रेल्वे प्रशासनाने दिलेली सवलत, तरीही शासन सदरची रक्कम भरण्यास दाखवित असलेली अनास्था, परिणामी मुंबई उपनगरी प्रवाशांसाठी असलेला एमयुटीपी-2 प्रकल्प उखडण्याची अथवा तो रद्द होण्याची निर्माण झालेला धोका, त्यामुळे जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता याप्रकरणी शासनाने तातडीने केलेली व करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया "

4G-2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे (नगर विकास व सामान्य प्रशासन विभाग राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

4G-3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या संदर्भात फार मोठे निवेदन दिलेले आहे. पण निवेदनाचा अर्थ समजल्यानंतर असे लक्षात येते की, या प्रोजेक्टच्या कामामध्ये काही प्रगती झ ालेली नाही. माझा सन्माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न आहे की, रेल्वेचा बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथील प्लॉट विकल्यानंतर काही पैसे येणार आहेत असे समजले आहे परंतु हा प्लॉट बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथे नसून दुसऱ्या कोणत्या तरी ठिकाणी आहे असे होऊ नये असे वाटते. माझ्या माहितीप्रमाणे तो रेल्वे स्टेशनच्या पूर्वेस आहे. या प्लॉटची व्यवस्थित माहिती घेण्यात येईल का ? दुसरा प्रश्न आहे की, एमयुटीपी-2 या प्रकल्पासाठी 50-50 टक्के वाटा रेल्वे आणि महाराष्ट्र सरकारचा राहणार आहे, हा प्रकल्प फक्त रेल्वे प्रशासनाने करावयाचा म्हणजे अवघड आहे म्हणून महाराष्ट्र शासनानेसुध्दा भार सोसाण्याची तयारी दाखविली आहे त्याबद्दल धन्यवाद. मुंबईतील लाखो प्रवांशावर याचा अधिक अधिभार पडणार नाही याची काळजी घेण्यात येईल का ? महाराष्ट्र शासन व रेल्वे प्रशासन या प्रकल्पाबाबत निर्णय कधी घेणार आहे याची माहिती देण्यात येईल का?

श्री.राजेश टोपे : एमयुटीपी-2 या प्रकल्पाची मी थोडक्यात माहिती सांगू इच्छितो. हा प्रकल्प मुंबई रेल्वे विकास कार्पोरेशनने सादर केलेला आहे, हा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर येणार आहे, हा भूखंड विकायचा आहे किंवा नाही ? याबाबतचा निर्णय मंत्रीमंडळाच्या निर्णयानंतर होईल. साधारणपणे बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथे पाच हेक्टर जमीन आहे. तिची अंदाजे किंमत 900 कोटी रुपये आहे. 1/3 मुंबई शहर 1/3 महाराष्ट्र राज्य, 1/3 देशासाठी असा याबाबत नियम आहे, यातून मिळणाऱ्या महसूली निधीचा वापर या प्रोजेक्टसाठी करण्यात येईल. हा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर येणार आहे, त्यानंतर रेल्वे मंत्रालयाकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल, या प्रस्तावाला मान्यता मिळाल्यानंतर प्लॉट विक्रीचा निर्णय घेण्यात येईल.

4G-4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, याबाबत मला जे वाटते ते खरे आहे, मंत्रीमंडळासमोर प्रस्ताव गेलेला नाही. रेल्वे प्रशासनाकडे प्रस्ताव गेलेला नाही, आपण फक्त याबाबत तयारी सुरु केलेली आहे. दुपारच्या गर्दीच्या वेळी सुमारे पन्नास हजार प्रवाशी उपनगरी रेल्वेतून प्रवास करतात, असे आपण दिलेले आहे. पण हे पन्नास हजार प्रवासी कोणत्या वेळी प्रवास करतात ? कोणत्या परिस्थितीत प्रवास करतात ? याबाबतची वस्तुस्थिती आपण पहावी. आपण हवेमध्ये तीर मारत आहात. ही योजना प्रत्यक्षात कधी अंमलात येईल या विषयी निश्चित माहिती देण्यात येईल का ?

श्री.राजेश टोपे : मुंबई महानगराच्या दृष्टीकोनातून, प्रवाशांचा त्रास कमी करण्याच्या व त्यांची व्यवस्था करण्याच्या दृष्टीकोनातून मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा - 2 ( MUTP-II ) राबविण्यात येणार आहे. MUTP-I प्रकल्पाला पूरक प्रकल्प प्रामुख्याने उपनगरी रेल्वेमध्ये सुधारणा करण्यासाठी हाती घेण्यात येणार आहे. त्यात प्रामुख्याने खालील कामांचा समावेश आहे. नवीन रेल्वे गाडयांची खरेदी करणे, कुर्ला ते छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानक पाचवी व सहावी लाईन टाकणे, ठाणे ते दिवा दोन अतिरिक्त लाईन्स करणे, बोरीवली ते मुंबई सेंट्रल सहावी लाईन टाकणे, हर्बर लाईनचा गोरेगांवपर्यत विस्तार करणे, तसेच प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करणे या प्रकल्पाचा अंदाजे खर्च रु.4509 कोटी असून 60 टक्के कर्जाद्वारे व 40 टक्के जमिनीचा विकास इत्यादीतून तो करण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासनाने तत्वत: या प्रकल्पातील 50 टक्के आर्थिक भार उचलण्याची तयारी दर्शविली आहे. मंत्रीमंडळाच्या निर्णयानंतर सदरील प्रस्ताव रेल्वे बोर्डाच्या अंतिम मंजूरीसाठी सादर करुन मंजूरी घेतली जाईल. या प्रस्तावास शक्य तितक्या लवकर मंजूरी मिळण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

..... यानंतर श्री.पुरी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, यासंबंधी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल झाली आहे, ती कोणी दाखल केली ? व त्याबाबत शासनाची भूमिका काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, डॉ.हंसा मुक्ती यांनी माननीय उच्च न्यायालयात मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा क्रमांक -2 ची अंमलबजावणी तात्काळ करण्याबाबत जनहित याचिका क्रमांक 2799/2005 दाखल केली असून सदर याचिकेस अनुसरुन शासनाने सदर प्रकल्पासंदर्भात जनहित तसेच यासंबंधात शासनाची बांधिलकी व शासनाची भूमिका स्पष्ट करणारे शपथपत्र न्यायालयात दाखल केले. त्याबाबतीत महाराष्ट्र शासन जबाबदार नाही.

---------

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : आदिवासी क्षेत्रात काम करणा-या शासकीय व अनुदानित संस्थामधील कर्मचा-यांवर वेतनाच्या बाबतीत झालेला अन्याय

**मु. शी.** : आदिवासी क्षेत्रात काम करणा-या शासकीय व अनुदानित संस्थामधील कर्मचा-यांवर वेतनाच्या बाबतीत झालेला अन्याय यासंबंधी सर्वश्री रामनाथ मोते, श्रीकांत जोशी, प्रतापराव सोनवणे, संजय केळकर,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय आदिवासी मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या शासकीय व अनुदानित संस्थांमधील कर्मचाऱ्यांना दिनांक 6 ऑगस्ट, 2002 च्या शासन निर्णयानुसार मूळ वेतनाच्या 15 टक्के प्रोत्साहनभत्ता व एकस्तर वेतनवाढ अनुज्ञेय असणे, ठाणे जिल्हयातील अतिसंवेदनशील आदिवासी भागातील कर्मचाऱ्यांना 15 टक्के प्रोत्साहन भत्ता लागू असणे, मूळ वेतनश्रेणीतील मूळ वेतन अधिक मूळ वेतनात समाविष्ट केलेला 50 टक्के महागाई भत्ता अनुज्ञेय धरण्याचे आदेश असणे, आदिवासी विकास विभागाने दिनांक 24 जुलै, 2006 च्या आदेशान्वये मूळ वेतन धरतांना 50 टक्के महागाई भत्ता समाविष्ट न करण्याचे आदेश देणे, ठाणे जिल्हयातील आदिवासी भागातील माध्यमिक शाळांमधील शिक्षक शिक्षकेतरांचे या आदेशान्वये नुकसान होणे, 15 टक्के प्रोत्साहन भत्ता देतांना 50 टक्के महागाई भत्ता मूळ वेतन म्हणून ग्राहय न धरणे, शिक्षकांच्या पगारातून दिलेल्या रकमेची वसुली करणे, पेन्शनसाठी व अन्य भत्त्यांसाठी मूळ वेतनात 50 टक्के महागाई भत्ता समाविष्ट करुन लाभ देण्याची तरतूद असणे, आदिवासी विकास विभागाने स्वतंत्रपणे प्रचलित नियमाविरुध्द निर्णय घेणे, आदिवासी भागातील शासकीय कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनवाढ लागू असणे, मात्र अनुदानित संस्थांमधील शिक्षक-शिक्षकेतरांना त्याचा लाभ न देणे, विषमता निर्माण करणे, आदिवासी भागातील शिक्षकांवर अन्याय करणे, याबाबत आदिवासी भागात काम करणाऱ्या शिक्षकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3....

श्री.रविशेठ पाटील ( आदिवासी विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, ही लक्षेवधी सूचना मूळ वेतनासंबंधी आहे. याठिकाणी माननीय वित्त मंत्रीही उपस्थित आहेत, ही चांगली गोष्ट आहे. मूळ वेतनाच्या बाबतीत आपण 2004 मध्ये बदल केला. आपण 50 टक्के डी.ए. मूळ वेतनात मर्ज केला. म्हणजे, वेतनाच्या मूळ वेतन अधिक 50 टक्के अशाप्रकारे आता आपण मूळ वेतन गृहीत धरतो. मूळ वेतनाची एकूण बेरीज केली तर त्यामध्ये इतरही भत्ते दिले जातात. त्यामध्ये महागाई भत्ता, स्थानिक पुरक भत्ता, प्रवास भत्ता, ट्रॅव्हलिंग अलाऊंस दिला जातो. वेतनश्रेणी मूळ वेतन अधिक डी.पी. असे दिले जाते. आज आदिवासी विभागामध्ये काम करणारे शिक्षक आणि शिक्षकेत्तर यांच्या मूळ वेतनात 15 टक्के प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय आहे. त्याप्रमाणे वेतन देण्यास सुरुवात झाली. परंतु मध्यंतरी आदिवासी विभागाचे दिनांक 24 जुलै,2006 रोजी एक साधे पत्रक काढले. तो जी.आर.ही नव्हता. एक साधे पत्रक काढून आदेश दिले की, मूळ वेतनावर 15 टक्के म्हणजे वेतनश्रेणीतील मूळ वेतनावर आपण डी.पी. मर्ज करावयाचा नाही. त्यामध्ये 15 टक्के प्रोत्साहन भत्ता द्यावयाचा नाही, अशाप्रकारचा आदेश काढला. त्या पत्रकाची अंमलबजावणी आदिवासी विभागाने लागलीच केली. याबाबतीत कोणत्याही प्रकारचा शासनाचा निर्णय नसताना, मंत्रिमंडळाने निर्णय घेतला नसतानाही अशाप्रकारचे पत्रक काढून त्याची अंमलबजावणी झाली. ठाणे जिल्हयातील आदिवासी विभागामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना 15 टक्के प्रोत्साहन भत्ता मिळत होता, परंतु तो आपण ऐन दिवाळीच्या सणामध्ये कापून घेतला. सर्व शिक्षकांची आपण मायनस रिकव्हरी केली, हे योग्य नाही. त्यामुळे याठिकाणी आपण मूळ वेतनाची स्पष्टता द्यावी. माननीय वित्त मंत्री याठिकाणी उपस्थित असल्यामुळे त्यांनीही याबाबतीत खुलासा केला तर बरे होईल.

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, प्रोत्साहन भत्ता ही सवलत असून ती मूळ वेतनावर देय आहे. यासंबंधी वित्त विभागाचा दि.19.7.2004 रोजीचा शासन निर्णय आहे. त्यामध्ये 50 टक्के महागाई भत्ता मूळ वेतनात मर्ज करुन येणारी रक्कम प्रोत्साहन भत्ता म्हणून देय नाही, असे वित्त विभागाने स्पष्ट केले आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, हे सर्व भत्ते ग्राहय धरले जातात. आपण अशाप्रकारे शिक्षकांवर अन्याय करीत आहात, त्यांना आपण संरक्षण द्यावे. प्रवास भत्ता, स्थानिक पुरक भत्ता आणि महागाई भत्ता हा मूळ वेतनात डी.पी.सह दिला जातो. परंतु याठिकाणी आपण प्रोत्साहन भत्ता देत नाहीत, हे योग्य नाही.

नंतर श्री.रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : हा प्रश्न चर्चेने सोडविणे शक्य आहे. सन्माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या दालनात सन्माननीय सदस्य, श्री.रामनाथ मोते यांना बोलावून घेऊन चर्चा करावी.

-----------------

..2...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असलेल्या डॉक्टरांना लोकसेवा आयोगाच्या लेखी परीक्षेतून सूट मिळणे

**मु. शी.** : तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असलेल्या डॉक्टरांना लोकसेवा आयोगाच्या लेखी परीक्षेतून सूट मिळणे यासंबंधी सर्वश्री रमेश निकोसे, संजय दत्त, गोविंदराव आदिक, यशवंतराव गडाख, शरद रणपिसे, जोगेंद्र कवाडे, अरविंद सावंत, मुझफ्फर हुसेन, सय्यद जामा, जितेंद्र आव्हाड, रणजितसिंह मोहिते-पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शासनाने वैद्यकीय अधिकाऱ्यांना लोकसेवा आयोगाची परीक्षा जाहीर केल्यामुळे त्यासाठी लोकसेवा आयोगाकडे सुमारे 13 हजार अर्ज येणे, सदर परिक्षेसाठी नवीन पदवीधर डॉक्टरांबरोबर सुमारे चार हजार डॉक्टरांना सदरची परीक्षा द्यावी लागत असणे, त्यामुळे नवीन पदवीधर डॉक्टरांची या परीक्षेद्वारे नियुक्ती झाल्यास गेल्या वीस वर्षापासून कार्यरत असलेल्या जुन्या डॉक्टरांवर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात, राज्यातील सुमारे 4200 अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्यासाठी राज्यभरातून आलेल्या सुमारे अडीच हजार डॉक्टरांनी दिनांक 20 नोव्हेंबर, 2006 रोजी मुंबईतील आझाद मैदानावर सुरु केलेले उपोषण आणि धरणे आंदोलन, निवासी डॉक्टरांनी या आंदोलनाला पूर्ण पाठिंबा दिल्यामुळे रुग्णालयातील अत्यावश्यक सेवा वगळता ग्रामीण रुग्णालय प्राथमिक आरोग्य केंद्र, नागरी रुग्णालयातील आरोग्य यंत्रणा विस्कळीत होणे, त्यामुळे हजारो रुग्णसेवेपासून वंचित रहात असणे, सदर प्रकारामुळे स्थानिक रुग्ण व नातेवाईकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, भीतीचे, चिंतेचे आणि असुरक्षिततेचे वातावरण याबाबतीत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची ठोस कार्यवाही, उपाययोजना आणि याबाबतची शासनाची प्रतिक्रिया"

..३...........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे ( सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------------------

..4.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, संबंधित संघटनेच्या मागण्यांबाबत शासन स्तरावर चर्चा करण्यात आली आहे. चर्चेमध्ये कोणत्या मागण्या मान्य करण्यात आल्या ? किती मागण्यांवर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार कार्यवाही सुरु करण्यात आली आहे ? लोकसेवा आयोगाने जाहीर केलेल्या लेखी परीक्षेऐवजी केवळ मुलाखत घेऊन कायमस्वरुपी सेवेत नियुक्ती देण्याबाबत शासनाने कार्यवाही केली नाही, याचे कारण काय आहे ? वैद्यकीय अधिकारी गट-अ यांना कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत शासनाने काही धोरण आखलेले आहे काय ? आदिवासी ग्रामीण क्षेत्रात नियुक्ती दिलेले बहुतांशी डॉक्टर रुजू होत नाही अथवा अल्पकाळ सेवेत राहतात. ते सेवा सोडून जातात यावर शासनाने कायम स्वरुपी उपाययोजना केली आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अनेक प्रश्न विचारले आहेत त्यांची उत्तरे देण्याचा मी प्रयत्न करतो. मेडिकल ऑफीसर क्लास 2 ही गॅझेटेड पोस्ट आहे. कोणत्याही गॅझेटेड ऑफीसरची नियुक्ती करतांना एम.पी.एस.सी.च्या माध्यमातून करावी लागते. हा प्रश्न ॲडहॉक डॉक्टरांसंबंधी आहे. 11 महिन्याच्या कॉंट्रॅक्टवर त्यांना घेण्यात येते. आता आरोग्य विभागाने एम.पी.एस.सी.कडे 1154 पदांसाठी मागणी केलेली आहे. हे करतांना बाकीचे ॲडहॉक डॉक्टर आहेत त्यांनी अशी मागणी केली आहे की, त्यांची लेखी परीक्षा न घेता डायरेक्ट मुलाखतीसाठी बोलाविण्यात यावे. एम.पी.एस.सी.ची अशी प्रोसिजर आहे की, प्रथम लेखी परीक्षा घेऊन नंतर त्याची स्क्रुटिनी होते व त्यानंतर एका पदासाठी 3 उमेदवार या पध्दतीने उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविण्यात येते. ॲडहॉक डॉक्टरांची अशी मागणी आहे की त्यांना डायरेक्ट मुलाखतीसाठी बोलाविण्यात यावे. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय स्पष्ट आहे. प्रत्येक व्यक्तिला समान संधी मिळाली पाहिजे. त्यामुळे कुणालाही डायरेक्ट शासकीय सेवेची संधी देता येणार नाही. ॲडहॉक डॉक्टरांना देखील या पदासाठी संधी आहे, त्यांनी लेखी परीक्षा देऊनच प्रयत्न करणे गरजेचे आहे.

----------------

..5......



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: दिघाळे गाव बेलापूर येथे मच्छी सुकविण्यासाठी चौथ-याची सोय उपलब्ध करुन देणे

**मु.शी.**: दिघाळे गाव बेलापूर येथे मच्छी सुकविण्यासाठी चौथ-याची सोय उपलब्ध करुन देणे यासंबंधी श्रीमती मंदा म्हात्रे, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

**(सन्माननीय सदस्या अनुपस्थित)**

----------------

..6............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :पुणे जिल्हयातील ऐतिहासिक किल्ल्याच्या पायथ्याशी छत्रपती संभाजी महाराज यांच्या आईसाहेब सईबाई यांच्या समाधीचा जिर्णोद्धार करणे

**मु. शी.** : पुणे जिल्हयातील ऐतिहासिक किल्ल्याच्या पायथ्याशी छत्रपती संभाजी महाराज यांच्या आईसाहेब सईबाई यांच्या समाधीचा जिर्णोद्धार करणे यासंबंधी श्री.उल्हास पवार, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.उल्हास पवार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सांस्कृतिक कार्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" पुणे जिल्हयातील ऐतिहासिक किल्ल्याच्या पायथ्याशी राष्ट्रवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या आईसाहेब सईबाई यांची समाधी सध्या उपेक्षित, दुर्लक्षित व उध्वस्त अवस्थेत असणे, त्यामुळे महाराष्ट्राच्या इतिहासावर आणि महाराष्ट्रावर प्रेम करणा-या जनतेच्या मनामध्ये तीव्र असंतोष पसरलेला असणे, छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्याच्या रक्षणासाठी धैर्याने बलिदान केले त्यांच्या मातोश्रीच्या समाधीचा जिर्णोध्दार करण्याच्या दृष्टीने व सुशोभीकरण करण्याच्या दृष्टीने शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना"

राणा जगजितसिंह पाटील (सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----------

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेचे निवेदन मी वाचलेले आहे. मला एवढेच म्हणावयाचे आहे की, रायगड नंतर राजगड ही छत्रपती संभाजी महाराजांच्या काळात राजधानी होती. श्री.संभाजी महाराजांच्या आईसाहेब सईबाई यांची समाधी राजगडाच्या पायथ्याला आहे. त्या ठिकाणचे सन्माननीय सदस्य, श्री.अनंतराव थोपटे तसेच पंचायत समितीचे सभापती व युवक काँग्रेसचे अध्यक्ष यांनी जिल्हाधिका-यांना निवेदन दिले होते. जिल्हाधिका-यांनी त्या जागेला भेट दिली होती. पुरातत्व विभागाकडून कोणती मान्यता घेत आहेत, हे मला माहीत नाही. परंपरेने त्या ठिकाणी चौथरा शिल्लक आहे. गडाचे आणि किल्ल्यांचे सुशोभिकरण केले जाते. आपण तेथे डागडूजी केलेली आहे. श्री.संभाजी महाराजांच्या आईसाहेब सईबाई यांच्या समाधीचा जिर्णोध्दार करावा, अशी मी अपेक्षा करतो.

राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, राजगडावर दोन समाध्या आहेत. एक समाधी गडावर आहे आणि दुसरी समाधी गडाच्या पायथ्याशी आहे. पुरातत्व विभागाचे मुख्य यांना सूचना देण्यात येईल की, ऐतिहासिक पुरावे याची माहिती घेऊन कार्यवाही करण्यात येईल. गडाच्या पायथ्याशी जी समाधी आहे तेथे भिंत बांधावयाची असेल तर ती कार्यवाही करण्यात येईल. पुरातत्व विभागाचे वरिष्ठ अधिका-याकडे चौकशी करु. ऐतिहासिक पुरावे बघून चौकशी करण्यात येईल.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, सईबाईंच्या समाधी सारखीच संभाजी महाराजांच्या समाधीची वळूज येथे वाईट अवस्था झालेली आहे. लोक वर्गणी काढून समाधीची देखभाल करतात. शासनाने संभाजी महाराजांची समाधी स्वाभीमान वाढविणारी आहे. शासन याकडे लक्ष देईल काय ?

राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, होय

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनबाबत.**

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. नियम 93 अन्वये सूचनेची निवेदने आलेली नाहीत. ती निवेदने आज होणार नसतील तर उद्या घ्यावीत.

**उपसभापती** : 93 ची निवेदने उद्या घेण्यात येतील.

--------

...3.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री.रणजित कांबळे (पाणी पुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मालेगाव झोडगे परिसरातील झोडगे, अस्ताने, लखाने गुळगुळवाढ, पळसदरे, भिलकोट, देवारपाडे या खेडयामध्ये सुरु असलेली काविळीची साथ" या विषयासंबंधी श्री.बळीराम हिरे माजी वि.प.स. यांनी दिनांक 28 मार्च, 1994 रोजी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर शासनातर्फे करण्यात आलेल्या निवेदनावर झालेल्या प्रश्नोत्तरांच्या वेळी आश्वासन दिल्याप्रमाणे माननीय सभापतींनी निदेश दिल्याप्रमाणे अधिक माहिती सभागृहासमोर ठेवीत आहे.

**उपसभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन कृपया छापावे.)

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "ठाणे व ठाणे जिल्हयातील कल्याण, उल्हासनगर, भिवंडी येथे दिनांक 14 नोव्हेंबर, 2005 रोजी वा त्या दरम्यान वीज चोरी पकडण्यासाठी घालण्यात आलेल्या धाडी" या विषयासंबंधी श्री.गुरुमुख जगवानी व इतर वि.प.स. यांनी दिनांक 15 डिसेंबर, 2005 दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर शासनातर्फे करण्यात आलेल्या निवेदनावर झालेल्या प्रश्नोत्तरांच्या वेळी आश्वासन दिल्याप्रमाणे माननीय सभापतींनी निदेश दिल्याप्रमाणे अधिक माहिती सभागृहासमोर ठेवीत आहे.

**उपसभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन कृपया छापावे.)

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...5........

प्रा.वसंत पुरके (शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मुंबई व उपनगरातील शासन मान्य महाविद्यालयातील सन 2006-2007 या शैक्षणिक वर्षातील इयत्ता 11 वीच्या प्रवेशासंबंधात" या विषयासंबंधी प्रा.शरद पाटील वि.प.स. यांनी दिनांक 14 जुलै, 2006 रोजी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर शासनातर्फे करण्यात आलेल्या निवेदनावर झालेल्या प्रश्नोत्तरांच्या वेळी आश्वासन दिल्याप्रमाणे माननीय सभापतींनी निदेश दिल्याप्रमाणे अधिक माहिती सभागृहासमोर ठेवीत आहे.

**उपसभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन कृपया छापावे.)

---------

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>औचित्त्याच्या मुद्याबाबत</u>** ....

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी औचित्त्याच्या मुद्याद्वारे आपले लक्ष एका गोष्टीकडे वेधू इच्छितो. सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करण्यात आल्याबाबत जो औचित्त्याचा मुद्दा येथे काल उपस्थित केला गेला होता त्यासंबंधात आपण आदेश दिले होते की, त्याबाबत माननीय मुख्यमंत्री उद्या, म्हणजे आज निवेदन करतील. पण अजून ते निवेदन झालेले नाही. तेव्हा त्या निवेदनाचे काय झाले ? हे निवेदन केव्हा होणार आहे ? ... मी समोरच्या आमच्या मित्रांना सांगेन की, आपण हे प्रकरण इतक्या लाईटली घेऊ नये. ...

**उपसभापती** : मुख्यमंत्रीच याबाबत निवेदन करतील असे नाही तर शासनातर्फे निवेदन याबाबत करण्यात येईल असे मी म्हटले होते. ...तेव्हा उद्या प्रश्नोत्तराच्या तासानंतर ताबडतोब या संबंधात निवेदन शासनातर्फे केले जावे इतकी सवलत आज मी सरकार पक्षाला देतो.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, उद्या प्रश्नोत्तराच्या तासानंतर हे निवेदन करण्यात येईल.

**<u>सभागृहाच्या कामकाजाबाबत</u>** ...

**उपसभापती** : माझी सभागृहाला विनंती आहे की, आता आपल्यापुढे चार विधेयके विचारार्थ आणि संमतीसाठी आहेत. आपण आज सकाळी 9.30 वाजल्यापासून काम करीत आहोत. तरीही माननीय वित्त मंत्र्यांची अशी विनंती आहे की, यातील किमान दोन तरी विधेयके, त्यातील एक सन 2006 चे वि.स.वि.कमांक 81 - राजकोषीय उत्तरदायीत्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन (सुधारणा) विधेयक संमत करून द्यावीत. तरी याबाबतीत सन्माननीय सदस्यांचे काय मत आहे ? विशेष करून सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार यासाठी सहमत असतील तर आपण ही विधेयके आता चर्चा करून संमत करू या.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आमची अडचणी ही आहे की, राजकोषीय तरतुदींसंबंधातील हे विधेयक आहे म्हणजेच महत्त्वाचे विधेयक आहे. असे महत्त्वाचे विधेयक न वाचता 'होय चे बहुमत' करून संमत आम्ही करावयाचे काय ? तेव्हा किमान माननीय वित्त मंत्र्यांनी उभे राहून सभागृहाला या विधेयक नेमके कशासाठी आणले आहे ते तरी सांगावे जेणे करून सभागृहाला त्याविषयी माहिती होऊ शकेल आणि आम्हालाही विधेयक संमत करण्यात अडचण येणार नाही.

**उपसभापती** : ठीक आहे. ..... 4के 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राजकोषीय उत्तरदायीत्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन (सुधारणा) विधेयक, 2006.

L.A. BILL NO. LXXXI OF 2006

( A BILL TO AMEND THE MAHARASHTRA FISCAL RESPONSIBILITY AND BUDGETARY MANAGEMENT ACT, 2005.)

श्री. जयंत पाटील (वित्त मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 81 - महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, 2005 यात सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 81 - महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, 2005 यात सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, या विधेयकातील आशय एवढाच आहे की, त्यातील जी प्रकाशने आहेत ती बजेटबरोबरच प्रसृत करावीत असे कायद्यात पूर्वी सूचित केलेले आहे. परंतु याबाबत अनुभव असा आला की, बजेट अधिवेशनामध्ये अधिवेशन संपण्यापूर्वी सभागृहासमोर बजेटचे काम झ ाल्यानंतर ही प्रकाशने त्यावर अधिक भर देऊन अधिक चांगल्या प्रकारे आणता येतील. म्हणजे बजेट 20-22 तारखेला मांडले जाते. आणि एप्रिलचे 10-15 दिवस त्यावर चर्चा होते तितके दिवस आपल्याला या प्रकाशनांसाठी अधिक मिळतात आणि मग त्या प्रकारची माहिती ही योग्य प्रकारे आपल्याला पटलावर ठेवता येईल. आपल्या यापूर्वीच्या म्हणजे सध्याच्या कार्यपद्धतीनुसार बजेटच्या दिवशीच बजेटसह ही सारी प्रकाशने सभागृहासमोर ठेवावी लागतात. परंतु ते काम ओव्हरलॅपिंग होत असल्याने ते बजेटनंतर ठेवण्याची अनुमती याद्वारे मागतो आहेत. त्यासाठीच हे विधेयक आणलेले आहे, इतकाच त्यात बदल आपण केलेला आहे. तरी माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी या विधेयकास संमती द्यावी.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

...... 4के 3 ...



KBS/ KGS/ KTG/ श्री. बोरले नंतर --- 17:45

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे, आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन् 2006 चे वि.स.वि.क्रमांक 81 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 81 संमत झाले आहे.

***

( यानंतर श्री.सरफरे .....4एल 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वि.स.वि.क्र. 96 बाबत**

श्री. जयंत पाटील (अर्थ मंत्री) : सभापती महोदय, सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 96 - महाराष्ट्र लॉटऱ्यांवरील कर विधेयक उद्या सकाळी चर्चेकरीता घ्यावे अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** : ठीक आहे. सन 2006 चे विधान सभा विधेयक क्रमांक 96 उद्या घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : मंत्रिमहोदय, आपणास आता सवय झाली आहे की, सभागृहामध्ये पाच मिनिटांकरीता यायचे आणि विधेयक मंजूर करुन निघून जायचे...

श्री. जयंत पाटील : मी उद्या सभागृहामध्ये यायला तयार आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता (सुधारणा) विधेयक

**L.A. BILL N0. XCI OF 2006**

**( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LOCAL AUTHORITY MEMBERS' DISQUALIFICATION ACT, 1986.)**

श्री. राजेश टोपे (नगर विकास राज्यमंत्री) :: सभापती महोदय,विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 91 महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, 1986 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 91 महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, 1986 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, सद्याच्या अधिनियमामध्ये अशी तरतूद आहे की, जे स्थानिक प्राधिकरण आहे त्याठिकाणी सदस्यांची संख्या 20 असेल, उदाहरणार्थ जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती असेल तर त्याठिकाणी एकूण सदस्य संख्येच्या 50 टक्के सदस्य फुटून जाऊ शकतात अशाप्रकारची तरतूद आहे . त्याठिकाणी 20 पेक्षा जास्त सदस्य असतील किंवा 33 पेक्षा जास्त सदस्य असतील तर त्याठिकाणी फुटून जाण्याची तरतूद विधेयकात आहे. फुटून जाणे म्हणजे वेगळा गट करणे असा त्याचा अर्थ आहे . संविधानाच्या 91 व्या दुरुस्तीच्या माध्यमातून केंद्राने पक्षांतर बंदीचा जो कायदा संमत केला आहे, तो खऱ्या अर्थाने पक्षांतर बंदीला प्रतिबंध करण्यासाठी कायदा संमत झाला आहे. त्या कायद्याशी सुसंगत अशाप्रकारे स्थानिक प्राधिकरण सदस्य अपात्रता व पक्षांतर बंदीची तरतूद यामध्ये केली आहे. त्यामुळे त्यामध्ये असलेला "फूट" हा शब्द वगळून त्याठिकाणी दोन तृतियांश सदस्यांना मत द्यावयाचे असेल तर त्यासाठी तरतूद ठेवली आहे. म्हणून माझी सभागृहाला विनंती आहे की, जो अध्यादेश काढण्यात आलेला आहे त्याचे कायद्यामध्ये रुपांतर करण्यासाठी हे विधेयक सभागृहापुढे आणले आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये विधेयक मांडले आहे, त्या संदर्भात मला दोन गोष्टीसंबंधी माहिती हवी आहे. यामध्ये 20 पेक्षा जास्त सदस्य असतील तर त्याठिकाणी वनथर्ड धरावे, आणि 20 पेक्षा कमी असतील तर ते टू थर्ड धरावे असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय?

(माननीय मंत्री श्री. राजेश टोपे बसून बोलतात.)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या विधेयकामधील सहावा क्लॉज महत्वाचा असल्यामुळे हे विधेयक आपण उद्या चर्चेकरीता घ्यावे अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** : ठीक आहे, या विधेयकावरील चर्चा उद्या घेण्यात येईल.

श्री. हसन मुश्रीफ (विधी व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 82 - फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक हे छोटेसे मर्यादित असल्यामुळे ते आता संमत करण्यात यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : अगोदरचे बील पूर्ण झालेले नाही. सन्माननीय सदस्य श्रीगुरुनाथ कुलकर्णी ऑन लेग आहेत, त्यामुळे मधेच दुसरे बील घेता येणार नाही.

आता सभागृहाची बैठक स्थगित होत आहे. गुरूवार दिनांक 14 डिसेंबर 2006 रोजी सकाळी 10-00 ते 11-45 वाजेपर्यन्त शासकीय विधेयके घेण्यात येतील व त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12-00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 55 मिनिटांनी गुरूवार दिनांक 14 डिसेंबर, 2006 रोजीच्या सकाळी 10-00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही